MAMAR 2.4

# एम. ए. (मराठी)

## सत्र - II

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम

# कालखंडाचा अभ्यास (१६०० ते १८१८)

# STUDY OF PERIODS (1600 TO 1818)

© UNIVERSITY OF MUMBAI

**प्रा. रवींद्र कुलकर्णी**
कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. डॉ. अजय भामरे**
प्र-कुलगुरू,
मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रा. शिवाजी सरगर**
संचालक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

**प्रकल्प समन्वयक :** **प्रा. अनिल आर. बनकर**
सहयोगी प्राध्यापक,
कला व मानव्यविद्या शाखा प्रमुख,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अभ्यास समन्वयक व संपादक :** **प्रा. मनिषा बनकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र (सी. डी. ओ. ई),
मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**लेखक :** **डॉ. प्रमोद पडवळ**
मराठी विभाग प्रमुख,
बनारस हिंदू विद्यापीठ (केंद्रीय विद्यापीठ),
वाराणसी.

: **डॉ. ज्ञानेश्वर भोसले**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
श्री. पी. एल. श्रॉफ कला, वाणिज्य महाविद्यालय,
चिंचणी, ता. डहाणू, जि. पालघर.

: **डॉ. राजेंद्र महादू आचार्य**
मराठी विभाग,
डी. बी. तटकरे महाविद्यालय,
माणगांव, जि. रायगड.

: **प्रा. प्रिया नेरलेकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
साकेत कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,
साकेत कॅम्पस रोड,
चिंचपाडा रोड, कल्याण - पूर्व.

**मार्च २०२५, प्रथम मुद्रण, ISBN : 978-93-6728-069-0**

**प्रकाशक**
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०००९८.

**अक्षरजुळणी**
मुंबई विद्यापीठ मुद्रणालय,
सांताक्रुझ, मुंबई

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | घटकाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| घटक १अ | १अ. कालखंडाचा अभ्यास स्वरूप व संकल्पना | डॉ. प्रमोद पडवळ | ०१ |
| घटक१आ | १आ. शिवकाल : समाज व संस्कृती | डॉ. प्रमोद पडवळ | ११ |
| घटक १इ | १इ. पेशवेकाल : समाज व संस्कृती | डॉ. प्रमोद पडवळ | २२ |
| घटक२अ | २अ. शिवकालीन संप्रदाय | डॉ. ज्ञानेश्वर भोसले | ३४ |
| घटक २आ.१ | २आ.१ शिवकालीन साहित्य | डॉ. राजेंद्र आचार्य | ६० |
| घटक २आ.२ | २आ.२ शिवकाळातील पंडिती काव्य | डॉ. राजेंद्र आचार्य | १०२ |
| घटक २आ.३ | २आ.३ शिवकाळातील शाहीरी वाङ्मय, | डॉ. राजेंद्र आचार्य | ११८ |
| घटक २इ१ | २इ.१वारकरी संप्रदाय परिचय<br>(कालखंड १६००-१८१८) | प्रा. प्रिया नेरलेकर | १३४ |
| घटक २इ२ | २इ.२समर्थ संप्रदाय परिचय<br>(कालखंड १६००-१८१८) | प्रा. प्रिया नेरलेकर | १५१ |

**Format of syllabus**

**Progamme Name : M.A.Marathi** **Course Name : कालखंडाचा अभ्यास (१६०० ते १८१८)**

**Study of Periods (1600 to 1818)**

**Course code** : **51411**

**Total Credits : 02** **Total Mark :50**

**University assessment : 25** **College assessment : 25**

**Course Objective**

१) शिवकाल आणि पेशवेकालाचे सामाजिक आणि सांस्कृतिक स्थितीगती जाणून घेणे .

२) शिवकाल आणि पेशवेकाळातील साहित्याचा शोध घेणे.

३) शिवकाल आणि पेशवेकालातील मराठीच्या भाषा आणि साहित्याच्या निर्मितीमागील तत्त्वज्ञानाचा आणि सांप्रदायिक विचारांचा शोध घेणे.

४) पंथीय साहित्य आणि शाहिरी काव्य यांचा अभ्यास करणे.

**Course Outcomes**

१) शिवकाल आणि पेशवेकाळातील सांस्कृतिक स्थितीगती ज्ञात होईल .

२) शिवकाल आणि पेशवेकालातील गद्य आणि पद्य साहित्याचे महत्त्व अधोरेखित होईल.

३) वारकरी आणि समर्थ संप्रदायाच्या साहित्याची ओळख होईल.

४) शाहिरी आणि लावणी या साहित्याचे आकलन होईल.

**MODULE –I**(श्रेयांकने २, व्याख्याने ३०)

घटक १

अ ) कालखंडाचा अभ्यास स्वरूप व संकल्पना

आ) शिवकाल : समाज व संस्कृती.

इ) पेशवेकाळ : समाज व संस्कृती.

घटक २

अ) शिवकालीन संप्रदाय

आ) शिवकालीन साहित्य

इ) वारकरी व समर्थ संप्रदाय परिचय.

**परीक्षा पद्धती :**

अ) अंतर्गत परीक्षा– एकूण गुण २५

१) १0 – १0 गुणांसाठी दोन अंतर्गत परीक्षा

२) उपस्थिती, सादरीकरण आणि उपक्रमांमधील सहभाग : 0५ गुण

आ) सत्रान्त परीक्षा-एकूण गुण २५

१) घटक १ , २ यावर आधारित पर्यायासह १५ गुणांसाठी एक दीर्घोत्तरी प्रश्न.

२) घटक १ , २ यावर आधारित पर्यायासह १० गुणांसाठी दोन टिपा (चारपैकी दोन).

**संदर्भ ग्रंथसूची**


१. आचार्य, मा. ना. ; ज्ञानमयूरांची कविता, पुष्पा प्रकाशन, पुणे.

२. केतकर, श्री. व्यं.; महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९६४ (दु० आ०).

3. जोग, रा. श्री.; मराठी वाङ्मयाभिरुचीचे विहंगमावलोकन, पुणे विद्यापीठ, पुणे, १९५९.

४. जोग, रा. श्री.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड ३, (१६८१ ते १८००) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७३.

५. तुळपुळे, शं. गो.; पाच संतकवी, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९८४ (तृ० आ०).

६. तुळपुळे, शं. गो.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १, (आरंभ ते १३५०) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.१९८४.

७. देशमुख, उषा मा.; कालखंडाचा अभ्यास, मुंबई विद्यापीठ, मराठी विभाग आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे,

८. नसिराबादकर, ल. रा.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर, १५ ०५.

९. पाध्ये, दिगंबर; साहित्य, समाज आणि संस्कृती, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि लोकवाङ्मय गृह, मुंबई, १९९८.

१०. फाटक, न. र.; एकनाथ: यक्ती आणि वाड्मय, मौज प्रकाशन, मुंबई, १९६३.

११. बडवे, नानासाहेब, एकनाथांची भारूडे, भाग १. श्रीएकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद, १९६८.

१२. बडवे, नानासाहेब एकनाथांची भारूडे, भाग २, श्रीएकनाथ संशोधन मंदिर, औरंगाबाद, १९७८.

१३. भावे, वि. ल., महाराष्ट्र सारस्वत, खंड १, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३ (स०आ०).

१४. भावे, वि. ल.; महाराष्ट्र सारस्वत, खंड २, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३ (स०आ०).

१५. भिंगारे, ल. म.; मुक्तमयुरांची महाभारते, मराठवाडा साहित्य परिषद, हैद्राबाद, १९५६.

१६. मालशे, स. गं.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, भाग १, (१३५० ते १६८०) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२.

१७. मालशे, स. गं.; मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड २, भाग २, (१३५० ते १६८०) महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९८२.

१८. शेणोलीकर, ह. श्री.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, १९७१.

१९ . सरदार, गं. बा.; संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, १९७० (ति० आ०)..

२०. साखरे, नानामहाराज, सकलसंतगाथा, खंड १ ते ३, वरदा प्रकाशन, पुणे, १९६७.

# घटक १अ

## १अ. कालखंडाचा अभ्यास स्वरूप व संकल्पना

**घटक रचना**

१अ.० उद्दिष्टे

१अ.१ प्रास्ताविक

१अ.२ कालखंडाची संकल्पना

१अ.३ कालखंडाच्या अभ्यासाची गरज

१अ.४ कालखंड निश्चितीच्या प्रेरणा

१अ.५ साहित्यकार आणि रचनाकृतींचे कालखंडात्मक आकलन

१अ.६ विशिष्ट कालखंड : वाङ्मयनिर्मिती

१अ.७ वाङ्मय प्रवाह आणि प्रवृत्ती

१अ.८ कालखंड अभ्यासाची काही वैशिष्ट्ये

१अ.९ वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि स्वरूप

१अ.१० कालखंडाचा अभ्यास आणि वाङ्मयेतिहास यांचे साहचर्य

१अ.११ वाङ्मयेतिहास आणि कालखंडानुसार वाङ्मय अभ्यास अनुबंध

१अ.१२ समारोप

१अ.१३ संदर्भग्रंथ सूची

१अ.१४ सरावासाठी प्रश्न

### १अ.० उद्दिष्टे

१. 'कालखंड' या संज्ञेचे स्वरूप समजून घेता येईल.

२. कालखंड निर्धारित करणारे विविध पैलू माहीत होतील.

३. विद्यार्थ्यांना कालखंड निश्चितीच्या प्रेरणा समजतील.

४. वाङ्मयेतिहासाच्या संकल्पनेचे आकलन होईल.

## १अ.१ प्रास्ताविक

साहित्य ही समाजाची कलापूर्ण अभिव्यक्ती त्याचबरोबर त्या त्या समाजाचे सांस्कृतिक संचितही असते. व्यक्तिपरत्त्वे वाचनाचा उद्देश बदलत असतो. ज्ञान मिळविणे, आस्वाद घेणे, समीक्षा करणे, आनंद मिळविणे त्याचबरोबर तत्कालीन काळाला त्या काळाची वैशिष्ट्ये जाणून घेण्यासाठी साहित्याचे वाचन केले जाते. प्रस्तुत घटकात कालखंडाचा अभ्यास ही संकल्पना जाणून घ्यावयाची आहे. 'कालखंड' ही व्यापक आणि व्यामिश्र संकल्पना आहे. वाङ्मयीन कालखंडाचा अभ्यास असे म्हणत असताना याठिकाणी 'कालखंडा'च्या संकल्पनेचा अर्थ बदलतो.

## १अ.२ कालखंडाची संकल्पना

'काल' हा शब्द वेळ, प्रसंग या अर्थाने वापरला जातो. या शब्दातून एक विशेष बोध होतो. 'काल' ही अशी नैसर्गिक क्रिया आहे जी अखंड आणि निरंतर चालत असते. 'काल अनादि व अनंत आहे' हे विधान सतत कानावर पडत आलेले असल्याने चांगलेच परिचयाचे आहे. जीवन आणि सृष्टीचे रहस्य समजून घेण्यासाठी त्याविषयीचे ज्ञान विकसित करण्यासाठी मानवाने आकलनाच्या विविध पद्धती विकसित केल्या. त्यामुळे मनुष्याला 'काल' आणि 'कालखंड' यांच्याशी संबंधित विविध शाखांतील संदर्भ जाणून घेणे सहजसाध्य झाले. यातूनच काळाची मोजणी सुरू झाली. त्या आधारे काळाचे भाग कल्पिले गेले. डॉ.द.दि. पुंडे म्हणतात, ' काल' ही जरी अखंड अप्रतिहत वस्तुस्थिती असली तरी कालगणनेमुळे काळाचे खंड कल्पिता येणे शक्य झाले. निसर्गनिर्मित किंवा मानवनिर्मित एका घटनेपासून कोणत्याही दुसऱ्या घटनेपर्यंतचा कालप्रवाह म्हणजे कालखंड. 'कालगणन' शास्त्रामुळे कालखंडाच्या विस्तार-संकोचांचे निश्चित मोजमाप घेणे शक्य झालेले आहे. मुख्य म्हणजे कालगणन शास्त्रामुळे दोन घटनांमधील अंतराबरोबरच त्या दोन घटनांचा अनुक्रम म्हणजे पौर्वापर्यही सांगणे शक्य झालेले आहे. यावरूनच हेही ध्यानात येईल की कालखंड ही संकल्पना जितकी नैसर्गिक असेल, तितकीच ती तार्किक, कृत्रिम व हेतुसापेक्ष असते. सर्व प्रकारचे मानवी इतिहास हे मानवी घटितांची व्यवस्था लावू पाहणारे इतिहास असल्याने इतिहासामधील कालखंड हे सृष्ट्य किंवा नैसर्गिक असण्यापेक्षा कल्पित, तार्किक किंवा हेतुसापेक्षच अधिक असणार हे स्पष्टच आहे. वाङ्मयेतिहासही या कालखंडाच्या हेतुसापेक्षतेला अपवाद नाही. यामुळेच 'वाङ्मयेतिहासामध्ये कालखंड कसे मानावेत', हा वादविषय होऊ शकतो. अगदी शुद्ध वाङ्मयीन घटितांच्या आधारे एखाद्या वाङ्मयेतिहासामधील कालखंड मानायचे म्हटले तरी वाद होऊ शकतो. सारांश हा की, वाङ्मयाच्या इतिहासात कालखंड हे मानावयाचे असतात, ते आपोआप पडणारे नसतात. अर्थातच वाङ्मयाच्या इतिहासातील कालखंड मानण्याची गमके निश्चित करण्याची वाङ्मयेतिहासकारावर जबाबदारी येऊन पडते.

(वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, संपा.डॉ.उषा मा. देशमुख, पृ.७) वरील विवेचनातून 'कालखंड'संकल्पनेवर प्रकाश पडलेला आहे.

'कालखंड' ही संकल्पना तत्त्वज्ञान, ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, गणित, इतिहास इ. क्षेत्रांत वापरली जाते. प्रत्येक क्षेत्रानुसार याचे अर्थ वेगवेगळे आहेत. समाजविज्ञान आणि मानव्य

विद्याशाखांमध्ये 'कालखंड' ही संकल्पना मानवी जीवनाच्या अवस्थांतरांचे आकलन करून घेण्यासाठी वापरली जाते. तत्त्वज्ञानामध्ये काल ही संज्ञा 'शाश्वती' या अर्थाने आलेली आहे. तर शास्त्रामध्ये ही 'महाकाव्य' आणि 'खंडकाव्य' अशा भेदांच्या अर्थाने वापरली गेलेली आहे. इतिहासशास्त्रात ही संज्ञा 'गणक' म्हणून वापरलेली आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रात 'कालखंड' ही संकल्पना वाङ्मयाचा गतकालीन अभ्यास करताना आवश्यक ठरते. त्याआधारे वाङ्मयाचा अभ्यास सोयीचा आणि अधिक सटीक होण्यास मदत होते.कालखंड या संकल्पनेचा वाङ्मयाच्या अनुषंगाने विचार करत असताना 'वाङ्मय इतिहास' ही संकल्पना पुढे येते. आज वाङ्मयाच्या अभ्यासाची स्वतंत्र शाखा म्हणून ती विकास पावलेली आहे. एखाद्या भाषेच्या प्रारंभ काळापासूनच्या विकास टप्प्यांचा, महत्त्वपूर्ण घडामोडींचा अभ्यास यात होत असतो. काळानुरूप साहित्य निर्मितीत होणारे परिवर्तन आणि या परिवर्तनामागची कारणमीमांसा याचा शोध वाङ्मयाचा इतिहासाचा अभ्यास करत असताना घेतला जातो.

## १अ.३ कालखंडाच्या अभ्यासाची गरज

मनुष्याला आसपासचा परिसर, निसर्गातील वैविध्य जाणून घेण्याची नेहमीच जिज्ञासा राहिलेली आहे. निसर्गातील रहस्य जाणून घेणे, ज्ञान प्राप्त करून घेणे आणि आकलन करून घेणे मानवासाठी औत्सुक्याचे व अनन्य साधारण महत्त्वाचे वाटत आलेले आहे. हे सर्व समजून घेण्यासाठी कालखंडाचा अभ्यास आवश्यक ठरतो. काळाचा पट विशाल व अमर्याद आहे. विशिष्ट घटकाला प्रमाण मानून त्याचे विभाग करणे गरजेचे असते. कालखंडाचा अभ्यास सर्व क्षेत्रांत महत्त्वाचा असला तरी ज्ञानक्षेत्रात त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. साहित्याच्या क्षेत्रात हा अभ्यास नवे आकलन पुढे आणणारा असतो.

## १अ.४ कालखंड निश्चितीच्या प्रेरणा

कालखंड निश्चिती प्रामुख्याने आकलन सुलभतेसाठी होते. अभ्यासक ज्या क्षेत्राशी संबंधित असतात त्या अनुषंगाने ते कालखंड निश्चितीच्या प्रेरणा ठरवतात. थोडक्यात त्या त्या क्षेत्राच्या गरजेनुसार प्रेरणा ठरवल्या जात असतात. कोणत्याही क्षेत्रातील विभिन्न व्यवहारांच्या व ज्ञानाच्या उपयोजनेच्या दृष्टीने जरी क्षेत्रनिहाय कालखंड निश्चितीच्या प्रेरणा ठरत असल्या तरी कल्पिलेला कालखंड मानवी इतिहासाला केंद्रवर्ती ठेवणाराच असतो. कालनिश्चितीसाठी आजवर मुख्यतः सामाजिक व राजकीय घडामोडींना प्राधान्य दिले गेलेले आहे. विशिष्ट परिसर, खंड यातील प्रभावित करणाऱ्या मानवी स्थित्यंतरानुसार वा विकासानुसार बरेचदा हा कालखंड निश्चित करण्यात येतो. सामाजिक शास्त्रे आणि मानवविद्या या अभ्यास शाखांमध्ये अशा प्रकारच्या कालनिश्चितीला महत्त्व दिले गेल्याचे दिसून येते.

साहित्य क्षेत्रातील कालखंड निश्चितीच्या प्रेरणांचा विचार करताना सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील विलक्षण परिणामकारक घडामोडी या प्रेरणा मानल्या जातात. या व्यतिरिक्त काही अन्य प्रभावी घटकसुद्धा प्रेरणा म्हणून मानले जातात. त्या त्या भाषेतील महत्त्वाचे साहित्यिक कालखंड निर्मितीच्या प्रेरणा ठरत असतात. उदा. शेक्सपिअर ऐज(युग), चिपळूणकर पर्व, केशवसुत पर्व, फडके-खांडेकर युग, मर्ढेकर कालखंड, भारतेंदू हरिश्चंद्र युग, याशिवाय अतिशय परिणामकारक व नाविन्यपूर्णता घेऊन आलेली एखादी

साहित्यकृती हीदेखील प्रेरणा ठरू शकते. उदा. 'पण लक्षात कोण घेतो?', 'कोसला' इत्यादी साहित्यकार आणि साहित्यकृती जसे कालनिश्चितीच्या प्रेरणा ठरतात, तसेच वाङ्मयीन प्रवृत्तीदेखील स्वतंत्ररित्या कालखंड कल्पिण्यास साहाय्यभूत ठरते. कालखंड निश्चितीसंदर्भात वर ज्या प्रेरणांचा उल्लेख केला आहे त्यातील कोणती प्रेरणा अधिक सर्वमान्य असावी याबाबतीत विद्वानांमध्ये मतमतांतरे असली तरी वाङ्मयीन प्रवृत्तींचा वाङ्मय प्रकारानुरूप कालखंड वाचून निश्चित करणे अधिक सयुक्तिक ठरू शकते, हे मत सर्वमान्य आहे. कालखंड ठरवताना त्याचा उगम, विकास आणि पूर्णविराम अपेक्षित असतो. मात्र साहित्याच्या प्रांतात एखादी सामाजिक घटना, राजकीय घडामोडी, एखादा लेखक अथवा विशेष साहित्यकृती गृहीत धरून प्रेरणा निश्चित केली जाते. तरीही कालखंड हा सुटा-सुटा नसतो. 'काळ' ही निरंतर गतीशील प्रक्रिया आहे. काळाच्या विस्तृत पटलावर अनेक गोष्टी घडत असतात त्यांतील जास्तीत जास्त प्रभावित करणारी घटना प्रेरणेच्या रूपाने अधोरेखित होत असते.

## १अ.५ साहित्यकार आणि रचनाकृतींचे कालखंडात्मक आकलन

एकूणच वाङ्मयीन व्यवहारात साहित्यिक आणि त्याची रचनाकृती हे दोन महत्त्वाचे घटक असतात. हे दोन्ही घटक ज्या कालखंडातील असतात त्या काळातील ज्ञानाची उपलब्धता आणि घटनांनी, प्रसंगांनी ते प्रभावित असतात. कालखंड निश्चितीच्या प्रेरणा आणि प्रत्यक्ष वाङ्मयीन घटक हे दोन्ही परस्परपूरक असतात. हे दोन्ही एकमेकांवर निर्भर असतात. साहित्यकाराला प्रमाणभूत मानून कालखंड निश्चित केला तर संबंधित साहित्यकाराच्या साहित्य कर्माची प्रभावशीलता पाहिली जाते. साहित्यकाराच्या अभिव्यक्तीतील मूल्ये पाहिली जातात. साहित्यिकाप्रमाणेच एखाद्या कलाकृतीला प्रमाण मानून वाङ्मयीन कालखंडाची निश्चिती केली तर त्या कलाकृतीची कलापूर्णता आणि त्यातून प्रकट होणाऱ्या जीवनसंदर्भांची प्रासंगिकता केंद्रवर्ती असते. साहित्यिक आणि साहित्यकृती ज्या काळाची अपत्ये असतात त्या काळाचा प्रभाव त्यांच्यावर असतो. तत्कालीन सामाजिक पर्यावरणाचा ते भाग असतात. आसपासच्या घडामोडींचा त्यांच्यावर परिणाम होत असतो.

## १अ.६ विशिष्ट कालखंड : वाङ्मयनिर्मिती

विशिष्ट कालखंडात साहित्य निर्मितीचे आणि साहित्य व्यापाराचे विशिष्ट केंद्र कार्यरत असते. कालखंड बदलला की ही केंद्रे बदलतात. मराठी साहित्याच्या आरंभी महानुभाव काळात ऋद्धीपूर व पैठण ही साहित्य व्यवहाराची केंद्रस्थाने होती. कालांतराने ही केंद्रे पुणे, मुंबई या ठिकाणी स्थानांतरित झाल्याचे दिसून येते. मराठी कादंबरी बहरत असताना कथा या साहित्य प्रकाराने बाळसे देखील धरले नव्हते. एकाच कालखंडातील विविध वाङ्मय प्रकार असमान विकास पावलेले आढळतात म्हणून वाङ्मय प्रकारानुसार कालखंड मानण्यात अडथळे निर्माण होतात.

## १अ.७ वाङ्मयप्रवाह आणि प्रवृत्ती

कालखंड मानताना वाङ्मयीन प्रवाहाची प्रवृत्ती पाहिली जाते. प्रवृत्ती पाहून केलेला वाङ्मय अभ्यास जास्त फायदेशीर ठरतो. ह.ना. आपटे यांच्या कथा, कादंबऱ्या पाहता कादंबरीकार

म्हणून हरिभाऊ श्रेष्ठ वाटतात. त्यांच्या लघुकथा किंवा स्फुटकथांना म्हणावे तशी लोकप्रियता मिळालेली दिसत नाही. म्हणजेच वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास काललक्ष्यी असतो. विशिष्ट कालखंड आणि त्यामध्ये निर्माण झालेले वाङ्मय यांचा आंतरिक संबंध शोधणे ही प्रवृत्ती यातून दिसते. वाङ्मय प्रवाहाचे कालखंड मानून त्यातून वाङ्मयीन प्रवृत्तीचा शोध घेता येतो.

## १अ.८ कालखंड अभ्यासाची काही वैशिष्ट्ये

अ. मानवनिर्मित किंवा निसर्गनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतच्या कालप्रवाहाला 'कालखंड' असे म्हटले जाते.

आ. ज्योतिषशास्त्र, खगोलशास्त्र, इतिहास, गणित, तत्त्वज्ञान या व अशासारख्या क्षेत्रात 'कालखंड' या संकल्पनेचा समावेश होतो.

इ. वाङ्मयाच्या कालखंडाच्या अभ्यास 'काललक्ष्यी अभ्यास असतो. विशिष्ट कालखंड आणि त्यामध्ये निर्माण झालेले साहित्य यांच्यातील आंतरसंबंधांचा शोध घेतला जातो.

ई. कालखंडाच्या अभ्यासात वाङ्मयीन स्थित्यंतरे, वाङ्मयीन परंपरा आणि नवता यांच्या क्रिया प्रतिक्रियांचा वाङ्मयाशी निगडित अभ्यास करता येतो.

उ. कालखंडाचा अभ्यास करताना साहित्यकृती, लेखक साहित्यप्रकार यांचा अभ्यास केलेला असतो.

ऊ. कालखंडाचा अभ्यास करताना त्या काळातील युगधर्म समजून घेणे ही त्या काळाच्या अभ्यासाची पूर्व अट असते. त्यामुळे तेन यांनी साहित्यकृती ही 'काळ', 'समाज' आणि 'परिवेश' यांची निर्मिती असते; असा सिद्धांत मांडलेला आहे. विशिष्ट कालखंडाच्या अभ्यासात युगधर्म आणि साहित्य यांच्यातील नाते शोधण्यावर भर दिलेला असतो. वारकरी पंथ, महानुभाव पंथ यांच्या साहित्यातून प्रकट झालेली अध्यात्माची शिकवण हा युगधर्मच आहे.

ए. वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास करताना भौतिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैयक्तिक, राजकीय घटनांचा विशिष्ट काळातील वाङ्मयावरील प्रभाव संस्कार यांचाही अभ्यास करावा लागतो.

ऐ. इतिहासाची क्षेत्र मर्यादा, काळमर्यादा लक्षात घेऊन त्या काळातील, क्षेत्र चौकटीतील साहित्यरूपांचा अभ्यास कालखंडाच्या अभ्यासाद्वारे करता येणे शक्य आहे.

ओ. वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, धर्मशास्त्र या व अशासारख्या अन्य शाखेच्या अभ्यासकांनाही लाभदायक ठरत असतो.

## १अ.९ वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि स्वरूप

द.दि.पुंडे यांनी वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि त्यासंदर्भातील विविध पैलूंचे मौलिक विवेचन केलेले आहे. त्यांनी म्हटले आहे, 'एका विशिष्ट भाषेतील आरंभ काळापासून विद्यमान काळापर्यंतच्या समग्र वाङ्मयकृतींचा आणि वाङ्मयीन घडामोडींचा एक विशिष्ट वाङ्मयीनसंबद्ध दृष्टिकोन घेऊन केलेला परंपराधिष्ठीत ऐतिहासिक अभ्यास म्हणजे वाङ्मयेतिहास.' अशी वाङ्मयेतिहासाची व्याख्या करता येईल. वाङ्मयेतिहासही वाङ्मयाच्या अभ्यासाची स्वतंत्र पद्धती आहे. वाङ्मयनिर्मितीच्याप्रेरणा-प्रवृत्तींची, वाङ्मयाच्या प्रसृतीची आणि प्रभाव- परिणामांची कालसंगत अशी जाणीव प्रस्थापित करणे, हे वाङ्मयेतिहासाचे प्रधान उद्दिष्ट असते. वाङ्मय ही शेवटी मानवाचीच एक कृती आहे. त्यामुळे एका विशिष्ट मानव समूहाचा त्याच्या स्वतःच्या वाङ्मयाद्वारे होत जाणारा आविष्कार कालक्रमानुसार टिपणे आणि स्पष्ट करणे अशाही रीतीने वाङ्मयेतिहासाचे कार्य स्पष्ट केले जाते.'(वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, उषा मा. देशमुख, पृ.७ )वरील विवेचनावरून वाङ्मयेतिहासाचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते.

वाङ्मयेतिहासातही कालखंड असतात. हे कालखंड मानवकृत असतात. कालखंड ही संकल्पना जितकी नैसर्गिक असेल, तितकीच ती तार्किक आणि कृत्रिम हेतुसापेक्षही अधिक असणार, हे स्पष्टच आहे. वाङ्मयेतिहासही हे कालखंडाच्या हेतुसापेक्षतेला अपवाद नाही, असे असल्यामुळे कालखंडाची निश्चिती करणे ही वाङ्मयेतिहासाचे लेखन करणाऱ्यांची जबाबदारी असते. वाङ्मयेतिहासाचे स्वरूपदेखील यानुसारच ठरते. वाङ्मयेतिहास लिहिताना कोणता दृष्टीकोन आणि वाङ्मयेतिहासाचे घटक केंद्रस्थानी ठेवतो, यावर अवलंबून असते. वाङ्मयप्रवाह, प्रवृत्ती, प्रकार याद्वारे की वाङ्मयावर प्रभाव पडणाऱ्या वाङ्मयाचे बाहेरील घटकांद्वारा (सामाजिक, आर्थिक, राजकीय घडामोडी इ.) लेखन करायचे, यावर ते निश्चित करण्यात येते. त्याद्वारा हे लेखन होते.

वाङ्मयाचा इतिहास लिहिताना व अभ्यास करताना कालखंड निश्चित केले जातात. द.दि.पुंडे लिहितात, 'वाङ्मयविद्येच्या संदर्भात म्हणजेच वाङ्मयाच्या संदर्भातदेखील 'कालखंड' ही संज्ञा इतिहास शास्त्रातल्या प्रमाणेच एक गणन पद्धती म्हणून वापरलेली जाताना दिसते. 'कालखंड' ही संज्ञा वाङ्मय अभ्यासामध्ये प्रामुख्याने वाङ्मयेतिहासाशी निगडित असल्याचे दिसते.' प्रा.सीताराम रायकर यांनी म्हटले आहे, 'वाङ्मयेतिहास' वाङ्मय – अभ्यास (literary studies) या विद्याशाखेची (discipline) एक उपशाखा आहे, या दृष्टिकोणातून आपण वाङ्मयेतिहासाकडे पाहिले पाहिजे, असे विधान मी केले आहे, याचा अर्थ आता पुरेसा स्पष्ट झाला असेल. अशा दृष्टिकोणातून लिहिलेला म्हणजेच सांस्कृतिक अभ्यासाच्या (cultural studies) अंगाने समग्रलक्षी असलेला वाङ्मयेतिहास लिहायचा असेल तर काही संबंधित क्षेत्रांतही भरीव कामगिरी झालेली असणे आवश्यक असते. ज्याला रूढार्थाने आपण इतिहास म्हणतो तसा इतिहाससुद्धा आपल्याला सलगपणे उपलब्ध नाही. महाराष्ट्राच्या इतिहासातील काही कालखंडांवर, उदा. शिवाजीमहाराजांचा जन्म ते पेशवाई- अखेर या काळावर, बरेच संशोधन, मौलिक वैचारिक लेखन झालेले आहे. तुलनेने त्या आधीच्या काळावर म्हणजे निदान ज्ञानेश्वर ते शिवाजी या काळावर कमी काम झाले आहे. आर्थिक इतिहासाच्या क्षेत्रात तरी अजून प्राथमिक अवस्थाच दिसते. सामाजिक-सांस्कृतिक इतिहासाच्या बाबतीत काही अभ्यासग्रंथांचे अपवाद आहेत. उदा. शं. बा. जोशी यांचे

मऱ्हाटी संस्कृती, डॉ.रा.चिं. ढेरे यांची संतसाहित्य – लोकसाहित्य, श्री विठ्ठल एक महासमन्वय, लज्जागौरी, चक्रपाणी, इत्यादी पुस्तके, द.ग.गोडसे यांची पोत, लोकधाटी, शक्तिसौष्ठव इत्यादी पुस्तके. यात व तेथे उल्लेख न केलेल्या अशा प्रकारच्या पुस्तकांमध्ये ज्या सांस्कृतिक धोरणामध्ये वाङ्मयनिर्मिती होत असते, त्याचे तपशील गोळा केलेले आहेत, व काही वेळा त्यांचे वाङ्मयाशी असलेले अनुबंध उलगडून दाखवले आहेत. वाङ्मयरूपे, वाचक आणि लेखक यांचे संबंध, इत्यादी वाङ्मयचर्चेच्या दृष्टीने महत्त्वाच्या बाबींवर प्रकाश टाकणारी सामग्री अशा पुस्तकात आहे.' (वाङ्मयेतिहासची संकल्पना, संपा. द.दि.पुंडे, लेखक सीताराम रायकर, पृ.८६).

## १अ.१० कालखंडाचा अभ्यास आणि वाङ्मयेतिहास यांचे साहचर्य

वाङ्मयेतिहास आणि कालखंडानुसार वाङ्मय अभ्यास या दोन स्वतंत्र अभ्यास पद्धती आहेत. असे असले तरी त्या दोहोंमध्ये परस्परपूरकता आहे. वाङ्मयाचा इतिहास लिहायचा म्हणजे त्यात कालखंड येतोच आणि कालखंडानुसार वाङ्मय अभ्यासातही कालखंड प्रधान असतो. वाङ्मयेतिहासात विशिष्ट काळांचे भाग कल्पिलेले असतात. त्याआधारे वाङ्मय व वाङ्मयीन व्यवहार अभ्यासला जातो. म्हणजेच त्याचे स्वरूप, पूर्वसुरींशी अनुबंध आणि पुढील काळात वाङ्मयाशी नाते त्यामध्ये तपासले जाते. वाङ्मयेतिहासात वाङ्मय आणि संपूर्ण वाङ्मयीन व्यवहार अपेक्षितअसतो. कालखंडाच्या वाङ्मयीन अभ्यासातही हा विचार अपेक्षित असतो. 'वाङ्मयेतिहास' आणि 'कालखंडाचा वाङ्मयीन अभ्यास' यांचे स्वरूप बऱ्याच अंशी समान वाटते. म्हणजे दोन्हींमध्ये वाङ्मय आणि त्याचे घटक केंद्रस्थानी असतात. त्याच्या स्वरूपाच्या विविध बाजू समजून घेण्यास दोहोंचे महत्त्व असते.

## १अ.११ वाङ्मयेतिहास आणि कालखंडानुसार वाङ्मय अभ्यास अनुबंध

'वाङ्मयेतिहास' आणि 'कालखंडानुसार वाङ्मय अभ्यास' या दोन्ही अभ्यास क्षेत्रांत परस्परपूरकता असली तरी त्यांच्यात असणारी स्वतंत्रता त्यांच्यातील मर्यादांमुळे स्पष्ट होते. या विषयी डॉ.द.दि.पुंडे यांचे मत विचारणीय आहे. ते लिहितात, 'वाङ्मयेतिहासातील कालखंडाचा अभ्यास' आणि 'विवक्षित कालखंडांचा वाङ्मयीन अभ्यास' ह्या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत की नाहीत आणि असल्यास का व कशा वेगवेगळ्या आहेत याचा निर्णय घ्यायला हवा. वाङ्मयेतिहासातील एखादा कालखंड हा संपूर्ण वाङ्मयेतिहासाचा एक अंशभाग असतो. अगोदरच्या आणि नंतरच्या खंडाशी तो निगडित असतो. त्या विशिष्ट कालखंडातील वाङ्मय व्यापाराचे अगोदरच्या व नंतरच्या कालखंडातील वाङ्मय व्यापाराशी असणारे नाते तेथे स्पष्ट करावे लागते. याचा परिणाम म्हणजे वाङ्मयेतिहासांतर्गत कालखंडातल्या वाङ्मयाचे विषय, रूपे इत्यादींचा केवळ ऐतिहासिक पद्धतीनेच किंवा विकासक्रमाच्या दृष्टीनेच विचार करावा लागतो. वेगळ्या शब्दांत सांगायचे म्हणजे वाङ्मयेतिहासातील एक अंशभाग म्हणून आपण जेव्हा कालखंडाचा अभ्यास करतो, तेव्हा एक ऐतिहासिक अनुसंधान ठेवावे लागते. याउलट विवक्षित कालखंडाचा विशेष अभ्यास करावयाचा म्हटले तर तेथे त्या कालखंडातील वाङ्मयाचे पूर्वोत्तर काळातल्या वाङ्मयाशी अनुसंधान दाखवण्यापेक्षाही त्या विवक्षित कालखंडातील एकूण वाङ्मयाचे स्वरूप वर्णनात्मक पद्धतीने निवेदित करण्याचा प्रश्न येतो. कारण येथे वाङ्मयाच्या अभ्यासासाठी निवडलेला कालखंड हा एक स्वायत्त घटक असतो. त्या विवक्षित कालखंडाचे स्वतःचे

काही गुणविशेष, काही धर्म असतात आणि ते निश्चित झालेले असतात. त्या कालखंडाला इतिहासदत्त असे स्वतःचे स्वरूप असते. त्याच्या प्रकाशात त्या विवक्षित कालखंडातील वाङ्मयाचा अभ्यास करणे तेथे अपेक्षित असते. उदाहरणार्थ, गतकाळातील एखाद्या शतकातल्या वाङ्मयाचा अभ्यास हा'विवक्षित कालखंडाचा अभ्यास' होऊ शकतो. कारण गतकाळातील त्या त्या शतकाची म्हणून काही गुणवैशिष्ट्ये आहेत, काही धर्म आहेत. त्यांच्या प्रकाशात आपण त्या शतकातल्या स्थितिगतीचा अभ्यास करू शकतो. परंतू हेच शतक जर वाङ्मयेतिहासातील एक कालखंड म्हणून आले, तर त्यातल्या वाङ्मयाच्या अभ्यासाचा आपला व्यूह बदलेल. कालखंडाच्या इतिहासदत्त निष्कर्षापेक्षा आपला भर पूर्वापार चालत आलेला नि पुढे चालू राहणारा वाङ्मयप्रवाह आधोरेखित करण्यावर अधिक राहील. म्हणून 'वाङ्मयेतिहासांतर्गत कालखंडाचा अभ्यास' आणि 'विवक्षित कालखंडाचा अभ्यास' या वेगळ्या गोष्टी मानायला हव्यात.' ( वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, संपा.उषा मा.देशमुख, पृ.१४)

वरील मताच्या अध्ययनाने स्पष्ट होते की या दोन्ही संकल्पनांमध्ये वेगळेपण आहे.

## १अ.१२ समारोप

'काळ' ही सतत चालणारी प्रवाही, नैसर्गिक प्रक्रिया असते. काळाबरोबर 'स्थल' या संकल्पनेत जोडले जाते. 'कालखंड' ही संकल्पना वाङ्मयेतिहासाशी निगडित गोष्ट आहे. वाङ्मयेतिहासात कालखंड मानावयाचे असतात. ते आपोआप पडत नसतात. कालखंडाचा अभ्यास सर्व क्षेत्रांत महत्त्वाचा असला तरी ज्ञानक्षेत्रात त्याचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. कालखंड निश्चिती प्रामुख्याने आकलन सुलभतेसाठी होते. अभ्यासक ज्या क्षेत्राशी संबंधित असतात त्या अनुषंगाने ते कालखंड निश्चितीच्या प्रेरणा ठरतात. त्या त्या क्षेत्राच्या गरजेनुसार प्रेरणा ठरवल्या जातात. वाङ्मयीन व्यवहारात साहित्यिक आणि त्याची रचनाकृती हे दोन घटक महत्त्वाचे असतात. हे दोन्ही घटक ज्या कालखंडातील असतात त्या काळातील ज्ञानाची उपलब्धता आणि घटनांनी ते प्रभावित असतात. कालखंड बदलला की साहित्य निर्मिती व व्यापाराची केंद्रे बदलतात. कालखंड मानताना वाङ्मयीन प्रवाहाची प्रवृत्ती पाहिली जाते. वाङ्मयाचा इतिहास लिहिताना व अभ्यास करताना कालखंड निश्चित केले जातात. वाङ्मयेतिहास आणि कालखंडानुसार वाङ्मय अभ्यास या दोन स्वतंत्र अभ्यास पद्धती आहेत. असे असले तरी त्या दोहोंमध्ये परस्परपूरकता आहे. 'वाङ्मयेतिहासांतर्गत कालखंडाचा अभ्यास' आणि 'विवक्षित कालखंडाचा अभ्यास' या वेगळ्या गोष्टी मानायला हव्यात.

## १अ.१३ संदर्भ ग्रंथ

१. देशमुख,उषा माधव (संपा.); वाङ्मयाच्या कालखंडाचा अभ्यास, मराठी विभाग, मुंबई विद्यापीठ आणि स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९४.

२. नाईक, शोभा, शिंदे, रणधीर (संपा.); वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन, साहित्य अकादेमी, नवी दिल्ली, २०२१.

३. पुंडे, दत्तात्रेय (संपा.); वाङ्मयेतिहासाची संकल्पना, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८६.

४. दडकर, जया आणि इतर (संपा.); मराठी वाङ्मयकोश आरंभापासून १९२० पर्यंतचा कालखंड, जी.आर.भटकळ फाउण्डेशन, मुंबई, १९९८.

५. देवरे, अरुण आणि इतर, कालखंडाचा अभ्यास (आरंभ ते १६००) MAMAR 1.4 , संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, मुंबई विद्यापीठ, विद्यानगरी, मुंबई , जुलै २०२४.

६. चिमोटे, मोना, कालखंडानुसार साहित्याभ्यास (MAR 122) , यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, ऑगस्ट २०२१.

## १अ.१४ सरावासाठी प्रश्न

**अ.दीर्घोत्तरी प्रश्न**

१. कालखंडाची संकल्पना स्पष्ट करा.

२. कालखंड अभ्यासाची वैशिष्ट्ये सागा.

३. वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि स्वरूप विशद करा.

४. कालखंडाची संकल्पना स्पष्ट करून कालखंडाच्या निर्मितीच्या प्रेरणा लिहा.

५. कालखंडाची संकल्पना सांगून कालखंडाची वैशिष्ट्ये थोडाक्यात विशद करा.

**ब) टीपा लिहा.**

१. कालखंड निश्चितीच्या प्रेरणा

२. वाङ्मयेतिहास आणि कालखंडानुसार वाङ्मय अभ्यास अनुबंध

३. साहित्यकार आणि रचनाकृतींचे कालखंडात्मक आकलन

४. कालखंडाच्या अभ्यासाची गरज

५. वाङ्मयप्रवाह आणि प्रवृत्ती

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. वाङ्मयीन व्यवहारात कोणते दोन महत्त्वाचे घटक आहेत?

**उत्तर : साहित्यिक आणि त्याची रचनाकृती**

२. मराठी साहित्याच्या आरंभी महानुभाव काळात साहित्य व्यवहाराची कोणती केंद्रस्थाने होती?

**उत्तर : ऋद्धीपूर व पैठण**

३. कोणत्या कालप्रवाहाला ‘कालखंड’ असे म्हटले जाते?

**उत्तर:** मानवनिर्मित किंवा निसर्गनिर्मित एका घटनेपासून दुसऱ्या घटनेपर्यंतच्या कालप्रवाहाला 'कालखंड' असे म्हटले जाते.

४. वाङ्मयेतिहासाची संकल्पना आणि त्यासंदर्भातील विविध पैलूंचे मौलिक विवेचन कोणीकेलेले आहे

**उत्तर-द.दि.पुंडे**

५. एका विशिष्ट भाषेतील आरंभ काळापासून विद्यमान काळापर्यंतच्या समग्र वाङ्मयकृतींचा आणि वाङ्मयीन घडामोडींचा एक विशिष्ट वाङ्मयीनसंबद्ध दृष्टिकोन घेऊन केलेला परंपराधिष्ठीत ऐतिहासिक अभ्यास म्हणजे-----------------होय.'

**उत्तर: वाङ्मयेतिहास**

*****

# घटक १आ

## १आ. शिवकाल : समाज व संस्कृती

**घटक रचना**

१आ.० उद्देश

१आ.१ प्रास्ताविक

१आ.२ शिवकालीन समाजजीवन

१आ.३ स्त्रियांचे जीवन

१आ.४ शिवरायांची धर्मक्रांती

१आ.५ शिवकालीन समाजातील देवदेवता

१आ.६ शिवकालीन अर्थव्यवस्था

१आ.७ शिवकालीन वास्तुशिल्प

१आ.८ शिवकालीन करमणुकीची साधने व खेळ

१आ.९ शिवाजी महाराज आणि स्वभाषा

१आ.१० शिवकालीन संत आणि कवी

१आ.११ शिवकालीन संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान

१आ.१२ समारोप

१आ.१३ सरावासाठी प्रश्न

१आ.१४ संदर्भ ग्रंथ

### १आ.० उद्देश

१. शिवकालीन समाजजीवनाचा परिचय करून घेणे.

२. शिवकालीन सांस्कृतिक स्थितीगतीचा धांडोळा घेणे.

३. शिवकालीन अर्थव्यवस्था लक्षात येईल.

४. शिवकालीन मराठी भाषेचा परिचय होईल.

५. शिवकालीन संतांचा परिचय होईल.

## १आ.१ प्रास्ताविक

१७ वे शतक शिवकाल म्हणून ओळखले जाते. शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी पंचवीस वर्षे आणि शिवाजी महाराजांच्या मृत्युनंतर २५ वर्षे असा हा कालखंड 'शिवकाल' म्हणून ओळखला जातो. मराठी वाङ्मयाच्या दृष्टीने शिवकाल म्हणजेच स्वराज्य स्थापनेचा काळ अतिशय महत्त्वाचा मानला जातो. शहाजी राजे, शिवाजी महाराज, संभाजी राजे, राजाराम महाराज व ताराबाई यांची कारकीर्द या कालखंडात मोडते. सतराव्या शतकाच्या प्रारंभापासूनच महाराष्ट्रात अस्थिर वातावरण होते. मोगलांच्या आक्रमणाने महाराष्ट्राची घडी पूर्णपणे विस्कटलेली होती. अशा परिस्थितीत शहाजी राजांनी शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेसाठी अनुकूल वातावरण निर्माण केले. इ.स.१६३० ते इ.स.१७०७ हा संपूर्ण कालखंड शिवरायांच्या कार्यकर्तृत्वाने भारून गेला होता. प्रस्तुत घटकात शिवकालातील सामाजिक व सांस्कृतिक क्रियाकलापांचा आढावा घ्यावयाचा आहे.

## १आ.२ शिवकालीन समाजजीवन

काळानुसार समाजरचना व समाज व्यवस्था सतत बदलत असते. मानवी समाजाची निर्मिती झाल्यापासून ही प्रक्रिया निरंतर चालत आली आहे. प्रत्येक कालखंडानुसार त्या त्या समाजाची काही वैशिष्ट्ये असतात. शिवकाळात गावगाडा पद्धत अस्तित्वात होती. सामाजिक आणि आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू खेडे होते. शेती व्यवसाय हा जगण्याचा प्रमुख मार्ग असल्याने लोकसंख्येचा मोठा हिस्सा शेतीवर अवलंबून होता. त्याकाळातील खेड्यातील लोकसंख्येचे प्रमाण आजच्या तुलनेने अधिक होते. कसबे अथवा व्यापारी ठाणी त्यामानाने कमी होती. खेड्याच्या अधिकार क्षेत्रात येणाऱ्या भूपृष्ठाचे दोन विभाग होते. गाव ज्याठिकाणी वसलेले आहे ती पांढरी किंवा पांढरी आई आणि दूसरा भाग लागवडीची जागा काळी किंवा काळी आई. ग्राम, देहे, मौजा या विविध नावांनी खेड्याचा उल्लेख होत असे. एखाद्या उपनगराचा विस्तार होऊन जेव्हा खेड्यात रुपांतर होत असे तेव्हा मूळ खेड्याला 'बुद्रुक' तर नव्या खेड्यास 'खुर्द' म्हटले जात होते. उदा.नेवासे बुद्रुक आणि नेवासे खुर्द. गावाच्या उपनगराला मजरा किंवा वाडी म्हटले जात होते. कसबा म्हणजे कसबी, हुन्नरी लोकांचे गाव. या ठिकाणी आठवड्याचा बाजार भरत असे आणि पंचक्रोशीतील गावकरी बाजारहाटासाठी कसब्यात येत असत. कारागीर आपल्या वस्तू या बाजारात विक्रीसाठी आणत असत आणि गरजू त्या वस्तूंची खरेदी करत असत. गावात ज्यांच्या मालकीची जमीन असे त्यांनाच गावाचे गावकरी समजले जात. काही कामानिमित्त अथवा मोलमजुरी करून गुजारा करणारे लोकही गावात रहात असत. ज्यांच्या मालकीची जमीन नसे त्यांना गावाच्या व्यवहारात अधिकार नसत. डॉ.अ.रा.कुलकर्णी यांच्या मते सामान्यपणे गावात चार प्रकारच्या सत्ता रूढ होत्या. पहिली दिवान सत्ता, यात हवालदार कारकून इत्यादी राज्याधिकारी मंडळी असत आणि त्यांच्या मार्फत राजा आपली सत्ता बजावीत असे. दुसरी आणि गावाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची सत्ता म्हणजे गोत सत्ता, यालाच देशसत्ता असेही म्हणत. यात गावचे वतनदार अधिकारी, रयत, बलुतेदार यांचा समावेश होई. ही राजसत्तेहून भिन्न आणि स्वतंत्र व समर्थ असे. सामाजिक दृष्ट्या ही सत्ता महत्त्वाची होती. तिसरी सत्ता म्हणजे ज्ञातिसत्ता अथवा धर्मसत्ता असून ही देखील स्वतंत्र व श्रेष्ठ असे. चौथी सत्ता म्हणजे

व्यापारी सत्ता, आणि वरील सत्ताप्रमाणे ही देखील स्वतंत्र व श्रेष्ठ असे. (शिवकालीन महाराष्ट्र,डॉ.अ.रा.कुलकर्णी,पृ.२३)

ज्यांना गावकीचे वंशपरंपरागत अधिकार असत आणि ज्यांना या कामासाठी सरकारातून जमीन मिळत असे, आणि ज्यांना गावात मानाचे स्थान असे, गावापासून ज्यांना काही हक्क प्राप्त होत असत अशा लोकांना 'देशक' म्हटले जात. हे गावचे कायमचे रहिवाशी होत. जमिनीच्या मोबदल्यात ते गावकीची विविध प्रकारची कामे करीत. गावकामगार आणि राज्याचे अधिकारी यांचे खेड्यातील स्थान भिन्न स्वरूपाचे असे. हवालदार, मुजुमदार, कमाविसदार, कारकून इत्यादि राज्याधिकारी हे तात्पुरते नेमलेले असत. देशक या सदरात देशमुख अथवा देसाई, देशपांडे अथवा देशकुलकर्णी, पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन इत्यादींचा उल्लेख केलेला आहे. थोडक्यात, ग्रामाधिकारी हे शाश्वत तर राज्याधिकारी अशाश्वत अधिकारी होते. यादवकालात निर्माण झालेल्या महाराष्ट्रातील ग्रामजीवनाचे चित्र शिवकालातही काही फरक सोडला तर कायम होते. आलुतेदार, बलुतेदार, पाटील-कुलकर्णी, देशमुख-देशपांडे यांना पहिल्यासारखे अधिकार होते. खेडी स्वयंपूर्ण होती. शिवकालात एक महत्त्वाचा बदल जाणवतो तो म्हणजे स्वराज्य स्थापनेनंतर समाजात एक प्रकारचे चैतन्य निर्माण झाले होते. इस्लामी राज्यकर्त्यांच्या काळातील समाजातील नकारात्मकता, उदासीनता व मरगळ दूर झाली होती. 'रयतेच्या राज्या' च्या रक्षणासाठी आणि उत्थानासाठी जनता स्वतःहून पुढे आली होती. खेड्यापाड्यातून मावळे आणि हेटकरी शिवाजी महाराजांच्या लष्करात सामील झाले होते. देशमुख-देशपांडे यांच्या ठिकाणी स्वराज्याविषयी निष्ठा निर्माण झाली होती. या सर्वांनीच स्वराज्य कार्यात बहुमूल्य योगदान दिलेले आहे.

स्वराज्यातील किल्ल्यांमुळे ग्रामीण जीवनात चैतन्य निर्माण झाले होते. शिवरायांनी किल्ल्यांना खूप महत्त्व दिले होते. संपूर्ण स्वराज्यात किल्ल्यांचे जाळे पसरले होते. प्रत्येक दुर्गाखाली काही गावांचा प्रदेश येत असे. त्याला 'घेरा' म्हटले जात. या प्रदेशाच्या संरक्षणाची जबाबदारी किल्ल्याच्या प्रमुखाकडे म्हणजेच हवालदाराकडे असे. गावातील न्यायनिवाडे हवालदाराच्या अखत्यारित होत. प्रा. ह. श्री. शेणोलीकर, डॉ. प्र. न. देशपांडे लिहितात, " किल्ले हे स्वातंत्र्याचे प्रतीक मानले गेल्यामुळे ग्रामीण भागातील जनतेलाही स्वराज्याचा अर्थ समजला. आपापल्या घेऱ्यांचे रक्षणकर्ते असलेल्या किल्ल्यांना ग्रामीण भागातील जनतेमध्ये प्रतिष्ठेचे स्थान होते." (महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, प्रा. ह. श्री. शेणोलीकर, डॉ. प्र. न. देशपांडे पृ.२७९) किल्ल्यांची भ्रमंती करत असताना शिवरायांचा प्रत्यक्ष लोकांशी संपर्क येत असत त्यातून लोकांच्या समस्या समजत असत आणि त्या समस्यांचे समाधानही होत असे. त्यामुळे हा 'राजा आपला आहे आणि हे राज्यही माझेच आहे' ही भावना जनतेच्या मनात मूळ धरत होती. रयतेच्या मनात ही आपुलकीची भावना यापूर्वी कधीच निर्माण झाली नव्हती.

गावोगावी मारुतीच्या उपासनेचे प्रचलन वाढले होते. समर्थ रामदास आणि चळवळीचे सामर्थ्य याचा प्रभाव दिसत होता. मल्लविद्येचे आखाडे निर्माण होत होते. प्राचीन काळापासून बहुजनांची उपास्य देवता 'महादेवा' चा प्रभावही कायम होता. शिवाजीराजांना जनतेने शंकराचा अवतार मानले होते. ग्रामीण भागातील सामान्य लोकांचे जीवन परंपरागत रूढीवर आधारित होते. असे असले तरी शिवाजी महाराजांनी या ग्रामीण जीवनात एक

सुसूत्रता आणली होती. पाटील-कुलकर्णी-देशमुख-देशपांडे हे केवळ वतनदार न राहता स्वराज्याचे 'पाईक' बनले होते. परिणामी शेतकऱ्यावरचा अन्याय दूर होण्यास मदत झाली होती. ग्रामीण जनता आपले व्यवसाय सांभाळत एकमेकांचे सहकार्य करीत होती.

धार्मिक कार्य करणे तसेच सामान्य जनतेला शास्त्रधर्म शिकवण्याचे काम ब्राह्मण करत होते. प्रत्येक गावात एक-दोन किंवा अधिक ब्राह्मणांची घरे होती. लिहिण्या-वाचण्यात ब्राह्मण पटाईत असल्याने स्वराज्य स्थापनेनंतर कारकुनीची कामे करत होते. देशस्थ ब्राह्मणांनी शिवकालात मानाच्या जागा प्राप्त केल्या होत्या. 'प्रभू' वर्गही ब्राह्मणांसारखाच लिहिण्या-वाचण्यात निष्णात होता. यांची संख्या प्रामुख्याने कोकण प्रांतात अधिक होती. महाराजांनी कोकणात राज्यविस्तार केल्याने हे प्रभू लोक कारकुनीची कामे करत होती. तत्कालीन समाजात एकतृतीयांश लोक मराठा जातीचे होते. स्वतः शिवाजी महाराज क्षत्रिय मराठाच होते. शेती आणि पशुपालन हा मराठ्यांचा प्रमुख व्यवसाय असला तरी लष्करातील नोकरीची त्यांना आवड होती. लढवय्या मराठ्यांनी स्वराज्य स्थापनेत बहुमूल्य योगदान दिलेले आहे. स्वराज्यात बलुतेदारांचे योगदानही महत्त्वपूर्ण असेच आहे. यांतील प्रत्येक घटक आपापल्या परीने हातभार लावत होता. उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी अशी म्हण महाराष्ट्रात पूर्वीपासून रूढ असली तरी महाराष्ट्रीयांना या मध्यम दर्जाच्या व्यवसायाचे आकर्षण कधीच वाटले नाही. महाराष्ट्राने स्वतंत्र व्यापारी वर्ग निर्माण केलाच नाही. व्यापाराच्या बाबतीत शिवकालीन महाराष्ट्राचा स्वतंत्र असा वर्ग नव्हता. शेणोलीकर/देशपांडे लिहितात, "महाराष्ट्रातील व्यापार मध्ययुगीन कालापासून परप्रांतीयांकडे असलेला आढळून येतो. एकेकाळी कानडी लोकांनी महाराष्ट्रातील बाजारपेठा काबीज केल्या होत्या. शिवकालामध्ये गुजराथी लोकांनी महाराष्ट्रात गावोगाव दुकाने थाटलेली दिसून येतात." (महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, प्रा. ह. श्री. शेणोलीकर, डॉ. प्र. न. देशपांडे पृ.२८२).

खेड्यातील भांडण -तंटे गोतसभा किंवा पंचायत सोडवत असत. गंभीर गुन्ह्याची दखल हवालदार घेत असे. गावपंचायतीत गावातील सर्व जातींचे प्रमुख लोक व पाटील – कुलकर्णी हजर असत. निकाल लवकर लावला जात असे. न्यायनिवाड्यासाठी कमी पैसा खर्च होत असे. शिक्षेचे स्वरूप कठोर असून दंड, प्रायश्चित किंवा दिव्य या शिक्षा शक्यतो दिल्या जात.

## १आ.३ स्त्रियांचे जीवन

मध्ययुगीन कालखंडाप्रमाणेच शिवकालीन स्त्रियांचे जीवन कष्टमय होते. बालविवाहाची पद्धत रूढ होती. पुरुष एकापेक्षा अधिक विवाह करायचे. सतीची चाल प्रचलित होती. विधवा स्त्रियांचे आयुष्य खूपच कष्टमय होते. त्यांना विरक्तपणे आयुष्य कंठावे लागत असे. स्त्रियांच्या जीवनात शिवकालात पूर्वीपेक्षा फारसा फरक पडला नसला तरी मुस्लिम राजवटीतील परिस्थितीपेक्षा निश्चित सुरक्षित झाले होते असे आपण म्हणू शकतो. शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टीकोण सर्वज्ञात आहे. परमुलखातील स्त्रियांविषयी शिवाजी महाराज आदरभाव दाखवायचे. 'परमुलखात बायकापोर न धरावी' असा आदेश ते सैन्याला देत व यात काही चूक झाली तर कठोर कारवाई केली जात. शिवकालात 'खंडोबा' ही देवता लोकमानसात प्रिय होती. संतान प्राप्तीसाठी नवस करणारे भक्त आपले पहिले मूल

खंडोबाला अर्पण करत असत यातूनच 'मुरळी' प्रथा जोर धरू लागली. मुरळ्यांची संख्या शिवकालात बरीच वाढली होती. शेख महमंदाच्या 'योगसंग्राम' ग्रंथात यासंदर्भातील वर्णन आले आहे. वेश्याव्यवसाय प्रचलित होता हेही शेखमहंमद यांच्या वरील उल्लेख केलेल्या ग्रंथावरून समजते.

शिवकालातील स्त्रिया विशेषतः सरदार, वतनदार व राजकारणातील स्त्रिया या राजकारण आणि सार्वजनिक जीवनात सक्रिय होत्या. तत्कालीन कागदपत्रांवरून जिजाबाई आणि ताराबाई यांनी राजकारणात आपला सहभाग नोंदवला होता. सरदार व वतनदार घराण्यातील महिलाही राजकारणात भाग घेत होत्या. पती निधनानंतर कित्येक स्त्रिया आपल्या मुलाला पुढे करून पाटीलकी व देशमुखीच्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळत होत्या. शेणोलीकर, देशपांडे लिहितात, " सर्वसाधारणपणे शिवकालातील स्त्रीजीवन नैतिक दृष्ट्या उच्च प्रकारचे होते. स्त्रियांवरील अत्याचार जवळजवळ तीन शतकांनंतर शिवकालात थांबले. स्त्री-वर्गाला स्वराज्यामुळे फार मोठा आधार व दिलासा मिळाला." (महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, प्रा.ह.श्री.शेणोलीकर, डॉ.प्र.न.देशपांडे पृ.२८३)

## १आ.४ शिवरायांची धर्मक्रांती

मानवी मनावर प्राचीन काळापासून धर्माची सत्ता चालत आलेली आहे. समाजाचा उत्कर्ष करील तो धर्म, समाजाचे जो रक्षण करतो तो धर्म, ही धर्माविषयीची धारणा सर्वज्ञात आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्य आणि स्वधर्म यांत अजिबात भेद केला नाही. राजधर्मच सर्वश्रेष्ठ धर्म आहे ही पूर्वीपासून म्हणजेच वेद, उपनिषदे, महाभारत, रामायण काळापासून चालत आलेली धारणा शिवरायांनी अधिक बळकट केली. व्यास म्हणतात; त्याप्रमाणे शस्त्रबलाने राज्याचे रक्षण केले तरच तेथे शास्त्र, विद्या, संस्कृती यांचा उदय व संरक्षण होते. या विचारांचा भारतातील राजपुरुषांना विसर पडलेला होता. शिवाजी महाराजांच्या पूर्वीचे भारतीय राजे हे धर्माभिमानी अवश्य होते परंतु स्वराज्य स्थापून धर्माचे रक्षण करावे असे त्यांना वाटले नाही. डॉ.सहस्रबुद्धे म्हणतात, त्याप्रमाणे तीर्थयात्रा, व्रते वैकल्ये, मंदिरे बांधणे, त्यांना जमिनी लावून देणे, साधुसंतांकडून उपदेश घेणे यातच त्यांचा हिंदुधर्म होता. हे सोपस्कार पार पाडल्यानंतर आपल्या धर्माचे नुकसान करण्यात त्यांना जराही अपराधपणाचा बोध होत नव्हता. शिवरायांनी मातोश्री जिजाबाईंच्या संस्काराने स्वराज्याची स्थापना हेच धार्मिक कर्तव्य मानले होते. धाकटे भाऊ व्यंकोजीने आदिलशहासाठी तंजावरच्या हिंदू राजाचा केलेला पराभव शिवाजी राजांना अजिबात रुचला नव्हता. कुडाळच्या लखम सावंताशी झालेल्या तहातील एका कलमावरून शिवाजी राजांच्या मनात नेमके काय चालू होते याचा अंदाज येतो. कलम असे आहे, 'स्वराज्यसाधनाच्या ठायी दक्ष राहून तुरुक लोकांचे साधन (साह्य) न करावे, तुरुकांना, मुस्लिमांना साह्य करणे हे पाप आहे. हा अधर्म आहे.' औरंगजेबाने १६७६ साली हिंदूंवर लादलेल्या जिझियाकराचा शिवरायांनी निषेध केला होता. शिवाजी महाराजांच्या धर्मक्रांतीत शत्रूंचे पारिपत्य आणि स्वराज्याच्या स्थापनेला महत्त्व होते.

स्वराज्यात देवालयांना संरक्षण मिळू लागले होते. शिवाजी महाराजांची वृत्ती सहिष्णू असल्यामुळे देवालयाप्रमाणे मशिदींनाही सरकारी तिजोरीतून दिवाबत्तीसाठी नेमणूक मिळत होती. सभासदाने म्हटले आहे, ' मुलखात देव -देवस्थाने जागजागा होती त्यास दिवाबत्ती,

नैवेद्य, अभिषेक स्थान पाहून यथायोग्य चालविले. मुसलमानांचे पीर, मशिदी, त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्य स्थान पाहून चालविले.' 'ईश्वर आणि अल्ला एकच आहेत' असे मानण्याइतपत विशाल दृष्टी असलेला सतराव्या शतकातील एकमेव राज्यकर्ता म्हणून शिवाजी महाराजांचाच उल्लेख होतो.

तत्तकालीन राजकर्त्यांच्या  धर्मांध वृत्तीसमोर शिवाजी राजांची सहिष्णुता अधिक उठावदार दिसते. शिवाजी राजांनी इतर धर्मियांना स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सामील करून घेतले होते. शिवाजी महाराजांच्या सैन्यातील महत्त्वाच्या पदावर मुस्लिम व्यक्ती होत्या. अंगरक्षक मदारी मेहतर, इब्राहिम खान, आरमार प्रमुख दौलत खान हे सर्व मुस्लिम होते. शिवाजी महाराज हे धर्म व जातीपेक्षा गुणवत्तेला प्राधान्य देत होते.

## १आ.५ देवदेवता

यादवकालाप्रमाणे शिवकालात अनेक देवतांची उपासना होत होती. पंढरपूरचा विठ्ठल त्याकाळातील लाडके दैवत होते. 'जेजुरीचा खंडोबा, तुळजापूरची भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी' या देवतांचे माहात्म्य शिवकालात होते. औंढ्या नागनाथ, घृष्णेश्वर, भीमाशंकर, परळी वैजनाथ, त्र्यंबकेश्वर या ज्योतिर्लिंगांना जनमानसात मोठे स्थान होते. याच काळात बलोपासनेचा प्रचार करण्यासाठी खेड्यापाड्यातून देवालये उभारून मारुतीची स्थापना करून आखाडे काढण्यास प्रोत्साहन दिले जात होते. हजारोंच्या संख्येने वारकरी भक्त दिंड्या-पताका घेऊन पंढरपूर वारी करत होते. नाशिक, शिखर शिंगणापूर, पाली या तीर्थक्षेत्रांनाही महत्त्व प्राप्त झाले होते. स्वराज्य स्थापनेनंतर परकीय राजकर्त्यांचा जुलूम कमी झाल्याने नवससायास, व्रतवैकल्ये आणि तीर्थयात्रा यांना पुन्हा चालना मिळाली होती. या काळात ग्रामदैवतांना मानणारा खूप मोठा वर्ग होता. प्रदेश व जातीनुसार ग्रामदैवतांची उपासना होत होती. उदा. मरीआई, म्हसोबा, मेसाई, तुकाई, सटवाई, भैरव इ. ग्रामदेवतांची पूजा होत होती. कामनापूर्तीसाठी भक्तांकडून या देवतांना नवस केले जात होते. ज्ञानदेव-नामदेवांपासून अनेक संतांनी क्षूद्र देव-देवतांचा निषेध केला असला तरी या ग्रामदैवतांवर सर्वसामान्य जनतेची श्रद्धा इतकी खोलवर रुजली होती त्यामुळे या देवतांच्या भक्तीचे प्रचलन कायम राहिले होते.

## १आ.६ शिवकालीन अर्थव्यवस्था

शिवकालात कराचे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे प्रकार होते. इनामपट्टी, मिरासपट्टी, देशमुखपट्टी अशा प्रकारच्या करांचा प्रत्यक्ष करात समावेश होता. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी 'सिंहासनपट्टी' किंवा 'तख्तपट्टी' हा कर वतनदारांस बसवला होता. (महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, प्रा.ह.श्री.शेणोलीकर, डॉ.प्र.न.देशपांडे पृ.२७७) व्यावसायिकांना त्यांच्या धद्यांनुसार कर द्यावे लागत होते. सराफ, धनगर, वीणकर, तेली इ. व्यावसायिक कर देत असत. 'भागटका', 'पायपोशी', 'तेलपट्टी' असे नाव या करांना दिलेले होते. कर जिनसांच्या रूपाने दिला जात होता. काही प्रसंगी पैशाच्या रुपात कर वसूल केला जात होता. खेड्यामध्ये बलुतेदारांना 'कारूक' नावाचा कर द्यावा लागत असे. अप्रत्यक्ष करांमध्ये अनेक कर होते. चुंगी, वांगी, फसकी, पळकी, सेवाधारा, उरीदलाली इ. अप्रत्यक्ष कर घेतले जात होते. धान्य, फळफळावळ, कपडे, गुरेढोरे यांच्या विक्रीवर कर लादले होते.

मीठ तसेच गुलामांच्या विक्रीवरही कर आकाराला जात होता. स्वराज्याच्या आर्थिक गरजेसाठी विविध प्रकारचे कर आवश्यक होते. हा कर आकारात असताना कोणावरही अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली जात होती. स्वराज्यातील व्यापार समृद्ध व्हावा याकडेही महाराजांचे लक्ष होते.

## १आ.७ शिवकालीन वास्तुशिल्प

स्वराज्य स्थापनेचा काळ हा खूपच धामधुमीचा व कठीण होता. हा काळ वास्तूकलेच्या वृद्धीसाठी अनुकूल नव्हता. या काळात नवे किल्ले बांधणे व जुन्यांची डागडुजी करणे हेच मुख्य स्थापत्यप्रकार आढळून येतात. शिवकालातील वास्तुप्रकार साधे पण सोयीस्कर होते. रायगडावरील जगदीश्वराच्या मंदिराची रचना मशीदीसारखी आहे. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दोन मिनार कोरले आहेत. तेथील धर्मशाळा, शिवरायांची समाधी, वृंदावने, मठ व लहान देवालये ही शिवकालीन स्थापत्यशिल्पाचे नमुने आहेत. शिवकालात औरंगाबाद येथे औरंगजेबाच्या स्मृतिप्रीत्यर्थ ताजमहालाची प्रतिकृती असलेला मकबरा उभारला आहे. ते एक भव्य शिल्प आहे.

## १आ.८ शिवकालीन करमणुकीची साधने व खेळ

शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वीपासून समर्थ रामदासांनी संस्कृती रक्षणार्थ बलोपासनेचा उपदेश करून गावोगावी मारुतीची मंदिरे व आखाडे स्थापन केले होते. मल्लविद्या, मर्दानी व मैदानी खेळ हे तरुणांच्या करमणुकीचे साधन होते. निरनिराळ्या शस्त्रांचा उपयोग आत्मसंरक्षणासाठी व शत्रूला नामोहरण करण्यासाठी कसा करावा याचे प्रशिक्षण या आखाड्यांमार्फत दिले जात होते. भजन-कीर्तन, पुराण-प्रवचन हे सुद्धा करमणुकीचे साधन होते. त्यामुळे सामाजिक नीतीचे संरक्षण व पोषण चांगले झाले. वीरगाथा गान व पोवाडे हे ग्रामीण भागातील सामान्य लोकांचे करमणुकीचे साधन होते.

## १आ.९ शिवाजी महाराज आणि स्वभाषा

स्वराज्य स्थापनेबरोबरच स्वभाषा अस्मितेची रुजवणूक शिवकालात झाली. स्वभाषा जोपासना व संवर्धनासाठीचे प्रयत्न झाले. स्वभाषा अभिमान वृद्धिंगत झाला. कृ. पां. कुलकर्णी लिहितात, ' शिवाजीसारख्या राजक्रांती करणाऱ्या वीरांनी केवळ जाणूनबुजून स्वधर्मपरित्राणासाठी परकीयांशी जी झोंबाझोंबी सुरू केली तिचा परिणाम स्वधर्माबरोबरच स्वदेश आणि स्वभाषा ह्यांच्या जोपासनेत झाला.' (मराठी भाषा उद्गम व विकास, कृ.पां.कुलकर्णी, पृ.२५४) संतांनी आध्यात्मिक उद्देशाने वाङ्मयरचना केली होती. आपला धार्मिक ठेवा हा संस्कृत भाषेत बंदिस्त असल्याने सर्वसामान्य जनतेपासून दूर होता. संस्कृत देवांची तर मराठी चोरांची अशी काहीशी चमत्कारिक परिस्थिती होती. अध्यात्म मराठीत सांगण्याची परंपरा मुकुंदराज, ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ यांनी सुरू केली. हिच परंपरा पुढे रामदास, तुकाराम व वामनांसारख्या कवींनी कायम ठेवली. एकनाथकालीन संस्कृत-मराठीचे भांडण शिवकालातही होते. राधामाधवविलासचंपू या संस्कृत रचनेचा कर्ता जयराम पिण्ड्ये हा संस्कृत कवींना 'सिंह' तर मराठी कवींना 'मर्कट' म्हणत होता. ज्ञानेश्वरांनी संस्कृत भाषेतील भांडार 'ज्ञानेश्वरी'च्या रूपाने मराठीत आणले. हिच परंपरा

वामन पंडितांनी 'यथार्थदीपिके' च्या रूपाने शिवकालातही कायम ठेवली. शिवकालात वाङ्मय आणि भाषा ह्यांच्या वाढीस राजाश्रय मिळाला. शहाजी राजांच्या आश्रयाखाली ३५ कवी होते. शिवाजी राजांनी भूषण कवीला आश्रय दिल्याचे सर्वश्रुत आहे. फारसीच्या मराठीवरील आक्रमणाला रोखण्याचा महत्त्वाचा प्रयत्न शिवकालात झाला. शिवाजी राजांनी रघुनाथ पंडितास राज्यव्यवहारकोश बनवण्याची आज्ञा करून मराठी भाषेच्या शुद्धीकरणाचे कार्य केले.

## १आ.१० शिवकालीन संत व कवी

शिवकाल हा स्वराज्यसंपादनाचा, स्वराज्य रक्षणाचा आणि स्वराज्य विस्ताराचा कालखंड मानला जातो. केतकर म्हणतात; त्याप्रमाणे शिवाजी महाराजांच्या काळामध्ये जितकी उच्च प्रकारची ग्रंथोत्पत्ती झाली तितकी केव्हाच झाली नाही. ह.श्री. शेणोलीकर या कालखंडाला 'पुनुरुज्जीवन पर्व', 'विस्तार पर्व' आणि 'विस्तरण पर्व' असे नाव देतात. मुक्तेश्वर, रमावल्लभदास, शिवकल्याण, लोलिंबराज, शामराज, तुकाराम, बोधलेबुआ, निंबराज, मोरया गोसावी, गणेशनाथ, विठ्ठलदास, सेना न्हावी, शेख महंमद, रामदास, गंगाधर, रंगनाथ स्वामी, आनंदमूर्ती, केशवस्वामी, वामन पंडित, नागेश, विठ्ठल बीडकर या सर्व संत व कवी मंडळींच्या रचना कर्माने शिवकाल चिरस्मरणीय ठरतो. रामदास व तुकाराम यांचे शिष्यगण व वेणाबाई, बहिणाबाई या संत कवयित्रींना आपापल्या पद्धतीने हातभार लावलेला आहे. शिवकालातील वाङ्मयाची ठळक वैशिष्ट्ये शेणोलीकर पुढीलप्रमाणे सांगतात.

१. स्वराज्याच्या कालखंडातील भौतिक उत्कर्षाच्या काळाचे प्रतिबिंब रामदास, वामन, आख्यान-कवी, शाहीर आणि बखरकार यांच्या वाङ्मयात पडलेले स्पष्ट दिसून येते.

२. या काळातील वाङ्मय एकांगी किंवा निष्प्रभ न राहाता सर्व बाजूंनी संपन्न आणि समर्थ झाले आहे.

३. एकीकडे स्वतंत्रतेच्या अनुभूतीने व पराक्रमाच्या ईर्षेने ते प्रस्फुरित झाले आहे तर दुसरीकडे स्वराज्यातील सुरक्षितेच्या व संपन्नतेच्या आनंदाने ते बहरले आहे.

४. एकनाथांनी रुजविलेल्या अनेक प्रवृत्तींच्या आणि वाङ्मयप्रकारांचा परिपोष होत जाऊन मराठी भाषा आणि साहित्य यांचे वैभव याच कालखंडात शिगेला पोहचले.

५. मराठी भाषा राजभाषा झाली; देशभर ग्रंथनिर्मितीची लाट उसळली. विविध ठिकाणची, नाना पंथांची, सर्व जातींची, संत-पंडित, कवी-शाहीर, चिटणवीस-वस्त्ररनवीस, इ. मंडळी विपुल आणि विविध साहित्य निर्माण करू लागली. त्यामुळे ललितेतर आणि ललित दोन्ही प्रकारची वाङ्मयनिर्मिती झाली.

६. भावनाविष्कारात कणखरपणा, कल्पनाविलासात पल्लेदारपणा, पांडित्य – प्रकर्षात निश्चितता, विचारात ओजस्विता हे विशेष या कालखंडातील प्रारंभीच्या वाङ्मयात आढळतात. (प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, ह.श्री.शेणोलीकर, पृ.१५०-१५१)

## १आ.११ शिवकालीन संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान

मुसलमानी राजवटीत अन्याय व अत्याचारांचा कळस झाला होता. सर्व रयत त्रस्त झाली होती. या अतिरेकाचा परिणाम शेवटी प्रतिक्रियेत, विरोधात झाला. समर्थ रामदासांनी जनतेच्या दुःखाचे दासबोधात वर्णन केलेले आहे. अशा या कठीण परिस्थितीत जनतेला शिवाजी महाराजांच्या रूपाने कुशल राजा मिळाला. छत्रपती शिवरायांनी संस्कृती रक्षण तर केलेच त्याबरोबर जनतेच्या मनातील भय दूर केले. द. ह. अग्निहोत्री म्हणतात त्याप्रमाणे; मुसलमानी जुलमी क्रियेची प्रतिक्रया शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वात दिसून येते. त्या "काळात स्वराज्याची गरज प्रकर्षाने जाणवू लागली होती. स्वराज्याविषयीचा आदरभावही जागृत झाला होता. परिणामी परंपरागत वतनदार देशमुख-देशपांडे स्वराज्यात सामील झाले होते".

शिवकालात चातुर्वर्ण्याची चौकट कायम असली तरी वारकरी संप्रदायाच्या समतेच्या उपदेशाने विषमता कमी होण्यास मदत झाली होती. सर्व समाज एकाच ध्येयाने प्रेरित होऊन कार्य करू लागला होता. प्रत्येकजण आपापल्या कुवतीनुसार स्वराज्याच्या यज्ञात आहुती देत होता. स्त्रियांची विटंबना थांबल्यामुळे त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळत होता. या काळात जिजाबाई, येसूबाई, ताराबाई यांसारख्या स्त्रियांनी राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी केली. त्यांच्या नीतिमत्तेचा दर्जा अत्यंत उच्च होता. सर्वसामान्य जनतेचे मन सश्रद्ध होते. त्यांची देवदेवतांवर व धर्मावर अढळ श्रद्धा होती. सामान्य लोक पापभीरू जीवन जगत होते. बेलभंडार उचलून घेतलेली शपथ ते प्राणांची पर्वा न करता पाळीत. साधुसंतांना समाजात महत्त्वाचे स्थान होते. संतांनी दाखवलेल्या मार्गावरून प्रजा चालत होती. संत तुकारामांचे अभंग सर्व सामान्यांच्या मनावर अधिराज्य गाजवत होते. समर्थ रामदासांचे शिष्य गावोगावी आपल्या विचारांचा जागर करत होते. शिवकालातील मोरया गोसावी, मौनीबुवा, शेख महंमदासारखे सत्पुरुष समाजाचे मार्गदर्शन करीत होते. या काळात परधर्म सहिष्णुता वाढीस लागली होती. पुरोगामी धर्मदृष्टीमुळे क्रांतिकारी निर्णय घेतले जात होते. उदा. धर्मभ्रष्ट झालेले नेताजी पालकर व बजाजी निंबाळकर यांना शुद्ध करून परत हिंदू धर्मात प्रवेश दिला गेला होता. तत्कालीन परिप्रेक्षात शिवाजी महाराजांचा हा निर्णय क्रांतिकारी म्हणावा लागेल. शिवकालात समर्थ रामदास निर्देशित स्वदेश व स्वसंस्कृतीचे रक्षण करण्यास प्राधान्य देणाऱ्या 'महाराष्ट्र धर्मा' चा प्रभाव वाढत चालला होता. खरे मराठी मन, खरा मराठी बाणा, खरी मराठी संस्कृती शिवकालात निर्माण झाली हे अग्निहोत्री यांचे मत समर्थनीय असेच आहे.

## १आ.१२ समारोप

महाराष्ट्राच्या इतिहासाचे शिवकाल हे सुवर्णाक्षरांनी लिहिलेले पान आहे. शिवाजी राजांच्या अंगी बुद्धी, युक्ती, शौर्य, गुणग्राहकता, गुणांविषयी आदर, योजकता, प्रजाहितदक्षता, धर्मनिष्ठा इत्यादि अनेक गुणांचा समुच्चय होता. शिवाजी राजांनी आपल्या या गुणांचा अचूक वापर केला. शिवकालात महाराष्ट्रातील उत्कर्षाला जी गती मिळाली ती पेशवेकाळातही कायम होती. प्रस्तुत घटकात शिवकालीन समाजजीवन व सांस्कृतिक परिस्थितीचा लेखाजोखा मांडलेला आहे.

## १आ.१३ सरावासाठी प्रश्न

**अ.दीर्घोत्तरी**

१) शिवकालीन समाजजीवनाचा सविस्तर आढावा घ्या.

२) शिवकालीन स्त्रियांच्या स्थितीचे विवेचन करा.

३) शिवकालीन संस्कृतीच्या तात्त्विक अधिष्ठानाची चर्चा करा.

४) शिवकालीन धर्मक्रांती कशी होती, ते सविस्तर लिहा.

५) शिवकालीन वाङ्मयाची ठळक वैशिष्ट्ये लिहा.

**ब) टीपा लिहा.**

१) शिवकालीन अर्थव्यवस्था

२) शिवकालीन संत व कवी

३) शिवकालीन वास्तुशिल्प

४) शिवरायांची धर्मक्रांती

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मुळ खेड्यागावाला काय म्हणतात?

**उत्तर- बुद्रुक**

२) नव्या खेड्यास काय संबोधतात?

**उत्तर- खुर्द**

३) शिवकालात कोणती देवता लोकमानसात प्रिय होती?

**उत्तर- खंडोबा**

४) औरंगजेबने कोणता कर हिंदूवर लादलेला होता?

**उत्तर- जिझिया कर**

५) कोणता कर वतनदारास बसवला होता?

**उत्तर- सिंहासन पट्टी किंवा तरलपट्टी**

## १आ.१४ संदर्भ ग्रंथ

१. शेणोलीकर, ह. श्री., देशपांडे, प्र. न.; महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९७२.

२. सहस्रबुद्धे, पु.ग.; महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७९.

३. देशपांडे,प्र.न.; मराठ्यांचा उदय आणि उत्कर्ष, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, द्वितीय आवृत्ती,२००१.

४. कुलकर्णी,कृ.पां.; मराठी भाषा उद्गम व विकास, मॉडर्न बुक डेपो प्रकाशन, पुणे, सहावी आवृत्ती, १९७३.

५. सरकार, यदुनाथ ; शिवाजी व शिवकाल, भारत गौरव ग्रंथमाला, पुणे, मुंबई, प्रथम आवृत्ती,१९३०.

६. शेंडे, सोपान आणि इतर; छत्रपती शिवाजी व शिवकाल, दुरशिक्षण केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, प्रथम आवृत्ती, २०१५.

७. शेणोलीकर, ह. श्री.; प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप , डायमंड पब्लिकेशन्स , पुणे , प्रथम आवृत्ती, २०११.

८. दडकर, जया आणि इतर (संपा.), संक्षिप्त मराठी वाङ्मयकोश, आरंभापासून १९२० पर्यंतचा कालखंड, जी.आर.भटकळ, मुंबई, प्रथम आवृत्ती, १९९८.

९. केतकर, श्री. व्यं.; महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, व्हीनस प्रकाशन, पुणे, दुसरी आवृत्ती, १९६४.

१०. पेंडसे, शं. द.; महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, दी इंटरनॅशनल बुक सर्व्हिस, पुणे, प्रथम आवृत्ती, १९३३.

१०. जोशी, प्र.न.; मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास प्राचीन काल, प्रसाद प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७८.

११. अग्निहोत्री, द.ह.; महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९७७.

१२. कुलकर्णी अ.रा.; शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, तिसरी आवृत्ती, २००४.

*****

# घटक१इ

## १इ पेशवेकाल : समाज व संस्कृती

**घटक रचना**

१इ.० उद्देश

१इ.१ प्रास्ताविक

१इ.२ पेशवेकालीन समाजजीवन : जाती आणि पोटजाती संबंध

१इ.३ पेशवेकालीन स्त्रीजीवन

१इ.४ पेशवेकालीन व्रतवैकल्ये आणि अंधश्रद्धा

१इ.५ पेशवेकालीन ग्रामव्यवस्था

१इ.६ पेशवेकालीन शेती, बागबगीचे आणि उद्योगधंदे

१इ.७ पेशवेकालीन वास्तुशास्त्रातील उपलब्धी

१इ.८ पेशवेकालीन दैनंदिन जीवन

१इ.९ पेशवेकालीन साहित्य आणि कला

१इ.१० पेशवेकालीन देवदेवता आणि धर्म

१इ.११ पेशवेकालीन न्यायव्यवस्था

१इ.१२ पेशवेकालीन प्रशासन

१इ.१३ पेशवेकालीन शिक्षण

१इ.१४ पेशवेकालीन संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान

१इ.१५ समारोप

१इ.१६ सरावासाठी प्रश्न

१इ.१७ संदर्भग्रंथ

### १इ.० उद्देश

१) पेशवेकालीन समाजजीवनाविषयी जाणून घेणे.

२) पेशवेकालीन संस्कृतीची ओळख करून घेणे.

### १इ.१ प्रास्ताविक

मराठ्यांना संपवण्याच्या उद्देशाने अनेक वर्षे महाराष्ट्रात ठाण मांडून बसलेल्या औरंगजेबाचा इ.स. १७०७ मध्ये मृत्यू झाला. त्यानंतर संभाजी राजांचे सुपुत्र शाहू महाराजांची मोगलांच्या

कैदेतून सुटका झाली. इ.स.१७०८ मध्ये शाहू महाराजांचा राज्याभिषेक झाला. अंतर्गत संघर्षातून मार्ग काढत शाहूराजांनी 'मराठा मंडळा' ची स्थापना केली. बाळाजी विश्वनाथ या कर्तबगार पेशव्यांच्या साथीने शाहू राजांनी मराठेशाही बळकट केली. पुढील काळात भारताच्या विस्तीर्ण भूभागावर मराठ्यांनी आपले वर्चस्व स्थापित केले. इ.स. १८१८ पर्यंत पेशव्यांनी राज्यकारभार केला. गो.बं. देगलूरकर म्हणतात, 'छत्रपती शाहूमहाराज यांनी इ.स.१७१३ मध्ये बाळाजी विश्वनाथ भट यांना स्वराज्याचे पेशवेपद दिले. आणि इ.स. १८१८ मध्ये मराठेशाहीची (पेशव्यांची) सत्ता ब्रिटिशांच्या ताब्यात गेली. हा सुमारे १०० वर्षांचा कालावधी म्हणजे 'पेशवे काळ' होय.'(पेशवेकालीन समाज आणि प्रशासन, गो.बं. देगलूरकर, पृ.१) प्रस्तुत घटकात या शंभर वर्षांच्या काळातील महाराष्ट्राच्या समाजजीवन व सांस्कृतिक जीवनाचा परिचय करून घ्यायचा आहे.

## १इ.२ पेशवेकालीन समाजजीवन : जाती आणि पोटजाती संबंध

पेशवेकालात वर्णव्यवस्था खोलवर रुजलेली होती. जातिव्यवस्थेने उग्र रूप धारण केले होते. ब्राह्मणांचे वर्चस्व होते. मराठा – ब्राह्मण संघर्ष काही प्रमाणात होता. माधवराव पेशव्यांच्या कारकीर्दीत कोल्हापूरला शंकराचार्य आणि राजमाता जिजाबाई यांच्यात संभाजीच्या दहनभूमीवर देवालय बांधण्याच्या प्रश्नावरून वाद उत्पन्न झाला होता. पेशवे आणि मराठा व इतर जातीतींल सरदार यांच्यात वैमनस्य दिसत होते. तत्कालीन धर्मश्रद्धेवरून ब्राह्मण- ब्राह्मणेतर वादाची पार्श्वभूमी लक्षात येते. जातिगत संघर्ष राजकीय ध्येयाच्या आड आले नाही. नाना फडणवीस आणि महादजी शिंदे यांनी एकत्र राहून निष्ठेने पेशवाईचे रक्षण केले हे सर्वज्ञात आहे. खर्ड्याच्या लढाईत सर्व मराठा सरदार एकदिलाने लढले. पेशवेकालीन जातीजातींमधील दुहीसाठी तत्कालीन धर्मभोळेपणा कारणीभूत होता असे खात्रीने आपणास वाटते. ब्राह्मण पोटजातींतील श्रेष्ठ-कनिष्ठ हा वाद भ्रामक धार्मिक श्रद्धेतून निर्माण झाला होता. वा.कृ. भावे लिहितात, ' भिक्षुक वर्गामध्ये ऋग्वेदी, यजुर्वेदी, सामवेदी, तैत्तिरीय, वाजसेनीय अशा प्रकारचे पोटभेद असून त्यांच्या दरम्यान मोठेपणाविषयी अहमहमिका लागून तट पडत, मारामाऱ्या होत व ग्रामण्येही माजत. त्यांच्या या क्षुद्र मनोवृत्तीमुळे क्षेत्रातील जीवितक्रम किती कुत्सितपणाचा बनत असेल व त्याची परस्थांना कशी कीव येत असेल याची कल्पना आजच्या काळातही काही क्षेत्रांची अवस्था पाहून करता येण्यासारखी आहे.' (पेशवेकालीन महाराष्ट्र,वा.कृ.भावे,पृ.३८१) खानदेशातील चोपडे गावी यजुर्वेदी ब्राह्मण आणि अभीर ब्राह्मण यांच्यामध्ये एकाच पंक्तीत बसून भोजन करण्यावरून वाद झाला होता. या प्रसंगावरून तत्कालीन मनोवृत्तीचा प्रत्यय येतो.

## १इ.३ पेशवेकालीन स्त्रीजीवन

पेशवेकालीन स्त्रियांची स्थिती एकंदरीत दयनीय होती. बालविवाहाची प्रथा रूढ होती. मुलगी आठ वर्ष होण्याअगोदर लग्न केले जात. मुलाचे लग्न बाराव्या-तेराव्या वर्षी केले जात. एकापेक्षा अधिक विवाह केले जात. बालविवाहाबरोबरच विषम विवाहाची प्रथा रूढ होती. प्रतिष्ठित लोक प्रतिष्ठेसाठी अनेक विवाह करीत. नाना फडणवीस यांची अनेक लग्ने झाली होती. बालविवाहाची प्रथा रूढ असल्याने स्त्रियांचे आयुर्मानही त्या काळात कमी असल्याचे दिसून येते. केवळ स्त्रियांच्याच नव्हे तर पुरुषांच्या आयुर्मानावरही बालविवाहाने परिणाम

होत होता. लहानपणी लग्न होत असल्यामुळे पुढे जाऊन पसंत-नापसंतीचा मुद्दा उपस्थित होत असे. पुरुषांच्या प्रवृत्तीत बदल होऊन दुसरे लग्न करण्याकडे त्यांचा कल दिसत असे. पेशवेकालात कसबिणींची संख्या भरपूर वाढली होती. कोकणात सिद्दी जातीच्या कुणबिणी असल्याचा उल्लेख आढळतो. कुणबिणींचा उपयोग मुलांना सांभाळणे, दळणकांडण करणे, घरची इतर कामे करणे, राखण करणे इत्यादी कामांसाठी होत असे. कुणबिणीप्रमाणे नायकिणींचा व्यवसाय करणाऱ्या अनेक स्त्रिया पेशवाईमध्ये होत्या.नायकिणी स्वतंत्र असत. नृत्यगायन करून चरितार्थ चालविणाऱ्या स्त्रियांना नायकिणी म्हणत असत. पेशव्यांच्या व इतर सरदारांच्या दरबारात नायकिणींचे नृत्यगायन होत असे.

पेशवेकालात सतीची चाल अत्यंत प्रतिष्ठेची मानलेली आढळून येते. अनेकदा पतीच्या मृत्युसमयी पत्नीचे वय कमी असत. अशा वेळी तरुण स्त्रीवर सहगमन करण्यासाठी दबाव आणला जात. तरुण किंवा अल्पवयीन स्त्रियांची पावले पतीपाठीमागे वाकडी पडतील ही भीती नातेवाईकांना वाटत असे. सती गेल्यावर स्त्रीला सद्गती लाभते असा समजही प्रचलित होता. पुष्कळ वेळी स्त्रिया आपल्या मनाविरुद्ध सती जात असे. स्वेच्छेने सती जाणाऱ्या स्त्रिया खूप कमी होत्या. धर्मावर गाढ श्रद्धा, पतिनिष्ठा, मोक्षप्राप्ती आणि रूढी इत्यादी कारणांमुळे स्त्रियांना सहगमन करण्याची प्रेरणा मिळे. प्रा.ह.श्री. शेणोलीकर, डॉ.प्र.न.देशपांडे लिहितात, ' पतीनिधनानंतर विधवा म्हणून जगणाऱ्या स्त्रियांचे जीवन तर अत्यंत अमानुष आणि केविलवाणे असे. ते पाहून विधवा राहण्यापेक्षा सती गेलेले बरे अशी समजूत तत्कालीन महिलांमध्ये असल्यास नवल नाही. सतीची चाल ब्राह्मणांमध्ये आणि क्षत्रियांमध्येच रूढ असल्याचे दिसून येते.' (महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, ह.श्री.शेणोलीकर, प्र.न.देशपांडे,पृ.३१३) सतीच्या स्मरणार्थ वृंदावन किंवा मंदिर बांधले जाई. गरीब लोक सतीच्या स्मरणार्थ शिला उभी करीत. सती न जाणाऱ्या स्त्रियांची परिस्थिती पेशवेकालात अत्यंत दयनीय होती. केशवपन करून विद्रूप बनण्याचे दुर्भाग्य त्यांच्या नशिबी येत. सासरी आणि माहेरी अशा दोन्ही ठिकाणी स्त्रीच्या वाट्याला वेदनाच होती. पेशवेकालीन समाजात स्त्रीच्या स्थानाविषयी सुधा देसाई लिहितात, 'The position of the middle class women, however, was probably worse than that of all others. The middle classes usually came from high castes. Thus while their class deprived the women of the privileges of the rich, their caste disqualified them the benefits which the concessions of law and custom accorded to the lower castes. The prevailing custom of child-marriage fettered their personality, and the system of joint family reduced them to a subservient position.' (Social Life in Maharashtra under the Peshwas, Sudha V. Desai, p.89) सुधा देसाई पेशवेकालीन स्त्रीच्या स्थितीवर अचूक भाष्य करतात.

## १इ.४ पेशवेकालीन व्रतवैकल्ये आणि अंधश्रद्धा

पेशवेकालात व्रतवैकल्य व भोळसट समजुतींची चलती होती. स्नानसंध्या चुकणे हे पाप मानले जाई. पेशव्यांची दोन-दोन घटका संध्या चालत असे. व्रते, दाने, अनुष्ठाने व तुला केल्याने ईश्वराची व ग्रहांची कृपा होते अशी समजूत दृढ होती. संकटातून वाचण्यासाठी प्रयत्नांऐवजी मंत्रतंत्रांचा आधार घेतला जात असे. आनंदीबाई कैदेतून मुक्त होण्यासाठी मंत्र-

तंत्रांचा जप करत असत. रघुनाथराव पेशव्यांनी ज्यावेळी मिरजेच्या गोविंदराव पटवर्धनांवर आक्रमण केले त्यावेळी पटवर्धन लढाई लढण्याऐवजी मंत्रतंत्र करत बसले होते. रघुनाथराव पेशव्यांचा मंत्रावर खूप भरोसा होता. त्यांनी पेशवेपद मिळावे म्हणून अनेक व्रतवैकल्ये केली होती. उपोषण करण्याची टूम पेशवेकालात रूढ होती. माधवराव पेशव्यांनी कैद केल्यानंतर रघुनाथ पेशव्यांनी अकरा उपोषणे केली होती. परंतु थोरल्या माधवरावांवर याचा कसलाही परिणाम झाला नव्हता. माधवराव पेशव्यांच्या अकाली मृत्यूला राघोबादादांचा तळतळाट कारणीभूत होता असे आनंदीबाईचे ठाम मत होते. नंतरच्या पेशव्यांनीही हाच कित्ता पुढे गिरवला.

अनुष्ठानावर तत्कालीन समाजाचा अत्यंत विश्वास होता. महामारीचे अनुष्ठान, प्रदक्षिणेचे अनुष्ठान, पर्जन्यासाठी अनुष्ठान अशा प्रकारची अनेक अनुष्ठाने केली जात व त्यावर प्रचंड पैसाही खर्च केला जात असत. ग्रहण हे तर मोठे अरिष्ट समजले जायचे. ग्रहणाच्या आधी आणि नंतर चार दिवस प्रवास वर्ज्य मानला जात होता. ग्रहणाच्या वेळी तुलादान केले जायचे. दानधर्माला पेशवेकालात फार प्रोत्साहन मिळाले होते. सणवार, ग्रहणे, पर्वकाळ अशावेळी पेशवे मोठ्या प्रमाणात दानधर्म करत. थोर व्यक्तींच्या मृत्युनंतर उत्तरकार्यासाठी जमिनी दान दिल्या जायच्या. ब्राह्मण भोजनाचे प्रस्थ खूपच वाढले होते. सहस्त्रभोजने तसेच लक्षभोजनाची प्रथा होती.

व्रतामध्ये अनेक प्रकारची व्रते लोक करत. दशाफलव्रत, बुधाष्टमीव्रत, अदुःखनवमीव्रत, ऋषिपंचमीव्रत, शाकाव्रत, मौन्यव्रत, संकष्टी चतुर्थी व्रत, गोकुळअष्टमी व्रत यांसारखी अनेक व्रते पाळली जात. भूतबाधा आणि चेटुक यांवर लोकांची नितांत श्रद्धा होती. कोकणामध्ये भुते घालवणे, त्यांचा बंदोबस्त करणारे अनेक लोक होते. लोकांना भुतांकडून उपद्रव करणारे काही लोक होते. अशा चेटुक करणाऱ्यांना शिक्षा करण्याची व्यवस्था होती. केवळ जनताच नव्हे तर मोठमोठ्या सरदारांचाही या गोष्टींवर विश्वास होता. लोकांचा पायगुण या अवैज्ञानिक गोष्टीवर विश्वास होता. पेशव्यांनी दौलताबादचा किल्ला जिंकल्यावर गोविंदराव पटवर्धनांनी पेशव्यांना खास पत्र लिहून विनंती केली, की दौलताबाद किल्ल्याचा पायगुण चांगला नाही. तो किल्ला मोगलांना त्वरित परत करावा. प्रत्येक गोष्ट खास करून लढाई मुहूर्त पाहून केली जात असे. त्यात अपयश आले तर मुहूर्त काढणाऱ्या ज्योतिषाला जबाबदार धरले जायचे. एकंदरीत पेशवेकालीन समाजाची मनोवृत्ती ही अंधविश्वासांना खतपाणी घालणारी होती. आज एकविसाव्या शतकातल्या विज्ञान युगातही सुशिक्षित जनता धर्मभोळी व अंधविश्वास पाळणारी आहे. वर्तमानकालीन परिस्थितीवरून पेशवेकालीन स्थितीचा आपण अंदाज करू शकतो.

## १इ.५ पेशवेकालीन ग्रामव्यवस्था

प्राचीन काळापासून चालत आलेली ग्रामव्यवस्था पेशवेकालात थोड्याफार फरकाने कायम होती. गावातील पाटील आणि कुलकर्णी हे प्रमुख होते. पाटिलकीच्या कामाबद्दल पाटलास जमीन इनाम दिली जात असे. तिला पासोडी म्हटले जात असे. गावच्या वसुलीचा दहावा हिस्सा पाटील व कुलकर्णी यांच्यामध्ये दोनास एक या प्रमाणात वाटला जाई. गावात सर्वाधिक मान पाटलाला व त्याखालोखाल कुलकर्ण्याला मिळत असे. गावातील शांती आणि सुव्यवस्थेची जबाबदारी या दोहोंवर होती. गावकीची कामे करणाऱ्या आलुतेदार

आणि बलुतेदार यांना शेतकरी वर्षाला ठराविक धान्य देत असत. गावात गुन्हा घडल्यास त्याची चौकशी ग्रामपंचायतीमार्फत होत आणि दोषींना दंडित करण्याचा अधिकार पाटलाकडे असे.

## १इ.६ पेशवेकालीन शेती, बागबगीचे आणि उद्योगधंदे

पेशवेकालात शेती हाच मुख्य व्यवसाय होता. बहुसंख्य जनता शेतीवर निर्भर होती. शेतीला पाणीपुरवठा करण्यासाठी अनेक नवीन योजना सुरू करणे आणि जुन्या योजनांची दुरुस्ती करणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य पेशवेकालात झाले. शेतीसाठी चांगली खिल्लार जनावरे उपलब्ध व्हावी या उद्देशाने अनेक सरदार खिल्लार जनावरे पाळत असत. ही जनावरे शेतकऱ्यांना देत असत. शेतकऱ्यांना तगाई देण्याची प्रथा पेशवाईत होती. ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणावी लागेल. पेशवाईत फुलबाग व फळबागांमध्ये वृद्धी झाली होती. पेशवे दप्तरात उल्लेख आहे की औरंगाबादवरून फुलझाडांची रोपे पुण्याला आणली जात असे. शाहू महाराजांना फळझाडांचा खूप शौक होता. वा.कृ.भावे लिहितात, 'साताऱ्यास नारळाची व सुपारीची झाडे घरोघरी आहेत. त्यांचा उगम शाहू महाराजांच्या उद्योगात सापडतो.' (वा.कृ.भावे, पेशवेकालीन महाराष्ट्र,पृ.१८३) इ.स. १७४७ मध्ये पुण्यात पेशवे, शिंदे आणि होळकर सरदारांच्या मिळून ३१ बागा होत्या.

पेशवेकालात येथील उद्योगधंद्यात खूप बदल झाला होता. पेशव्यांच्या काळात इंग्रजांनी महाराष्ट्रातल्या बाजारपेठा काबीज करण्याचे षडयंत्र सुरू केले होते. व्यापारावर कब्जा केल्यामुळे इंग्रजांचा आर्थिक लाभ झालाच त्याच बरोबर मराठ्यांमध्ये दूरदृष्टीचा कसा अभाव आहे याचाही अनुभव आला. कापड, कागद, लोखंडी सामान, घड्याळे, दुर्बिणी इ. वस्तू भारतीय लोक खरेदी करत. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीलाच भारतीय कापडधंदा इंग्रजांनी नष्टप्राय केला. परदेशी स्वस्त कापडांच्या आहारी जाऊन भारतीयांनी आपल्याच कामगार बांधवाना रस्त्यावर आणले. दौलताबाद आणि जुन्नर याठिकाणी चांगल्या प्रकारचा कागद तयार होत असे. मात्र इंग्रजांच्या गुळगुळीत कागदाने भारतीयांना आकर्षित केले. नानासाहेब पेशव्यांच्या काळात परदेशी कागद चांगलेच लोकप्रिय झाले होते. कागदाप्रमाणे कुलपांचे विविध प्रकार इंग्लंडमधून भारतात आणून ब्रिटिशांनी भारतातील कुलूपव्यवसाय डबघाईला आणला. इंग्रजांनी चहाचा व्यवसायही आपल्या नियंत्रणाखाली आणला. भारतीय काचकामाचा व्यवसाय इंग्रजांच्या काळात संपला. हे सारे पेशवेकाळात होत होते.

## १इ.७ पेशवेकालीन वास्तुशास्त्रातील उपलब्धी

पेशवेकालात वास्तुशास्त्राने प्रगती केली होती. प्रवरा व गोदावरीच्या संगमावर असलेले टोके हे गाव पेशवेकालात रचलेले होते. या गावातील घरे उत्कृष्ट असून प्रत्येक घराला न्हाणीघर होते. सांडपाण्याची विल्हेवाट लावण्यासाठी गटारांची व्यवस्थित रचना केली होती. देवालये बांधण्याची कला उर्जितावस्थेस आली. टोके येथील सिद्धेश्वर मंदिर, नेवासे येथील मोहिनीराज मंदिर, प्रवरासंगम, कायगाव येथील महादेवाची मंदिरे, नाशिकमधील सुंदर नारायण, रामेश्वर आणि काळाराम ही मंदिरे, त्र्यंबकेश्वर येथील त्र्यंबकेश्वराचे मंदिर, भीमाशंकर येथील मंदिर, पुण्याच्या पर्वतीवरील मंदिरे पेशवेकालात बांधलेली आहेत.

अहिल्याबाई होळकर यांनी वेरुळच्या घृष्णेश्वराच्या मंदिराचा याच काळात जीर्णोद्धार केला. पुण्यात पेशव्यांनी अनेक मंदिरे बांधली. उदा. तुळशीबाग, बेलबाग, ओंकारेश्वर, अमृतेश्वर इ. माहुलीतील काशी विश्वेश्वर आणि संगमेश्वर मंदिर, धावडशीचे भार्गवरामाचे मंदिर, सासवडचे वटेश्वर आणि संगमेश्वर मंदिर, कोल्हापूरजवळचे केदारेश्वर मंदिर यांचे निर्माण पेशव्यांच्या काळात झाले. देवळाभोवती तटबंदी, प्रवेशद्वारावर नगारखाना, मुख्य मंदिराला जोडून लहान मंदिरे, दीपमाळ ही पेशवेकालीन मंदिर बांधणीची मुख्य वैशिष्ट्ये आहेत. घाटांची बांधणीही पेशवेकालात मोठ्या प्रमाणात झाली. अहिल्याबाई होळकर यांनी काशीच्या पवित्र गंगेकाठी घाट बांधला. महेश्वर, नाशिक, रामेश्वर, पंढरपूर या तीर्थक्षेत्री अहिल्याबाई यांनी घाट बांधले. पेशव्यांपैकी नानासाहेब पेशवे आणि दुसरे बाजीराव यांनी अनेक धार्मिक वास्तू बांधल्या. वाईतही अनेक घाट असून रास्ते घाट, जोशी घाट आणि पेशवे घाट प्रसिद्ध आहे. यात्रेकरूंच्या सोयीसाठी पेशव्यांनी अनेक धर्मशाळा बांधल्या. मंदिरांतून विहिरी बांधल्या. नाशिकच्या गोदावरीला अनेक कुंडांचे निर्माण केले. पेशवेकालात तीर्थयात्रांना महत्त्व प्राप्त झाले होते. उत्तर भारतातही काशी, प्रयाग, मथुरा, वृंदावन या क्षेत्रांना पुनः महत्त्व प्राप्त झाले होते. पेशवेकालात थोर पुरुषांच्या समाध्या व छत्र्या ठिकठिकाणी बांधल्या गेल्या. उदा. इंदोर, महेश्वर व पुणे येथील छत्र्या वास्तुशास्त्राच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. पेशव्यांच्या काळात चौसोपी वाडे बांधले गेले. उदा. पुणे (शनिवारवाडा), कोपरगाव (रघुनाथ पेशव्यांचा वाडा). पेशवेकालात रस्त्यांची दुरुस्ती मोठ्या प्रमाणात झाली. नानासाहेब पेशवे व माधवराव पेशव्यांनी रस्ता व घाट बांधणीसाठी उत्तेजन दिले. पेशवेकालात पाणी पुरवठ्याच्या अनेक योजनांना पूर्णत्व प्राप्त झाले. उदा. कात्रज तलाव, पर्वती तळे, सातारा पाणी पुरवठा योजना, बोरघाट तळे, जेजुरी तळे इ.

## १इ.८ पेशवेकालीन दैनंदिन जीवन

महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास या ग्रंथात प्रा.ह.श्री.शेणोलीकर, डॉ.प्र.न.देशपांडे यांनी पेशवेकालीन दैनंदिन जीवनाविषयी विचार मांडले आहेत. त्यांच्या मते पेशवेकालीन दैनंदिन जीवन खूपच समृद्ध होते. पुरुषांच्या पोषाखामध्ये धोतर, विजार, तुमान, तुंबा (पायजमा) यांचा समावेश होता. रेशीम कापडाचे अंगरखे पुरुष घालीत. पगडी सर्वात महत्त्वाची होती. फेटा, पागोटे, मंदील आणि रुमालाचा वापर होत असे. पुरूषांमध्ये मिशा राखण्याची पद्धत होती. दाढी ठेवण्याकडे कल नव्हता. कपाळावर गंध लावला जात होता. पुरुष हातात अंगठ्या कानात भिकबाळी घालत. स्त्रिया वीस हात लुगडे, जरीकाठी पातळ वापरत असत. सुवासिनी स्त्रिया अंगावर शेला किंवा दुपेटा घेत असत. विधवा स्त्रिया धोतर वापरत. स्त्रियांच्या अलंकारात कर्णफुले, नथ, मोत्याची माळ, पोहेहार, पाटल्या, बिल्वर, अंगठ्या, कंठी इ. अलंकार आवर्जून घालत. मौल्यवान रत्नांचाही वापर होत होता. अन्नधान्याची रेलचेल होती. भोजनात अनेक मिष्टान्ने असत. पुरणपोळी पदार्थ पेशवेकालात खूप लोकप्रिय होता. श्रीमंत लोक चहा पित. मद्यपानावर कठोर नियंत्रण होते. आजारी व्यक्तींना हिंदू वैद्य किंवा मुस्लिम हकिमांकडून उपचार होत असे विलायती डॉक्टरांचे प्रस्थ होते. इ.स. १७७३ मध्ये एक विलायती डॉक्टर पुण्याच्या दरबारात होता. विलायती औषधांची दुकानेही होती.

## १इ.९ पेशवेकालीन साहित्य आणि कला

पेशव्यांचा इंग्रजांशी संपर्क येऊनही त्यांच्याकडून छपाई कलेचा स्वीकार केला नाही. पोथ्यापुराणांच्या हस्तलिखित प्रती करून उपजीविका करणारा एक वर्ग पेशवेकालात होता. धार्मिक शिक्षणाला पेशवेकालात प्राधान्य होते. श्रावणमासदक्षिणा किंवा पर्वतीवरील रमणा याद्वारे पंडिती शिक्षणाला उत्तेजन दिले जात होते. कीर्तन, प्रवचन, पुराण या माध्यमातून धार्मिक शिक्षण व लोकरंजन केले जात होते. तमाशा, नृत्य, लळीत, बहुरूपी सोंगे, कळसूत्री बाहुल्यांचे खेळ हे मनोरंजनासाठी होते. तमाशा हा कलाप्रकार खूपच लोकप्रिय होता. रामजोशी, परशराम, सगनभाऊ, प्रभाकर, होनाजी बाळा इ. लावणीकार पेशवाईत उदयास आले होते. पेशवे धार्मिक असल्याने कीर्तनकार व हरिदासांना चांगले दिवस आले होते. सुधा देसाई लिहितात, ‘ The class of people who performed katha and kirtana were known as Haradasa and Gosavi. These katha performances must have been popular in those days, for we find that the Haradasa and Gosavi were being invited to produce such performances on the occasion of public festivals like Ganesh Chaturthi and Shimaga, at the Peshwa’s palace.’ श्रीधर, मोरोपंत, निरंजनमाधव, मध्वमुनी, महिपती, अमृतराय हे प्रसिद्ध कवी पेशवाईत होऊन गेले. शेणोलीकर, देशपांडे तत्कालीन साहित्याविषयी म्हणतात, ‘ अठराव्या शतकातील वाङ्मयात लोकांच्या आचारविचारांना वळण लावण्याची धमक राहिली नाही. त्याच त्याच आध्यात्मिक विचारांचे व पुराणकथांचे चर्वितचर्वण करण्यापलीकडे श्रीधर, महिपती वा मोरोपंत यांच्या वाङ्मयाने स्वतंत्र विचारप्रवर्तन केले नाही.’(महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, ह.श्री.शेणोलीकर, प्र.न.देशपांडे,पृ.३१६) एकंदरीत या काळातील साहित्यात प्रेरकतेची कमतरता होती.

## १इ.१० पेशवेकालीन देवदेवता आणि धर्म

पेशवाईत पौराणिक देवतांना महत्त्व वाढले होते. ‘गणेश’ ही देवता पेशव्यांची उपास्य देवता असल्याने या देवतेची अनेक मंदिरे पेशवेकालात बांधली गेली होती. शिव, स्कंद, विष्णू, लक्ष्मी या देवतांची काही मंदिरे बांधली गेली. पेशव्यांनी अनेक मंदिरांचा जीर्णोद्धार केला. गणपती देवतेकडे पेशव्यांचे खास लक्ष होते. खंडोबा, भवानी यांचेही महत्त्व अबाधित होते. पेशव्यांनी त्र्यंबकेश्वर देवस्थानाला सोन्याचा मुखवटा चढवला होता. जेजुरीच्या खंडोबावर पेशव्यांची श्रद्धा होती. पेशवेकालात कर्मकांड, सोवळेओवळे या भ्रामक कल्पनांना उधाण आले होते. शिवकालात हिंदूंचे शुद्धीकरण झाले होते मात्र पेशवेकालात तसे अजिबात झाले नाही. पानिपतच्या लढाईत अनेक हिंदू मुसलमानांकडून बाटवले गेले होते. महाराष्ट्रात आल्यावर त्यांचे शुद्धीकरण करण्याचा प्रयत्न पैठणच्या ब्राह्मणांनी केला होता परंतु कर्मठ ब्राह्मणांनी त्यांना वाळीत टाकले होते. भोजनाच्या बाबतीत उच्च-नीच, स्पृश्य-अपृश्य, ब्राह्मण-ब्राह्मणेतर असा भेदभाव केला जात होता.

## १इ.११ पेशवेकालीन न्यायव्यवस्था

भारतातील प्राचीन ‘आचारधर्म’ विषयक ग्रंथातून सांगितलेल्या न्यायदान पद्धतीनुसार न्यायदान होत असे. तसेच त्यात सांगितलेल्या पद्धतीच्या आणि प्रकारच्याच शिक्षा दिल्या

जात होत्या. परंपरा मोडू नका आणि नव्या परंपरा निर्माण करू नका असेच पेशव्यांचे धोरण होते. पेशवे सत्ताधारी झाल्यावर त्यांनी न्यायदानासाठी 'न्यायाधीश' हे स्वतंत्र पद निर्माण केले. याअगोदर अष्टप्रधानांपैकी पंडितराव हे न्यायदानाचे काम पहात होते. सुरुवातीच्या काळात हे पद भूषवलेले रामशास्त्री प्रभुणे हे त्यांच्या कठोर न्यायी स्वभावामुळे इतिहासात प्रसिद्ध झाले. रामशास्त्री प्रभुणे यांच्या न्यायनिवाड्यावरून पेशवेकालीन न्यायव्यवस्था अतिशय निःपक्षपाती होती हे दिसून येते. रामशास्त्री हे सरन्यायाधीश होते त्यामुळे अनेक खटले त्यांच्यासमोर चालत. गुन्ह्याच्या व्याप्तीप्रमाणे पाटील, मामलेदार, सुभेदार यांना न्यायदानाचे अधिकार होते. शिक्षांमध्ये दंडापासून दिव्यापर्यंत अनेक प्रकारच्या शिक्षा सुनावल्या जात. निरपराधीपण सिद्ध करण्यासाठी गुन्हेगाराला दिव्य करावे लागत असत. चोरी, मारामारी, खून, व्यभिचार यांसारखे गुन्हे गंभीर स्वरूपाचे मानले जात. गंभीर गुन्हा असेल तर देहदंडाची शिक्षा सुनावली जात. रामशास्त्री यांनी रघुनाथराव पेशव्यांना देहदंडाची शिक्षा फर्मावली होती. व्याभिचाराबद्दल स्त्री आणि पुरुष दोघांनाही शिक्षा सुनावली जात असे. पेशवेकालीन समाजव्यवस्था धर्माधिष्ठित असल्यामुळे धर्मबाह्य वर्तन करणे गंभीर स्वरूपाचे समजले जाई. ब्राह्मणसमाजावर अत्यंत कडक बंधने होती. गो.बं.देगलूरकर लिहितात, 'पंचायतीप्रमाणे निवाडा करण्यासाठी ब्रह्मसभा आणि जातिसभा पूर्वापार अस्तित्वात होत्या. पेशवाईत त्या तशाच चालू राहिल्या. ब्रह्मसभा ही पारंपरिक अधिकारानुसार धार्मिक आणि जातीय तंट्यांचा निवाडा करी. जातिधर्माच्या बाबतीत जे दोषी असतील त्यांना दिव्य करावयास लावण्याचा अधिकार ब्रह्मसभेला होता. तसेच व्यभिचार, हिंसा अशासारखे कृत्य करणाऱ्यांना जातिधर्माचे उल्लंघन केले म्हणून दोषी ठरवण्याचा अधिकार जातिसभेला होता.' (पेशवेकालीन समाज आणि प्रशासन, गो.बं.देगलूरकर, पृ.२०१) जातीतील जाणते आणि प्रतिष्ठित लोक एकत्र येऊन निवाडा करत. त्याला 'दैव' असे म्हणत. जातिधर्माविरुद्ध वर्तन करणाऱ्यास 'दैव' जातीबाहेर टाकत असे. जातिबाहेर टाकलेल्या व्यक्तीस पुन्हा जातीत घेता येत असे. परंतु त्यासाठी त्या व्यक्तीने प्रायश्चित घेण्याच्या प्रक्रियेतून जाण्याची अपेक्षा असे. हिंदूंच्याप्रमाणे इतर धर्मियांचे तंटे पेशव्यांकडे न्यायदानासाठी येत असत आणि योग्य तो न्याय दिला जात असे. एका मुस्लिम महिलेस तिच्या नवऱ्याच्या मृत्यूनंतर घरच्या दासीपुत्राने फसवून जहाँगिरी मिळवली होती. तिने पुराव्यासह पेशव्यांकडे अर्ज केला तेव्हा तिला तिची जहाँगिरी परत मिळाली होती.

## १इ.१२ पेशवेकालीन प्रशासन

पेशवाईत प्रशासन सुचारू चालण्याच्या उद्देशाने राज्याचे अनेक भाग पाडले होते. प्रांत, जिल्हा, तालुका आणि गाव ही आजची विभागणी पेशवेकालातही होती. प्रांताला सुभा म्हटले जात होते. तालुक्यापेक्षा लहान घटकाला महाल म्हटले जात. महालात कसबा, मौजे आणि मजरे यांचा समावेश असे. मौजे म्हणजे लहान खेडेगाव, कसबा म्हणजे बहुधा बाजार भरणारे खेडेगाव. लोकहितवादींच्या मते, बारा गावची हद्द ज्या गावाला लागली ते गाव म्हणजे 'कसबा' होय. शेणोलीकर, देशपांडे म्हणतात त्याप्रमाणे, पेशवे दप्तरातील कागदपत्रे पाहता कसबा या राज्यघटकाची निश्चित व्याख्या सांगता येत नाही. तालुक्याला परगणा म्हटले जात होते. निरनिराळ्या घटकांचे अधिकारी पुढीलप्रमाणे होते. गाव-मोकदम, तरफ-हवालदार, महाल-महालकरी, तालुका-मामलेदार, प्रांत-सुभेदार. अंमलदार किंवा

अधिकाऱ्यांचे वेतन वर्षातून एकदा होत असे. रोजंदारीवर काम करणाऱ्या कामगारांना दररोज किंवा महिन्याला मोबदला मिळत असे. सणावाराला पगारवाढ होत असे. अधिकारी दौऱ्यावर असेल तर वेगळा भत्ता मिळे. पेशवाईत उत्पन्नाच्या महत्त्वाच्या बाबी – १) शेतजमिनीवरील कर (सारा). २) जकात-ही सर्व पदार्थ प्राणी व गुलाम यांच्या विक्रीवर आकारली जाई. ३) अबकारी कर – शहरातून दुकाने उघडताना सरकारी तिजोरीत भरावयाचे शुल्क. ४) पट्टी – ही प्रसंग विशेषणे घेतली जात. घरपट्टी, नळपट्टी, तळेपट्टी आकारली जात असे. सरकारी अधिकारी कर वसूल करीत. जकातकर वसूल करणारे स्वतंत्र अधिकारी नेमले होते.

## १इ.१३ पेशवेकालीन शिक्षण

शिक्षण क्षेत्राचा विचार करता असे दिसून येते की, प्रशासनात शिक्षणासाठी वेगळे खाते किंवा विशिष्ट धोरण नव्हते. समाज साक्षर व्हावा यासाठी सरकारी पातळीवर जाणीवपूर्वक प्रयत्न झाल्याचे दिसत नाही. ज्याला जे वाटेल ते तो व्यक्तिगत पातळीवर शिकत होता. एखादा उत्साही माणूस गावातील मुलांना जमवून प्राथमिक गोष्टी शिकवत असे. श्रीमंत लोक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी शिक्षकाला घरी बोलावत असे. मा.वि.पाटणकर यांनी तत्कालीन शिक्षण विषयक काही तपशील दिला तो पुढीलप्रमाणे आहे – ' तात्या पंतोजीच्या शाळा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शाळा त्या काळात शहरात आणि खेड्यात बऱ्याच असत. शाळा म्हणजे आताच्या पद्धतीच्या नव्हत्या. देऊळ, चावडी किंवा एखाद्या सुयोग्य अशा सार्वजनिक ठिकाणी त्या भरत. मोडी व बाळबोध लिहिणे-वाचणे, सोपे हिशोब ठेवता येणे आणि व्यावहारिक गणित अवगत होणे एवढ्यापुरताच अभ्यासक्रम मर्यादित असे. पुस्तके नसत. हस्तलिखितांच्या सहाय्यानेच लिहिणे-वाचणे शिकवण्यात येई. मुलांजवळ धुळपाट्या असत. मासिक फी ऐवजी पंतोजींना दक्षिणा किंवा शिधा देण्यात येई. या शाळा फक्त मुलांसाठी असत. मुलींना शिक्षण द्यावे ही कल्पनाच नव्हती. अशा शाळांचे जाळे महाराष्ट्रभर पसरले होते. या शाळांद्वारा साक्षरतेचे कार्य व्यवस्थित चालू होते. तत्कालीन सरकारी अहवालांवरून असे दिसते की, पेशवाईच्या अंतकाळी अशा शाळा एकट्या पुण्यात २२२ होत्या. (पेशवेकालीन समाज आणि प्रशासन, देगलूरकर गो.बं.,पृ.७७) पेशव्यांनी तलवारीच्या जोरावर अनेक पराक्रम केले पण पराक्रमी सैनिक तयार करण्यासाठी सैनिकी शाळा सुरू करावी असे त्यांना वाटले नाही. सैन्यातील आणि स्वारी शिकारीतील अनुभव हाच प्रत्यक्ष सैनिकी शिक्षणाचा गुरू होता.

व्यावसायिक शिक्षण हे व्यावहारिक शिक्षणाचा एक भाग मानला जातो. पेशवेकाळात व्यावसायिक शिक्षण व्यक्तिगत पातळीवर घेतले जात होते. व्यावसायिक शिक्षणाचा संबंध बारा बलुतेदारांच्या व्यवसायांशी येतो. हे व्यवसाय वंशपरंपरेने चालत आलेले असतात. पित्याचा व्यवसाय मुलगा पुढे चालवत असे. हे शिक्षण घेण्यासाठी मुलाला इतरत्र जाण्याची गरज भासत नसे. आपल्या पित्याकडून हे शिक्षण त्याला मिळे. वडिलांच्या व्यवसायात सहभागी झाले की वडिलांचे मार्गदर्शन, निरीक्षण आणि प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळत असे. तांत्रिक शिक्षण किंवा कौशल्य शिक्षण वंशपरंपरेने मिळत होते.

देगलूरकर यांच्या मते पेशवे ग्रंथप्रेमी आणि विद्याप्रेमीही होते. त्यांना ज्ञानलालसा होती. ते बहुश्रुत होते. युद्धकला आणि शस्त्र शिक्षणाइतकेच त्यांनी ग्रांथिक, व्यावहारिक आणि

राजकीय शिक्षणालाही महत्त्व दिल्याचे त्यावेळच्या पत्रव्यवहारावरून दिसून येते. (पेशवेकालीन समाज आणि प्रशासन, देगलूरकर गो.बं.,पृ. ७९) पेशवाईच्या प्रारंभी महाराष्ट्रात पुस्तकांची वाण फारच भासत होती. पेशव्यांनी ग्रंथसंग्रहाचे अत्यंत आवश्यक कार्य केले. नानासाहेब पेशवे अधिक विद्वान व बहुश्रुत होते. त्यांनी महाराष्ट्र आणि महाराष्ट्राबाहेरून (उदयपूर) अनेक हस्तलिखिते जमविली.

## १इ.१४ पेशवेकालीन संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान

पेशवाईच्या पूर्वार्धात बाळाजी विश्वनाथ व पहिला बाजीराव, चिमाजी आप्पा यांनी सर्व सरदारांना एकत्र आणून 'मराठा मंडळ' स्थापन करून स्वराज्याचे संरक्षण व विस्तार केला. पेशवे व मराठे सरदार एकाच ध्येयाने प्रेरित झाले असल्याने त्यांच्यात एकजूट होती. त्यांचा पराक्रम व स्वामिभक्ती या गुणांमुळे स्वराज्याचा विस्तार होत गेला. भारताच्या अन्य प्रांतांतील मोगल, पोर्तुगीज, इंग्रज, फ्रेंच यांच्यावर मराठ्यांचा दबाव होता. डॉ.द.ह.अग्निहोत्री म्हणतात त्याप्रमाणे, नियंत्रित स्वातंत्र्य व प्रलोभन यांच्या योग्य उपयोगामुळे पेशवाईच्या पूर्वार्धात महाराष्ट्राची भरभराट झाली होती. (महाराष्ट्र संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान, डॉ.द.ह.अग्निहोत्री, पृ.२३०) पेशवाईच्या पूर्वार्धाचा काळ अत्यंत धामधुमीचा असल्याकारणाने संस्कृतीच्या विभिन्न अंगांचा विकास होऊ शकला नाही. या काळात सरदारांचे वाडे, मंदिरे व नद्यांचे घाट बांधले गेले. पेशवाईच्या उत्तरार्धात संस्कृतीचे अधःपतन झाले. उदा. वैदिक कर्मकांडे, सोवळेओवळे, स्पृश्यअस्पृश्यता याबाबतीत पेशवाईच्या उत्तरार्धात विद्वान ब्राह्मणांनी अतिरेक केला. त्यामुळे समाजात कमालीची विषमता वाढली. भ्रामक धर्मविषयक समजुती, जप व अनुष्ठाने यांच्या परिणामकारकतेवर अतोनात विश्वास वाढला. व्रतवैकल्ये, उद्यापने, संतर्पणे, सहस्रभोजने व दानधर्म यांवर अफाट खर्च झाला. याकाळात लोकशिक्षणाची उपेक्षा झाली. मंदिरातील पाठशाळांतून केवळ ब्राह्मणांच्या मुलांना वेदविद्या, काव्य, व्याकरण, ज्योतिष, तर्क, न्याय इ. विषय शिकवले जात होते. युद्धविषयक शिक्षणाची सोय नव्हती. उद्योगधंद्यांचे शिक्षण दिले जात नव्हते. शुद्रातिशूद्रांचा प्रचंड तिरस्कार केला जात होता. पाश्चात्य देशांतील विज्ञानाच्या व यंत्रशास्त्राच्या प्रगतीचे महत्त्व पेशव्यांनी ओळखले नाही. त्यामुळे आपण परावलंबी राहिलो. याचा परिणाम असा झाला की सामान्य जनतेने इंग्रजांचे स्वागत केले.

## १इ.१५ समारोप

पेशवेकालीन इतिहास बारकाईने अभ्यासल्यावर जाणवते की अठराव्या शतकात युरोपात विविध क्षेत्रांत जी परिवर्तने झाली त्याची दखल पेशवेकालीन राजकर्त्यांनी घेतलेली नव्हती. अठराव्या शतकाच्या अखेरीस अमेरिकेतील क्रांती, फ्रान्स राज्यक्रांती तसेच इंग्लंडमधील औद्योगिक क्रांती याविषयी पेशवे अनभिज्ञ होते. हे आश्चर्यकारक म्हणावे लागेल. पेशव्यांनी राजकारणात धर्मकारण आणि कर्मकांडाची सरमिसळ केली हे शेणोलीकर, देशपांडे यांचे मत स्विकारणीय असेच आहे. यादवकालात जे झाले त्याची पुनरावृत्ती पेशवेकालात झाली. पेशवेकालीन हिंदू राज्यकर्त्यांप्रमाणे इस्लामी सत्ताधीशांची प्रतिगामी वृत्ती वाढली होती. या दोहोंनी आधुनिक विचारांना जाणीवपूर्वक दूर ठेवले. परिणामी इंग्रजांचे फावले व ते भारताचे सर्वेसर्वा बनले.

## १इ.१६ संदर्भ ग्रंथ

१. नसिराबादकर, ल.रा.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास,फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९७६.

२. शेणोलीकर, ह.श्री.; प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९७१.

३. सरदार, गं.बा.; संत साहित्याची सामाजिक फलश्रुती, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे, तिसरी आवृत्ती, १९७०.

४. अग्निहोत्री, द.ह.; महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान, सुविचार प्रकाशन मंडळ, नागपूर, प्रथम आवृत्ती, १९७७.

५. भावे, वि.ल.; महाराष्ट्र सारस्वत,पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सहावी आवृत्ती,१९८२.

६. कुलकर्णी, श्री.रं; मध्ययुगीन मराठी साहित्य एक पुनर्विचार, राजहंस प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९९५.

७. भावे, वा.कृ.; पेशवेकालीन महाराष्ट्र, भारतीय इतिहास अनुसंधान परिषद, नवी दिल्ली, प्रथम आवृत्ती, १९७६.

८. Desai, Sudha; Social Life in Maharashtra under the Peshwas, Popular Prakashan, Bombay, Ist edition, 1980.

९. सहस्रबुद्धे, पु.ग.; महाराष्ट्र संस्कृती, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती, १९७९.

१०. शेणोलीकर, ह. श्री., देशपांडे, प्र. न.; महाराष्ट्र संस्कृती घडण आणि विकास, मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प्रथम आवृत्ती, १९७२.

११. देगलूरकर गो.बं.; पेशवेकालीन समाज आणि प्रशासन, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था, पुणे, प्रथम आवृत्ती, २०२३.

## १इ.१७ सरावासाठी प्रश्न

### अ.दीर्घोत्तरी

१) पेशवेकालीन शिक्षण व्यवस्थेचे स्वरूप स्पष्ट करा.

२) 'पेशवेकालीन स्त्रियांचे जीवन कष्टप्रद होते.' या विधानाची चर्चा करा.

३) पेशवेकालीन न्यायव्यवस्थेसंबंधी चर्चा करा.

४) पेशवेकालीन समाज जीवनाचा थोडक्यात आढावा घ्या.

५) पेशवेकालीन संस्कृतीची ओळख करून द्या.

**ब) टीपा लिहा.**

१) पेशवेकालीन वास्तू

२) पेशवेकालीन संस्कृतीचे तात्त्विक अधिष्ठान

३) पेशवेकालीन दैनंदिन जीवन

४) पेशवेकालीन शिक्षण

५) पेशवेकालीन साहित्य आणि कला

**क) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) पेशवेकाळात मुख्य व्यवसाय कोणता होता?

**उत्तर- शेती**

२) 'बारा गावची हद्द ज्या गावाला लागली ते गाव म्हणजे कसबा होय', असे कोणाचे मत होते?

**उत्तर- लोकहितवादी**

३) प्रवरा व गोदावरीच्या संगमावर असलेले कोणते गाव पेशवे काळात रचलेले होते?

**उत्तर- टोके**

*****

# घटक२अ

## २अ. शिवकालीन संप्रदाय

**घटक रचना**

२अ.१ उद्देश

२अ.२ प्रस्तावना

२अ.३ नाथ संप्रदायाचा इतिहास

२अ.३.१ नाथसंप्रदायाचे मुख्य दैवत

२अ.३.२ नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान

२अ.३.३ नाथसंप्रदायाचा प्रभाव

२अ.३.४ नाथसंप्रदायातील ग्रंथनिर्मिती

२अ.३.५ नाथसंप्रदायाच्या मर्यादा

२अ.४ महानुभाव संप्रदायाचा इतिहास

२अ.४.१ महानुभाव संप्रदायाचा आराध्यदैवत

२अ.४.२ महानुभाव संप्रदायाची ग्रंथनिर्मिती

२अ.४.३ महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान

२अ.४.४ महानुभाव संप्रदायाचा प्रभाव

२अ.४.५ महानुभाव संप्रदायाच्या मर्यादा

२ अ.५ दत्त संप्रदायाचा इतिहास

२अ.५.१ दत्त संप्रदायाचे साहित्य संपदा

२अ.५.२ दत्त संप्रदायातील देवता

२अ.५.३ दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान

२अ.५.४ दत्त संप्रदायाचा प्रभाव

२अ.५.५ दत्त संप्रदायाच्या मर्यादा

२अ.६ वारकरी संप्रदायाचा इतिहास

२अ.६.१ वारकरी संप्रदायातील देवता

२अ.६.२ वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान

२अ.६.३ वारकरी संप्रदायाचा प्रभाव

२अ.६.४ वारकरी संप्रदायाची ग्रंथनिर्मिती

२अ.७ समर्थ संप्रदायाचा इतिहास

२अ.७.१ समर्थ संप्रदायाचे आराध्यदेवता

२अ.७.२ समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान

२अ.७.३ समर्थ संप्रदायाचा प्रभाव

२अ.७.४ समर्थ संप्रदायातील ग्रंथनिर्मिती

२अ.७.५ समर्थ संप्रदायाच्या मर्यादा

२अ.८ सारांश

२अ.९ संदर्भ ग्रंथसूची

२अ.१० प्रश्नावली

## २अ.१ उद्देश

सदर अध्ययन घटकाचे उद्देश पुढीलप्रमाणे:

१. शिवकालीन संप्रदायांचा इतिहास अभ्यासणे.

२. शिवकालीन संप्रदायांचा तत्त्कालीन समाजजीवनावरील परिणाम जाणून घेणे.

३. शिवकालीन धार्मिक परिस्थिती समजून घेणे.

४. शिवकालीन सामाजिक, राजकीय आणि साहित्यिक पार्श्वभूमी समजून घेणे.

## २अ.२ प्रस्तावना

मध्ययुगीन काळ अनेक संप्रदायांनी भरभराटीला आलेला काळ होता. नाथसंप्रदाय, दत्तसंप्रदाय हे प्राचीन संप्रदाय मध्ययुगीन काळात महाराष्ट्रात भरभराटीला आलेले दिसतात. त्यानंतर या संप्रदायाच्या प्रभावातून महाराष्ट्रात ‘महानुभाव’, ‘वारकरी’, ‘दत्त’, ‘समर्थ’ हे संप्रदाय उदयाला आलेले दिसतात. या संप्रदायातील संतांनी आपल्या विचार, कार्यातून तत्त्कालीन समाजाला दिशा दाखवण्याचे, धार्मिक जागरण करण्याचे कार्य केलेले होते. या काळातील समाज धर्मकेंद्री असल्याने या संप्रदायांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते. या संप्रदायांनी सामाजिक सलोखा जपण्याचे, समाजजागृतीचे, जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाचे

महत्त्वाचे कार्य केले. छत्रपती शिवाजीमहाराजांनी (१६३० ते १६८०) स्वराज्याची स्थापना केली. यासाठी त्यांनी मुघल, बहामणशाहीतील आदिलशाही, कुतुबशाही, बरीदशाही अशा मुस्लीम राजवटींच्या विरोधात उभे राहून स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. हे स्वराज्य सामान्यांचे स्वराज्य होते. हे रयतेचे राज्य होते. या स्वराज्याच्या निर्मितीसाठी सामान्य जनतेने लढा दिला. त्यांच्यामध्ये स्वाभिमान जागृत करून, धर्माभिमान जागृत करून अन्यायाविरोधात लढण्याची प्रेरणा या काळातील संप्रदायांनी दिली. यामध्ये 'नाथसंप्रदाय, महानुभाव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्तसंप्रदाय, समर्थ संप्रदाय' यांचे योगदान महत्त्वाचे आहे. मुस्लिम सुफी संत, ख्रिश्चर मिशनरी यांनीही या काळात मोठे सांस्कृतिक योगदान दिलेले दिसते. समाजामध्ये समता, शांती, न्याय, सलोखा जपण्याचे कार्य या संप्रदायांनी केले. या सर्व संप्रदायातील संतांनी, अनुयायांनी मूळ माणुसकीचे तत्त्वज्ञान समाजासमोर ठेवले. पारतंत्र्य, विषमता, अंधश्रद्धा, अन्याय याविरोधात आवाज उठवला. समाजामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधूता, न्याय, माणुसकी, प्राणीप्रेम, अहिंसा, दया, प्रेम, सहानुभूती या सकारात्मक गोष्टी समाजामध्ये रुजवल्या. त्यामुळे यांचे कार्य व विचार समजून घेणे आवश्यक आहे. शिवकाळातील सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय पार्श्वभूमी आणि शिवकालीन साहित्य नीटपणे समजून घेण्यासाठी या काळातील संप्रदाय समजून घेणे आवश्यक आहे. त्यांचा परिचय आणि अभ्यास पुढीलप्रमाणे करता येईल.

## २अ.३ नाथ संप्रदायाचा इतिहास

नाथ संप्रदाय हा भारतातील सर्वाधिक प्राचीन संप्रदाय आहे. हा भारतातील एक प्राचीन शैव संप्रदाय आहे. मध्ययुगीन काळात भारतामध्ये अनेक संप्रदायांचा उदय झाला. नाथ संप्रदाय हा त्यातील एक प्रमुख आणि महत्त्वाचा संप्रदाय होय. या संप्रदायाचा उगम नेमका कसा?, कोठे? आणि कधी? झाला, याविषयी अभ्यासकांमध्ये मतभेद असलेलेल दिसतात. इसवी सनाच्या प्रारंभापासून नवव्या-दहाव्या शतकापर्यंतच्या सुमारे हजार वर्षांच्या काळात शैव, वैष्णव, बौद्ध, जैन असे अनेक संप्रदाय भारतामध्ये अस्तित्वात होते. पाचव्या शतकानंतर शैवांच्या श्रीकुल आणि कालीकुल या दोन्ही शाखांमध्ये आणि बौद्धांच्या महायान संप्रदायामधून पुढे आलेल्या वज्रयान अथवा तंत्रयान परंपरेमध्ये अनेक वाममार्गी साधना पद्धतींचा अंतर्भावही हळूहळू होऊ लागलेला दिसतो. नाथ संप्रदाय हा शैव संप्रदायातील एक योगप्रधान संप्रदाय असून ह्याचा उगम सुमारे ८व्या ते १२वे शतक यादरम्यान झाला. आदिनाथ परमेश्वर शिव हे याचे आद्यप्रमुख आहेत, अशी ह्यांच्या अनुयायांची समजूत आहे. या संप्रदायाच्या रूपनाथ येथील मंदिराशेजारी सम्राट अशोकाचा शिलालेख सापडला आहे. नाथसंप्रदायाचे प्रवर्तक म्हणून प्रामुख्याने मच्छिंद्रनाथ आणि गोरक्षनाथ या गुरु-शिष्यांचे नाव घ्यावे लागेल. नवव्या शतकातील 'मच्छिंद्रनाथ' हे ह्या संप्रदायाचे पहिले मानवी गुरू होय. मच्छिंद्रनाथांनी त्यांच्या आईच्या (मासळी) पोटात असतानाच शिव-पार्वती संवाद ऐकला. यातून प्राप्त झालेले ज्ञान, गाईच्या शेणाच्या ढिगातून गोरक्षनाथांचा झालेला जन्म, मत्स्येन्द्रांना खाव्याशा वाटलेल्या वड्यासाठी गोरक्षनाथांनी आपला एक डोळा काढून देणे, हाती असलेल्या मातीच्या पुतळ्यामध्ये मंत्रजप करताना प्राणसंचार होणे, अशा त्यांच्या असंख्य कथा महाराष्ट्राच्या मातीत खोलवर रुजल्या आहेत. या संप्रदायांमधून स्वतंत्र होत-होत हळूहळू सिद्ध परंपरेचा जन्म झालेला दिसतो. त्यामध्ये तांत्रिक आणि वामाचारी उपासना पद्धतींना स्थान नव्हते. बाह्य आचार, राहणीवर यांच्यावर भर न देता तत्त्वानुभूती,

भक्ती, योग इत्यादी साधनांना महत्त्व देऊन मोक्षमार्गाचे वर्णन या संप्रदायाने केले. या संप्रदायामध्ये जे दीक्षित असत, त्यांना प्रामुख्याने 'नाथ' असे संबोधले जाईल. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, आजचा तेलंगाना हे प्रांत या संप्रदायाची उदयभूमी मानले जातात. या संप्रदायाचे अनुयायी संपूर्ण भारतभरातच नव्हे, तर भारताच्या सीमेबाहेरच्या प्रदेशातही होते, असे लक्षात येते. 'नाथ' या संज्ञेचा अर्थ रक्षणकर्ता, मालक अथवा स्वामी असा होतो. 'आदिनाथ गुरू सकळ सिद्धांचा । मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य' हा श्लोक सर्वपरिचित आहे. नाथ संप्रदायाची स्थापना मत्स्येंद्रनाथ ऊर्फ मच्छिंद्रनाथ यांनी केली आणि गोरक्षनाथ ऊर्फ गोरखनाथ यांनी त्याचा पुढे विकास केला. गोरखनाथांनी ह्या संप्रदायाला नावारूपाला आणले. नवनाथ हे ब्रह्माच्या विर्यापासून उत्पन्न झाले म्हणून समस्त नाथसंप्रदाय हिंदू वर्णव्यवस्थेमध्ये मोडला जात नाही. श्रीदत्तगुरू यांनी नवनाथांना नाथसंप्रदायामध्ये त्यांना महत्त्वपूर्ण स्थान दिले. दैत्यगुरू शुक्राचार्य यांना प्रसन्न करून त्यांच्याकडून मच्छिंद्रनाथानी संजीवनी मंत्राची दीक्षा मिळवून घेतली. नंतर ही दीक्षा त्यांनी गोरक्षनाथ यांना दिली. ती गुप्त स्वरूपात ठेवली गेली. नाथ संप्रदायाचे मूळ पुरुष हे आदिनाथ म्हणजे भगवान शंकर असून याचा दत्त संप्रदायाशीदेखील अगदी जवळचा संबंध आहे. नवनाथांपैकी अनेकांना या संप्रदायाची दीक्षा भगवान दत्तात्रेयांकडून मिळाल्याचे दिसून येते. जरी दत्त संप्रदाय आणि नाथ संप्रदाय यांमध्ये भिन्नत्त्व असले, तरी दोन्ही संप्रदायांकरिता अत्यंत पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध असल्याचे आढळते. म्हणूनच 'नाथमत', 'अवधूतमत', 'अवधूत संप्रदाय', 'सिद्धमत' इत्यादी नावांनी देखील हा संप्रदाय ओळखला जातो. कवी, हरी, अंतरिक्ष, प्रबुद्ध, पिप्पलायन, अविहरेत्र, द्रुमिल, चमस आणि करभाजन या पुराणांमध्ये उल्लेख केलेल्या नऊ नारायणांनीच कलियुगामध्ये नवनाथांच्या रूपाने अवतार घेतला, अशी समजूत आहे. या परंपरेमध्ये एकंदर बारा उपसंप्रदाय विद्यमान आहेत. त्यातील काही आदिनाथांनी, तर काही गोरक्षनाथांनी प्रवर्तित केले आहेत, अशी मान्यता असल्याचे आढळून येते.

### २अ.३.१ नाथसंप्रदायातील मुख्य दैवत:

हा शैव संप्रदाय असल्यामुळे शिव हे यातील मुख्य दैवत होय. आदिनाथ म्हणजेच भगवान शंकर यांच्यापासून या संप्रदायाचा उगम झाला. म्हणून त्याला 'नाथ संप्रदाय' असे नाव मिळाले. या संप्रदायाची दीक्षा घेतल्यानंतर व्यक्तीला आपल्या नावानंतर 'नाथ' हा शब्द जोडता येतो. या संप्रदायात काली, दुर्गा, बालसुंदरी, त्रिपुरासुंदरी, अंबा, जगदंबा, भैरवी अष्टनायिका, मातृका, योगिनी, शाकिनी, डाकिनी इ. देवी, भैरव, नंदभैरव, कालभैरव, एकलिंग इ. शिवाची रूपेही यात उपास्यदेवता आहेत. नाथ संप्रदायामध्ये भगवान शंकरांचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. नाथसंप्रदायामध्ये काश्मीर शैव परंपरेतून आलेल्या सिद्धान्ताशी मिळतीजुळती मांडणी केल्याचे पाहावयास मिळते. योगमार्गाचा अवलंब या संप्रदायामध्ये प्रधान असल्याने योगशास्त्रातील अनेक संकल्पना या संप्रदायात ओपोआप रूढ झालेल्या दिसतात. दत्तात्रेयांच्या मूर्तीची पूजा या संप्रदायात केली जाते. महादेव-आदिशक्ती, विष्णू, श्री दत्तगुरू, नवनाथ (नवनारायण) आणि वैष्णवी देवी धाम येथील भैरवनाथ हे या संप्रदायातील मुख्य देवता मानल्या जातात. या नाथ संप्रदायाचा उगम कोठे झाला, ह्याबद्दल मतभेद आहेत. 'शिव हेच अंतिम सत्य असून तोच पिंड बह्मांडाचा आधार होय', ही ह्या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा पाया आहे. नाथांचे मूळ गुरू आदिनाथ म्हणजे शिव असून त्यांचा दत्त संप्रदायाशी देखील अगदी जवळचा संबंध आहे. नवनाथांपैकी अनेकांना

या संप्रदायाची दीक्षा दत्तात्रेयांकडून मिळाल्याचे दिसून येते. या दोन्ही संप्रदायांमध्ये अत्यंत पूजनीय असलेल्या गुरू दत्तात्रेयांमुळे या दोन्ही संप्रदायांमध्ये सलोख्याचे संबंध दिसून येतो.

नवनाथांच्या परंपरेमध्येच ८४ सिद्धांचा उल्लेख सापडतो. ही कल्पना मूलत: वज्रयान परंपरेतील आहे. या सिद्धांकडून आणि त्यांच्या शिष्यांकडून विविध लोकांना सांप्रदायिक उपदेश मिळाला आणि यातून पुढे नाथसंप्रदायातील अनेक गुरु-शिष्य परंपरांचा जन्म झाला.

दुर्गा, भैरव, नरसिंह, राम, हनुमान अशा दैवतांसोबतच लोकधर्मातील म्हसोबा, वेताळ यांसारख्या दैवतांचे मंत्र नाथपरंपरेत सापडतात. त्र्यंबकेश्वर, द्वारका, पुष्कर, रामेश्वर, हिंगळजा, गिरनार, गोरखपूर, पैठण अशी असंख्य ठिकाणे नाथसंप्रदायाशी संबंधित आहेत. यात एकूण १२ पंथ विद्यमान आहेत. या संप्रदायाला योग, सिद्ध, अवधूत, दर्शनी, गोरख, गोरखनाथी, कानफाटा, गुरू संप्रदाय या नावांनीही ओळखले जाते. त्र्यंबकेश्वर या ठिकाणी गोरक्षनाथांनी नऊ नाथांना व ८४ सिद्धांना उपदेश केल्याने तिला अनुपान शिळा, असेही संबोधले आहे.

### २अ.३.२ नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान:

नाथसंप्रदाय वर्णव्यवस्थेला मानत नाही. योगमार्गाने सिद्धावस्था प्राप्त करणे, हे ह्या पंथाचे ध्येय होय. नाथसांप्रदायिक संतांनी समाजाला सामाजिक बांधिलकी, प्रेम, त्याग, भक्ती, काम, भोग, मोक्ष, गृहस्थ जीवनाचा सुलभ व सुखी जीवनाचा मार्ग दाखवला. ओंकार हा सूक्ष्म वेद आहे. मुक्ती म्हणजे नाथस्वरूपात स्थिर होण्याची अवस्था होय. शक्ती सृष्टी करते, शिव पालन करतो, काल संहार करतो व नाथ मुक्ती देतात. नाथ हाच एकमात्र शुद्ध आत्मा असून बाकीचे जीव असतात. नाथ हे सगुण-निर्गुणाच्या पलीकडचे असतात. असे सामान्यपणे नाथसंप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे. कुंडले, लोकरीची मेखला, रुद्राक्ष, धंधारी चक्र, शिंगीनाद-जानवे, भगव्या रंगाची गोधडी, भिक्षेसाठी फुटके मडके, शरीरावर भस्म हा त्यांच्या पोशाखाचा भाग असतो. विस्कळित असलेल्या नाथपंथी लोकांना संघटित करून गोरखनाथांनी त्यांच्या सत्यनाथी, धर्मनाथी, रामपंथ, नाटेश्वरी, कन्हड, कपिलानी, माननाथी, आईपंथ, पागलपंथ, ध्वजपंथ, गंगानाथी व बैरागपंथ या बारा शाखा बनविल्या. यांखेरीज लक्ष्मणनाथी, दरियानाथी, रावळ, जालंधरि (र) पा, कानिपा, चोलिका, घोडाचूडी, हाडीभरंग, कायिकनाथी, पायलनाथी, उदयनाथी, आरयपंथ, फीलनाथी, चर्पटनाथी, गहिनीनाथी, निरंजननाथी, वरंजोगी, काममज, काषाय, अर्धनारी, नायरी, अमरनाथ, कुंभीदास, तारकनाथ, अमापंथी, भृंगनाथ इ. शाखा भारतभर आहेत. या संप्रदायामधील गुरू कर्णमुद्रा, शैली, शृंगी, झोळी, कंथा, एकतारी, पुंगी इत्यादी धारण करतात. यामध्ये विशिष्ट प्रकारची वेशभूषा अपेक्षित असते. नियमित स्नान, अंगास विभूती फासणे, 'अलख निरंजन'चा गजर, भिक्षा मागणे आणि 'आदेश' म्हणजे इतरांशी संवाद साधणे या गोष्टी या संप्रदायामध्ये परंपरेने आलेले आहेत.

### २अ.३.३ नाथसंप्रदायाचा प्रभाव:

मध्ययुगीन महाराष्ट्रातील धर्मसाधनेवर, धर्मतत्त्वज्ञान, आचार-विचार यांच्यावर नाथसंप्रदायाचा सर्वाधिक प्रभाव पडलेला दिसतो. हा संप्रदाय नंतरच्या काळातील अनेक संप्रदायांची गंगोत्री मानला जातो. याच संप्रदायाच्या प्रभावातून नंतर महानुभाव, वारकरी अशा संप्रदायांनी प्रेरणा घेऊन बोलीभाषेचा स्वीकार, भ्रमंतीचा स्वीकार, परधर्माबद्दलच लवचिक भूमिका असे गुण स्वीकारलेले दिसतात. चक्रधर, ज्ञानेश्वर, काही दत्त सांप्रदायिक कवी आणि रामदास स्वामी या सर्वांच्या कार्याला नाथ सांप्रदायिक संतांनी, त्यांच्या व्यापक-उदात्त अशा विचारांची प्रेरणा मिळालेली दिसून येते. नाथ संप्रदाय पुढे महानुभाव, वारकरी आणि वीरशैव इ. इतर संप्रदायात विलीन झाला. नाथ संप्रदायाने सर्वप्रथम देशी भाषांचा पुरस्कार केला. त्यातून वाङ्मयनिर्मिती केली. धर्मातील विकृत आचरणाविरुद्ध तीव्र असे आंदोलन उभारून शुद्ध परमार्थमार्गाचा आदर्श निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. या पंथाने योगमार्गाचा आग्रह धरलेला दिसतो. नंतरच्या काळात मात्र या संप्रदायाला विकृत आणि चैतन्यहीन स्वरूप प्राप्त झाले.

महाराष्ट्रातील नाथपरंपरेत निवृत्तिनाथ आणि ज्ञानेश्वर यांचा उल्लेख आवर्जून करावा लागतो. मच्छिंद्रनाथांचे शिष्य गोरक्षनाथ. त्यांच्याकडून गहिनीनाथांना उपदेश मिळाला. त्यांनी निवृत्तिनाथांना गुरूपदेश केला. पुढे ज्ञानेश्वरांना हाच नाथपरंपरेचा वारसा निवृत्तिनाथांकडून प्राप्त झाला.

'मच्छिंद्राने बोध गोरक्षासी केला। गोरक्ष वोळला गहिणीप्रती॥

गहिणीप्रसादे निवृत्ती दातार। ज्ञानदेवा सार चोजविले॥'

या शब्दांमधून ही परंपरा सांगण्यात, स्पष्ट करण्यात आलेली आहे. या परंपरेने सहजयोगाचा वारसा पुढे चालू ठेवत प्रामुख्याने नामस्मरणावर आणि भक्तिमार्गावर भर दिलेला आढळतो. ज्ञानेश्वरांच्या 'भावार्थदीपिका', 'अमृतानुभव' यांसारख्या ग्रंथांमधून त्यांनी नाथसंप्रदायाचे गुह्य तत्त्वज्ञान सोप्या भाषेत उकलून दाखविले. एकप्रकारे ज्ञानेश्वरांनी नाथसंप्रदायाला भगवद्भक्तीशी एकरूप केले आणि सहजयोगास उज्ज्वल स्थान प्राप्त करून दिले. मराठीतील आद्यकवी मुकुंदराज, विसोबा खेचर इ. व्यक्ती नाथपरंपरेतील होत्या. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर यांचे गुरू गुंडम राऊळ व आजेगुरू चांगदेव राऊळ हे दोघेही नाथसिद्ध होते. स्वतः चक्रधरांचा इतर अनेक नाथसिद्धांशी संबंध आला होता. चक्रधरांवर नाथ संप्रदायाचाच प्रभाव असल्यामुळे एका दृष्टीने महानुभाव पंथाचा उगम नाथ संप्रदायातूनच झाला, असे म्हणता येते. दत्तसंप्रदायाशीही या संप्रदायाचा निकटचा संबंध आहे. नाथ आणि दत्तात्रेय या दोघांनाही 'अवधूत' हे नाव आहे. नाथ संप्रदायात गुरूचे स्थान महत्त्वाचे असते आणि म्हणूनच आदर्श गुरू असलेल्या दत्तात्रेयाला नाथपंथी पूज्य मानतात. अवधूतगीता दत्ताने गोरक्षनाथांना सांगितली. अनेक नाथांना दत्तात्रयांचा अनुग्रह होता. संत एकनाथांनी नारायण-ब्रह्मा-अत्रिनाथ-दत्त-जनार्दन-एकनाथ अशी आपली परंपरा सांगितली आहे. समर्थ रामदासांनी व त्यांच्या शिष्यांनी नाथ परंपरेविषयीही आदर व्यक्त केला आहे. समर्थांनी दासबोधाच्या आधारग्रंथात अवधूनगीतेचा समावेश केला आहे. नाथसिद्धांचा त्यांच्या आरतीत उल्लेख सापडतो. वैष्णव, बौद्ध, जैन, शाक्त, सांख्य, योग इ. अनेक मार्गांचे लोक गोरखनाथाचे अनुयायी झाले. त्यामुळे नाथसंप्रदायाचा भारतातील इतर अनेक धर्म

पंथांशीही संबंध आला. 'कपिलानी' ही नाथसंप्रदायाची शाखा मूळची वैष्णव योगावर आधारलेली होती. महाराष्ट्रात पाशुपात भराडी हे नाथ संप्रदायाचे अनुयायी बनले, त्यामुळे नाथ संप्रदायाचा पाशुपत संप्रदायाशीही संबंध आला. नाथ संप्रदाय योगप्रधान असल्याने पातंजल योगाशी त्याचा निकटचा संबंध होता. लिंगायत संप्रदायातही शिव आराध्यदेवता असून शिवशक्तीचे सामरस्य अनुभवणे इ. बाबतींत लिंगायत संप्रदायाचे नाथसंप्रदायाशी साम्य आहे. बसवेश्वरांचे सहकारी अल्लमप्रभू व गोरखनाथ यांची भेट झाली होती. यात अल्लमप्रभूंनी गोरखनाथांना प्रभावित केले होते, अशी आख्यायिका सांगितली जाते. अल्लमप्रभू आणि गोरखनाथ हे दोघेही मच्छिंद्रनाथांचे शिष्य होते. अल्लमप्रभू, रेवणसिद्ध व मरूळसिद्ध हे प्रथमत: नाथसिद्ध होते. इ. मते आढळतात. नाथयोग्याचे स्वरूप, नाथ संप्रदायाचे तत्त्वज्ञान, साधनापद्धती, भाषा आणि आविष्कारपद्धती या सर्वांचा कबीरांवर सखोल परिणाम झालेला होता. गुरूनानकांच्या 'जपुजी' वर व इतर शीख गुरूंच्या वाणीवरही नाथसंप्रदायाचा प्रभाव दिसतो. मीराबाईंचा कृष्ण नाथजोग्याच्या रूपात आहे. भारतातील वेगवेगळ्या धर्मपंथांशी नाथसंप्रदायाचा कोणत्या तरी स्वरूपात संबंध आलेला दिसतो. बौद्ध धर्माच्या भारतातील शेवटच्या काळात महायान पंथात तांत्रिक कर्मकांड रूढ झाले होते. त्याचाच वारसा नाथ संप्रदायाने पुढे चालवला, असे म्हटले जाते.

### २अ.३.४ नाथसंप्रदायातील ग्रंथनिर्मिती:

मच्छिंद्रनाथांचे शिष्य गुरू गोरक्षनाथ यांनी लिहिलेला 'सिद्धसिद्धांत पद्धती' हा या सांप्रदायाच्या सिद्धांतांची माहिती देणारा महत्त्वाचा ग्रंथ आहे. आधुनिक भारतीय भाषांपैकी बहुतेक सर्व भाषांच्या प्रारंभिक साहित्यावर नाथ संप्रदायाचा प्रभाव आढळतो. संस्कृत आणि प्रादेशिक भाषांमध्ये नाथसंप्रदायाचे नानाविध ग्रंथ आहेत. विविध भाषांतील लोककथा, लोकगीते, म्हणी इ. लोकसाहित्यातूनही नाथांच्या आचारविचारांचे दर्शन घडते. आदिनाथांनी वसुगुप्त नावाच्या काश्मीरी शिवभक्तास स्वप्नात आदेश दिला, अशी एक आख्यायिका आहे. ती सूत्रे म्हणजेच शिवसूत्रे असून नाथसंप्रदायाचे सर्व तत्त्वज्ञान यावर आधारलेले आहे. याशिवाय कुलागमशास्त्र, कौलज्ञाननिर्णय, अकुलवीरतंत्र, कुलानंद इ. अनेक ग्रंथ मच्छिंद्रनाथांच्या नावावर आहेत. सिद्धसिद्धांतपद्धती, अमनस्क, अमरोघ शासन, गोरक्षपद्धती, गोरक्षसंहिता इ. जवळजवळ २८ ग्रंथ गोरखनाथांच्या नावावर आहेत. याशिवाय मच्छिंद्रगोरखबोध, गोरखदत्तगुष्टी, गोरषगणेशगुष्टी, महादेवगोरषगुष्टी, गोरक्षसिद्धांतसंग्रह, हठयोगप्रदीपिका, नवनाथकथासारामृत हे ग्रंथही या संप्रदायातील आहेत. केवळ बाह्य वेश या संप्रदायामध्ये महत्त्वाचा नसल्याचे यातील ग्रंथांमध्ये आढळते. वस्तूंमागेसुद्धा विशिष्ट तत्त्वज्ञान असून ते समजून त्याप्रमाणे आचरण करणे हे सर्वांत महत्त्वाचे आहे.

### २अ.३.५ नाथसंप्रदायाच्या मर्यादा:

उफाळलेल्या अनाचाराला विरोध करून नाथसंप्रदायाने विशुद्ध आचार व निष्कलंक चारित्र्याचे महत्त्व वाढवले. वाममार्गी तांत्रिकांचा प्रभाव कमी केला. बाह्याचारांच्या अवडंबराला विरोध करून आत्मप्रामाण्याचे महत्त्व वाढवले. जातिभेद दूर करण्याचा प्रयत्न केला. स्त्रियांनाही या पंथात प्रवेश दिला गेला. लोकभाषांचा स्वीकार करून सर्वसामान्यांसाठी मोक्षमार्ग सुलभ केला. धार्मिक वातावरण शुद्ध व उदात्त बनविल्यामुळे

मध्ययुगात नाथ संप्रदायाचा प्रभाव भारतात सर्वत्र पडला. गोरखनाथाच्या मृत्यूनंतर प्रत्यक्ष नाथसंप्रदायाची धुरा वाहणारी व सर्व शाखांचा समन्वय साधणारी त्याच्या तोडीची व्यक्ती संप्रदायात उरली नाही. नंतर हा संप्रदाय हळूहळू क्षीण होत केलेला दिसतो.

## २अ.४ महानुभाव संप्रदायाचा इतिहास

यादवराजांच्या कारकीर्दीत बाराव्या शतकात महाराष्ट्रात चक्रधर स्वामींनी हा संप्रदाय स्थापन केला. ते मुळचे गुजरातचे होते. चक्रधरांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे आणि विचारसरणीमुळे सारंग पंडित, रामदेव विद्यावंत, प्रज्ञासागर, म्हाइंभट्ट यांसारखे विद्वान पंडित त्यांच्या हयातीतच त्यांचे शिष्य बनले. त्यात स्त्रियाही होत्या. यादवांच्या दरबारातील अधिकारी, राजपुरुष व राजस्त्रिया यांनीही चक्रधरांचे अनुयायित्व पत्करले होते. चक्रधरस्वामी हे स्वत: गुजराती भाषिक असले, तरी ते मराठी भाषा चांगली बोलत. आपल्या तत्त्वज्ञानाचा मराठी या लोकभाषेतच त्यांनी प्रचार केला. नागदेवाचार्यांनी आपल्या अनुयायांना याच भाषेतून ग्रंथनिर्मिती करण्याची प्रेरणा दिली. चक्रधरांनंतरच्या काळात संप्रदायाला स्थिरता देण्याचे कार्य नागदेवाचार्यांनी केले. ‘सर्वसामान्य जनतेला विकासाचा मार्ग मोकळा करून देणे’ हे या संप्रदायाचे उद्दिष्ट होते. ज्ञान आणि भक्ती हे या संप्रदायातील दोन विशुद्ध तत्त्वे होत. नाथ संप्रदायातून विशुद्धाचरण, समता, लोकभाषेचा पुरस्कार इ. गोष्टी त्यांनी स्वीकारल्या. सामान्यांना त्यांच्या भाषेत मोक्षमार्ग सुलभ करून सांगणारे जैन, नाथ, लिंगायत, आदी पंथ यापूर्वीच प्रस्थापित झाले होते. या काळात कर्मकांडाचे प्रस्थ वाढून सकाम भक्तीचे बंड माजले होत. सर्वांसाठी खुल्या असणाऱ्या महानुभाव पंथाने जातिनिरपेक्षतेचा आणि अहिंसा तत्त्वाची पुरस्कार केला. या पंथातील अनुयायी परस्परांस ‘महात्मा’ म्हणत.

### २अ.४.१ महानुभाव संप्रदायाचा आराध्यदैवत:

श्रीकृष्णलीलावर्णन करणारे भागवत आणि कृतयागात हंसावतार, त्रेतायुगात दत्तावतार, द्वापारयुगात श्रीकृष्ण आणि कलियुगात श्रीचक्रधर असे चार अवतार ते मानतात. त्यांचा दत्त हा एकमुखी होय. द्वारकाधिश कृष्ण, दत्तात्रय, द्वारावतीचे चांगदेव राऊळ, ऋद्धिपूरचे गोविंदप्रभु आणि प्रतिष्ठानचे चक्रधर असे कृष्णाचे पाच अवतार ते मानतात. यांना पंचकृष्ण संबोधले जाते. श्रीकृष्णाचे सगुण रूप या संप्रदायाने मान्य केले असून निर्गुण-निराकार रूपापेक्षा सगुणरूपाचे महत्त्व या संप्रदायात अधिक दिसते. द्वैत मत स्वीकारलेले असल्याने महानुभावांचा कृष्ण द्वैताचा स्वीकार करणारा आहे. महायुद्धाच्या प्रसंगी डळमळीत मानसिकतेच्या अर्जुनाला आणि ज्ञानाच्या अभिमानाने आंधळा बनलेल्या उद्धवाला उपदेश करणारा श्रीकृष्ण या संप्रदायामध्ये मुख्य आहे. यानंतर दत्तात्रेयप्रभूंना या संप्रदायात दुसऱ्या कृष्णाचे स्थान प्राप्त झालेले आहे. सह्याद्रीवर्णन या ग्रंथामध्ये महानुभवांच्या दत्तात्रेयप्रभूंचे जीवनचरित्र सांगण्यात आलेले आहे. महानुभावांचा दत्ताही सगुण आहे. निर्गुण निराकार दत्तात्रेयांपेक्षा याच सगुण दत्तात्रेयांचे महत्त्व या संप्रदायात अधिक दिसते. श्रीकृष्ण आणि दत्तात्रेय हे अलौकिक अवतार असून पुढील तीन अवतार हे लौकिक अवतार किंवा कृष्ण मानले जातात. चांगदेव राऊळ हे तृतीय कृष्ण या संप्रदायामध्ये आराध्य आहेत. यांनीच चक्रधरांच्या रूपाने अवतार धारण केल्याचे काही जण मानतात. गोविंदप्रभू हे या संप्रदायातील चौथे कृष्ण. ते अवलिया होते. जातीयता मानत नव्हते. ते विरक्त होते. त्यांचे

जीवनचित्रण ऋद्धिपूरवर्णन (गोविंदप्रभूचरित्र) या ग्रंथामध्ये आलेले आहे. त्यांनीच महदंबेला धवळे लिहिण्याची प्रेरणा दिली. चक्रधरस्वामींना त्यांनीच चक्रधर हे नाव दिले. महानुभवांमध्ये त्यांचे महत्त्वाचे आदराचे स्थान असलेले दिसून येते. चक्रधर स्वामी यांना दवडण्याचा अवतार मानले जाते. ते मूळचे गुजरातचे. हरपाळदेवाच्या मृत शरीरात प्रवेश करून त्यांनी अवतार कार्य केले असे मानले जाते. 'लीळाचरित्र' या ग्रंथात एकाक आणि उत्तरार्ध यातून त्यांचे पूर्ण जीवन, तत्त्वज्ञान आलेले आहे. ते प्राणीप्रेमी, ज्ञानी, प्रेमळ, अष्टपैलू, सर्वगुणसंपन्न, सौंदर्यवान आणि तेजस्वी होते.

### २अ.४.२ महानुभाव संप्रदायाची ग्रंथनिर्मिती:

संप्रदायातील महापुरुषांची चरित्रे, पंथीय तत्त्वज्ञान आणि आचारधर्म सांगणारे ग्रंथ, टीका, क्षेत्रवर्णनपर ग्रंथ, विविध स्तोत्रे आणि विदग्ध कथाकाव्ये असे विपुल वाङ्मय या संप्रदायाने निर्माण केले. मराठीतील आद्यग्रंथ लीळाचरित्र याच संप्रदायाने निर्माण केला. परकीय आक्रमणाच्या काळात हे साहित्य सकळ आणि सुंदर लिप्यांमध्ये बंदिस्त झाले. सिद्धांतसूत्रपाठ हा या पंथाचा प्रमुख धर्मग्रंथ आहे. निरनिराळ्या काळात पंथातील वेगवेगळ्या कवींनी लिहिलेल्या नरेंद्रांचे 'रुक्मिणीस्वयंवर', भास्करभट्ट बोरीकरांचे 'शिशुपालवध' व 'उद्धवगीता', दामोदर पंडितांचा वछाहरण, रवळो व्यासांचा 'सह्याद्रिवर्णन', पंडित विश्वनाथ बाळापूरकर यांचा 'ज्ञानप्रबोध', पंडित नारायण व्यास वहाळिये यांचा 'ऋद्धिपूरवर्णन' हे साती ग्रंथ या संप्रदायात मुख्य मानले जातात. याशिवाय सूत्रवाङ्मय, टीकावाङ्मय, न्याय-व्याकरणादी शास्त्रे, क्षेत्र व व्यक्तिमहात्मवर्णने, स्तोत्रे इ. ग्रंथ या संप्रदायाने निर्माण केले. पुढील काळात या संप्रदायात चौपद्या, धुवे, स्तोत्रे, आरत्या, धवळे, पदे अशी विपुल स्फुटरचनाही झाली. सूत्रभाष्य, अर्थनिर्णयशास्त्र, व्याकरणशास्त्र, साहित्यशास्त्र यांची रचना मराठीच्या प्रारंभकाळात महानुभावीयांनी केली. भास्करभट्ट आचार्य असताना लीळाचरित्र, ऋद्धिपूरवर्णन, स्मृतिग्रंथ यांच्या अधिकृत पोथ्या कोकणातून जात असताना चोरांकडून लुबाडल्या गेल्या. त्यानंतर आठवणीप्रमाणे त्यांचे पुनर्लेखन करण्यात आले. त्यामुळे या ग्रंथांत अनेक पाठभेद निर्माण झाले. रवळोव्यासांनी १३५३ मध्ये सकळ लिपी आणि १३६३ मध्ये सुंदरी लिपी शोधली. नंतर पारमांडल्य, वज्रलिपी, अंकलिपी इ. अनेक लिप्या तयार झाल्या. यातील बहुतेक ग्रंथ सकळ लिपीतच आढळतात. म्हाइंभट्टांनी चक्रधरांच्या जीवनावर आधारित लीळाचरित्र आणि गोविंदप्रभूंच्या जीवनावर आधारित ऋद्धिपूरवर्णन हे चरित्रग्रंथ लिहिले. ते मराठीतील आद्य चरित्रकार मानले जातात. केसोबासांचा 'रत्नमालास्तोत्र', नागदेवाचार्यांच्या जीवनावर आधारित 'स्मृतिस्थळ', केशवराज सुरी यांचा 'सिद्धांतसूत्रपाठ' आणि 'दृष्टांतपाठ' हे ग्रंथ या संप्रदायाचे तत्त्वज्ञान विशद करतात. श्रीचक्रधरस्वामींची नित्यदिनचर्या पूजावसर या ग्रंथातून सांगितली आहे. मुनिव्यासांनी श्रीचक्रपाणी, गोविंदप्रभु व चक्रधर यांच्या सहवासाने पवित्र झालेल्या स्थळांची माहिती देणारा 'स्थानपोथी' हा ग्रंथ लिहिला. मराठीतील आद्यकवयित्री ठरलेल्या महदंबा यांचे धवळे आणि मातृकी रुक्मिणीस्वयंवर हे यातील महत्त्वाचे ग्रंथ आहेत. या संप्रदायातील हयग्रीवाचार्य यांनी गद्यराज नावाचे श्रीमद्भागवताच्या दशम स्कंधावर आरित निर्यमक असे श्लोकबद्ध काव्य लिहिले. गुर्जर शिववासाने चक्रधरांच्या वचनांवर लिहिलेले 'लक्षणस्थळ', 'विचारस्थळ' आणि 'आचारस्थळ' हे ग्रंथ लिहिले. याच काळात मराठीचा पहिला व्याकरणग्रंथ पंडित भीष्माचार्यांनी लिहिला. चक्रधरांच्या वचनांचे निरुपण करणारा 'निरुक्तशेष' हा ग्रंथ भीष्माचार्य वाइंदेशकर ह्यांनी तयार केला.

### २अ.४.३ महानुभाव संप्रदायाचे तत्त्वज्ञान:

जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर ही अनादि व अनंत मूळ चार तत्त्वे असून परमेश्वर नेहमी अवतार घेतो. प्रपंच अनित्य असून अनादि अविद्यायुक्त जीव बद्धमुक्त, देवता नित्यबद्ध आणि परमेश्वर हा नित्यमुक्त आहे. जीव अनंत असून परमेश्वराचे अवतारही अनंत आहेत. हा संप्रदाय द्वैती असून आत्मा आणि परमात्मा वेगळे मानणारा आहे. महानुभवांनी जीवास 'बद्धमुक्त' मानले, कारण अविद्येपासून मुक्त होऊन ईश्वरस्वरूपाचा आनंद भोगण्याची पात्रता जीवाच्या ठिकाणी आहे. प्रपंचाचे यांनी अनादि अनंत म्हणूनच नित्य असा 'कारण प्रपंच' व व्यक्त आणि अनित्य असा 'कार्य प्रपंच' असे दोन भाग मानले आहेत. देवतांचे मुख्य कार्य सृष्टीतील जीवांना त्यांच्या कर्माचे फळ देणे हे आहे. परमेश्वराचे त्यांनी दृश्यावतार, परदृश्यावतार आणि उभयदृश्यावतार असे तीन प्रकार मानले आहेत. परमेश्वर नित्यमुक्त असल्याने तोच जीवाचा उद्धार करू शकतो. साकार परमेश्वराच्या सान्निध्याने जीवाचा उद्धार होतो. मुक्तीनंतरही जीवाचे अस्तित्त्व टिकून राहते. ५६ व्या वर्षापूर्वी सर्वेंद्रिये कार्यक्षम असताना संन्यास घेणे आवश्यक आहे. उपदेशी आणि संन्यासी असे दोन वर्ग यांनी मानले असून उपदेशी वर्ग लौकिक जीवनात चातुर्वर्ण्य पाळतो. संन्यास दीक्षेनंतर मात्र जातिनिर्बंध पाळण्याची आवश्यकता नाही. ऋद्धिपूरचे गोविंदप्रभू हे चक्रधरांचे गुरू. चक्रधरांचे मूळचे नाव हरपाळदेव असून त्यांच्या मृत शरीरात चांगदेव राऊळ यांनी प्रवेश केला, अशी कल्पना आहे. नागदेवाचार्य हे चक्रधारांचे पट्टशिष्य व या संप्रदायाचे पहिले आचार्य. तत्कालीन सनातनी लोकांकडून चक्रधरांना विरोध झाला. त्यांना मारण्याचेही प्रयत्न झाले.

### २अ.४.४ महानुभाव संप्रदायाचा प्रभाव:

चक्रधरांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्या काळातील अनेक लोकांवर होता. स्वत: राजाच्या संपर्कातील लोकही त्यांचे अनुयायी होते. या संप्रदायाचा प्रभाव नंतरच्या संप्रदायांवर तितकासा पडू शकला नाही. तरीही या संप्रदायापासून काही गोष्टी अन्य संप्रदायांनी शिकल्या, असे म्हणता येते. महानुभाव संप्रदायाने लोकभाषेचा स्वीकार केला. विविध प्रकारची ग्रंथनिर्मिती केली. सामान्यांना संप्रदायामध्ये प्रवेश दिला. माणुसकी, प्राणीप्रेम, अहिंसा, दया, प्रेम, सहानुभूती या गोष्टी समाजामध्ये रुजवल्या. स्त्री-पुरुष समानता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. या सर्वांचा प्रभाव नंतरच्या संप्रदायांवर पडलेला दिसून येतो.

### २अ.४.५ महानुभाव संप्रदायाच्या मर्यादा:

महानुभाव संप्रदायाने प्रस्थापित आचारधर्मावर प्रहार करून आपला नवा विचारप्रवाह निर्माण केला. पंचकृष्णांखेरीज अन्य देवता क्षुद्र मानल्या. स्त्री-शुद्रादिकांना संन्यासाचा अधिकार दिला. मोक्षमार्ग सर्वासाठी खुला केला. महानुभव संप्रदाय हा वेदानुयायी किंवा वेदविरोधी दोन्ही नसून त्याचे स्वतंत्र रूप आहे. चक्रधरांनी वेदांबद्दल कधीही अनादर दाखविलेला नाही. वर्णाश्रमधर्मविरोधी विवेचनही त्यांच्या ग्रंथात कोठे आढळत नाही. मुसलमानी आक्रमणाच्या काळात संप्रदायाची बरीच वाताहात झाली. आत्यंतिक व्यक्तिनिष्ठा, संन्यासमार्गाचा आग्रह, काळे वस्त्र परिधान करणे, अन्य संप्रदायांशी तुटक वर्तन, धर्मग्रंथ सांकेतिक लिपीत बंदिस्त होणे, प्रभावी प्रचारक न लाभणे, कायाक्लेश व

अतिरेकी देहदंडनाची शिकवण, अन्य देवतांविषयी संकुचित दृष्टी अशा अनेक कारणांमुळे नंतरच्या काळात या संप्रदायास ओहोटी लागली.

## २अ.५ दत्त संप्रदायाचा इतिहास

दत्तात्रेयांची उपासना भारतामध्ये प्राचीन काळापासून केली जात असली, तरी महाराष्ट्रात या उपासनेला सांप्रदायिक रूप चौदाव्या शतकात नृसिंह सरस्वती यांनी प्राप्त करून दिले. श्रीपाद श्रीवल्लभ हे दत्तात्रेयाचे पहिले अवतार, तर नरसिंह सरस्वती हे दुसरे अवतार मानले जातात. कलियुगातील दत्तात्रेयांचे अवतार श्रीपाद श्रीवल्लभ यांनी तेराव्या शतकात जन्म घेतला, असे मानले जाते. आंध्र प्रदेशातील गोदावरी जिल्ह्यातील पीठापूर हे त्यांचे जन्मगाव. तेथून ते कुरवपूर या ठिकाणी गेले. यांनी दत्त संप्रदायाची वाढ केली. नंतरच्या श्रीनृसिंहसरस्वती यांना दत्तात्रेयांचा दुसरा अवतार मानले जाते. अकोला जिल्ह्यातील कारंजा (लाड) हे त्यांचे गाव. श्रीपाद श्रीवल्लभांचे कार्य यांनीच पुढे चालवले. माधवसरस्वती, कृष्णसरस्वती, बाळकृष्णसरस्वती, उपेंद्रसरस्वती, सदानंदसरस्वती, ज्ञानज्योतीसरस्वती आणि सिद्धसरस्वती हे त्यांचे प्रमुख सात शिष्य होते. श्रीनृसिंहसरस्वती स्वामींनी तपश्चर्या केलेली औदुंबर, नृसिंहवाडी आणि गाणगापूर ही दत्त संप्रदायातील अतिशय पवित्र स्थाने आहेत. श्रीदत्तात्रेयांचे तिसरे अवतार अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ यांना मानले जाते. आपल्या अवतार समाप्तीच्या वेळी श्रीनृसिंहसरस्वती स्वामी यांनी श्रीशैल्य येथून कर्दळीवनामध्ये जाऊन तपश्चर्येला केली. साडेतीनशे वर्षांच्या काळात त्यांच्याभोवती वारूळ तयार झाले. एके दिवशी एक लाकूड तोडतांना त्याच्या कुऱ्हाडीचा घाव चुकला आणि तो त्या वारुळावर पडला. त्यातून श्रीस्वामी समर्थ प्रकट झाले, अशी मान्यता आहे. श्रीदत्तात्रेयांची शास्त्रशुद्ध उपासना पुन:स्थापित करण्याचे श्रेय श्रीवासुदेवानंदसरस्वती, म्हणजेच टेंब्येस्वामी यांना दिले जाते. सावंतवाडीजवळील माणगाव येथे त्यांचा जन्म झाला. त्यानंतर ते नृसिंहवाडी येथे आले. प्रत्यक्ष दत्तात्रेयांनी त्यांना नृसिंहवाडी येथे अनुग्रह दिला, असे मानले जाते. त्यांनी संपूर्ण भारतामध्ये प्रवास करून दत्त संप्रदायाचा सर्वत्र प्रचार केला. टेंब्येस्वामींनी कारंजा, कुरवपूर, पीठापूर, अक्कलकोट, अशी अत्यंत महत्त्वाची श्रीदत्तक्षेत्रे त्यांनीच प्रकाशात आणली. 'दिगंबरा दिगंबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा' हा मंत्र त्यांनी दिला. विपुल साहित्य निर्माण केले. आचरणशुद्धता, कर्म आणि रूढीप्रिय अशी परंपरा त्यांनी निर्माण केली. अशा नवनवीन संतांमुळे हा नित्यनूतन आणि प्रवाही राहिला आहे. दत्त संप्रदायामध्ये प्रामुख्याने श्रीदत्तात्रेयांच्या किंवा त्यांच्या अवताराच्या मूर्तीचे किंवा पादुकांचे पूजन केले जाते.

बिदरजवळील हुमणाबाद येथील श्रीमाणिकप्रभू हेही दत्तात्रेयांचे अवतार मानले जातात. या परंपरेला 'सकलमत परंपरा' म्हटले जाते. केवळ याच दत्तसंप्रदायिक परंपरेत गादी परंपरा असून सर्व धर्मांच्या, जातींच्या, पंथांच्या लोकांना मुक्त प्रवेश आहे. मुसलमान, जैन आणि लिंगायत समाजातील अनेक व्यक्ती या परंपरेमध्ये सहभागी झालेल्या आहेत. त्यांच्यानंतर श्रीमनोहर माणिकप्रभू, श्रीमरतड माणिकप्रभू यांनी या संप्रदायाचा सर्वत्र प्रचार आणि प्रसार केला. दक्षिण भारतामध्ये मुख्यत: कर्नाटक आणि आंध्रप्रदेशामध्ये या संप्रदायाची परंपरा पसरली आहे. श्रीदत्तात्रेय यांच्यासमवेत त्यांची शक्ती म्हणजे मधुमती नावाची शक्ती हे या परंपरेचे उपास्यदैवत असून ही एक अतिशय समृद्ध अशी दत्त परंपरा आहे.

श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री यांनी दत्त संप्रदायाची परंपरा पुढे सुरू ठेवली. त्यांना बालावधूत महाराजांकडून अवधूत पंथाची दीक्षा मिळाली. ही परंपरा अवधूत परंपरा म्हणून ओळखली जाते. श्रीदत्तात्रेय-श्रीरामावधूत-श्रीबालावधूत- श्रीपंतमहाराज, अशी ही परंपरा आहे. विषयवैराग्य, सहजानुभव, बंधुप्रेम, विधिनिषेध त्याग, नि:स्वार्थ कर्म, संचित, अहंकारनाश, समरसता, सद्गुरुप्रीती, अद्वैतभक्ती ही या अवधूतपंथाची मुख्य वैशिष्टये आहेत. अवधूतपंथामध्ये कोणतीही बंधने नाहीत. येथे मुक्तीलाही कमी लेखले गेले आहे. मुक्तीपलीकडची प्रेमभक्ती अशी अवधूत परंपरेची धारणा आहे.

### २अ.५.१ दत्त संप्रदायाचे साहित्य:

इ. स. १५३८ च्या सुमारास सरस्वती गंगाधर यांनी लिहिलेला 'गुरुचरित्र' हा ग्रंथ या संप्रदायाची माहिती एकत्रपणे देतो. या संप्रदायात आजही हा ग्रंथ वेदतुल्य मानला जातो. या ग्रंथामध्ये तत्कालीन सांस्कृतिक जीवनाची माहिती मिळते. दत्तमाहात्म्य, दत्तप्रबोध, गुरुचरित्र, अवधूतगीता, गुरुगीता, जीवन्मुक्तगीता हे या संप्रदायातील मुख्य ग्रंथ आहेत. या संप्रदायात मान्यता पावलेले अनेक ग्रंथ तेलुगू भाषेत लिहिले गेले आहेत. सौराष्ट्रात गिरनार येथे दत्तोपासनेची प्रेरणा घेतलेला बाबा किनराम अघोरी यांनी अठराव्या शतकाच्या आरंभी विवेकसार ग्रंथ लिहिला. गिरनार येथे त्यांना दत्तात्रेयांचा साक्षात्कार झाला, असे त्यांनी यामध्ये म्हटले आहे. मुसलमानी आमदानीत हिंदू धर्म आणि भारतीय संस्कृती टिकवून धरण्यासाठी दत्त संप्रदायाने मोठा वाटा उचललेला दिसतो. वेदोक्त आणि आगमोक्त आचाराचे संमिश्रण या संप्रदायाच्या आचरणात दिसून येते. या संप्रदायात कर्मठपणा दिसून येत असला, तरी तो परधर्माच्या आक्रमणापासून समाजाला सुरक्षित ठेवण्यासाठी स्वीकारण्यात आला असावा, असे वाटते. सगुण मूर्तीऐवजी निर्गुण पादुका किंवा समाधीस्थाने यांची पूजा या संप्रदायाने स्वीकारली. दत्त संप्रदाय हा संपूर्ण भारतातील एक महत्त्वाचा संप्रदाय आहे. नंतरच्या काळात दत्त संप्रदायामध्ये अनेक पंथ आणि परंपरा निर्माण झाल्या. दत्त संप्रदायाचे उपसंप्रदाय ठरतात.

### २अ.५.२ दत्त संप्रदायातील देवता:

दत्त संप्रदायात श्रीदत्तात्रेय ही मुख्य देवता, उपास्यदेवता, सद्गुरुरूप, सिद्धिदाता आणि अष्टांग योगाचे मार्गदर्शक मानले जातात. त्यागाला सर्वोच्च प्राधान्य दत्त संप्रदायामध्ये आहे. सज्जनांचे रक्षण, दुर्जनांचे निर्दालन, धर्माचे पुनरुज्जीवन, सामाजिक संतुलन आणि विश्वाचे कल्याण यासाठी परमात्मा अवतार घेतो. तेराव्या शतकातील श्रीपाद श्रीवल्लभ, अकोला जिल्ह्यातील कारंजा (लाड) येथील श्रीनृसिंहसरस्वती, माधवसरस्वती, कृष्णसरस्वती, बाळकृष्णसरस्वती, उपेंद्रसरस्वती, सदानंदसरस्वती, ज्ञानज्योतीसरस्वती आणि सिद्धसरस्वती हे त्यांचे प्रमुख सात शिष्य, अक्कलकोटचे श्रीस्वामी समर्थ, सावंतवाडीजवळील माणगाव येथील श्रीवासुदेवानंदसरस्वती (टेंब्येस्वामी), बिदरजवळील हुमणाबाद येथील श्रीमाणिकप्रभू, श्रीमनोहर माणिकप्रभू, श्रीमरतड माणिकप्रभू, श्रीपंतमहाराज बाळेकुंद्री यांना प्रमुख आदराचे स्थान असलेले दिसते. दत्त संप्रदायामध्ये प्रामुख्याने श्रीदत्तात्रेयांच्या किंवा त्यांच्या अवताराच्या मूर्तीचे किंवा पादुकांचे पूजन केले जाते.

### २अ.५.३ दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान:

दत्तमाहात्म्य, दत्तप्रबोध, गुरुचरित्र, अवधूतगीता, गुरुगीता, जीवन्मुक्तगीता ह्या ग्रंथांमध्ये दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान आले आहे. पूजोपचारांसाठी मूर्तीऐवजी पादुका या संप्रदायात प्रशस्त मानल्या आहेत. या संप्रदायात प्रपंच, परमार्थ आणि मुक्ती यांचा यथायोग्य मेळ घातला गेला आहे. त्यामुळे हा सर्वांना जवळचा वाटतो. शैव, वैष्णव याचबरोबर शाक्त, गाणपत्य इत्यादी सर्व पंथांना दत्त संप्रदाय जवळचा ठरतो. वारकरी पंथातही दत्तावताराला मोठा मान आहे. दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान अद्वैत वेदान्ताच्या पायावरच उभे आहे. शांतिब्रह्म संत एकनाथमहाराज हे वारकरी संप्रदायामध्ये प्रमुख संत मानले जातात. तेही मुळचे दत्त सांप्रदायिकच होते. त्यांचे गुरू जनार्दनस्वामी हेही दत्तसांप्रदायिक होते. या संप्रदायात सगुणोपासना मुख्य असून गुरुभक्ति प्रधान मानली गेली आहे. यात योगमार्ग, हटयोग, कठोर अनुष्ठान आणि आत्मक्लेश याही परंपरा प्रचलित आहेत. सगुण भक्ती आणि उपासना ही या संप्रदायाची मध्यवर्ती भूमिका आहे. शुद्ध आचार ठेवणे, सर्वाभूती परमेश्वर पाहणे, सर्वाविषयी प्रेम बाळगणे, नामस्मरण करणे, योग करणे, ध्यानधारणा करणे, नि:स्वार्थी आचरण करणे आणि यातूनच आत्मोन्नती साधणे हे दत्त संप्रदायाचे तत्त्वज्ञान आहे. दत्त संप्रदायाचे प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे, परमात्म्याचे आत्म्याशी असलेले एकत्त्व, अविनाशी गुरुतत्त्व आणि अपरोक्ष अनुभूती. हा संप्रदाय प्राचीन, लोकाभिमुख, समन्वयात्मक आणि सर्वांना सामावून घेणारा संप्रदाय आहे.

### २अ.५.४ दत्त संप्रदायाचा प्रभाव:

पुराणे व अर्वाचीन पाच उपनिषदे यांना हा संप्रदाय मानतो. गुरुतत्त्वाला त्यांनी आदर्श मानले आहे. दत्तात्रेय हे अवधूत जोगी आहेत म्हणून नाथसंप्रदायातही त्यांची उपासना होते. नाथ संप्रदायास त्यावरूनच 'अवधूत' संप्रदाय म्हटले जाते. नाथ संप्रदायात दत्तात्रेय आणि गोरखनाथ यांच्या संबंधाबाबतच्या अद्भुत कथा रूढ आहेत. महानुभाव पंथाचे आदिकारण दत्तात्रेय आहेत, असे चक्रधरस्वामींनी म्हटले आहे. महानुभावांचे दत्तात्रेय त्रिमुखी नसून एकमुखी आणि चतुर्भुज आहेत. ते परब्रह्माचा अवतार आहेत. सूत्रपाठ, लीळाचरित्र इ. महानुभव ग्रंथांतूनही दत्तमाहात्म्य वर्णिले आहे. सह्याद्रीवर्णन या ग्रंथामध्ये दत्तात्रेयांचे वर्णन आढळते. वारकरी आणि आनंद संप्रदायातील संतांनी भगवान दत्तात्रेयाविषयी आदर व्यक्त केला आहे. दत्तात्रेयाने प्रवर्तिलेल्या चैतन्य संप्रदायाच्या एका शाखेत एकोणिसाव्या शतकात भैरव अवधूत नावाचे एक सत्पुरुष झाले. त्यांनी आपल्या ज्ञानसागर या ग्रंथात दत्तोपासनेचे महत्त्व सांगितले आहे. जनार्दन स्वामी, एकनाथ, दासोपंत, मुक्तेश्वर, निरंजन रघुनाथ, माणिक प्रभू, अक्कलकोटकर स्वामी, वासुदेवानंद सरस्वती इ. महापुरुषांनी संप्रदायाची परंपरा चालू ठेवली. आजही अनेक दत्तोपासक महाराष्ट्रात आढळतात. महाराष्ट्रातील बहुतेक योगमार्गी हे दत्तोपासकच होते. या संप्रदायात शैव, वैष्णव, मुसलमान यांच्यात समन्वय साधला आहे. माणिक प्रभू हे दत्त संप्रदायातील प्रमुख संत. त्यांनीही समन्वयवादी विचार मांडले आहेत. औदुंबर, नरसोबाची वाडी व गाणगापूर ह्या क्षेत्री दत्तात्रेयाच्या पादुकांची स्थापना केलेली आहे. पांचाळेश्वर, नरसोबाची वाडी, माहूर, गाणगापूर, लाड कारंजे, कुरुगड्डी, गिरनार ही या संप्रदायाची प्रमुख क्षेत्रे आहेत. या संप्रदायाचा प्रसार महाराष्ट्राइतका अन्यत्र झालेला आढळत नाही. नरसिंह सरस्वतींचा निवास गाणगापूरला झाल्यामुळे कर्नाटकात दत्त संप्रदायाचा बराच प्रसार झाला. गंगाधर सरस्वती यांनी

मराठीमध्ये गुरुचरित्र लिहिले असले, तरी ते कानडी होते. आंध्रामध्येही दत्त संप्रदाय दिसतो.

### २अ.५.५ दत्त संप्रदायाच्या मर्यादा:

या संप्रदायातील अवतारी पुरुषांनी वर्णाश्रमधर्मावर जोर दिला आहे. गृहस्थाश्रमापेक्षा निवृत्तीवादावर या संप्रदायाने अधिक भर दिला. या संप्रदायाचे नेतृत्व सामान्यांकडे दिले गेले नाही. त्यामुळे हा संप्रदाय उच्चवर्णीयांपुरता बराच मर्यादित झाला. अन्य संप्रदायांनी दत्त उपासना स्वीकारल्यामुळे दत्तोपासक बऱ्याच प्रमाणात अन्य संप्रदायाकडे वळलेले दिसतात. दत्तात्रेयांचे एकमुखी, निर्गुण-निराकार, तीनमुखी अशा प्रकारांमुळे या संप्रदायाचे उपासक विखुरलेले दिसतात. आचरणातील ताठरतेमुळेही या संप्रदायाची लोकप्रियता कमी झाल्याचे दिसून येते.

## २अ.६ वारकरी संप्रदायाचा इतिहास

महाराष्ट्राच्या मध्ययुगात अनेक भक्तिसंप्रदाय उदयास आले. त्यातील महत्त्वाचा भक्तिसंप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. संत बहिणाबाई शिऊरकर लिहितात,

'ज्ञानदेवे रचिला पाया। उभारीले देवालया ॥१॥

नामा तयाचा किंकर। तेणे रचिले ते आवार ॥२ ॥

जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत ॥३ ॥

तुका झालासे कळस। भजन करा सावकाश ॥४॥"

या अभंगावरून संत ज्ञानेश्वर (इ. स. १२७५ ते इ. स. १२९६ ) यांनी वारकरी संप्रदायाचा पाया घातला, हे स्पष्ट होते. संत ज्ञानेश्वरांच्या पूर्वीही पुंडलिकाच्या काळात विठ्ठलभक्ती प्रचलित होती. वारकरी संतांच्या अभंगांमध्येही याचे संदर्भ सापडतात. शिलालेख आणि ताम्रपटांमध्येही या पंढरपुरासंबंधीचे पुरावे सापडतात. आद्य शंकराचार्यांच्या (इ. स. ७८८ ते इ. स. ८२०) 'पांडुरंग स्तोत्रात' पुंडलिक आणि विठ्ठल यांचा उल्लेख सापडतो. "पंढरपूरच्या विठ्ठल मंदिरातील सोळखांबी मंडपाच्या पूर्वद्वारासमोरील तुळईवर खोदलेल्या शके ११५९ मधील शिलालेखाचा (इ. स. १२३७), इ. स. ५१६ मधील ताम्रपटात, इ. स. १२७३ ते इ. स. १२७८ या काळात कोरला गेलेला पंढरपूर येथील चौऱ्यायशीचा शिलालेख यांमध्ये पंढरपूरचा उल्लेख असल्याचे र. रा. गोसावी यांनी आपल्या 'पाच भक्तिसंप्रदाय' या ग्रंथामध्ये स्पष्ट केले आहे. यावरून संत ज्ञानेश्वरांपूर्वीच्या काळातही वारकरी संप्रदाय अस्तित्वात होता, हे लक्षात येते. पंढरपूरसोबतच आळंदी, पैठण, देहू, त्र्यंबकेश्वर, पिंपळनेर, सासवड, अरण, तेर, मंगळवेढा, नेवासे या ठिकाणांनाही वारकरी संप्रदायामध्ये पवित्र स्थानाचा दर्जा प्राप्त झालेला दिसतो. संत ज्ञानेश्वरांनी या वारकरी संप्रदायास वैचारिक अधिष्ठान प्राप्त करून दिले. नंतरच्या संतांनी त्याचा मोठ्या प्रमाणात प्रसार केला.

'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी'

ही नामदेवांची भूमिका होती. यात गाण्यापेक्षा भजनावर अधिक भर असतो. वारकरी कीर्तन प्रत्यक्ष सुरू होण्यापूर्वी मृदंगाच्या साथीवर टाळकऱ्यांचे भजन चालू असते. हातात वीणा घेतलेला एक वारकरी निरनिराळ्या संतांचे अभंग सांगतो आणि इतर ते म्हणतात. कीर्तनकार बुवा आल्यानंतर ते वीणेकऱ्याला व श्रोत्यांना नमस्कार करून वीणा स्वतःच्या गळ्यात घालतात. नंतर 'जयजय रामकृष्ण हरी'च्या घोषात कीर्तन चालू होते. नमनाला ज्ञानदेवांचा 'रूप पाहतां लोचनी। सुख जालें वो साजणी' हा किंवा संत तुकारामांचा 'सुंदर ते ध्यान । उभे विटेवरी' हा अभंग घेतात. त्यानंतर निरूपणाचा अभंग सुरू होतो. ज्ञानोबांपासून निळोबांपर्यंत झालेल्या संतांचेच अभंग निरूपणासाठी घ्यायचे, असा दंडक आहे. जेथे कीर्तन करायचे, तेथे अन्न घ्यायचे नाही, असाही दंडक आहे. निरूपणाचा अभंग म्हणून झाल्यानंतर एखादा वारकरी बुवांच्या सांगण्यावरून तोच अभंग रागदारीत गातो. हे अभंगगायन चालू असताना कीर्तनकार बुवांनी आरंभी ज्याच्या हातून वीणा घेतलेली असते, तो वीणेकरी बुवांच्या हातून वीणा घेऊन आपल्या गळ्यात घालतो. कीर्तनाच्या गादीचा मान म्हणून वीणा देता घेताना बुवा व वीणेकरी एकमेकांच्या पाया पडतात. वारकरी कीर्तनात वीणेचे महत्त्व विशेष आहे. भजन संपल्यानंतर 'पुंडलीक वरदा हरिविठ्ठल, श्रीज्ञानदेव तुकाराम, पंढरीनाथ महाराज की जय' असा घोष करतात. शेवटी निरूपणाच्या अभंगाचा भावार्थ बुवा सांगतात. येथे कीर्तनाचा पूर्वरंग संपतो. उत्तररंगात निरूपणाच्या अभंगाचे सखोल आणि सविस्तर विवेचन केले जाते.

### २अ.६.१ वारकरी संप्रदायातील देवता:

महाराष्ट्रातील भीमा नदीच्या काठी असलेल्या पंढरपुरातील विठ्ठल हे या संप्रदायाचे मुख्य दैवत होय. हा विठ्ठल कृष्णाचेच एक रूप म्हणून वारकऱ्यांनी स्वीकारलेला आहे. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असलेल्या विठ्ठलाचे निर्देश श्रुतिस्मृतिपुराणांत आलेले नाहीत. विष्णुसहस्रनामांत तसेच विष्णुच्या मानल्या गेलेल्या चोवीस अवतारांत विठ्ठलाचा अंतर्भाव झालेला दिसत नाही. तथापि विठ्ठलाला इसवी सनाच्या अकराव्या-बाराव्या शतकांपासून असाधारण अशी वैष्णव प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. विष्णूपासून विठ्ठल हे नाव बनले, असे मत काही अभ्यासकांनी व्यक्त केलेले आहे. उदा., विष्णु-विष्टु-विठ्ठल असे विठ्ठल हे नाम तयार झाले, असे अनेक अभ्यासक मानतात. तथापि विठ्ठल हे विष्णूचे अपभ्रष्ट रूप नसून विठ्ठलभक्तीच्या क्षेत्रापुरते विष्णू हे 'विठ्ठल'चे (विठूचे) उद्भ्रष्ट रूप होय, असे डॉ. रा. चिं. ढेरे ह्यांचे मत आहे. त्यांच्या मते विठ्ठल हा देव एकेकाळचा लोकदेव असला पाहिजे आणि तो क्रमाने कीर्तीवंत होत गेल्यानंतर त्याचे वैदिकीकरण करण्यात आले. पंढरपूरच्या विठ्ठलाचे मूळ हे गोपजनीय परंपरेत आहे. वारकरी संप्रदायाचे एक प्रमुख प्रचारक शं. वा. उर्फ सोनोपंत दांडेकर ह्यांनी वारकरी संप्रदाय हा वैदिक धर्मांतर्गत एक पंथ असून वैदिक धर्माच्या तत्त्वांशी अतिशय जुळते घेणारा, असा पंथ असल्याचे म्हटले आहे. वारकरी पंथ म्हणजे सनातन वैदिक धर्माची भक्तीस प्राधान्य देणारी शाखा, असेही त्यांनी म्हटले आहे. पंढरपूरचा विठोबा हे वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत असल्यामुळे वारकऱ्यांचे मुख्य क्षेत्र पंढरपूर आणि तीर्थ चंद्रभागा होय. विठोबा हे श्रीकृष्णाचेच रूप आहे, अशी सर्व संतांची धारणा असल्यामुळे वारकरी संप्रदाय हा कृष्णोपासकही आहेच. तथापि तो रामाचाही उपासक आहे. द्वारका, काशी ही क्षेत्रेही वारकरी पवित्र मानतात. तसेच चंद्रभागेप्रमाणेच इंद्रायणी, गोदावरी, कऱ्हा, तापी ह्या नद्यांनाही त्यांनी पवित्र मानले आहे. शिवाय सर्व हिंदूंनी पवित्र मानलेल्या गंगा, कृष्णा आदी नद्यांनाही ते पवित्र मानतातच.

विठ्ठलाच्या दर्शनास पंढरपूर येथे जे नियमाने जातात, त्यांना 'वारकरी' म्हणतात. 'वारी' या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझारा असा दिला जातो. यावरून उपास्यदेवतेच्या यात्रेला जो नियमितपणे एक व्रत म्हणून जातो, तो 'वारकरी' होय. वर्षातून एकदा आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यांपैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपुरास जातो, तो 'पंढरीचा वारकरी' म्हटला जातो. त्यांच्या उपासनेचा मार्ग 'वारकरी संप्रदाय' होय. संत नामदेव (इ. स. १२७० ते इ. स. १३५० ) हे भागवत धर्माच्या प्रसार आणि प्रचारकार्याचे आद्यप्रवर्तक होते. ते कीर्तनकार होते. संत नामदेवांचे जवळपास अडीच हजार अभंग आज उपलब्ध आहेत. त्यांचे असंख्य अभंग काळाच्या उदरात गहाळही झाले असावेत. त्यानंतर संत निवृत्तिनाथ (इ. स. १२७३ ते इ. स. १२९७), संत सोपान (जन्म : अज्ञात ते इ. स. १२९७), मुक्ताबाई (इ. स. १२७९ ते इ. स. १२९७), संत गोरा कुंभार (इ. स. १२६७ ते इ. स. १३१७), संत जनाबाई (इ. स. १२५८ ते इ. स. १३५०), संत सावता माळी (इ. स. १२५० ते इ. स. १२९५), संत नरहरी सोनार (जन्म : अज्ञात, मृत्यू : १३१३), संत कान्होपात्रा (१५ वे शतक), सेना न्हावी (१३ वे शतक), संत चोखामेळा (जन्म : अज्ञात, मृत्यू इ. स. १३३८), संत सोयराबाई (१४ वे शतक), संत निर्मळा (१४ वे शतक), संत बंका (१४ वे शतक), संत एकनाथ (इ. स. १५०४ ते इ. स. १५९९), संत तुकाराम (इ. स. १६०८ ते इ. स. १६५०) या वारकरी संतांनी आपल्या अभंगांमधून या संप्रदायाला तत्त्वज्ञानाची एक व्यापक बैठक प्राप्त करून दिली.

### २अ.६.२ वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान:

हा संप्रदाय वैदिक आणि औपनिषदिक तत्त्वज्ञानाचे विकसित आणि परिवर्तीत रूप आहे. केवळ निवृत्तीचा मार्ग सांगून समाज आणि संसाराकडे पाठ न फिरवता मानवा-मानवामध्ये ईश्वराचे रूप पाहून त्याची सेवा करावी आणि जगाच्या उद्धारासोबत स्वोद्धार करावा, असा प्रवृत्तीचा मार्ग या संप्रदायाने सांगितला. वारकरी संतांनी सदाचरणाचा साधा, सोपा मार्ग लोकांना सांगितला. संतांनी त्यासाठी वाङ्मय निर्माण केले. या संप्रदायाची भूमिका सर्वसमावेशक आहे. गृहस्थाश्रम धर्म पाळून कोणत्याही जाचक कर्मकांडात न अडकता सहज शक्य होईल, अशी सोपी शिकवण या संप्रदायाने दिली. उदारमतवादी भूमिकेमुळे या संप्रदायाला लोकाश्रय प्राप्त होत गेला. वारकरी संप्रदायास 'भागवत धर्म' किंवा 'माळकरी पंथ' असेही म्हणतात. तुळशीच्या मण्यांची गळ्यात माळ, कपाळावर गंध ही वारकऱ्यांची बाह्यचिन्हे आहेत. 'माळकरी' असेही याला दुसरे नाव आहे. वारकरी लोक गळ्यात जी तुळशीची माळ घालतात, त्यावरून याला 'माळकरी संप्रदाय' असे नामाभिधान प्राप्त झाले आहे. आज महाराष्ट्रात हा संप्रदाय 'वारकरी संप्रदाय' या नावानेच सर्वश्रुत आहे. "आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यांपैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीमाळा घालून नियमाने पंढरपुरास जातो, तो 'पंढरपूरचा वारकरी' म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग, तो 'वारकरी पंथ' होय". जीव हा परमात्म्याचा अंश असून मायेच्या प्रभावाखाली येऊन तो दु:खी झाला आहे. प्रापंचिक मायेचा त्याग करून भक्तिमार्गाच्या आधारे आपल्या मूळ रूपाची जाणीव भक्ताला करून घेता येते. आपल्या मूळ अस्तित्वाची ओळख होताच जीव मायेतून मुक्त होऊन सुखरूप अशा परमात्म्याला उपलब्ध होतो. परमात्म्याची प्राप्ती झाल्यानंतरही या देहामध्ये राहून भक्तिसुखाचा आनंद घेता येतो. देह नष्ट झाल्यानंतर हा जीव परमात्म्यामध्ये विलीन होतो. यालाच वारकरी संतांनी 'मोक्षसुख' असे म्हटले आहे.

परंतु या मोक्षापेक्षाही अधिक सुख भक्तीमध्ये असल्याने वारंवार हे सुख भोगण्यासाठी या मनुष्य शरीरामध्ये येण्याची इच्छा सर्व वारकरी संतांनी व्यक्त केली आहे. त्यामुळेच वारकरी संप्रदायामध्ये भक्तीला धर्म, अर्थ, काम आणि मोक्षानंतरचा पाचवा पुरुषार्थ मानले आहे.

जगत हे मिथ्या नसून ते चैतन्याचा विलास आहे. चैतन्याच्या ठिकाणी असणाऱ्या सुखाचा अथवा प्रेमाचा आस्वाद घेण्यासाठी आत्मा जीवरूपाने प्रकट होतो. परंतु जन्मानंतर माया-मोहामध्ये अडकून तो दु:खी होता. अशा जीवाला अहंभाव टाकून तद्रुप झाल्याशिवाय ते भक्ती-प्रेमसुख मिळत नाही. भक्तीचा हा अनुभव म्हणजे परमपुरुषार्थ होय. या भक्तीची गोडी संतांच्या संगतीत आहे, असे वर्णन संतसाहित्यात आढळते. वारकरी संप्रदायाचा विशेष भर भक्तीवर आहे. आपल्या अद्वैत विचारांना किंचितही धक्का न देता भक्तिसुखाचा आनंद उपभोगता येतो, असे हा संप्रदाय शिकवतो. या संप्रदायातील कोणत्याही संताने संन्यास वृत्तीचा उपदेश केला नाही. उलट ते स्वत: मुक्त बनून आपण ज्या मार्गाने मुक्त झालो, त्याचे जगास ज्ञान करून देतात. साध्य भक्तीसोबतच साधन भक्तीही यामध्ये प्रतिपादिली आहे. म्हणजेच हा संप्रदाय सगुणोपासकही आहे. परमात्मा व्यापक, निर्गुण, निराकार आहे, हेही वारकरी संतांना मान्य आहे. त्याचबरोबर तो सगुण, साकार आहे, हेदेखील वारकरी संतांनी सांगितले आहे. वारकरी संतांची शिकवण संकुचित विचारसरणी नसून ती सर्वसमावेशक व सहिष्णू आहे. या संप्रदायात अधिकारपदाची उतरंड नाही, जातिव्यवस्थेचे बंधन नाही. या संप्रदायाचा आचारधर्म बहुजनसुलभ व आंतरिक उत्कट भाववृत्तीला महत्त्व देणारा आहे. त्यामुळेच हा संप्रदाय सर्वाधिक लोकप्रिय ठरला. या संप्रदायाचे अनुयायी आळंदी-पंढरपूरच्या वाटेने वर्षानुवर्षांपासून मार्गक्रमण करताना आजही दिसतात. एकादशीचा उपवास मनोभावे वारकरी करतात.

हा महाराष्ट्रातील एक अत्यंत लोकप्रिय भक्तिसंप्रदाय आहे. ‘वारी करणारा’ ह्या अर्थाने ‘वारकरी’ हा शब्द वापरण्यात आलेला आहे. ‘वारी’ ह्या शव्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझार असा दिला जातो. आषाढी एकादशी आणि कार्तिकी एकादशी ह्या दोन वाऱ्या प्रमुख मानल्या जातात. त्यांतही आषाढीला महत्त्व विशेष आहे. ज्यांना वर्षातून एकदाच, म्हणजे आषाढीला किंवा कार्तिकीला, येणे शक्य असते, त्यांनी तसे केले तर चालते. परंतु प्रतिवर्षी किमान एकदा तरी वारी करणे, ही वारकऱ्यांची मुख्य साधना होय. श्रीज्ञानदेवांनी समाधी घेतल्यानंतर प्रतिवर्षी कार्तिकवद्य एकादशीस वारकरी संप्रदायाचे अनुयायी आळंदीलाही नियमाने जमू  लागले. वारकरी संप्रदायाला ‘माळकरी संप्रदाय’ असेही एक पर्यायी नाव आहे. प्रत्येक वारकऱ्याच्या गळ्यात तुळशीच्या १०८ मण्यांची माळ असते. इतर अनेक धर्मपंथांत माळेला स्मरणी म्हणून महत्त्व आहेच, पण वारकरी संप्रदायात ही तुळशीच्या मण्यांची माळ घातल्याखेरीज कोणाला वारकरी होताच येत नाही. माळ घालणे, म्हणजे एक नवा आध्यात्मिक जन्म घेणे, असे मानले जाते. वारकरी संप्रदायात माळ म्हणजे निव्वल स्मरणी नव्हे.

वारकरी संप्रदायाची दीक्षा घेण्याचा विधी अगदी साधा असतो. ह्या संप्रदायात फड (प्रत्येक महंताच्या वा वारकरी साधूच्या भोवती असलेला त्याच्या शिष्यमंडळींचा समुदाय) असतात. दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याला अशा एखाद्या फडप्रमुखाकडून तुळशीच्या १०८ मण्यांची माळ घालून घ्यावी लागते. दीक्षेची पद्धत अशी  ही माळ आणून दीक्षा  देणाऱ्या साधूकडे वा फडप्रमुखाकडे जावयाचे. तो ती माळ ज्ञानेश्वरीवर ठेवतो आणि प्रतिवर्षी पंढरीची वारी

करण्याचे वचन दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याकडून घेतो. किमान एक तरी पंढरपूरची आणि आळंदीची वारीही केलीच पाहिजे. १. सत्य बोलावे. २. परस्त्रीला मातेसमान मानावे. ३. कांदालसूण आणि मांसाहार वर्ज्य करावा. ४. मद्यपान वर्ज्य करावे. ५. रोज हरिपाठ करावा, तसेच 'रामकृष्णहरी' ह्या मंत्राचा जप करावा. ६. प्रपंचातील कर्मे श्रीविठ्ठलस्मरण करीत पार पाडावी, हे सर्व नियम या संप्रदायातील अनुयायी पाळतात. दीक्षाविधीच्या वेळी गळ्यात घातलेली ही तुळशीची माळ काही कारणाने तुटल्यास ती पुन्हा गुंफून गळ्यात घालीपर्यंत वारकऱ्याला अन्नसेवन करता येत नाही. वारकऱ्याच्या आचारधर्माचा आणखी एक भाग, म्हणजे त्याने गोपी चंदनाचा ऊर्ध्व पुंड्र लावून मुद्रा लावल्या पाहिजेत. गोपाळकाला या संप्रदायात प्रमुख आहे. नामदेवांपासून या संप्रदायात कीर्तनपरंपरा सुरू आहे.

### २अ.६.३ वारकरी संप्रदायाचा प्रभाव:

वारकरी संप्रदायाला अमाप लोकप्रियता मिळाली. सर्वसामान्यांशी ह्या पंथाने अत्यंत जिव्हाळ्याचे नाते जोडले आहे. वारकरी संप्रदायाचे उपास्य दैवत जे विठ्ठल, ते महासमन्वयाचे प्रतीक आहे. वारकरी संतांनी शैव, वैष्णव, बौद्ध, जैन इ. विविध धर्मविचारांचा विठ्ठलाच्या ठायी संगम साधला आहे. आपल्या विचारांना लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी वारकरी पंथीयांनी मराठी भाषेच्या जोडीला ओवी आणि अभंग छंदाचे तंत्र उपयोगात आणले. इतर पंथीयांच्या तुलनेत वारकरी संतसाहित्य लोकांपर्यंत अधिक प्रमाणात पोहोचले. या संप्रदायातील ज्ञानेश्वरांच्या ओवीछंदाचा प्रभाव नंतरच्या काळातील अनेक ग्रंथावर पडलेला दिसतो. तुकोबारायांच्या अभंगरचनेचा प्रभाव नंतरच्या अनेक संत साहित्यिकांवर पडलेला दिसतो. हरिपाठाच्या अनुकरणातून शिवपाठ, दत्तपाठ असे नामस्मरणाचे महत्त्व सांगणारे ग्रंथ वारकरी संप्रदायाचा प्रभाव सूचित करतात. या संप्रदायाची लोकप्रियता लक्षात घेऊन नंतरच्या संप्रदायांनीही समता, बंधुता, अंधश्रद्धा निर्मूलन यांना विरोध केलेला दिसून येतो. शिवाजीमहाराज, पेशवे, ब्रिटिश या राज्यकर्त्यांवरही वारकरी संतांचा प्रभाव दिसून येतो. महात्मा फुले यांच्या अखंडादि काव्यरचनेच्या तंत्रावर संत तुकारामांच्या अभंगांचा प्रभाव दिसतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या 'मूकनायक' या वृत्तपत्राच्या शीर्षस्थानी वारकरी संतांची वचने दिलेली आढळतात. आधुनिक सुधारणावादी विचारांवरही वारकरी संप्रदायाचा प्रभाव दिसून येतो.

### २अ.६.४ वारकरी संप्रदायाची ग्रंथनिर्मिती:

संत ज्ञानेश्वरांची 'ज्ञानेश्वरी', संत एकनाथांचे 'एकनाथी भागवत' आणि संत तुकारामांची 'अभंग गाथा' हे तीन ग्रंथ म्हणजे वारकरी संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाची प्रस्थानत्रयी होय. 'ज्ञानेश्वरी' हा 'श्रीमद्भगवद्गीता' या ग्रंथावरील टीकात्मक ग्रंथ होय, तर 'एकनाथी भागवत' हे अठरावे महापुराण 'श्रीमद्भागवत' या ग्रंथातील अकराव्या स्कंधावरील भाष्य होय. हे दोन्ही ग्रंथ हे मूळ अन्य ग्रंथांवर आधारित असून वारकरी संतांची अभंगरचना ही त्यांची स्वतंत्र रचना आहे. या अभंगांमधून वारकरी संतांची विचारसरणी स्वतंत्रपणे प्रकट झाली आहे. सर्वत्र केवळ आत्मतत्त्वरूप चैतन्याचे स्फुरण असून ते स्वसंवेद्य आहे. म्हणजेच त्याच्या अस्तित्वाला कोणताही पुरावा लागत नाही. संत ज्ञानेश्वरांनी 'हे विश्वची माझे घर ।' या विश्वव्यापक भूमिकेतून रचलेल्या या संप्रदायाचे तत्त्वज्ञान सुरुवातीला 'अमृतानुभव',

'चांगदेवपासष्टी', 'भावार्थदीपिका', 'हरिपाठ', स्फुट अभंग यांच्या माध्यमातून मांडले. भक्ति उपासन, हरिहर ऐक्य, संतमहात्म्य, भक्तिमहात्म्य यांचे वर्णन यांच्या लेखनामध्ये अनेक ठिकाणी आले आहे. भक्तांसाठी ज्ञानेश्वरी, ज्ञानी लोकांसाठी अमृतानुभव, योगी लोकांसाठी चांगदेवपासष्ठी आणि सामान्य गृहस्थांसाठी हरिपाठ अशी ज्ञानेश्वरांनी रचना केलेली आहे. नामदेवांनी नामपर, संतपर, भक्तिपर, उपदेशपर, पंढरीपर अशी अभंगरचना केली. ज्ञानेश्वरी, ज्ञानेश्वरकृत हरिपाठ, एकनाथी भागवत, चतु:श्लोकी भागवत, एकनाथांचा हरिपाठ, तुकारामांची अभंगगाथा, अन्य वारकरी संतांचे अभंग हे वारकरी संप्रदायाला प्रमाणभूत होत. त्यांतही ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत, तुकोबांची अभंगगाथा ही वारकरी संप्रदायाची प्रस्थानत्रयी मानली जाते. संत एकनाथ महाराज हे महाराष्ट्रातील एक श्रेष्ठ संतकवी. देवगिरी येथे सहा वर्षे राहून अध्यात्मग्रंथांचे त्यांनी अध्ययन केले. इ. स. १५८३मध्ये ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीचा त्यांनी जीर्णोद्धार केला आणि 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाची संहिता शुद्ध केली. श्रीमद्भागवत पुराणाच्या द्वितीय स्कंधाच्या नवव्या अध्यायातील ३२ ते ३५ श्लोकांवरील १,०३६ ओव्यांचे 'चतु:श्लोकी भागवत' ही त्यांची पहिली रचना. स्फुटलेखनामध्ये आंधळे, पांगळे, भाटे, वासुदेव, गोसावी यांनाही त्यांनी ईश्वरप्राप्तीच्या तत्त्वज्ञानाचे विषय बनवले. त्यांनी आयुष्यभर सातत्याने स्फुट व दीर्घ स्वरूपाचे लेखन केल्यामुळे त्यांची रचना विपुल आहे. त्यांनी लेखनातून लोकशिक्षकाची भूमिका बजावली. भारुडे, गौळणी, अर्जदास्त, संतचरित्रे, जोहार, पदे, आरत्या इत्यादी अनेक स्फुट काव्यप्रकार एकनाथ महाराजांनी समर्थपणे हाताळले. वारकरी संतकवींमध्ये त्यांच्याइतकी विपुल व विविध रचना अन्य कोणाचीही नाही. लोकभाषेत त्यांनी ही सारी रचना केली. एकनाथ महाराजांच्या स्फुट ग्रंथांची संख्या निश्चितपणे सांगता येत नाही. श्री. गो. का. चांदोरकरांनी आपल्या 'संतकवि काव्यसूची'मध्ये एकनाथ महाराजांच्या ३४ ग्रंथांचा निर्देश केला आहे. श्री. नरहरी विष्णुशास्त्री पणशीकरांनी 'श्री संत एकनाथ महाराजकृत आठ ग्रंथ' या संपादित ग्रंथात 'चतु:श्लोकी भागवत', 'हस्तामलक', 'स्वात्मसुख', 'आनंदलहरी', 'शुकाष्टक', 'आनंदानुभव', 'अनुभवामृत' आणि 'चिरंजीवपद' या ग्रंथांचा समावेश केलेला आहे. बहुजन समाजासाठी एकनाथ महाराजांनी कथात्मक रचना केली. 'तुळशीमाहात्म्य' या ग्रंथातून त्यांनी तुळशीचे व्यक्तित्व आणि आध्यात्मिक महत्त्व सूचित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'सीता-मंदोदरीची एकात्मता' या पुराणकथेतून त्यांनी या दोन महान स्त्रियांच्या सम-विषम धागा मांडलेला आहे. सांसारिकांच्या मनोवृत्तीचा आल्हादक व विनोदरम्य आविष्कार करणाऱ्या 'हळदुली' या स्फुट कथेतून त्यांनी 'रुक्मिणीस्वयंवरा'तील हळदुली प्रसंग सांगितला आहे. 'कृष्णदान' ह्या श्रीकृष्णकथेतून त्यांनी कृष्णभक्तीचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. 'कदर्यु-आख्यान' या आख्यानातून त्यांनी कृपण माणसाचे हास्यजनक स्वभावचित्र रेखाटले आहे. याशिवाय 'रुक्मांगद कथा', 'हनुमानजन्म', 'प्रल्हादचरित्र', 'ध्रुवचरित्र', 'उपमन्यूकथा', 'सुदामचरित्र', 'संदीपनकथा' इत्यादी आख्यानांची रचना केली आहे. याशिवाय 'ध्रुव', 'प्रल्हाद', 'उपमन्यू' आणि 'सुदामा' यांच्या छोट्या अशा चरित्रकथा एकनाथ महाराजांनी लिहिल्या. निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, मुक्ताबाई, नामदेव, सोपानदेव, नामदेव, गोरा कुंभार, सांवतामाळी, चोखामेळा या वारकरी सांप्रदायिक संताची चरित्रे त्यांनी लिहिली. शिवकाळातील संत तुकारामांच्या अभंग गाथेलाही या संप्रदायात महत्त्वाचे स्थान आहे. त्यांची अभंगरचना ही कळस मानली जाते. त्यांनी नामपर, संतपर, उपदेशपर, पंढरीपर, स्थितीपर, आत्मनिवेदनपर अभंगरचना केली. त्यांच्या अभंग गाथेतील अभंग संख्येबद्दल मतभेद असून शासकीय संपादित गाथेत ५०००, तर देवडीकर

महाराज संपादित अभंगगाथेत ४०९२ अभंग आहेत. अंधश्रद्धानिर्मूलन, समतेचा आग्रह, परखड आणि तीव्र भाषा हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्ट्य आढळते. याशिवाय जनाबाई, गोरा कुंभार, सावतामाळी, सेना न्हावी, चोखामेळ, कर्ममेळा, बंका, निर्मळा अशा संतांचेही अभंग या संप्रदायात आदराचे स्थान प्राप्त करून आहेत. तुकाराम महाराजांनंतर निळोबाराय पिंपळनेरकर, बहिणाबाई शिऊरकर यांनी या संप्रदायामध्ये साहित्यनिमिर्ती केलेली दिसते.

### २अ.६.५ वारकरी संप्रदायाच्या मर्यादा:

वैदिक-अवैदिक अशा दोन्ही परंपरा स्वीकारल्याने हा संप्रदाय पुरोगामी आणि प्रतिगामी अशा दोन्ही स्वरूपाचा ठरलेला दिसतो. त्यामुळे पारंपरिक विचारांसोबतच आधुनिक विचारांच्या लोकांनीही हा संप्रदाय स्वीकारलेला दिसतो. त्यामुळे परस्परविरोध विचार एकाच संप्रदायात अस्तित्त्वात आलेले दिसतात. यातून तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील संभ्रवावस्था काही प्रमाणात या संप्रदायात आलेली दिसून येते. वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था नाकारणाऱ्या या संप्रदायात वर्णाभिमानीही आपला दावा करताना दिसतात. महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगाणा या राज्यांबाहेर या संप्रदायाचा तितकासा प्रचार-प्रसार झालेला दिसून येत नाही. निळोबाराय, बहिणाबाई शिऊरकर यांच्यानंतर या साहित्याची ग्रंथनिर्मिती थांबलेली दिसते.

## २अ.७ समर्थ संप्रदायाचा इतिहास

महाराष्ट्रात इसवी सनाच्या सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात समर्थ रामादासांचे कार्य आणि शिकवण सुरू झाली. समर्थ संप्रदाय हे त्याचे प्रचलित दुसरे नाव. शिवकाळात समाज जीवनाची ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही दृष्टींनी नीतिमत्ता ढासळलेली होती. समर्थ रामदासांनी या वस्तुस्थितीविषयी असंतोष व्यक्त केला. या विस्कटलेल्या सामाजिक जीवनाची घडी बसविण्यास त्यांनी दीर्घ तपश्चर्या केली. पर्यटन करून समाजाचे अवलोकन केले, परमार्थचिंतन केले. यातून सामान्यांमध्ये त्यांनी आत्मविश्वास निर्माण केला. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आणि महाराष्ट्राबाहेरही त्यांनी मठ स्थापन केले. स्त्रियांनाही मठांचे अधिपती केले. आपल्या विचारांचा आणि कार्यातून शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य-स्थापनेसाठी समाजाची अस्मिता जागी केली.

### २अ.७.१ समर्थ संप्रदायातील आराध्यदेवता:

श्रीसमर्थ रामदासस्वामींनी सुरू केलेली रामदासी परंपरा प्रामुख्याने प्रभू श्रीरामचंद्रांची उपासना करते. समर्थ रामदास आणि दत्त संप्रदाय यांचेही नाते अतूट आहे. समर्थ जेव्हा माहूरगडावर गेले होते, तेव्हा त्यांना श्रीदत्तात्रेयांचे दर्शन झाले, असा हनुमंतस्वामींनी त्यांच्या बखरीत केला आहे. समर्थांनी दासबोध, एकवीस समासी, मनोबोध (मनाचे श्लोक), आत्माराम इत्यादी ग्रंथांच्या माध्यमातून समाजाला आपला विचार सांगितला. ज्ञानदान, उपासना आणि भिक्षाफेरी ही या संप्रदायाची वैशिष्ट्ये ठरतात. त्यांच्यानंतर श्रीधर स्वामी यांनीही या संप्रदायाचे कार्य सुरू ठेवले. सज्जनगडावरील समर्थ रामदासस्वामींची समाधी आणि कर्नाटक राज्यातील वरदपूर येथील श्रीधरस्वामींची समाधी, तसेच चाफळचे श्रीराम मंदिर आणि समर्थांनी स्थापन केलेले अकरा मारुती ही या संप्रदायातील साधकांची प्रेरणास्थाने आहेत. श्रीरामचंद्र ही प्रमुख देवता, श्रीहनुमान ही दुसरी. रामनवमी व

हनुमानजयंती हे दोन प्रमुख उत्सव होय. समर्थांच्या निर्णयानंतर यामध्ये दासनवमीची भर पडली. चाफळ व सज्जनगड ही दोन प्रमुख स्थाने या सांप्रदायिकांना पूज्य वाटतात. समर्थांनी स्थापन केलेले मठ व तेथे नियुक्त केलेले महंत ही संप्रदाय स्थापन केल्याची महत्त्वाची खूण आहे. ब्रह्मचैतन्यमहाराज गोंदवलेकर हे स्वामीसमर्थांचाच अवतार मानले जातात. यांनी  नामसाधनेवर भर दिलेला दिसतो. या संप्रदायाने पारमार्थिक साधनेला सामाजिक कार्याची जोड दिलेली आहे.

### २अ.७.२ समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान:

स्व-काल परिस्थितीच्या संदर्भात समर्थांना 'इहलोक' आणि 'परलोक' अशा दोन्ही मताचा समन्वय करण्याची आवश्यकता वाटली.  धर्माच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी देवधर्म, राजधर्म, क्षात्रधर्म इ. संकल्पनांना 'स्वधर्म' या विशाल संकल्पनेत समाविष्ठ त्यांनी समाविष्ट केले. रामोपासना, हनुमान उपासना यांतून बळाची पूजा करण्याचा संदेश त्यांनी दिला. धर्मकार्यासोबत राजकारणाचा, प्रपंचाबरोबर परमार्थाचा आणि भक्तीबरोबर शक्तीच्या उपासनेचा त्यांनी समाजाला संदेश दिला. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या काळात समर्थांनी केलेले राष्ट्रकार्य मोलाचे होते. समर्थांनी भक्तीला शक्तीच्या उपासनेची जोड दिली. गावागावात हनुमान मंदिर स्थापन करून युवकांना आध्यात्मिक आणि शारीरिक बल वाढविण्यासाठी प्रेरित केले. अवघड वाटणारा परमार्थ त्यांनी सोप्या पद्धतीने समजावून दिला. प्रपंचात राहूनही परमार्थ कसा करावा, यासंबंधी मार्गदर्शन केले. परंपरागत अद्वैतसिद्धांताला त्यांनी भक्तीची जोड दिली. त्यांच्या तत्त्वज्ञानावर द्वैतमताची छाया दिसते. ज्ञानोत्तर कर्म व अवतार-कल्पना आणि नवविद्या भक्तीची कल्पना समर्थांनी स्वीकारलेली दिसते. कोणत्याही एका ग्रंथाचे वा आचार्याचे अनुकरण त्यांनी केले नाही. अंतरात्मा, जगज्जेती, चंचल आणि निश्चल ब्रह्म, चंचल कर्ता व निश्चल देव, अशा काही संज्ञा समर्थ रामदासांनी वेगळ्या अर्थाने वापरल्या. सगुणापेक्षा निर्गुणाचे महत्त्व आणि आत्मनिवेदन भक्तीचा वेगळा उलगडा त्यांनी केला. त्यांचा विचार ऐहिकाच्या पातळीवर येतो. त्याला देश-काल-परिस्थितीचे वास्तव भान आहे. हरिकथा निरूपण मुख्य मानून त्यांनी राजकारण व सर्वविषयी सावधपण यांची त्याला जोड दिली. प्रयत्नवाद व लोकसंग्रह यांचा पुरस्कार केला. आपल्या संप्रदायाचे विशिष्ट आचार समर्थांनी नेमकेपणाने कोठे सांगितले नाहीत. त्याविषयीच्या त्यांच्या कल्पना निरनिराळ्या रचनांतून ठरवाव्या लागतात. संप्रदायाची वीस लक्षणे त्यांनी एके ठिकाणी सांगितली आहेत. लिहिणे, वाचणे, अर्थांतर सांगणे, अर्थभेद व आशंकानिवृत्ती, गायन, नर्तन, टाळी वाजवणे, लोकराज राखणे, प्रसंग व काळ जाणणे, सर्वांशी समान वागणे, राजकारण, शिष्यांसाठी नियम, निस्पृह किंवा महंत यांची लक्षणे, भिक्षानिरूपण, ब्रह्मचर्यव्रत, संन्यस्त वृत्ती, उदंड भ्रमण व भिक्षावृत्ती यांवर त्यांनी आपल्या लेखनात अनेक ठिकाणी विवरण केले आहे. मेखला, शिरोवस्त्र, झोळी, कमरेस बांधावयाचे रामनामांकित वस्त्र व भगवे निशाण अशी पंच वस्त्रे भिक्षेच्या वेळी भिक्षुकाजवळ असावीत. भिक्षा मागून झाल्यावर मनोबोधातील शेवटचा श्लोक म्हणून झोळी देवापुढे ठेवावी व तिची पूजा करून 'सुरवरवरदायिनी' ही आरती म्हणावी, असा आचार समर्थ रामदासांनी सांगितला आहे. हुरमुजी रंगाची वस्त्रे, मस्तकी जटाभार, गळ्यात मेखला, हातात माळ, काखेत कुबडी व पायात खडावा असा समर्थांचा वेष होता. शिष्यांकडून त्याचे अनुकरण होते. भजन, प्रार्थना, मंत्रजप, वैराग्य, विवेक, इंद्रियनिरोध, वर्णाश्रमधर्माचे पालन, स्नानसंध्यादी नित्यकर्मे, एकान्ती मानसपूजा, सूर्यनमस्कार, हनुमंतस्मरण, श्रीरामाचे

भजनपूजन, करुणाष्टकांचे वाचन, दररोज दासबोध व मनोबोधाचे वाचण, शास्त्रचर्चा, आत्मनिरुपण, लोकजागृती, ब्रह्मचर्यव्रत, हुरमुजी वस्त्रे, विवेक, वैराग्य, इंद्रियनिरोध, भिक्षावृत्ती, नि:स्पृहता व ईश्वरभक्ती हाच या संप्रदायाच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे.

## २अ.७.३ समर्थ संप्रदायाचा प्रभाव:

समर्थ रामदासांनी साठ-सत्तर मठ स्थापन केले. आंध्रप्रदेशात इंदूरबोधन व दक्षिणेत तंजावरपर्यंत या संप्रदायाचा प्रसार पोहोचला होता. काशी, अयोध्या, मथुरा, अवंती, द्वारका, बद्री-केदार अशा दूरच्या स्थळी मठ असल्याचा उल्लेख आढळतो. नासिक-टाकळी येथे बारा वर्षे केलेल्या तपश्चर्या केल्यानंतर समर्थ रामदासांनी भारतातील सर्व भागात तीर्थयात्रा केली. त्या काळातच त्यांनी शिष्य बनवण्यास सुरुवात केली. ही प्रेरणा त्या काळातील इस्लामच्या सार्वत्रिक स्वरूपाच्या धार्मिक व राजकीय आक्रमणांशी संबंधित होती. इंग्रजी राजवटीत पारतंत्र्याविषयीचा असंतोष उत्पन्न करण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हा न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, लोकमान्य टिळक, इतिहासाचार्या राजवाडे अशा विचारवंतांनी मराठा सत्तेचे ऐतिहासिक अवलोकन सुरू केले, तेव्हा नव्या युगाच्या संदर्भात संतसाहित्याची समीक्षा करताना त्यांनी समर्थांचे चरित्र व त्यांच्या ग्रंथांतील शिकवणूक यांना देशभक्तीचा आधार बनवून सामान्यांच्या मनात स्वातंत्र्याचे, देशभक्तीचे स्फुल्लिंग जागे करण्याचा अतिशय प्रभावी प्रयत्न केलेला दिसतो.

## २अ.७.४ समर्थ संप्रदायातील ग्रंथनिर्मिती:

'मनाचे श्लोक' ही स्वत:ला उपदेश करण्याची प्रक्रिया आहे. यातू २०५ श्लोक आहेत. यातून त्यांचे मनाविषयीचे सखोल ज्ञान लक्षात येते. त्यांचा 'दासबोध' हा गुरू-शिष्याचा संवाद असून याची निर्मिती इ. स.१६३२ ते १६८१ या काळात म्हणजे जवळजवळ ५० वर्षे चालू होती. वीस दशकी, दोनशे समासी असाही या ग्रंथाचा उल्लेख केला जातो. याच्या पूर्वार्धात आठ दशक व उत्तरार्धात बारा दशक आहेत. पूर्वार्धाची ओवीसंख्या ३८६६ आणि उत्तरार्धाची ३८८५ आहे. हा ग्रंथ म्हणजे 'एकवीस समासी'ची सुधारीत आवृत्ती होय. 'आत्माराम' हा त्यांचा एकूण १८३ ओव्यांचा ५ समासांमध्ये बांधलेला ग्रंथ आहे. हा ग्रंथ समर्थांच्या प्रस्थानत्रयीमधील महत्त्वाचा ग्रंथ आहे. रामदासांनी काव्यलेखनही केलेले आहे. त्यांनी अनेक देवदेवतांच्या आरत्या रचल्या आहेत. 'सुखकर्ता दुखहर्ता' ही गणपतीची आरती, 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' ही मारुतीची आरती, 'दुर्गे दुर्घट भारी तुजविण संसारी' ही देवीची आरती, 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा' ही शंकराची आरती या सर्व आरत्या घरोघरी म्हटल्या जातात. त्यांनी काकड आरती, भूपाळ्या, शेजारती असे आरतीचे अनेक प्रकार लिहिले. 'संतांची आरती' नावाचे त्यांचे स्वतंत्र कवण असून त्यात ज्ञानेश्वरादी चारही भावंडे, चोखामेळा, नरहरी सोनार, सेना न्हावी, गोरा कुंभार, तुकाराममहाराज या सर्व संतांना संत रामदासांनी वंदन केले आहे. तुकाराममहाराज संत रामदासांच्या समकालीन असूनही त्यांचा समावेश आरतीत केला आहे. कृष्णामाईची आरतीदेखील संत रामदासांनी लिहिली आहे. त्यांच्या 'करुणाष्टका'त प्रत्येकी चार चरण असलेली १५ कडवी आहेत. प्रत्येक चरणात १५ अक्षरे आहेत. 'जुना दासबोध' म्हणजे 'एकवीस समासी' हाही त्यांचा महत्त्वाचा ग्रंथ. संत रामदासांना सिद्धी प्राप्त होण्याच्या वेळी याची रचना झाली. याची ओवीसंख्या १३४० आहे. त्यांनी भारूडेही रचली. रामदासांनी लळिताच्या पदांतून सजीव

व निर्जीवांच्या अभिन्नत्त्वाचे, त्यांच्या अंत:सूत्राचे जे दर्शन घडविले. रामदासांनी रचलेल्या पहाटगाण्यात गणेश, शारदा, सद्गुरू, संत सज्जन, यांना प्रथम वंदन करून देवांना बंधमुक्त करणाऱ्या रामाचा जप सर्व लोकांना नित्य नेमाने करण्यास सांगून मोक्षप्राप्तीचा सुलभ, सोपा मार्ग दाखवून दिलेला आहे. रामदासांच्या अभंगांची संख्या कमी असली, तरी त्यांनी याही छंदात लेखन केलेले आहे. त्यांनी लिहिलेली २५ पत्रे उपलब्ध आहेत. त्यांची अनेक पत्रे पद्यमय आहेत. याखेरीज सुमारे २१५ हिंदी रचनादेखील केल्या आहेत. त्यांनी तत्कालीन सामाजिक व राजकीय भान 'अस्मानी सुलतानी' या स्फुट लेखनातून करून दिली आहे. इंदूरबोधन मठाचे अधिपती श्रीसमर्थदास यांनी श्रीसमर्थसांप्रदायिक नित्यनेमसोपान या (इ. स. १९२६) ग्रंथात समर्थ संप्रदायातील भिक्षेचे नियम दिलेले आहेत. दिनकरस्वामी यांचा स्वानुभवदिनकर, आत्मारामहाराजांचा दासविश्रामधाम, हरिस्वामीं पदे अशी साहित्यनिर्मिती या संप्रदायाने केलेली दिसते. समर्थांनी केलेले अपार लेखन हा त्यांच्या संप्रदायातील वाङ्मयाचा मूलाधार होय. समर्थांचे थोरले बंधू रामीरामदास, मेरुस्वामी, माधवस्वामी, हरिबुवा भोंडवे, आत्मारामहाराज एक्केहाळीकर, हंसराजस्वामी येथवर या संप्रदायातील ग्रंथकारांची परंपरा दिसते. समर्थचरित्रपर, तत्त्वज्ञानपर, कथापर व स्फुट असे लेखन या लेखकांनी केले. समर्थांच्या शिष्या वेणाबाई यांचे रुक्मिणीस्वयंवर हा एक महत्त्वपूर्ण ग्रंथ होय.

### २अ.७.५ समर्थ संप्रदायाच्या मर्यादा:

समर्थ संप्रदायात पहिले रामदास व अखेरचे हंसराज वगळता इतर कोणालाही मराठी वाङ्मयात  महत्त्वाचे स्थान लाभलेले नाही. समर्थांचे तेज तर कोणालाच आढळत नाही. प्रपंच परमार्थाचा विवेक, प्रयत्नवादाचा पुरस्कार, लोकसंग्रहाचा ध्यास व देशकालपरिस्थितीचे उत्कट भान हे समर्थांच्या विचारांतील विशेष कोणत्याही लेखकामध्ये आढळत नाहीत. त्यांच्या शिकवणुकीचा प्रचार करेल, असा एकही शिष्य समर्थांना लाभला नाही. त्यामुळे त्यांच्यानंतर संप्रदायातील चैतन्य ओसरत गेले. मठही प्रभावहीन झाले. नंतरच्या काळात लोकजागृती व लोकसंग्रह यांकडे या संप्रदायाच्या अनुयायांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले. दैनंदिन पूजाअर्चा, भजनकीर्तन, रामनवमी (चैत्र शु. नवमी), हनुमानजयंती (चैत्री पौर्णिमा) व दासनवमी (माघ वद्य नवमी) असे वार्षिक उत्सव साजरे करणे, एवढेच मर्यादित कार्य या मठांमध्ये होऊ लागले.

याशिवाय सुफी संप्रदायाही या काळात अस्तित्वात होता. यादवी अस्तापासून शिवशाहीच्या उदयापर्यंत सुमारे ४०० वर्षे महाराष्ट्रात मुसलमानांची सत्ता होती. या प्रदीर्घ काळात सूफी या इस्लाममधील संप्रदायाने महाराष्ट्रात धर्मप्रसाराचे कार्य केले. त्यांनी प्रेममूलक भक्तिमार्गाचा अवलंब केला. यामध्ये खोटे चमत्कार वगैरे दाखवून भोळ्या भाविकांना भुलविणारे सूफी अधिक होते. याचे वर्णन तत्कालीन साहित्यात दिसते. मूळ इराणमधील या संप्रदायाचे इ. स. ११व्या शतकात भारतात आगमन झाले. कर्मठ इस्लामने या पंथास दीर्घकाळ मान्यता दिली नाही. यात चिश्ती, सुहरावर्दी, कादरी आणि नक्शबंद असे उप-संप्रदाय आढळतात. पंथप्रचारासाठी त्यांनी भारतीय भाषांचा अवलंब केला. राजकीय पाठबळ लाभल्याने सुफींना हिंदू-साधूसंतांच्या स्थानांचे दर्ग्यात रूपांतर करणे सहजशक्य झाले. राजाश्रय आणि भोळ्या भाविकांचा लोकाश्रय यांच्या बळावर पीर-फाकीरांची बरीच

स्थाने या काळात ऊर्जितावस्थेस आली. याशिवाय वीरशैव संप्रदाय, जैन संप्रदायही या काळात अस्तित्वात होते. यांनीही आपल्या लेखनातून मराठी ग्रंथ वाङ्मय समृद्ध केले.

## २अ.८ सारांश

या काळातील संप्रदायांनी समाजकारण, राजकारण आणि धर्मकारण असे विविध कार्य केले. जीवनाचा सर्वांगीण विकास करणारे या काळातील सर्व संप्रदायातील संतांचे विचार आजही तितकेच मोलाचे ठरतात. शिवकाळात परकीय जुलमी सत्तेची राजवट होती. समाजाला योग्य मार्ग दाखवणाऱ्या नेतृत्वाची उणीव होती. समाज गलितगात्र झालेला होता. अशा समाजाला जागे करण्यासाठी, राष्ट्राभिमानाचा अग्नी चेतविण्यासाठी, कल्याणकारी नेतृत्व उभे करण्यासाठी या काळातील संप्रदायांनी मोलाचे कार्य केले. शहाजीमहाराज, शिवाजीमहाराज, संभाजीमहाराज यांसारख्या नेतृत्वाला या सांप्रदायांच्या कार्यातून बळ मिळालेले दिसते. उपेक्षित पुरुष, स्त्रियांविषयीही या संप्रदायांनी मोलाचे कार्ये या काळात केले. 'महिकावतीच्या बखरीत' ज्या महाराष्ट्रधर्माचा ध्यास धरला गेला, ध्येयवादाचा पुरस्कार केला, तो महाराष्ट्रधर्म अत्यंत प्रतिकूल काळात महाराष्ट्रातील साधुसंतांनी आणि या विविध संप्रदायातील संतांनी जोपासला. परकीयांच्या राजकीय आणि धार्मिक आक्रमणांनी खचून न जाता अनुकूल काळाची वाट पाहत महाराष्ट्राने स्वतःचे सत्त्वरक्षण केले. त्यांची तपस्या फळास आली आणि हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेने महाराष्ट्रधर्म कृतार्थ झाला. या स्वराज्याच्या स्थापनेसाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्याच्या दृष्टीने शिवकालीन संप्रदायाचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. या संप्रदायांनी समाजामध्ये आत्मविश्वास, आत्मभान जागे केले. त्यांना लढायला शिकवले. ऐहिक आणि पारलौकिक ऐश्वर्य प्राप्त करण्यासाठी सजग केले. ऐहिक सुखाचा पारलौकिक सुखाशी त्यांनी संबंध जोडला. लवचिक भूमिका स्वीकारून समन्वयवाद स्वीकारून समाजाचे ऐक्य वाढीस लावले. समाजामध्ये ऐकोपा ठेवला. विषमतेला नष्ट करून एकता स्थापन करण्याचा प्रयत्न केला. साहित्यनिमिती करून मराठी वाङ्मयात या सर्व संप्रदायांनी मोलाचे योगदान दिले. नंतरच्या काळातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक परिस्थितीवर या संप्रदायांनी प्रभाव टाकलेला दिसतो. विशिष्ट तत्त्वज्ञान सांगून त्याचे आचार-विचार मांडून समाजासमोर आचारसंहिता ठेवली. यातून समाजाचे अध:पतन थांबले. मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यात या संप्रदायांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

## २अ.९ संदर्भ ग्रंथसूची


१. गोसावी, र. रा., 'पाच भक्तिसंप्रदाय'

२. नसिराबादकर, ल. रा., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास'

३. जोशी, प्र. न., 'प्राचीन मराठी वाङ्मयाचा विवेचक इतिहास'

४. विश्वकोश मराठी, महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ

५. ऑनलाईन रिसोर्स, गुगल

६. मध्ययुगीन वाङ्मयाचा इतिहास, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे

## २अ.९ प्रश्नावली

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न:**

१. नाथसंप्रदायाचा अन्य संप्रदायांवर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

२. नाथसंप्रदायाचे भारतीय संस्कृतीतील योगदान अधोरेखित करा.

३. दत्तसंप्रदायाचे विविधांगी स्वरूप विशद करा.

४. महानुभाव संप्रदायाचे स्वरूप व इतिहास सांगा.

५. वारकरी संप्रदायाच्या लोकप्रियतेचे गमक कोणते, ते तुमच्या शब्दांत सांगा.

६. समर्थ संप्रदायाचे वेगळेपण अधोरेखित करा.

७. मुस्लीम धर्मीय संतांचे सांस्कृतिक योगदान कोणते, ते सांगा.

८. ख्रिश्चन धर्मीय साहित्याची पार्श्वभूमी सांगा.

**ब. लघुत्तरी / टीपा:**

१ नवनाथांचे महत्त्व

२. नाथसंप्रदायातील मच्छिंद्रनाथ व गोरखनाथ

३. दत्तावतार

४. चक्रधर स्वामी

५. गोविंदप्रभू

६. शिवकालीन संत तुकाराम

७. शिवकालीन संत रामदास

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा:**

१. भारतातील आद्य संप्रदाय कोणता?

२. महाराष्ट्रातील आद्य संप्रदाय कोणता?

३. नाथसंप्रदायाचे मूळ पुरुष कोण?

४. नाथसंप्रदायात किती सिद्धांचा उल्लेख येतो?

५. महानुभवांचे मूळ पुरुष कोण?

६. चक्रधरांचे चरित्र कोणत्या ग्रंथात आलेले आहे?

७. चक्रधरांचे गुरू कोण?

८. चक्रधर मूळचे कोणत्या राज्यातील होते?

९. चक्रधरांना चक्रधर हे नाव कोणी दिले?

१० सरस्वती गंगाधर यांनी कोणता ग्रंथ लिहिला?

११. वारकरी संप्रदायाची स्थापना कोणी केली?

१२. ज्ञानेश्वरांचे गुरू कोण?

१३. निवृत्तीनाथांना कुणाचा अनुग्रह मिळाला होता?

१४. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ कोणी लिहिला?

१५. कोणत्या वारकरी संताचे अभंग शिखबांधवांच्या 'गुरुग्रंथसाहेब'मध्ये समाविष्ट आहेत?

१६. एकनाथांचा कालखंड कोणत्या शतकातील आहे?

१७. शिवकालीन वारकरी संत कोणते?

१८. समर्थ रामदासांनी कोणत्या संप्रदायाची स्थापना केली?

*****

# घटक २आ.१

## शिवकालीन साहित्य

**घटक रचना**

२आ.१.१ उद्दिष्टे

२आ.१.२ प्रस्तावना

२आ.१.३ शिवकाळातील संत साहित्य

२आ.१.४ संत तुकाराम आणि त्यांची अभंगवाणी

२आ.१.४.१ संत तुकारामांचा जीवनपरिचय

२आ.१.४.२ संत तुकारामांच्या अभंगवाणीचा आशय आणि स्वरूप वैशिष्ट्ये

२आ.१.४.३ आत्मनिवेदनपर अभंग

२आ.१.४.४ विठ्ठल भक्तीपर अभंग

२आ.१.४.५ समाज प्रबोधनपर अभंग

२आ.१. ४.६ कृष्णलीलांचे वर्णनपर अभंग

२आ.१.४.७ संत तुकारामांचे स्थितीदर्शक अभंग

२आ.१.४.८ संत तुकारामांचे बोध आणि उपदेशपर अभंग

२आ.१.४.९ संत तुकारामांचे प्रासंगिक अभंग

२आ.१.४.१० संत तुकारामांच्या अभंग वाणीतील भाषिक सौंदर्य आणि वैशिष्ट्ये

२आ.१.५ समर्थ रामदास आणि त्यांच्या वाङ्मयाचा आशय आणि स्वरूप वैशिष्ट्ये

२आ.१.५.१ समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म

२आ.१.५.२ समर्थ रामदास यांच्या वाङ्मयाचा आशय आणि स्वरूप वैशिष्ट्ये

२आ.१.५.३ रामदासांची ग्रंथसंपदा

२आ.१.५.३.१ दासबोध

२आ.१. ५.३.२ एकवीस समासी किंवा जुना दासबोध

२आ.१.५.३.३ लघुरामायण

२आ.१.५.४ स्फूट प्रकरणे

२आ.१.५.४.१ अस्मानी सुलतानी

२आ.१.५.४.२ परचक्र निरुपम

२आ.१.५.४.३ राम वरदायिनी

२आ.१.५.४.४ आत्माराम

२आ.१.५.४.५ आनंदवनभुवन

२आ.१.५.४.६ दास पंचायतन

२आ.१.६ समारोप

२आ.१.७ संदर्भग्रंथ

२आ.१.८ प्रश्नावली

## २आ.१.१ उद्दिष्टे

१. स्वराज्य स्थापनेमागील प्रेरणा व संकल्पना समजून घेता येतील.

२. शिवकाळातील मराठी वाङ्मयाचा कालिक अभ्यास करता येईल.

३. शिवकाळातील मराठी वाङ्मयाचा स्थूल परिचय करून देता येईल.

४. संत तुकारामांचा जीवनपरिचय करून देता येईल.

५. संत तुकारामांच्या अभंगवाणीचा आशय, स्वरूप - वैशिष्ट्ये समजून देता येतील.

६. समर्थ रामदासांचा जीवनपरिचय आणि ग्रंथरचनेचा परिचय करून देता येईल.

७. समर्थ रामदासांच्या ग्रंथरचनेचा आशय स्वरूप व वैशिष्ट्ये समजून देता येतील.

## २आ.१.२ प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापन करून मराठी सत्तेचा पाया घातला. पुढे अठराव्या शतकात हिंदुस्थानभर मराठी सत्तेचा विस्तार झाला. हिंदुस्तानच्या इतिहासात हा कालखंड मराठी सत्तेच्या परमप्रभुत्वाचा (Maratha Supremacy) कालखंड म्हणून इतिहासकारांनी गौरविला आहे. मराठ्यांची ही सत्ता १ जानेवारी १८१८ पर्यंत टिकली.

शिवपूर्वकाळात उत्तर भारतात मोगल सत्ता होती आणि दक्षिणेत कुतुबशाही, आदिलशाही, निजामशाही, बरीदशाही, इमादशाही या मुसलमानी शाह्यांनी महाराष्ट्राला व्यापले होते. त्यात अनेक मराठी सरदार नोकरीस होते. अशावेळी सतराव्या शतकाच्या मध्यात शिवाजीराजांनी महाराष्ट्रात हिंदवी स्वराज्य स्थापनेचा प्रारंभ केला आणि आदिलशाही, कुतुबशाही व मोगल इत्यादींना आपल्या पराक्रमाने जेरीस आणले. महाराष्ट्रातील कोकण किनारपट्टी व इतर प्रदेश पादाक्रांत करून त्यांनी अनेक किल्ले जिंकले, काही नवीन बांधले आणि जुन्याची डागडुजी केली. पुढे त्यांनी स्वतंत्र राज्याची स्थापना केली आणि स्वतःस ६ जून १६७४ रोजी स्वतंत्र राजा म्हणून राज्याभिषेक करून घेतला. प्रशासनाच्या सोयीसाठी अष्टप्रधान मंडळ नेमून राज्यव्यवहाराचे नियम तयार केले. गड, कोट, आरमार, घोडदळ,

पायदळ वगैरे संबंधी शिस्तीचे धडे घालून दिले. शिवाजी महाराजांनी जनतेत सुरक्षिततेची भावना निर्माण करून तसेच कार्यक्षम प्रशासन आणि शक्तिशाली शासन निर्माण करून महाराष्ट्रात मराठी सत्तेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या नेतृत्वाखाली, तसेच मार्गदर्शनाखाली मराठी राज्याचा विस्तार झाला आणि शासनाला स्थिरता आली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूसमयी ४ एप्रिल १६८० पर्यंत त्यांच्या ताब्यातील किल्ल्यांची संख्या सुमारे तीनशे होती.

- **शहाजीराजे : हिंदवी स्वराज्याचे द्रष्टे:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले पण त्याची प्रेरणा आणि संकल्पक शहाजीराजे होते. जिजामाता यांनी शिवाजी महाराजांवर बालपणी संस्कार केले तर शहाजी राजांनी शिवरायांना स्वराज्यनिर्मितीसाठी लागणारे पाठबळ दिले. स्वराज्य निर्मितीसाठी शिवरायांना शहाजीराजांकडून प्रेरणा मिळाली होती. हिंदवी स्वराज्य हे शहाजीराजांचे स्वप्न होते तर शिवाजी महाराजांना घडलेला तो साक्षात्कार होता. यावरून हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेची प्रेरणा शहाजीराजे होते, हे स्पष्ट होते.

महंमद आदिलशहाची शहाजी राजासंबंधीची अनेक आज्ञापत्रे प्रसिद्ध आहेत. त्यावरून शहाजीराजांवर आदिलशहाचा नितांत विश्वास होता याचा प्रत्यय येतो. 'राजा' हा त्यांना मिळालेला पहिला किताब होय. कर्नाटकात शहाजीराजांना बरेच स्वातंत्र्य मिळाले त्याच्या मुळाशी असलेली शहाजीराजांची कर्तबगारी आणि आदिलशाचा विश्वास या दोन्ही गोष्टी नाकारता येत नाही. या संदर्भात आणखी एक बाब लक्षात ठेवण्यासारखी आहे, ती म्हणजे शूरवीर, गुणी - हरहुन्नरी, लढवय्ये, मुत्सद्दी यांचा अमाप संग्रह शहाजीराजांनी केला होता. इतकेच नव्हे तर 'दक्षिणेत शहाजी आणि उत्तरेत शहाजहान' ही उक्ती त्यांनी खरी करून दाखवली होती. अनेक मुरलेल्या आणि अनुभवी लोकांची रवानगी त्यांनी महाराष्ट्रात केली. हे अगदी सहजगत्या वाटले तरी ते हेतूपूर्वक घडलेले आहे.

इ.स.१६४९ नंतर म्हणजे अटकेतून सुटका झाल्यानंतर शहाजीराजे दरबारापासून बरेच अलिप्त राहू लागले. बंगळूरच्या त्यांच्या जहाँगिरीला स्वतंत्र राज्याचे स्वरूप येऊ लागले. भारतीय विद्या आणि कला यांना बंगलोरच्या दरबारात मानाचे स्थान मिळू लागले. त्यामुळेच शहाजीराजांच्या दरबारात असलेली नररत्ने केवळ बंगळूरातच राखून त्याने ठेवली नाहीत तर प्रसंगानुरूप अशा मुरलेल्या मुत्सद्याची रवानगी महाराष्ट्रात होत असे. शिवाजी महाराजांच्या हिंदवी स्वराज्यास कान्होजी जेथे यांचा खंबीर आधार शहाजीराजांनी दिला. त्याचप्रमाणे कर्त्या मुत्सदयाचे आधारस्तंभदेखील कर्नाटकातून महाराष्ट्रात आले. शिवाजी महाराजांचा पहिला पेशवा सामराज निळकंठ हा अशाच उत्साही त्यापैकी एक होता. पुढे स्वराज्यात नावारूपाला आलेले हणमंत्याचे घराणे त्यापैकीच होते. हे कर्ते मुत्सद्दी कधी उघड तर कधी शहाजीराजांवर रूष्ट होऊन शिवाजी महाराजांच्या सेवेस राहिल्याचे दिसून येते. रणांगण, राजकारण आणि साहित्यकारण यांच्याशी संबंधित असलेल्या घटनांचा विचार केला असता मुसलमानी सत्तेच्या प्रचारार्थ अहोरात्र झटणारा, जहाँगिरीच्या लोभाने केवळ अचाट पराक्रम करणारे असे शहाजीराजांचे खरे व्यक्तिमत्व नसून वास्तवाचा विसर पडू न देता ध्येयवादाला वास्तवाच्या आधाराने आकार देणारे दूरदर्शी आणि मुत्सद्दी असेच शहाजीराजांचे व्यक्तिमत्व होते. रियासतकार सरदेसाई यांनी

शहाजीराजांना हिंदवी स्वराज्याचे मूळ संस्थापक मानण्यात आले आहे. यात कोणत्याही प्रकारच्या अतिशयोक्ती केली आहे असे वाटत नाही.

वरील सर्व परिस्थितीचा साकल्याने विचार केला असता असे म्हणता येईल की, हिंदवी स्वराज्य हे शहाजीराजांचे स्वप्न होते तर शिवाजी महाराजांचा घडलेला तो साक्षात्कार होता. यावरून हिंदवी स्वराज्याच्या स्थापनेची प्रेरणा शहाजीराजे होते हे स्पष्ट होते. शहाजीराजांना अटक झाल्यानंतर बंगळूरला संभाजी राजे (शिवाजी राजे यांचे थोरले बंधू) यांनी आणि सह्याद्रीच्या खोऱ्यात शिवाजी महाराजांनी आदिलशाहीला अक्षरशः 'त्राहि भगवान' करून सोडले. १६४९ मध्ये शहाजीराजांना विजापुरात आणण्यात आले. त्यांना नजरकैदेत ठेवण्यात आले, अनेक दडपणे त्यांच्यावर आणली. शिवाजी महाराजांचा बंदोबस्त त्यांनी करावा हे दरबाराचे म्हणणे, तर आपला मुलगा आपल्या आज्ञेत नाही, तुम्ही वाटेल तसा त्याचा बंदोबस्त करू शकता. ही शहाजीराजांची भूमिका यावरूनही स्वराज्याची प्रेरणा शहाजीराजे होते, हेच स्पष्ट होते.

**हिंदवी स्वराज्य : एक तेजस्वी पर्व:**

रोहिडेश्वराच्या साक्षीने रोहीड खो-यात १६४५ साली हा साक्षात्कार प्रथम घडला. हा एक मोठा चमत्कारच म्हटला पाहिजे. पंधरा ते अठरा वर्षाचे वयोमान असलेल्या एका जागीरदाराच्या मुलाने हिंदवी स्वराज्य स्थापण्याची प्रतिज्ञा करावयाची आणि तीही सभोवती प्रबळ इस्लामी सत्ता नांदत असताना ! या घटनेने पुढच्या दीड शतकातील भारताचे राजकारण मराठ्यांच्या सत्तेभोवती केंद्रित केले. याच घटनेने १६५६ नंतर प्रथम वैदिक धर्म आणि संस्कृती यांना राजदंड आधार लाभला.

## २आ.१.३ शिवकाळातील संत साहित्य

संत परंपरा ही महाराष्ट्राच्या सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक जीवनाला लाभलेली अनमोल देणगी आहे. या संत परंपरेने वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून सातशेहून अधिक वर्षे महाराष्ट्रातील लोकमनावर अधिराज्य गाजविले. महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत तुकाराम यांना या वारकरी संप्रदायाच्या इमारतीचा कळस होण्याचे भाग्य लाभले आणि समर्थ रामदास यांनी स्वतःचा स्वतंत्र संप्रदाय निर्माण करून महाराष्ट्रात १७ व्या शतकामध्ये परमार्थाची शिकवण दिली. महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत तुकाराम आणि समर्थ रामदास यांनी आपल्या सामाजिक तळमळीतून जे वाङ्मयीन व सामाजिक कार्य केले त्याचा इथल्या समाज मनावर स्पष्ट ठसा उमटलेला दिसतो. संत नामदेवांच्या नंतर तितक्याच विपुल आणि रसाळ स्वरूपाची अभंग रचना करणारा संत म्हणजे तुकाराम होय. संसारिक विठ्ठलभक्त असूनही क्रांतिकारी तत्त्वज्ञान मांडणारा विचारवंत आणि लोकहिताची तळमळ असणारा समाजसुधारक अशा विविध भूमिका घेऊन तुकारामानी आपली वाङ्मयनिर्मिती केलेली दिसते. याच काळात परमार्थाची शिकवण देणारे समर्थ कवी रामदास यांनी महाराष्ट्रातील तत्कालीन परिस्थिती आणि बदलता काळ ध्यानात घेऊन समाजाला प्रपंचविज्ञान शिकविले.

## २आ.१.४ संत तुकाराम आणि त्यांची अभंगवाणी

### २आ.१.४.१ संत तुकारामांचा जीवनपरिचय - (१६०८ -१६५०):

संत तुकारामांचा जन्म मोरे कुळातील सधन व धर्मनिष्ठ अशा आंबिले घराण्यात झाला. वडिलांच्या मृत्यूनंतर अंगावर पडलेला दुकानदारीचा व्यवसाय आणि दोन बायकाचा संसार ही गृहस्थाश्रमाची जबाबदारी चांगल्या तऱ्हेने पार पाडण्यामध्ये तुकारामाच्या वयाची सतरा वर्षे सुखासमाधानात गेली. पण त्यानंतर दुष्काळामध्ये झालेले आप्तजनांचे मृत्यू, व्यापारात आलेली तुट आणि संसाराची झालेली वाताहात या आपत्तीने घेरल्यानंतर तुकाराम त्रासून गेले आणि त्यांनी भक्तिमार्गाची कास धरली. त्यांना त्यांच्या संसारात, व्यवहारात 'जग हे सुखाचे । दिल्या घेतल्याचे॥' असे जाणवल्याने ते देवाकडे विठ्ठलाकडे वळले. त्यांना बाबाजी चैतन्य नावाच्या सत्पुरुषाने स्वप्नात येऊन इ. स. १६४० मध्ये गुरुपदेश केला. तसेच संत तुकारामांनी नामदेवांनी आणि पांडुरंग यांच्या आज्ञेवरून कवित्व करण्यास सुरुवात केली. तुकारामांनी मोठ्या प्रमाणात अभंगनिर्मिती केली आहे.

विठ्ठलोपासना हे तुकारामांच्या कुटूंबाचे कुलदैवतच होते. तुकारामांचे वडील बोल्होबा व आई कनकाई यांनी हे व्रत्त श्रद्धापूर्वक चालू ठेवले. त्यांच्या गृहस्थाश्रमाला चित्तशुद्धीचे, सत्कर्माचे अधिष्ठान होते. आपल्या उद्योगधंद्यात त्यांनी सत्यनिष्ठा व सचोटी यांचे कटाक्षाने परिपालन केले. प्रपंच व परमार्थ ही जीवनाची दोन अंगे त्यांनी सारख्याच तत्परतेने सांभाळली. आपल्या मुलाबाळांच्या मनावर त्यांनी उत्तम संस्कार घडविले. तुकारामांना दोन भाऊ होते. वडील भाऊ सावजी जात्याच विरक्त व प्रपंचाविषयी उदासीन होता. धाकटाभाऊ कान्होबा हा सत्प्रवृत्त आणि मनमिळावू होते. भगवद्भक्तीने आणि सदाचाराने पुनीत झालेल्या अशा विशुद्ध व सोज्वळ वातावरणात तुकाराम लहानाचे मोठे झाले.

**प्रपंचाची वाताहात:**

तुकारामांचे सर्व काही सुरळीत चालू असताना आणि तुकाराम उत्साहाने काम करीत असताना त्यांना कौटुंबिक आपत्तींचा पहिला तडाखा प्रेमळ माता-पित्याच्या मृत्यूने बसला. घराचा आणि पेठेतील सावकारी पेढीचा व्यवहार स्वतः तुकोबा करीत असले तरी त्यांना सल्लामसलत देण्याचे काम त्यांचे वृद्ध वडील करत होते. पण वयाच्या सतराव्या वर्षी वडीलांचे निधन झाल्यामुळे तसेच त्यानंतर लवकरच त्यांची माता निर्वतल्यामुळे माता-पित्याच्या प्रेमळ छत्राला तुकाराम अंतरले, त्यानंतर वडील बंधू सावजीची पत्नी निवर्तली व ते तीर्थयात्रा करण्यास निघून गेले ते परत आलेच नाहीत. अशा रीतीने घरातील ज्या वडील मंडळींचा तुकोबांना आधार वाटत असे ते जाऊन तुकोबा एका अर्थाने निराधार झाले. त्या कौटुंबिक आपत्तीच्या जोडीला महाराष्ट्रात शके १५५० (इ. स. १६२८) मध्ये जो अचानक दुष्काळ पडला. त्यामुळे अगणित माणसे आणि गुरेढोरे अन्नपाण्यावाचून तडफडून मेली. लोकांची अवस्था खायला अन्न नाही, पैसा नाही, होता नव्हता तो मिळेल त्या किंमतीला, मिळेल ते धान्य घेण्यात खर्च होऊन गेला. अशा स्थितीत सावकारांचे कर्ज कोण देणार? तुकोबांची सावकारी बसली आणि दिवाळे निघाले. वाण्याचा धंदा केला तरी गिऱ्हाईक नसल्यामुळे चालला नाही. बैलावरून गोणी वाहण्याचा व्यवसायही अंगाशी आला आणि एकेकाळी सधन असणाऱ्या तुकारामांच्या सावकारी घरालाच दुष्काळाने एक असा तडाखा

दिला की, तुकोबांचे जीवन हादरून गेले. त्यांची पहिली प्रिय पत्नी अन्न अन्न करुन मेली आणि तिच्यापाठोपाठ त्यांचा लाडका मुलगाही गेला. तुकोबांनी आपल्या दूर्दशेचे स्वतःच वर्णन करून ठेवले आहे –

"संसारे झालो अति दुःखे दुःखी ।

मायबाप सेखीं क्रमिलिया ।

दुष्काळे आटिलें द्रव्यें नेला मान ।

स्त्री एकी अन्न अन्न करिता मेली ।

लज्जा वाटे जीवा त्रासलो या दुःखे ।

वेवसाय देखे तुटी येता॥" (१३३३)

घरामध्ये आईबाप, भावजय, पत्नी, मुलगा यांच्या मृत्यूमुळे तुकोबा अतिशय कष्टी झाले. दुष्काळात इतर हजारो माणसे अन्नाविना तडफडून प्राण टाकताना तुकोबा आजूबाजूला प्रत्यक्ष पाहत होते, पण प्रत्यक्षात त्यांची पत्नी व मुलगा अन्न अन्न करीत मेलेली पाहून त्यांचे हृदय पिळवटून निघाले आणि मानवी जीवनाची परावलंबिता, दैवाधिनता आणि क्षणभंगुरता पाहून त्यांना 'समूळ प्रपंचे वीट आला' त्यांचा सावकारीचा धंदा बुडून दिवाळे निघाले. एवढेच नव्हे तर इतरांना कर्ज देणाऱ्या सावकारालाच कर्ज झाले. काही केल्या पुरे पडेनासे झाले. रांडापोरे भिकेला लागण्याचा प्रसंग आला. या आपत्तीतून बाहेर पडण्याची आशा नष्ट झाली आणि तुकोबांना 'जावे हे सर्व टाकूनिया' असे वाटू लागले. बालपणी तुकारामांना खेळाची विलक्षण आवड असावी. सवंगड्यासोबत नाना प्रकारचे खेळ ते खेळत असावेत.

"हे बालपणें ऐसी वरुषे गेली बारा । खेळता या पोरा नानामते ॥

विटी दांडू, चेंडू लगोऱ्या, वाघोडी । चंपे पेंड खडी एकीबेकी ॥

हमामा हुंबरी पकव्याच्या बारे ॥ खेळे जंगीभोवरे चुंबाचुंबी ॥

सेलडेरा आणि निसरभोवंडी । उचली बाळे धोंडी अंगवळे ॥

तुका म्हणे ऐसे बाळपण गेले । मग तारुण्य आले गर्वमूळ ॥"

या अभंगावरून व पुढे अध्यात्मिक रूपकासाठी चेंडूफळी, विठू - दांडी, हमामा, हुंबरी, लगोरी या सर्व खेळाचा ज्या खुबीने वापर संत तुकारामांनी केला आहे, त्यावरून त्यांचे खेळाचे कौशल्य लक्षात येते.

**संत तुकारामांचे अध्ययन:**

महिपतीबुवा ताहराबादकर यांनी लिहिलेल्या तुकारामचरित्राधारे ल. रा. पांगारकर आणि कै. पु. म. लाड यांनी तुकोबाच्या अभ्यासाचे सविस्तर वर्णन केले आहे. स्वतः तुकोबांनी आपल्या संक्षिप्त आत्मवृत्तात

"आरंभी कीर्तन करी एकादशी।

नव्हती अभ्यासीं चित्त आधी।

काही पाठ केले संतांची उतारे।

विश्वासे आदरे करूनिया।"

एवढेच म्हटले आहे.

तुकोबांना 'नामाचा तुका' म्हणतात कारण त्यांनी 'नामदेव कीर्तन करी पुढे नाचे पांडुरंग' असे भक्तिरसपूर्ण कीर्तन करणाऱ्या नामदेवाचे अभंग पाठ करून त्यांचीच कीर्तन परंपरा पुढे चालवली. रामानंदाचे शिष्य कबीर यांचे 'वचनामृते' तुकोबांनी प्रीतीने पाठ केली. नंतर ते अध्यात्म ग्रंथाकडे वळले. 'ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी॥'असे नामदेवांनी सांगितले. नाथांनी शुद्ध केलेले ज्ञानेश्वरीची शुद्धप्रत मिळविली असे मुद्दाम महिपतीने सांगितले. नंतर ज्ञानाचा एका असलेल्या नाथांच्या भागवत टीकेचा सखोल अभ्यास केला. ज्ञानेश्वरांचा अमृतानुभव ग्रंथ यांचेही मनन तुकोबांनी केले. भागवत धर्माचे दोन प्रख्यात संस्कृत ग्रंथ भगवदगीता आणि भागवत याचाही त्यांनी सूक्ष्म अभ्यास केला. गीतेच्या श्लोकाचा अभंगात भावार्थ सांगणारी 'मंत्रगीता' ही तुकोबांनी लिहिली होती. बहिणाबाईला स्वप्नात त्यांनी हीच मंत्रगीता दिली असावी.

एकादशीचा उपवास, जागरण, भजन, कीर्तन शरीर कष्टवून होईल तितका परोपकार ही भागवत धर्माच्या आचाराची तपश्चर्या चालू असता, एकांतात जाऊन तीव्र बुद्धिमत्ता आणि दृढनिश्चय यांच्या सहाय्याने, एकाग्र मनाने तुकोबांनी भागवत धर्माच्या आधारभूत ग्रंथांचे जे सखोल अध्ययन केले त्यातूनच त्यांचे अभंगवाणीचे सहजोद्गार बाहेर पडले. ग्रंथातील थोर विचार वैराग्याच्या मुशीतून आचारात येऊन परिणामकारक झाले. सर्वजनसुलभ अशी प्रासादिक शब्दसंपत्ती हस्तगत झाले आणि मोठमोठे सिद्धांत सुरेख, सोप्या अभंगवाणीनेच प्रकट होऊ लागले. या सहजस्फूर्तीचे कारण तुकोबाच्या मते, गुरूपदेशानुत्तम नामस्मरणाची 'अखंड' भक्ती होय.

"मानियेला स्वप्नी गुरुचा उपदेश।

धरिला विश्वास दृढ नामी।

यावरि धरिले चित्तीं विठोबाचे॥"(१३३३)

स्वप्नामध्ये बाबाजी चैतन्यांनी आवडीचा 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला. केशव चैतन्य म्हणजे 'बाबाजी चैतन्य' असे 'चैतन्य कथाकल्पतरू' ग्रंथात सांगितले आहे. गुरूंनी दिलेल्या मंत्रावर दृढ विश्वास ठेवून वाणीने त्याचा अखंड जप केल्यामुळे अभंगवाणीला स्फुरण चढले असे तुकोबांचे म्हणणे आहे

### २आ.१.४.२ संत तुकारामांच्या अभंगवाणीचा आशय आणि स्वरूप वैशिष्ट्ये:

संत तुकारामांच्या काव्यरचनेचे मराठी साहित्यातले स्थान फार उच्च आहे. हे तर त्यांच्या काळापासूनच सर्व मानीत आले आहेत. इ. स. १३ – १४ व्या शतकात ज्ञानदेव - नामदेव -

कबीरांनी भक्तिमार्गाचा झेंडा भारतभर फडकवल्यावर आपल्याकडे त्यालाही अवनतीचा किंवा ऱ्हासाचा काळ आला. तो साधारण दीडशे - दोनशे वर्षे तरी राहिला. त्यामुळेच या भागवत पंथाचा प्रसार करण्यासाठी ज्ञानदेव, नामदेव व कबीर यांना पुन्हा अवतार घ्यावा लागला. म्हणून 'ज्ञान्याचा एका । नाम्याचा तुका । आणि कबीराचा शेका (शेख महंमद) अशी जी म्हण क्वचित उद्धृत केली जाते. तिचा आशय तुकारामांचे श्रेष्ठत्व सांगणे हा आहे. वारकरी भक्तिमार्गाच्या मंदिराची बांधणी पाया व आवार येथपर्यंत येऊन थांबली होती. ती दीड - दोनशे वर्षांनी एकनाथांनी भागवताचा खांब रोवून पूर्ण केली आणि ती इमारत पुरी करून त्यावर कळस चढवला तो तुकोबांनी !

पारंपरिक समजुतीप्रमाणे संतसकलगाथेत एकूण ४४६८ इतकी रचना तुकोबा आंबिले यांची मानली जाते. संपा. सं. ग. मालशे - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे प.आ. १५ सप्टेंबर १९८२, (पृ ३९२) तर तुकारामबाबाच्या अभंगाची गाथा हे पुस्तक विष्णु परशुराम शास्त्री पंडित यांनी शंकर पांडुरंग पंडित दक्षिणा प्राईस कमिटीचे चिटणीस यांच्या साह्याने शुद्ध करून छापलेल्या ग्रंथाच्या पहिल्या भागामध्ये ४६०७ अभंग आले आहे. या तुकोबांच्या रचनांचे पाच भाग केलेले आढळतात. त्यांचे स्वरूप खालीलप्रमाणे

तुकारामांनी आपली अभंगवाणीत दैनंदिन जीवनातील विविध अनुभव शब्दबद्ध केले आहेत. हे करीत असताना समाजजीवनातील वास्तवता ते परखडपणे मांडतात. समाजचिंतन हा त्यांच्या कवितेचा गाभा आहे त्यामुळे त्यांच्या कवितेत उपदेशपरता प्रकट होते. हे बहुतांशी वाङ्मय उस्फुर्त आणि आत्माविष्काराच्या स्वरूपाचे आहे. त्यांच्या अभंगवाणीचे खालील उपविभागात वर्गीकरण करता येईल.

### २आ.१.४.३ आत्मनिवेदनपर अभंग:

संत तुकारामांच्या आत्मनिवेदनपर अभंगातून त्यांचे चरित्र समजण्यास मदत होते. 'धन्य देहूगाव पुण्य भूमी ठाव.... तेथे नांदे देव पांडुरंग' असे वर्णन करून देहूचा पुण्यभूमी म्हणून उल्लेख करतात. आपल्या कुळाची परंपरा सांगतात. तसेच दुसऱ्या एका अभंगात स्वतःच्या कुळाविषयी, व्यवसायविषयी माहिती तर मिळते.

“शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ॥

मुखी अमृताची वाणी । देह देवाचे कारणी ॥

सर्वांग निर्मळ । चित्त जैसे गंगाजळ ॥

तुका म्हणे जाती । ताप दर्शने ने विश्रांती ॥”

दुष्काळात आपल्या आप्तजनांच्या अकाली मृत्यूमुळे तुकाराम एकाकी बनले. ते जीवनाचा अधिक अंतर्मुख होऊन विचार करू लागले. दुःखाने पोळून निघालेले त्यांचे अंतकरण समाजातील मानवी दुःखाकडे अपार करुणेने पाहू लागले. त्यांच्या मनात स्वतःच्या, कुटुंबाच्या दुःखापेक्षा समाजदुःखाविषयी कळवळा निर्माण झाला. समाजाला उपदेश

करण्याची गरज लक्षात आली. अशातच नामदेवांनी स्वप्नामध्ये प्रेरणा दिली व सांगितले 'करावे कविता तत्त्व' असा उपदेश केला.

संत तुकारामांनी विठ्ठललाची भक्ती केली. विठ्ठललाच्या भेटीची त्यांना आस वाटू लागली आपल्या मनाची भावव्याकुळता अनेक उपमा दृष्टांतांच्या आधारे व्यक्त करताना ते म्हणतात

"कन्या सासुरासी जाये मागे परतोनी पाहे ॥

तैसे झाले माझे जीवा । केव्हा भेटशी केशवा ॥

चुकलिया माय बाळ हुरू हुरू पाहे ।

जीवना वेगळी मासोळी । तैसा तुका तळमळी ॥"

प्रत्यक्ष विठ्ठलाचा धावा, फळाला आलेली भक्ती आणि अलौकिक अनुभूती तुकारामांना प्राप्त झाली. प्रत्यक्ष विठ्ठल भेटीच्या आनंदाचे वर्णन भारावून टाकणारे आहे, ते म्हणतात -

"आनंदाचे डोही आनंद तरंग । आनंदची अंग आनंदाचे ॥

काय सांगू झाले काहीचिया बाही । पुढे चाले नाही आवडीने"

**२आ.१.४.४ विठ्ठल भक्तीपर अभंग:**

वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत असलेल्या विठ्ठलाची भक्ती परंपरा तुकारामांच्या घराण्यात फार पूर्वीपासून चालत आली होती. तुकारामांच्या मनात विठ्ठलाविषयी अपार श्रद्धा होती. त्यांनी माता-पिता - बंधू - बहीण - सखा वगैरे सर्व नाती विठ्ठलाशी जोडलेले होते.

"अमुची मिरास पंढरी । आमचे घर भिमातिरी ॥

पांडुरंग आमचा पिता । रखुमाई आमुची माता ॥

भाऊ पुंडलिक मुनी । चंद्रभागा आमची बहीण ॥"

या अभंगातून त्यांनी जोडलेली नाती स्पष्ट होतात.

विठ्ठल विठ्ठल वर्णनामध्ये संत तुकारामांची प्रतिभा बहरते हा अनुभव त्यांच्या

सुंदर ते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनिया ॥ तुळशीहार गळा कासे पितांबर । आवडे निरंतर हेचि रूप ॥

मकर कुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणी विराजित ॥

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीने ॥ ही विठ्ठल माऊली आपली कृपेची सावली आहे असे त्यांना वाटते. त्या विठोबा माऊलीला ते कधी आर्त हाक मारतात, कधी तिच्यापाशी हट्ट धरतात तर कधी तिच्याशी प्रेमाने भांडतातही.

जेथे जाते तेथे तू । माझा सांगाती॥ असे स्पष्ट करतात. ' हेचि दान देगा देवा । तुझा विसर न पडावा॥' असे प्रेम ते करतात. असा हा विठ्ठल संत तुकारामां ना भक्तीचा सागर, सकलांचा आधारू वाटतो. म्हणून त्यांना साऱ्या तीर्थाचे तीर्थक्षेत्र पंढरपूर वाटते. स्वर्गाहून श्रेष्ठ अशा पंढरीची विठोबा नित्यनेमाने वारी करीत. पंढरपूरशिवाय सारे जग त्यांना उणे वाटते. अनंत अडचणी जरी आल्या तरी असल्या तरी आयुष्यात एकदा तरी मनुष्याने पंढरपूरला जावे असे ते सांगतात. धन्य झालो हो संसारी आम्ही देखील पंढरी असे सांगतात.

**२आ.१. ४.५ समाज प्रबोधनपर अभंग:**

संत तुकारामांचा पिंड जसा एका भावकवीचा आहे तसाच तो क्रांतिकारी विचार मांडणाऱ्या समाजसुधारकाचाही आहे. कुणाची भीड न ठेवता समाजातील अपप्रवृत्तींवर तुकाराम परखड टीका करतात. समाजातील दांभिकता, ढोंगीवृत्ती, उच्चनीचता, स्वार्थीवृत्ती, अनिष्ट रूढी - परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांड नास्तिकपणा यांच्यावर त्यांनी शाब्दिक प्रहार केले. त्यांना ठणकावून सांगितले की,

“बुडते हे जन न देखवे डोळा म्हणून कळवळा येतो आम्हा” या भूमिकेतून तुकाराम समाजाचे प्रबोधन करतात. प्रपंच आणि परमार्थ या दोन गोष्टी वेगवेगळ्या आहेत तरीही प्रपंचात राहूनही परमार्थ साधता येतो प्रपंचकांनी वर्तन कसे ठेवावे, विविध अवधाने कशी सांभाळावीत, पैसासंपत्तीबाबत काय काळजी घ्यावी, गुरु - वडीलधाऱ्यांशी कसे वागावे याबाबत प्रबोधन करतात. जीवनाचे सारे तत्त्वज्ञान अभंगातून मांडताना ते म्हणतात -

“जोडोनिया धन उत्तम वेव्हारे । उदास विचार वेच करी॥

उत्तमची गती तो एक पावेल । उत्तम भोगील जीव खाणी ॥

परउपकारी, देणे परनिंदा । परस्त्रिय सदा बहिणी माया ॥

भूतदया गाईपशूचे पालन तान्हेल्या जीवन वनामाजी ।”

संत तुकारामांची भूमिका प्रामाणिक समाजसुधारकांची आहे. समाजाला, भोळ्याभाबड्या लोकांना खरी भक्ती, खरा धर्म पटवून देतात. देवभोळेपणापेक्षा कल्याणकारी भूतदयावादी दृष्टिकोन बाळगणे ही खरी भक्ती आहे. खरा देव कोठे आहे हे सांगताना,

“जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले

तोचि साधू ओळखावा देव तेथेचि जाणावा”

जे दुःखी - कष्टी आहेत त्यांची सेवा करणे, त्यांच्या विषयी कळवळा येणे हीच ईश्वर सेवा आहे. मात्र मायेहून मवाळ होणारे संत तुकाराम दाभिकांसाठी वज्राप्रमाणे कठोर होतात. वाईट प्रवृत्तींना, समाजाला छळणाऱ्यांना अद्दल घडविले पाहिजे. जशास तसे वागले पाहिजे, अशी भूमिका ही तुकाराम महाराज परखडपणे मांडतात

“पाया झाला नारू तेथे । न बांधू कापूरु॥

तेथे बिबव्याचे काम । अधमासि अधमा ॥

देवावरी विंचू चढला आला । देवपूजा नावडे त्याला ॥

तेथे पैजारीचे काम । अधामासि तो अधम ॥"

हा न्याय सांगून कंटकाचे निर्दालन करण्याचा उपदेश करतात.

संत तुकाराम आपले विचार पटवून देण्यासाठी रोजच्या जीवनातील साधी सोपी उदाहरणे देऊन रूपक दृष्टांताच्या माध्यमातून प्रभावीपणे उद्बोधन करतात. सज्जन माणसाच्या गुणांचे गौरव करताना,

"चंदनाचे हात पाय ही चंदन । परिसा नाही हीन कोणी अंग ॥

दीपा नाही पाठीपोटी अंधकार । सर्वांग साकर अवघी गोड ॥

सर्वांचे गोड तुका म्हणे तैसा सज्जनांपासून । पाहता अवगुण मिळेचि ना ॥"

चंदनासारखे झिजत राहणे, दिव्यांसारखा जीवना सन्मार्गाचा प्रकाश निर्माण करणे, ज्याच्या वागण्या-बोलण्यात गोडवा असतो तो माणूस समाजात आदर्श निर्माण करतो हे सांगताना वाईट प्रवृत्तीच्या माणसांपासून दूर राहिले पाहिजे हे सांगायलाही तुकाराम विसरत नाहीत.

"ढेकणाचे संगे हिरा जो भंगला । कुसंगे नडला तैसा साधू ॥

ओढाळाच्या संगे सात्विक नासली । एक क्षण नाडली समागमे ॥

डाकाचे संगती सोने हीन झाले । मोल ते तुटले लक्ष कोडी ॥

विषाने पक्वान्ने गोड कडू जाली । कुसंगाने केली तैसी परी ॥"

वाईट माणसाच्या संगतीने सज्जनावर वाईट परिणाम होतो. कुसंगतीने तोही बिघडून जातो. स्वैराचारी स्त्रीमुळे सात्त्विक स्त्रीसुद्धा बदफैली ठरते म्हणजे वाईट माणसांची संगत विषाइतकी घातक ठरते. असा उपदेश ते करतात.

### २आ.१.४.६ कृष्णलीलांचे वर्णनपर अभंग:

यात २५२ अभंग आले असून इतर भावकवींप्रमाणे संत तुकारामांनीही बाळकृष्ण, यशोदा, गोपगोपी यांचे वर्णन केलेले आहे. त्यात मंगलाचरणाच्या १७ स्फुट अभंगाचा समावेश होतो.

"सुंदरते ध्यान उभे विटेवरी । कर कटावरी ठेवूनियां ॥

तुळशीहार गळां कासे पितांबर । आवडे निरंतर ते चि रुप ॥

मकरकुंडले तळपती श्रवणी । कंठी कौस्तुभमणि विराजित ॥

तुका म्हणे माझे हें चि सर्व सुख । पाहीन श्रीमुख आवडीनें ॥" (२)

**किंवा**

"रूपी जडले लोचन । पायी स्थिरावले मन ॥

देहभाव हरपला। तुज पाहतां विठ्ठला ॥

कळों नये सुखदुःख। तान हरपली भूक ॥

तुका म्हणे नव्हे परती। तुझ्या दर्शनें मागुती ॥" (२४६५)

**किंवा**

"सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती। रखुमाईचा पती सोयरिया ॥

गोड तुझे रूप गोड तुझे नाम। देई मज प्रेम सर्व काळ ॥

विठो माऊलिये हा चि वर देई। संचरोनि राही हृदयामाजी॥

तुका म्हणे कांही न मागें आणीक। तुझे पायी सुख सर्व आहे ॥" (३)

यासारखी अप्रतिम भावपूर्ण रचना आहेत. तुकारामांचे कवीत्व सहजस्फूर्त होतेच पण त्यातल्या रचनाशैलीत व बांधणीत कमावलेपणाही आढळतो. गोपीच्या वर्णनात त्यांना श्रीकृष्णाचा वेध लागल्याचे प्रत्ययकारी वर्णन आहे.

"हरी तुझे कांती रे सावळी। मी ते गोरी चापेकळी ॥

तुझ्या दर्शने होईन काळी। मग हे वाळी जन मज ॥" (३९०)

यासारख्या वेधक गौळणीत याची प्रचिती येते. श्रीकृष्णाच्या लीला व त्यांचे पोवाडे गाण्याचा निर्धार तुकोबांनी,

"गाईन ते लीळा चरित्र पवाडे। राखिले संवगडे सहित गाई ॥

चोरीले नवनीत बांधविला गळा। ते तुम्ही गोपाळा छंद केले ॥" (४१२, पृ. ७२)

या अभंगात व्यक्त केला आहे. त्यानंतर येणाऱ्या देव, व्रते, तीर्थे यांच्या वर्णनात ठराविकपणा हाच विशेष जाणवतो. त्यातल्या त्यात पंढरीमहात्म्य विभागातल्या

"का रे पुंड्या मातलासी। उभें केलें विठ्ठलासी ॥

ऐसा कैसा रे तू धीट। मागे भिरकावली वीट ॥

युगे झाली अठ्ठावीस ॥अजूनही न म्हणसी बैस॥

भाव देखोनि निकट। देवें सोडिलें वैकुंठ ॥

तुका म्हणे पुंडलिका। तू चि बळिया निका ॥" (३८४२, पृ. ६२९ )

**किंवा**

"तारूं लागले बंदरी। चंद्रभागेचिये तिरी ॥

लुटा लुटा संतजन। अनुप ही रासी धन ॥

जाला हरिनामाचा तारा। सीढ लागले फरारा॥

तुका जवळी हमाल। भार चालवी विठ्ठल॥" (१५४९, पृ. २६८ )

यासारख्या काव्यकृती लक्षणीय आहेत. विशेषता तारू बंदरात लागण्याचे कल्पना देशावर राहणाऱ्या तुकोबांना सुचावी ही गोष्ट त्यांच्या व्यापार-उदीमाच्या व्यवसायामुळे घडून आलेली दिसते.

भानुदासांनीही जहाजाचे रूपक एका पदात योजले आहे. ते येथे सहज आठवते. पण पुढच्या 'संतमहिमा' या पोटविभागातल्या अभंगात तुकोबाचे मन खरेखुरे हेलावलेले आपणास दिसते. संतमहिमा या पोटविभागात संतांचा महिमा वर्णन करताना,

"पवित्र ते कुळ पावन तो देश।

जेथें हरिचे दास घेती जन्म॥'

कर्मधर्म त्याचे जाला नारायण।

त्याचेनी पावन तिन्ही लोक॥

वर्णाभिमाने कोण जाले पावन।

ऐसे द्या सांगून मजपाशी॥

अंत्यजादि योनि तरल्या हरिभजने।

तयाची पुराणे भाट जाली॥" (४२९९)

हा प्रसिद्ध अभंग आलेला आहे. याच भागात संतलक्षणे सांगताना,

"जे का रंजले गांजले। त्यासि म्हणे आपुले॥

तो चि साधू ओळखावा। देव तेथें चि जाणावा॥

मृदु सबाह्य नवनीत। तैसे सज्जनांचे चित्त॥ (३४७, पृ ५७-५८)

मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदूऐसे॥

मेले जित असों निजोनिया जागे। जो जो जें जें मागे तें तें देऊ॥

भले तरी देऊ . . . लंगोटी। नाठ्याळा चि गांठी देऊ माथा॥

मायबापाहूनि बहु मायावंत। करू घातपात शत्रूहूनि॥

अमृत तें काय गोड आम्हापुढे। विष ते बापुडें कडू किती॥

तुका म्हणे आम्ही अवघे चि गोड। ज्याचे पुरे कोड त्याचेपरि॥"(९८७, पृ. १७५)

**आणि**

"वीर विठ्ठलाचे गाढे । कळिकाळ पायां पडे ॥

करिती घोष जय-जयकार । जळती दोषांचे डोंगर ॥

क्षेंमा दया शांती । वाण अभंग हे हाती ॥

तुका म्हणे बळी । ते चि एक भूमंडळी ॥" (११४१, पृ. २०४)

हे खास तुकारामी बाण्याचे अभंग आलेले आहेत.

संत हे मनाचे मवाळ, वाचेचे रसाळ असतात हे खरे, पण हे सर्व ते जेव्हा भले राहू शकतात तेव्हाचे, पण समोर नाठाळ असला तर त्याच्या माथा काठी म्हणायलाही ते कमी करीत नाहीत म्हणूनच भले असताना 'कासेची लंगोटी सोडून द्यायला तयार असणारे हे' विष्णुदास विठ्ठलाचे गाढे वीर ही असतात, व मग कळिकाळही त्यांच्या पायावर लोटांगण घेतो. संतांच्या कृपेचे वर्णन करताना हीच वाणी प्रेमळ बनते. तुकोबा एक अत्यंत सरळ रसाळ अभंग लिहितात.

"माऊलीची चाली लेकराचे ओढी । तयालागीं काढी प्राणें प्रीती ॥"

"ऐसी बळीवंत । आवडी जी देवा संत॥ महानुभवां विनवितो । मोहें मोहियेलें सर्वकाळ चित्त ॥ विसरू तो घेत नाही ॥ क्षणेंतुका म्हणे दिला प्रेमाचा वोरस । सांभाळिले दास आपुले तें ॥" (३६८३,पृ.६०५)

**किंवा**

"लेकराचे हित । वाहे माऊलीचे चित्त ॥

ऐसी कळवळ्याची जाती । करी लाभेंविन प्रीती ॥

पोटी भार वाहे । त्याचे सर्वही साहे ॥

तुका म्हणे माझें । तैसे तुम्हा संतां ओझें ॥" (१७४१.पृ. ३०१)

हा अभंग जसा संतांना लागू आहे तसा देवालाही लागू आहे. पुढे 'नाममहिमा' गाताना एकंदर थाट भक्तकवीच्या ठराविक पद्धतीचा असला तरी तेथेही

"विठ्ठल विठ्ठल येणे छंदे । ब्रह्मानंदे गर्जावें ॥

वाये टाळ टाळ्य टाळटया। होय होळी विघ्नांची॥" (३०४३, पृ. ५०९)

**आणि**

"धन्य दिवस आजि डोळियां लाधला । आनंद देखीला धणीवरी ॥

धन्य झाले मुख निवाली रसना । नाम नारायणा घोष करू ॥

धन्य हे मस्तक सर्वांग शोभले । संताची पाउले लागताती॥

धन्य आजि पंथे चालती पाऊले। टाळिया शोभले धन्य कर ॥

धन्य तुका म्हणे आम्हांसी फावले । पावलो पाउलें विठोबाची ॥" ( ३८६७, पृ. ६३३)

अशासारख्या सरस रचनाही येऊन जातात.

**२आ.१.४.७ संत तुकारामांचे स्थितीदर्शक अभंग:**

या प्रकारच्या अभंगांमध्ये तुकारामांची विठ्ठल भेटीची आर्तता आली आहे. त्यात -

"नीचेपणा बरवे देवा । न चाले कोणाचाही दावा ॥

महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे राहाती ॥

येता सिंधूच्या लहरी । नम्र होता जाती वरि ॥

तुका म्हणे कळ । पाय धरिल्या न चले बळ ॥" (१२८३, पृ. २२६)

या सारखा एखादा अभंग खासच तुकारामी ठशाचा दिसतो. यात तुकारामांनी आपल्या शूद्र कुणबियाच्या वंशाचा उल्लेख केला आहे. विठ्ठल भेटीची उत्सुकता वर्णन करणाऱ्या अभंगात

"वाटुली पाहतां सिणले डोळुले । दाविसी पाउलें कै (कइ) वो डोळां ॥

तूं माय माउली कृपेची साउली । विठ्ठले पाहिली वास तुझी ॥

तुका म्हणे माझ्या आसावल्या बाह्या । तुज क्षेम द्याया पांडुरंगा ॥" ( ८०७ पृ. १४८)

**किंवा**

"भेटीलागीं जीवा लागलीसे आस । पाहे रात्रीं दिवस वाट तुझी ॥

पूर्णिमेचा चंद्रमा चकोरा जीवन । तैसें माझे मन वाट पाहे ॥

दिवाळीच्या मुळा लेंकी आसावली । पहातसे वाटुली पंढरीची॥

भुकेलिया बाळ अति शोक करी । वाट पाहे परि माउलीची ॥

तुका म्हणे मज लागलीसे भूक । धांवुनि श्रीमुख दावी देवा ॥"( २८२१, पृ.४७३)

**किंवा**

"कन्या सासुऱ्यासि जाये । मागे परतोनि पाहे ॥

तैसे झाले माझ्या जिवा । केव्हा भेटसी केशवा ॥

चुकलिया माये । बाळ हुरू हुरू पाहे ॥

जीवना वेगळी मासोळी । तैसे तुका तळमळी ॥" (२६६,४५)

हे प्रसिद्ध ऋदयस्पर्शी अभंग अंतर्भूत आहेत. त्या पुढे येते विठोबाचे विठ्ठलाची सलगीचे भाषण ! मूल आईशी ज्याप्रकारे सलगी करते तसाच प्रकार येथे आहे. मूल काय वाटेल ते बडबडते तसाच तो काही वटवट करीत आहे. शेवटी मात्र तुकोबा एक गोष्ट निश्चितपणे सांगतात.

"वेडें वांकडे गाईन । परि मी तुझा चि म्हणविण ॥

मज तारी दीनानाथा । ब्रीदें साच करी आतां ॥

केल्या अपराधांच्या राशी । म्हणऊनि आलो तुजपाशीं ॥

तुका म्हणे मज तारीं ।सांडी ब्रीद नाहीतरी॥" (२७६७, पृ. ४६४)

मग पुढे विठुरायाशी मागणे येते. त्यात भक्त वेगळे काय मागणार ? दास तुका तर म्हणतो की

"नलगे देवा तुझे आम्हासी वैकुंठ ।सायुज्याचा

पट न लगे मज॥

देई तुझे नाम मज सर्वकाळी॥ मागेन वनमाळी हें चि तुज" ॥

नारद तुंबर उद्धव प्रल्हाद । बळी रूक्मानंद नाम घ्याती ॥ सिद्ध मुनिगण गंधर्व किन्नर । करिताती गजर रामनामें ॥ तुका म्हणे हरी देई तुझे नाम । अखंडित प्रेम हे चि द्यावे॥ (४१५६, पृ. ६७९)

"मग त्यांना हवे तरी काय तर

कंठी राहो नाम । अंगी भरोनिया प्रेम ॥

ऐसे द्यांवे काही दान । आलो पतित शरण ॥

संताचिये पायीं । वेळोवेळां ठेवी डोई॥

तुका म्हणे तरें । भवसिंधु एका सरें ॥" (३०४२, पृ. ५०९)

**आणि**

"सावळे सुंदर रूप मनोहर । राहो निरंतर हृदयी माझे ॥

आणीक कांही इच्छा आम्हा नाही चाड । तुझे नाम गोड पांडुरंगे॥

जन्मोजन्मी ऐसे मागितले तुजा आम्हांसी सहज द्यावें आता॥

तुका म्हणे तुज ऐसे दयाळ । धुंडितां सकळ नाही आम्हा ॥" ( ४०१०, पृ. ६५५)

हेच त्यांचे मागणे आणि मग आपली नित्य परिचयाची पण अविस्मरणीय प्रार्थना

"हेचि दान दे गा देवा । तुझा विसर न व्हावा ॥

गुण गाईन आवडी । हे चि माझी सर्व जोडी॥

न लगे मुक्ति आणि संपदा । संतसंग देई सदा ॥

तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ॥" (२३०६,पृ ३९३)

**किंवा**

"लाहानपण दे गा देवा । मुंगी साखरेचा रवा ॥

ऐरावत रत्न थोर । त्यासी अंकुशाचा मार ॥

ज्याचे अंगी मोठेपण । तया यातना कठीण ॥

तुका म्हणे जाण । व्हावे लाहानाहुनि लहान ॥" (१२८२, पृ. २२६)

अशा शब्दात व्यक्त झालेल्या आत्माविष्कारी वृत्तीला तोड नाही. यापुढे येणाऱ्या देवाजवळच्या प्रेम कलहात हाच भाव व्यक्त करणारे अभंग आहेत. तुकोबा त्यात म्हणतात –

"आम्ही भांडो तुजसवे। वर्मी धरूं जा जाले ठावें ॥" (२२४९, पृ. ३८४)

पण हे सर्व लटकेच असते. त्यामुळे नंतरच्या 'करुणा' या पोटविभागात तुकोबा मनोमन खरे तेच बोलतात.

"प्रीतीचा तो कळवळा । जिव्हाळाचि वेगळा ॥

बहू ने रडो माता। दुश्चित होता धीर नव्हे ॥

वरी वरी तोंडापूरतें। मोहरी तें कळतसे ॥

जाणोनियां नेणता तुका । नव्हे लोकांसारखा ॥" (३७०५, पृ. ६०८)

आणि या विश्वासानेच उद्गारतात

"गातो नाचतो आनंदे। टाळघागारिया छंदे ॥

तुझी तुज पुढें देवा । नेणो भाव कैसी सेवा ॥

नेणो ताळ घात मात । भलते सवां पाय हात ॥

लाज नाहींशंका । प्रेमे घाला म्हणे तुका ॥" (३४०५, पृ. ५६४)

"कारण विठ्ठल माझी माय । आम्हाला सुखा उणे काय ॥

घेतो अमृताचे घनी । प्रेम वोसंडले स्तनी ॥

क्रीडो वैष्णवाच्या मेळी । करुं आनंदाच्या जळीं ॥

तुका म्हणे कृपावंत । ठेवीं आम्हापाशी चित्त ॥" (२१०८, पृ.३६३ )

अर्थात प्रतीती येण्याच्या आधी

"जीवनावाचुनी तळमळी मासा। प्रकार हा तैसा होतो जीवा ॥

न सांपडे जाले भूमिगत धन,। चरफडी मन तयापरी ॥

मातेचा वियोग जालिया हो बाळा। तो कळवळा जाणा देवा ॥

सांगावे ते किती तुम्हांसी प्रकार। सकळाचे सार पाय दावीं॥

ये चि चित्ते माझा करपला भीतर। कां नेणो विसर पडिला माझा ॥

तुका म्हणे तूं हें जाणसी सकळ। यावरि कृपाळ होई देवा ॥" (१०३१, पृ.१८२)

**किंवा**

"तुजलागी माझा जीव झाला पिसा। अवलोकितों दिशा पांडुरंगा॥

सांडिला व्यवहार माया लोकाचार। छंद निरंतर हा चि मनीं ॥

आईकिले कानीं ते रूप लोचन। देखावया सीण करिताते ॥

प्राण हा विकल होय कासावीस। जीवनाविण मत्स्य तयापरी ॥

तुका म्हणे आतां कोणतो उपाव। करू तुझे पाव आतुडे तो ॥" (३०३७, पृ ५०८)

हे भावानुभव टिपले आहेत.

पुढच्या 'अद्वैत' या पोटविभागात रूपकाधारे जिवा - शिवाचे अद्वैत कसे पटते ते तुकोबांनी दाखविले आहे. यात घट - काष्ट आहे. उंबरातील कीटक आहे, रज्जू - सर्प आहे, लवण जीवन - न्याय आहे, गोडपणीं गूळ आहे.

"नटनाट्य अवघ्ये संपादिली सोंग दाऊ रंग न पालटे ॥

मांडियेला खेळ कौतुक बहुरूप। आपुले स्वरूप जाणतोसों॥

स्फटिकाची शिळा उपाधि न मिळे। भाव दावी पिवळे लाल संगे॥

तुका म्हणे आम्ही या जनाविरहित। होऊनि निश्चिंत क्रीडा करू ॥" (५६४, पृ. १०४)

अशी प्रमाणेही आहेत. हे विशेष. मात्र दृश्य द्वैतातून भक्तीच्या मार्गाने अमूर्त अद्वैत अनुभवताना तुकाराम

"वेद अनंत बोलिला। अर्थ इतका चि साधिला ॥

विठोबासी शरण जावें। निजनिष्ठा नाम गावें॥

सकळशास्त्रांचा विचार। अंती इतका चि निर्धार ॥

अठरापुराणीं सिद्धांत । तुका म्हणे हा चि हेत ॥" (४०६९, पृ. ६६५)

असे सांगून विठोबाशी शरण जावे याचे मूळ पदावर येतात. आणि एकदा हा आत्मानुभव जाणवला की तुकोबा म्हणणारच

"अणुरणीयां थोकडा । तुका आकाशाएवढा ॥

गिळुनि सांडिले कळिवर । भवभ्रमाचा आकार ॥

सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटीं ॥

तुका म्हणे आतां । उरलो उपकारापुरता (९९३, पृ.१७६)

आनंदाचे डोही आनंदतरंग । आनंद चि अंग आनंदाचे ॥

काय सांगो जालें कांहीचियाबाही ।

पुढे चाली नाही आवडीनें गर्भाचे आवडी मातेचा डोहळा ।

तेथींचा जिव्हाळा तेथे बिंबे ॥

तुका म्हणे तैसा ओतलासे ठसा ।

अनुभव सरिसा मुखा आला ॥" ( ३२५१, पृ.५४०)

**आणि**

"आपुले मरण पाहिले म्यां डोळां । तो जहाला सोहळा अनुपम्य॥

आनंदें दाटलीं तिन्ही त्रिभुवनें । सर्वात्मकपणे भोग जाला ॥

एकदेशीं होतो अहंकारे आथिला । त्याच्या त्यागें जाला सुकाळ हा ॥

फिटलें सुतक जन्ममरणाचे । मी माझ्या संकोचे दुरी जालो ॥

नारायणें दिला वसतीस ठाव । ठेवूनिया भाव ठेलो पायीं ॥

तुका म्हणे दिले उमटूनि जगीं । घेतले ते अंगी लावूनिया ॥" ( २६६९, पृ. ४५०)

**२आ.१.४.८ संत तुकारामांचे बोध आणि उपदेशपर अभंग:**

संत तुकारामांचे भक्तीच्या स्तोमाविरुद्ध आलेले अभंग

तर मराठी भाषेतली लेणीच आहेत. नमुन्यादाखल मी पुढील अभंग दिले आहेत

"मोले घातले रडाया । नाहीं अंसू नाही माया ॥

तैसा भक्तीवाद काय । रंगबेगडीचा न्याय ॥

वेठी धरिल्या दावीं भाव । मागे पळायचा धांवे ॥

काजव्याच्या ज्योती । तुका म्हणे न लगे वाती ।।( २४९७, पृ. ४२५)

आंधळ्यासि जन अवघे चि आंधळे । आपणासि डोळे दृष्टी नाही ।।

आरोग्या विषतुल्य् लागे मिष्टान्न। तोंडासि कारण चवी नाही ।।

तुका म्हणे शुद्ध नाही जो आपण । तया त्रिभुवन अवघें खोटे ।। (३०२, पृ. ५०)

वाघे उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊ द्यावे मला।।

अंती मरसी ते न चुके । मजही मारितोसी भुके ।। येरू म्हणे भला भला ।

"निवाडे तुझ्या तोंडे जाला ।। देह तंव जाणार।।

घडेल हा उपकार । येरु म्हणे मनी । ऐसें जावें समजोनी ।।

गांठी पडली ठका ठका । त्याचा धर्म बोले तुका ।। (३०५२,पृ. ५११)

ढेकणाचे संगे हिरा जो भंगला । कुसंगे नाडला तैसा साधु ।।

ओढाळाच्या संगे सात्विक नासलीं । क्षण एक नाडलीं समागमे ।।

डांकांचे संगती सोने हीन जाले । मोल ते तुटले लक्ष कोडी ।।

विषाने पक्वान्ने गोड कडू झाली । कुसंगाने केली तैसी परी ।।

भावें तुका म्हणे सत्संग हा बरा । कुसंग हा फेरा चौऱ्याशीचा ।।(३४०३,पृ. ५६४)

चिरगुटे घालुनि वाढविले पोट । गऱ्हवार बोभाटा जणांमध्यें ।।

लटिकेचि डोहाळे दाखवी प्रकार । दुध स्तनी पोर पोटी नाही ।।

तुका म्हणे अंती वांज चि ते खरी। फजिती दुसरी जनांमध्ये।।" ( ३०७१,पृ. ५१४)

इत्यादी भारुडवजा उपदेशपर रूपकामध्ये बोध आणि उपदेश आला आहे .

### २आ.१.४.९ संत तुकारामांचे प्रासंगिक अभंग:

तुकोबांनी गुरु परंपरा, त्यांना झालेला कवित्वाचा दृष्टांत, अभंगाच्या वह्या इंद्रायणीतून कोरड्या निघण्याचा प्रसंग, स्वस्त्रीचे कठोर बोलणे व तिला केलेला उपदेश, शिवाजीराजा संबंधीच्या घटना व त्यास उपदेश, कीर्तन प्रसंगी आलेले परचक्र व त्या वेळी निघालेले उद्गार, सालोमालो व अंबाजी यांच्या हकीकती, अशा तऱ्हेचे आत्मवृत्तपर लेखन या भागात अभंगात आले आहेत. त्यात –

"आता तरी पुढें हा चि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ।।

सकळांच्या पाया माझे दंडवत । आपूलाले चित्त शुद्ध करा ।

हित ते करावे देवाचे चिंतन । करुनियां मन एकविध ।।

तुका म्हणे लाभ होय तो व्यापार । करा काय फार शिकवावे ।।(१०१ पृ.१५)

या अभंगातून जनास उपदेश केला आहे.

आली सिंहस्थ पर्वणी । न्हाव्या भटा जाली धनी ।।

अंतरी पापाच्या कोडी । वरि वरि बोडी डोई दाढी ।।

बोडिले तें निघालें । काय पालटलें सांग वहिले ।।

पाप गेल्याची काय खूण । नाहीं पालटले अवगुण ।।

भक्तिभावें विण । तुका म्हणे अवघा सीण।।" (२८७०, पृ ४८०)

या अभंगातून बहुजन समाजाला तुकारामांनी उपदेश केला आहे.

"सुख पाहता जवापाडें । दुःख पर्वताएवढे ।।

धरी धरी आठवण । मानीं संतांचे वचन ।।

नेलें रात्रीनें तें अर्धे । बाळपण जरा व्याधे ।।

तुका म्हणे पुढा । घाणा जुंती जसी मुढा ।।" (८८, पृ.१३)

या अभंगातून प्रापंचिक उपदेश आला आहे.

**किंवा**

"दया तिचे नाव भूतांचे पालन । अणीक निर्दाळण कंटकाचे ।।

पाप त्याचें नाव न विचारितां नीत । भलतें चि उन्मत्त करी सदा ।।

तुका म्हणे धर्म रक्षावया साठीं । देवास ही आटी जन्म घेणे।।" (२६४ पृ. ४५)

यातून नीतीचा बोध केला आहे.

"नको नको मना गुंतू मायाजाळी । काळ आला जवळी ग्रासावया ।।

काळाची हे उडी पडेल बा जेव्हा । सोडविना तेव्हा मायबाप ।।

सोडवीना राजा देशींचा चौधरी । आणीक सोइरीं भलींभलीं।।

तुका म्हणे तुला सोडविना कोणी । एका चक्रपाणि वाचुनिया।।" (२८०८ पृ. ४७०)

यातून इंद्रियास उपदेश केला आहे

"घेई माझे वाचे । गोड नाम विठोबाचे ।।

तुम्ही घ्या रे डोळे सुख । पाहा विठोबाचें मुख ।।

तुम्ही ऐका रे कान । माझ्या विठोबाचे गुण ।।

मना तेथे धांव घेई । राहे विठोबाचे पायी ।।

तुका म्हणे जीवां । नको सोडूं या केशवा ।।"( ७५६ पृ. १४१)

यातूनही इंद्रियास उपदेश केला आहे

**किंवा**

"आपुलिया बळे नाही मी बोलत । सखा भगवंत वाचा त्याची ।।

साळुंकी मंजुळ बोलतसे वाणी । शिकविता धनी वेगळाची ।।

काय म्या पामरे बोलावी उत्तरे । परि त्या विश्वंभरे बोलविलें

।। तुका म्हणे त्याचे कोण जाणे कळा । चालवी पांगळा पायांविण।।" (२९५० पृ ४९२)

या अभंगातून विठ्ठलाच्या भक्तीचे फळ व्यक्त होते .

"न देखवे डोळां ऐसा हा आकांत। परपीडे चित्त दुःखी होतें।।

काय तुम्ही येथे नसालसे जालें । आम्ही न देखिलें पाहिजे हे ।।

परचक्र कोठे हरिदासांच्या वासें । न देखिजेत देशें राहातिया।।

तुका म्हणे माझी लाजविली सेवा । हीनपणें देवा जिणें जालें।।" ( ५५७, पृ.१०३)

**आणि**

"भीत नाही आता आपुल्या मरणा । दुःखी होता जना न देखवे ।।

आमची तो जाती है ऐसी परंपरा । कां तुम्ही दातारां नेणां ऐसें।।

भजनी विक्षेप तें चि मरण । न वजावा क्षण एक वांयां ।।

तुका म्हणे नाही आघाताचा वारा । ते स्थळी दातारा ठोव मागे ।।" (५५९, पृ. १०३)

हे अभंग परचक्राची धाड आल्या वेळचे दृढविश्वास युक्त मनोभाव प्रकट करणारे आहेत.

"कोणी निंदा कोणी वंदा । आम्हां स्वहिताचा धंदा ।।

काय तुम्हांसी गरज । आम्ही भजू पंढररिराज ।।

तुम्हांसारिखे चालावें तेव्हा स्वहिता मुकावे ।।

तुका म्हणे हो कां कांही । गळ दिला विठ्ठल पायीं ।।" (४३११, पृ. ७०४)

"बोले तैसा चाले । त्याची वंदीन पाउले ।।

अंगे झाडीन अंगण । त्याचें दास्यत्व करीन ॥

त्याचा होईना किंकर । उभा ठाकेन जोडूनिया कर ॥

तुका म्हणे देव । त्याच्या चरणीं माझा भाव॥" (४३१६,पृ. ७०५)

"आम्ही जातो आपुल्या गावा । आमचा रामराम घ्यावा ॥

तुमची आमची हे चि भेट । येथुनिया जन्म तुटी ॥

आता असो द्यावी दया। तुमच्या लागतसें पाया ॥

येता निजधामीं कोणी । विठ्ठल विठ्ठल बोला वाणी ॥

रामकृष्ण मुखीं बोला । तुका जातो वैकुंठाला ॥" (४४७२, पृ. ७३०)

"कोठे गुंतलासी योगीयांचे ध्यानी । आनंदकीर्तनी पंढरीच्या ॥

काय काज कोठे पडलीसे गुंती । कानी न पडती बोल माझे ॥

काय शेषशयनीं सुखनिद्रा आली । सोय का सांडली तुम्ही देवा ॥

तुका म्हणे कोठें गुंतलेती सांगा । किती पांडुरंगा वाट पाहू ॥" (४०००, पृ ६५४)

यासारख्या अभंगातून तुकारामांची आत्मस्थिती स्पष्ट होते.

### २आ.१. ४.१० संत तुकारामांच्या अभंग वाणीतील भाषिक सौंदर्य आणि वैशिष्ट्ये:

तुकारामांची गाथा आजही सर्वसामान्य जणांसाठी हृदयाला भेटणारे काव्य आहे कारण त्याचे लेखन अठरापगड जातींचा अशिक्षित समाज डोळ्यांसमोर ठेवून केले आहे. तत्कालीन समाजाची जी बोलीभाषा होती त्या बोलीमध्ये संत तुकारामांनी ही अभंगनिर्मिती केली आहे. स्व- अनुभवावर आधारलेले संत तुकारामांचे हे काव्य भक्तिरसाने ओतप्रोत भरलेले आहेत. जीवनानुभव आणि आत्माविष्कार हे संत तुकारामांच्या अभंगवाणीचा गाभा आहे. जीवनवादी दृष्टीतून भरलेले हे जिवंत वाङ्मय आहे. अभंग लेखनाबरोबरच संत तुकारामांनी आरत्या, भारुडे, गवळणी हे काव्यप्रकार हाताळले आहेत. त्यांच्या सर्व काव्यात आर्तता दिसून येते.

संत तुकारामांच्या काव्यात विलक्षण अल्पाक्षर रमणीत्व हा यांच्या लेखनशैलीचा विशेष मानावा लागेल. कमीत कमी शब्दांमध्ये जास्तीत जास्त आशय व्यक्त करण्याचे सामर्थ्य त्यांच्या काव्यात आहे. उदा.- 'सुख पाहता जवापाडे । दुःख पर्वत एवढे', 'असाध्य ते साध्य करिता । सायास कारण अभ्यास', 'मन करा रे प्रसन्न । सारे सिद्धीचे कारण'॥ 'निश्चयाचे बळ। तुका म्हणे हेचि फळ'॥ 'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती'॥, 'ज्यांच्या अंगी मोठेपणा । तया यातना कठीण'॥ असे अनेक अभंग त्याची साक्ष देतात. चिमूटभर शब्दात आकाशभर ज्ञान संत तुकाराम आपल्या अभंगातून व्यक्त करतात. त्यांचे अभंग वाचताना 'घागर में सागर' सामावल्याचा अनुभव येतो. त्यांच्या अभंगात अनेक दृष्टांत, उपमा, अनुप्रास इत्यादी अलंकार जागोजागी आढळतात. समर्पक दृष्टांत हे त्यांच्या अभंगवाणीचे मुख्य

वैशिष्ट्ये आहे. अणुरेणूया थोकडा । तुका आकाशाएवढा ॥अशा परस्परविरोधी दृष्टांताचा सुंदर नमुना आशयाला वेगळे परिमाण देतो. तुकारामांचे मूल्य प्राप्त झाले आहे. आज मराठी साहित्यात स्थिर झालेल्या म्हणी, वाक्प्रचार, सुभाषिते संत तुकारामांच्या काव्यातील आहेत.

उदा. 'आलिया भोगासी असावे सादर', 'निश्चयाचे बळ तुका म्हणे हिची फळ', 'लहानपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा', 'महापुरे झाडे जाती । तेथे लव्हाळे वाचती', 'शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी', 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती', 'मन नाही निर्मळ काय करील साबण', 'एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ', 'ज्यांच्या अंगी मोठेपण तया यातना कठीण' ।

**समारोप:**

संत तुकारामांच्या कवित्वशक्तीची खरी कसोटी त्यांच्यावरील चार प्रकारांतील विविधतेमुळे हाती येत नाही. त्यासाठी शेवटी त्यांच्या कवितेकडे वळावे लागते. नामदेवांनी स्वप्नात येऊन आपले अपुरे राहिलेले कवित्वाचे कार्य पुरे करण्याचा आदेश तुकारामाला दिला. अशी आठवण तुकारामाच आपल्या अभंगात नमूद करतात.

नामदेवें केले स्वप्नामाजि जागे । सवें पांडुरंगे येऊनिया ॥ सांगितले काम करावे कवित्व । वाउगें निमित्ते बोलों नको॥ माप टाकी सळ धरिली विठ्ठलें । थापटोनि केले सावधान ॥ प्रमाणाची संख्या सांगे शतकोटी । उरले शेवटी लावी तुका ॥(१३२०, पृ. २३१)

संत तुकाराम हे अत्यंत सामान्य मूळचे व्यापारी माणूस पण त्यांना साक्षात्कार झाला आणि अध्यात्मिक कवित्व स्फुरू लागले परंतु तुकोबा याबाबतीत फार नम्र व विनयशील आहेत.

"लेखिले कवित्व माझे सहज बोल । नलगे चि ओल जिव्हाळ्याची ॥

नये चि उत्तर कांही परतोनी । जालों नारायणीं न सरतें ॥

लाजिरवाणी कां वदली हे वाचा । नव्हे च ठाईचा मननशीळ ॥

तुका म्हणे फळ नव्हे चि सायासा । पंढरीनिवासा काय जाले॥" (३६९१ पृ. ६०६)

म्हणजे सहज माझ्या वाचेतून उमटणारे बोल कविता म्हणून मानले गेले तरी त्यांने मला समाधान नाही कारण त्यात अजून ओल जिव्हाळ्याची पाहिजे ते नाही नव्हे हे कवित्व टाकसाळी नाणे आहे असे ते पुढे लगेच म्हणतात. आणि शेवटी एकच चिंता व्यक्त करतात अंगा आले फार महंतपण, बोलविता धनी वेगळाचि आहे. याची मात्र त्यांना पुरेपूर खात्री पटली आहे.

नव्हे माझी वाणी पदरचि,

मज विश्वंभर बोलवितो

त्यांनी लगेच पुढे म्हटले.

आपुलिया बळें नाही मी बोलत ( २९५०, पृ. ४९२)

ही त्यांची श्रद्धा आहे असे हे तुकाराम स्वतःला पाईकचि खरा मानीत असले तरी ते मराठी भाषेचे श्रेष्ठ भक्तकवी व भावकवी होते.

“सदा माझे डोळे जडो तुझे मूर्ती । रखुमाईच्या पती सोयरिया ।। (३, पृ. १)

वृक्षवल्ली आम्हां सोयरीं वनचरें । पक्षीही सुस्वरे आळविती ।।

येणें सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुण दोषा अंगा येत ।।

आकाश मंडप पृथिवी आसन। रमें तेथे मन क्रीडा करी ।।

कयांकमंडलू देहउपचारा । जानवितो वारा अवसरू।।

हरिकीर्तन भोजन परवडी विस्तार । करोनि प्रकार सेवूं रुची।।

तुका म्हणे होय मनासी संवाद । आपुला चि वाद आपणांशी ।।”(२४८१, पृ. ४२२)

“जेथें जातो तेथें तूं माझा सांगाती । चालविसी हाती धरुनिया ।।

चालों वाटे आम्ही तुझा चि आधार । चालविसी भार सवें माझा।।

बोलो जाता बरळ करिसी तें नीट । नेली लाज धीट केलों देवा ।।

अवघे जन मज लोकपाल। सोइरे सकळ प्राणसखे ।

तुका म्हणे आतां खेळतो कौतूकें । जालें सुख अंतर्बाहीं ।।” ( २००० पृ.३४६)

हे अभंगही उत्कृष्ट भावकाव्य आहेत.

तुकारामांनी व्यवहारातील उदाहरणांच्या सहाय्याने थोडक्यात आशय सांगितल्यामुळे त्यांचे अभंगाला सूत्राचे रूप प्राप्त झाले आहे. अशा सूत्रमय पद्धतीमुळे तुकारामांची अभंगवाणी अजरामर ठरली आहे. तुकारामांचे गोड शब्द कोंदणात बसवल्याप्रमाणे शोभिवंत दिसतात. त्यातून तुकारामांचे परिपक्व विचार व्यक्त झाले आहेत. हे

“शुद्ध बीजापोटी। फळे रसाळ गोमटी ।।

मुखी अमृताची वाणी । देह वेचावा कारणी ।।

सर्वांगी निर्मळ । चित्त जैसी गंगाजळ।।

तुका म्हणे जाती । ताप दर्शने विश्रांती।।”(६ पृ.९)

“सुख पाहता जवापाढे । दुःख पर्वताएवढे।।

धरी धरी आठवण । मानी संतांचे वचना।।

नेले रात्रींनेते अर्धे । बाळपण जरा व्याधें।।

तुका म्हणे पुढा । घाणा जुंती जसी मूढा।।” ( ८८, पृ. १३)

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने । शब्दांचीं च शस्त्रे यत्ने करू ॥

शब्द चि आमुच्या जीवाचें जीवन । शब्दें वांटूं धन जनलोका ॥

तुका म्हणे पाहा शब्द चि हा देव । शब्दे चि गौरव पूजा करू॥" (३३९६ पृ.५६३)

"गाढव शृंगारले कोडे । काही केल्या नव्हे घोडें

त्याचे भुंकणे न राहे। स्वभावासीं करील काय ॥

स्वान शिबिके बैसविले । भुंकता न राहे उगलें ॥

तुका म्हणे स्वभाव कर्म । काही केल्या न सुटे धर्म॥" (३९५७, पृ. ६४८)

"बुडती हे जन न देखवे डोळा । दुःखी होता जना न देखवे ॥ येतो कळवळा देखुनिया घात ॥

"तीर्थी धोंडा पाणी । देव रोकडा सज्जनी ॥

मिळालिया सतसंग । समर्पिता भले अंग ॥

तिर्थी भाव फळे । येथे आणाड तें वळे ॥

तुका म्हणे पाप । गेलें गेल्या कळे ताप (११४, पृ. १६)

कामातुरां भय लाज ना विचार । शरीरा असार तृणतुल्य ॥" (१८२७ , पृ. ३१७)

"निंदकाचे घर असावे शेजारी ।

एक एका सहाय्य करूं । अवघे धरू सुपंथ॥

कोण जाणे कैसी परी । पुढे उरी ठेविता ॥

अवघे धन्य हो आतां। स्मरविता स्मरण ॥

तुका म्हणे अवघी जोडी । ते आवडा चरणांची ॥" (२७३२,पृ.४६०)

या सारख्या उदाहरणावरून हे स्पष्ट होत होते. तुकारामांच्या अशा विविध स्तरांमधील रचना मराठी भाषेतले सुभाषितवजा चलनी नाणीच झालेली आहेत. त्यामुळेच महाभारतातल्या सुक्तींबरोबरच तुकारामरचित अभंगचरनांचाही उपयोग शैलीच्या सजावटीसाठी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे करीत असत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीही तुकारामांच्या अभंगातील वचने उपयोगात आणली आहेत. त्यांच्या मूकनायक या वर्तमानपत्रांमध्ये सुरुवातीलाच,

'काय करूं आता धरूनिया भीड ।निशंक हे तोंड वाजविले ॥ नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण। सार्थक लाजोनी नव्हे हित॥' (४२२९, पृ.६९०) न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या प्रार्थनासमाजीय मनाला तुकारामांच्या अभंगातून शांती व स्फूर्ती मिळ, हे सर्वज्ञात सत्य आहे. असा हा आपला बहुजनांविषयी कळवळा असलेला कवी वारकरीपंथाच्या संतकृपेने फळाला आलेल्या इमारतीचा कळस ठरला.

## २आ.१.५ समर्थ रामदास आणि त्यांच्या वाङ्मयाचा आशय आणि स्वरूप वैशिष्ट्ये

समर्थ संप्रदाय महाराष्ट्रधर्म या नावानेही ओळखला जातो. समर्थ रामदासांनी पारमार्थिक हेतूने स्वधर्म रक्षणासाठी या संप्रदायाची उभारणी केली. मुख्यत्वे हरीकथा निरूपण, दुसरे ते राजकारण असे त्यांच्या कार्याचे सूत्र होते. स्वधर्म रक्षणासाठी निष्कलंक चारित्र्याची व्यक्ती समाजासमोर रामदासांना व्यक्त करायची होती. त्यासाठी त्यांनी सर्वगुणसंपन्न अशा पुरुषोत्तम श्रीरामचंद्राची निवड केली आणि समर्थ संप्रदायाची स्थापना केली. या संप्रदायाची श्रीरामचंद्र ही प्रमुख देवता, श्रीहनुमान की दुसरी देवता होय. रामनवमी व हनुमानजयंती हे प्रमुख उत्सव या संप्रदायाचे असून 'चाफळ' आणि 'सज्जनगड' या संप्रदायाचे तीर्थक्षेत्रे आहेत. समर्थ रामदास आणि समर्थ संप्रदायातील शिष्यांनी विविध प्रकारची त्यांच्या वाङ्मयमय रचना करून मराठी भाषेचे दालन समृद्ध केले आहे.

**समर्थ रामदास (इ. स. १६०८ - १६८१):**

समर्थ रामदासांचे पूर्ण नाव नारायण सूर्याजी ठोसर असे होते. त्यांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत आणि आईचे नाव राणूबाई असून ठोसर हे उपनाव होते. त्यांच्या वडील भावाचे नाव गंगाधर. त्यास पुढे 'श्रेष्ठ' किंवा 'रामीरामदास' असे म्हणत. त्यांचा जन्म २४ मार्च १६०८ रोजी जालना जिल्ह्यातील जांब येथे झाला. हे महाराष्ट्रातील कवी व समर्थ संप्रदायाचे संस्थापक होते. राजकारण धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत असणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होते. ते छत्रपती शिवाजी महाराज आणि संत तुकारामा यांचे समकालीन होते. समर्थ रामदासांनी परमार्थ, स्वधर्मनिष्ठा, राष्ट्रप्रेम यांच्या प्रसारार्थ महाराष्ट्रात प्रबोधन व संघटन केले.

### २आ.१.५.१ समर्थ संप्रदायाचे तत्त्वज्ञान आणि आचारधर्म:

रामदास स्वामी अद्वैत तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. केवळ ब्रह्म हेच सत्य आहे हा विचार त्यांच्या साहित्यात सर्वत्र दिसतो. त्यांच्या तत्त्वज्ञानात संत एकनाथांच्या वाङ्मयाची बैठक होती. दासबोधाच्या बहुतेक सर्व दशकांमध्ये ब्रह्म, माया, जीव, जगत, परमेश्वर इत्यादी गोष्टींची चर्चा आहे. पंचीकरण हा विषय समर्थांनी अतिशय सखोलपणे सांगितला आहे. परब्रह्म, मूळमाया, गुणमाया, त्रिगुण, पंचमहाभूते अष्टधा प्रकृती, विश्वाची उभारणी व संहार, पिंड-ब्रह्मांड रचना व त्यांचे संबंध अशा अनेक विषयांचे चिंतन समर्थांच्या साहित्यात आले आहे. सर्व कर्मांचा कर्ता हा राम असून आपण मिथ्या अहंकारामुळे स्वतःकडे कर्तेपण घेतो असे ते सांगतात. समर्थ रामदास स्वामी स्वतः सदैव विदेही अवस्थेमध्ये असल्याने त्यांचे अनुभवज्ञान त्यांनी ग्रंथरूपाने मांडले आहे. त्यांनी भक्तिमार्गाचा प्रसार केला. भक्ती केल्यामुळे देव निश्चितपणे प्राप्त होतो असे त्यांनी दासबोधाच्या सुरुवातीलाच सांगितले आहे. त्यांनी स्वतः बारा वर्षे नामस्मरण भक्ती केली व त्याचा प्रसार केला. परमार्थाशिवाय केलेला प्रपंच भिकारी आहे. ज्या घरामध्ये रामनाम नाही ते घर सोडून खुशाल अरण्यात निघून जावे असे समर्थ निक्षून सांगतात. देवाचे वैभव वाढवावे, नाना उत्सव करावे असे त्यांचे मत होते. समर्थांनी प्रत्ययाचे ज्ञान सर्वश्रेष्ठ मानले आहे. अनुभवाशिवाय असलेल्या केवळ शब्द ज्ञानाची त्यांनी तिखट शब्दात हजेरी घेतली आहे. भोंदू गुरू व बावळट शिष्य हे परस्परांचे

नुकसान करतात असे त्यांनी सांगितले आहे. परमात्मा हा चराचरांत भरलेला असून त्याची प्राप्ती करून घेण्यातच मानवी जीवनाची सार्थकता आहे. हे समर्थांनी अनेक ठिकाणी सांगितले आहे. सतत ईश्वरचिंतन करावे, सद्गुरुची सेवा करावी. उपासनेला प्राणपणाने चालवावे. सतत परमार्थ चिंतनाचे परिशीलन करावे असे अनेक दंडक समर्थांनी घालून दिले आहेत.

### २आ.१.५.२ समर्थ रामदास यांच्या वाङ्मयाचा आशय आणि स्वरूप वैशिष्ट्ये:

समाजाविषयीच्या अपार तळमळीतून समर्थांनी विपूल वाङ्मयनिर्मिती केली आहे. रोखठोक विचार, साधी सरळ भाषा आणि स्पष्ट निर्भीड मांडणी ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, करुणाष्टके, अस्मानी सुलतानी, आनंदवनभुवन, भीमरूपी स्तोत्र, 'सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची' ही गणपतीची आरती, 'लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा' ही शंकराची आरती, 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी' श्री हनुमानाची आरती अशा ६१ आरत्या त्यांनी लिहिल्या आहेत. समर्थांनी राष्ट्र उभारणीसाठी जसे बहुमोल मार्गदर्शन केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक या गोष्टींवरही भर दिला कारण यातूनच राष्ट्र उभे राहते आणि स्वराज्य स्थापन होते असे त्यांना वाटते. लोकांनी साक्षर व्हावे यासाठी त्यांनी लिहिण्याची वाचण्याची मोहीम काढली. आपल्या एका वचनात ते म्हणतात,

"दिसा माजी काही तरी ते लिहावे ।

प्रसंगी अखंडीत वाचीत जावे ॥

त्याचबरोबर त्यांनी असेही सांगितले

जे जे आपणासी ठावे । ते ते इतरांसी शिकवावे ।

शहाणे करून सोडावे सकळ जन ॥"

प्रपंच सोडून जर परमार्थ केला तर केवळ आत्मोन्नती होईल परंतु प्रपंच करून परमार्थ केला तर राष्ट्रोन्नती होईल म्हणून ते म्हणतात –

"प्रपंची जे सावधान । तोचि परमार्थ करील जाण ।

प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ॥"

समर्थ रामदास हे निसर्गप्रेमी होते म्हणून चाफळ, शिवथरघळ, सज्जनगड आणि अनेक घळी ह्या आपल्या निवासाच्या जागा त्यांनी निवडल्या. सज्जनगडाच्या पायथ्याला समर्थांना एक बाग तयार करायची होती. या बागेत कोणती कोणती झाडे लावायची आणि ती कशी लावावी या संबंधीचे समर्थांचे एक स्वतंत्र प्रकरण आहे. यावरून त्यांना वनस्पतीशास्त्राचा किती अभ्यास होता याची कल्पना येते. बाग प्रकरण म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवितेत समर्थांनी सुमारे ३५० वनस्पतीची नावे दिली आहेत. आश्चर्य म्हणजे यादी देताना पालेभाज्या, फळभाज्या, फळ, फूल, औषधी वनस्पती यांची व्यवस्थित

वर्गवारी आहे. ल. रा. पांगारकर यांनी संपादित केलेल्या 'श्री समर्थ रामदास समग्र ग्रंथ' यामध्ये वाचावयास मिळते.

### २आ.१.५.३ रामदासांची ग्रंथसंपदा:

रामदासांची ग्रंथसंपदा अफाट आहे. तिचे मोजमाप करण्यासही येथे सवड नाही कै. शंकर देव यांनी आपले उभे आयुष्य रामदास स्वामी यांच्या संशोधनार्थ वेचले असून समर्थांची बहुतेक सारी कविता त्यांनी छापून काढली आहे. परंतु एवढेच करून ते थांबले नाहीत. रामदासांचे मठ म्हणजे त्या काळातील विद्यापीठे होती व त्यातून महाराष्ट्रातील सर्व लहानथोर संतकाव्याच्या प्रती संग्रहित करून ठेवण्याचे काम अखंड चालत असे. हे सर्व मठ धुंडून त्यातील असंख्य अनमोल व हस्तलिखिते कै. शंकर देव यांनी धुळे येथील श्रीसमर्थ वाग्देवता मंदिरात सुरक्षित ठेवून दिली आहेत. याचा हस्तलिखिताची वर्णनात्मक विल्हेवारीही त्यांनी 'रामदासी संशोधन' या नावाखाली तीन खंडात प्रसिद्ध केली आहे. मराठी वाङ्मयाच्या भावी इतिहासकारांस धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिरात एक दोन वर्षे तळ दिल्या वाचून भागणार नाही. इतका हा संग्रह अमोल आहे. या संग्रहात "रामदासाचे हातचे असे एक अस्सल पत्र आहे. ते पत्र रामदासांनी रघुनाथभटास लिहिलेले आहे. शके १५९६ चातुर्मासात रामदास हेळवाकच्या घळीत होते व पुढे तेथे शीत बाधा झाल्यामुळे तिकडील कार्ये दिवाकर गोसाव्यांचे व्याही रघुनाथभट यांच्यावर सोपवून ते चाफळच्या उष्ण हवेत परतले. त्यानंतर लगोलग लिहिलेल्या पत्रात रामदास रघुनाथ भटाचे उपकार आठवीत आपले हृदय त्याच्यापाशी उघडे करीत आहेत. यामुळे पत्रातून महत्त्वाचा भाग पुढीलप्रमाणे... "तुमचा निरोप घेऊन हेळवाकीहून स्वार झालो ते सुखरूप चाफळास पावलो... आपण ते कर्कष सीतलाईमधें बहुतचि श्रम पावलो.... " दासबोध, एकवीससमासी उर्फ जुना दासबोध, लघु रामायण, मोठे रामायण, चौदा ओवीशते, लघुकाव्ये करुणाष्टके, मनाचे श्लोक इत्यादी रचना रामदासांनी केली आहे. रामदासांवर मुकुंदराजांचा विवेकसिंधू, दासोपंतांचा ग्रंथराज, एकनाथांचे भावार्थरामायण, त्र्यंबकराज यांचा बालबोध या ग्रंथांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. हे ग्रंथ व ग्रंथकार रामदासांच्या लेखनाच्या प्रेरणा होते.

समर्थ रामदास यांनी संत परंपरेतीलच पण स्वतःचा स्वतंत्र समर्थ नावाचा संप्रदाय स्थापन करणारे होते. हा रामदासी संप्रदाय, दास संप्रदाय या नावानेही ओळखला जातो. बदलता काळ, भोवतालाची परिस्थिती लक्षात घेऊन त्यांनी प्रपंचविज्ञान सोप्या भाषेत मांडले. आपल्या वाङ्मयातून भक्तीमार्गाबरोबरच जीवनाच्या विविध टप्प्यावरचा उपदेश केला. आपल्या भ्रमंतीतून जे समाजदर्शन झाले त्याचे त्यांनी आपल्या साहित्यात विवेचन केले आहे.

### करुणाष्टके (१६२५ - १६३०):

समर्थ रामदासांची करुणेने ओथंबलेली कविता म्हणजे करुणाष्टके होत. अक्षरशः ही रडविणारी कविता म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. रामदासांनी आपल्या साधक अवस्थेतील मनाचा कोलाहाल करूणाष्टकामध्ये मांडला आहे. नाशिक येथील पंचवटीस आल्यानंतर रामाचा जप सुरू झाला, रामाची आराधना सुरू झाली तरी सुद्धा राम भक्ताला भेट दर्शन देत नाही म्हटल्यावर मनाची जी अवस्था झाली ती अवस्था व राम दर्शनाची तळमळ आणि धडपड रामदास या काव्यात मांडतात.

"अनुदिन अनुतापे तापलो रामराया

परम दीनदयाळा नीरसी मोहमाया

अचपळ मन माझे नावरे आवरिता

तुजविण शिण होतो धाव रे धाव आता"

असे रामदर्शनाची तळमळ त्यानी प्रांजळपणे व्यक्त केली आहे. 'भजनरहित रामा सर्वही जन्म गेला। स्वजन जनधनाचा व्यर्थ म्या गर्व केला॥' असा पश्चातापही रामदास प्रकट करतात. रामाचे दर्शन घडत नाही म्हणून त्याच्या मनाला उदास अवस्था प्राप्त झालेली आहे. आपल्या गर्वाने प्रस्तावलो. दर्शन होईना म्हणून कावलो क्रोधाने तप्त झालो तरी तू दर्शन देत नाही अशा जन्माचा काय उपयोग? म्हणून व्यर्थ जन्मास मी आलो अशी भावना रामदासांची होते. टोकाची आर्तता आणि कारुण्याचा वर्षाव ही करुणाष्टकाची वैशिष्ट्ये ठरतात. रामदासाच्या कवी मनाची ओळखही अष्टके करून देतात. रामदासाच्या इतर ग्रंथरचनेच्या पार्श्वभूमीवर काव्यगुणदृष्ट्या करुणाष्टके सरस होत. भक्तीरसाची सरोवरे असलेली ही करुणाष्टके रामदासाच्या अंतःकरणातील अनुताप, वैराग्य, कोमलता यांचे चित्रण करणारी आहेत. या करूणाष्टकाबद्दल 'ही करुणाष्टके म्हणजे प्रेमळ प्रार्थना' होय, असे मत ल. रा. पांगारकर यांनी व्यक्त केले आहे.

### २आ.१.५.३.१ दासबोध:

'दासबोध' हा ग्रंथ समर्थांचा प्रमुख ग्रंथ आहे. तो सर्वात मोठा ग्रंथ असून हा त्यांच्या संप्रदायाचा 'ग्रंथसाहेब' म्हणून ओळखला जातो. समर्थांचे विचारधन या ग्रंथात एकवटले आहे. या ग्रंथाची रचना इ. स. १६३२ ते १६८१ अशी पन्नास वर्ष सुरू होते. डॉ. शं. गो. तुळपुळे यांच्या मते, "दासबोध हा ग्रंथ तीन टप्प्यात लिहिला गेला असावा. वीस दशकी दोनशे समासी असा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे पूर्वार्ध उत्तरार्ध असे भाग असून ओवीसंख्या सुमारे ३,८६६ व ३,८८५ एवढी आहे.

या ग्रंथाचे पहिले सात दशक लिहिल्यानंतर हा ग्रंथ पुरा केला असावा. कारण हे सर्व समास एकटाकी आहेत, तसेच या सात दशकात प्रमुख विषय अध्यात्म हाच आहे. इतकेच नव्हे तर सातव्या दशकात 'सरली शब्दांची खटपट । आला ग्रंथाचा शेवटा' असे स्पष्ट लिहिले आहे. म्हणजे आता शेवटला भाग सांगून ग्रंथ पुरा करायचा इतकेच राहिले. अर्थात या पुढले भाग - समास वेळोवेळी लिहून या ग्रंथात जोडले आहेत असे दिसते. दासबोध हा ग्रंथ इतकाच सात दशकातच राहिला असता तर त्याबद्दल कोणाचे काय विशेष वाटले नसते. इतर हजारोहजार वेदांत चर्चेच्या ग्रंथांत तोही कदाचित जिरून गेला असता. पण यापुढचे दशक नेहमीच्या चाकोरीला सोडून आहेत. अकराव्या दशकाच्या पाचव्या व सहाव्या समासात समर्थ राजकारणाच्या वातावरणात शिरले आहेत व राजकारण हे हरिकथेप्रमाणेच आवश्यक आहे असे सांगितले आहे. बाराव्या दशकात प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घातली आहे. आजपर्यंतचे साधूंचे 'वैराग्य आणि परमार्थ' असे शब्द वापरत होते त्यांच्याऐवजी आता 'प्रपंच आणि परमार्थ' असे शब्द आले. यातच भजनाची जागा यत्नाला मिळाली यापुढचे चौदावा - पंधरावा दशक रामदास संप्रदायी मंडळाचा शिक्षाप्रबंध आहे. सामान्यतः चौदा, पंधरा, सोळा हे दशक दासबोधाचे अपूर्वत्त्व विशेष दाखवतात. या मध्ये अध्यात्माबरोबरच,

राजकारण, समाजकारण, बुद्धिवाद प्रयत्नवाद हे विषय निरूपिलेले आहेत. यातले केवळ उतारे देऊन भागणार नाही. जसे भिंतीची एखादी वीट किंवा पायाचा एखादा दगड आणून पुढे ठेवल्याने एखाद्या भव्य इमारतीच्या रचनेची कल्पना पाहणाऱ्याला जितपत होईल, तितपतच यातील उताऱ्याने या दशकांची कल्पना वाचकाला येईल. तेव्हा हे दशके स्वतः ज्याने त्याने वाचले पाहिजे. या एकंदर ग्रंथात म्हणजे दासबोधात एक गोष्ट विशेष नजरेस येते ती अशी की, रामदासांचे निरीक्षण फार चौकस व बारकाईचे होते. भोवतालचे जग त्यांनी नीट निरखून पाहिले होते याचा प्रत्यय या ग्रंथात सर्वत्र येतो. या ग्रंथात व्यवहारातल्या गोष्टी चौकसपणे पाहून चातुर्याने सांगितले आहेत. यातील प्रवृत्तिवेदांताचा उपदेश, प्रपंच व परमार्थ यांची सांगड आणि राजकारणाचे समाजास महत्त्व व त्यासंबंधी सूचना या गोष्टी महाराष्ट्राचा अपूर्व आहेत. अनेक राज्यक्रांत्या आणि घडामोडी होत असताना कोणाही साधूसंतांने त्याबद्दल एक ब्र देखील काढला नाही की, तो काढण्याची कल्पना किंवा आवश्यकताही कोणा संतगुरूला आजपर्यंत वाटली नाही आणि रामदासाने ती गोष्ट कळकळीने आपल्या लोकांपुढे आणि देशातल्या देवतांपुढे मांडली. तेव्हा हा सर्व प्रकार कौतुकास्पद वाटावा, यात नवल नाही. दासबोधाच्या अठराव्या दशकाच्या सहाव्या समासात

"म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुता दिसांचे माजले बंड।

या कारणे अखंड । सावधान असावे ।।"

अशी एक ओवी आली आहे. हा समास अफजलखानाचा वध करून शिवाजी दर्शनास आला त्यावेळी लिहिले असे म्हणतात. यातील

"बरे ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी ।

परंतु विचार पाहोनि। कार्य करणे ।।"

या ओवीवरून हे म्हणणे खरे असेल असे दिसते. या नंतरच्या दशकात अध्यात्माबरोबरच राजकारण, समाजकारण, बुद्धिवाद, प्रयत्नवाद असे विषय निरुपिले आहेत परंतु परमार्थ हाच दासबोधाचा मुख्य विषय असल्याचा निर्वाळा समर्थांनी ग्रंथारंभी दिला आहे. तो पुढील शब्दात –

"ग्रंथनाम दासबोध । गुरूशिष्याचा संवाद ।

येथे बोलीला । विशेष भक्तिमार्ग ।।"

सद्गुरुच्या मार्गदर्शनाखाली आपण परमार्थाचा मार्ग अनुसरावा त्यासाठी विवेकयुक्त वैराग्याची जरुरी आहे. शिष्याने गुरुसुद्धा पारखून घ्यावा यासाठी गुरु - शिष्याची लक्षणे सांगितली आहेत. संसारत्याग न करता व प्रपंच न सोडता विवेकाच्या बळावर आपणास मुक्त होता येते म्हणून 'आधी प्रपंच करावा नेटका मग लागावे परमार्थ विवेका' असे दासबोध सांगतो. दासबोधात प्रसंगपरत्वे उपदेश आला आहे. उत्तमपुरूष निरुपणात आदर्श पुरुषांची लक्षणे आली आहेत. मूर्खलक्षणनामात दुर्गुणांचे विवेचन केले आहे. 'संसार मुळी नासका विवेके करावा नेटका' अशी शिकवण दिली आहे. प्रापंचिकाला 'यत्न तो देव जाणावा' असे सांगून

दुसऱ्यावर विसंबून राहू नये कारण 'जो दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला' असेच समर्थ उपदेश करतात. दासबोधाची रचना गुरु - शिष्य संवाद रूपाने केली आहे. शिष्याच्या मनात वेळोवेळी आलेल्या शंकांचे समाधान गुरु करतात. वेद - उपनिषिदे, द्वादशगीता, श्रीमद्भागवत इत्यादी ग्रंथाचा उल्लेख त्यांनी ग्रंथाच्या प्रारंभी केला आहे. विचारांच्या दृष्टीने भगवद्गीतेचा प्रभाव अधिक जाणवतो. मुकुंदराज, दासोपंत, त्र्यंबकराज, एकनाथ यांच्या रचनेचा प्रभाव या ग्रंथात दिसून येत. मुकुंदराजांच्या विवेकसिंधूत व दासबोधात बरेच साम्य आहे. रामदासही मुकुंदराजाप्रमाणेच गुरूला परीस, कामधेनू, कल्पतरू, चिंतामणी असे संबोधतात. दासोपंतांच्या ग्रंथराज या ग्रंथाचा प्रभाव दिसून येतो. दासोपंतांनी वापरलेले प्रचिती आणि प्रबोध हे शब्द रामदासांनी वापरली आहेत. वर्णनपद्धती दोघेही सारखीच आहे. 'दासबोधातील व्यावहारिक शिकवण वगळल्यास हा रामदासी ग्रंथराज म्हणजे दासोपंतांच्या ग्रंथराजाची सुधारून, वाढवलेली आवृत्ती ठरेल' असे मत डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी व्यक्त केले आहे. त्र्यंबकराजच्या बालबोध या ग्रंथावरून दासबोध ते नाव सुचले असावे. एकनाथांचा प्रयत्नवाद रामदासांनी स्वीकारला. प्रपंच आणि परमार्थ यांचा समन्वय घालण्याचे एकनाथानी सुरू केलेले कार्य रामदासाने पूर्ण केले. यात माधुर्य आणि प्रसादगुण आढळणार नाही मात्र ओजोगुणाचे ते भांडारच आहे. भावनांचा उद्रेक यात नाही पण विचाराचे गांभीर्य, नि:संदिग्धता, रोखठोकपणा ही वैशिष्ट्ये दासबोधात आढळतात. शब्दाच्या सौंदर्याकडे रामदासांनी लक्ष दिलेले नाही. व्याकरण, शुद्धलेखन यांची पर्व त्यांनी केलेली नाही. स्पष्टता, तर्कशुद्धता, निश्चयात्मक सकसपणा, उत्कटता, ओजस्विता आणि भेदकता ही वैशिष्ट्ये दासबोधाचे आढळतात.

### २आ.१.५.३.२ एकवीस समासी किंवा जुना दासबोध:

वीसदशकी दासबोधा व्यतिरिक्त समर्थांची जी स्फुट प्रकरणात्मक रचना आहे, तीमध्ये एकवीस समासांचा जुना दासबोध ही सर्वात महत्वाची रचना होय. या ग्रंथाचे समर्थांनी दिलेले नाव काय? याबाबत मतभेद आहे. 'श्रीरामदास ग्रंथ' हे त्याचे नाव आहे असे एक मत आहे. शके १७१९ मध्ये (म्हणजे इ. स. १७९७ मध्ये) लिहिल्या गेलेल्या एका जुन्या हस्तलिखित पोथीत या नावाचा उल्लेख आढळतो. असे शंकर श्रीकृष्ण देव यांनी म्हटले आहे. मर्ढे मठाचे शके १६९२ मध्ये (म्हणजे इ. स. १७७० मध्ये) निधन पावलेले अधिपती अमृतेश्वर यांनी या प्रकरणाच्या अखेरीस ज्या पाच ओव्या जोडल्या आहे त्यामध्ये 'ग्रंथनाम श्रीरामदास।' असे म्हटले असल्याचा आणखी एक उल्लेख देवांनी केला आहे. (श्रीसमर्थहृदय पृ. २९५) या प्रकरणाचे एकूण समास २१ आहेत त्यावरून पंचसमासी किंवा सप्तसमासी याप्रमाणे याला एकवीस समासी असे नाव पडले असावे. याची एकूण ओवीसंख्या १३४० आहे. 'जुना दासबोध' हे नाव अर्थातच समर्थांचा बृहद्ग्रंथ जो दासबोध त्याच्याशी या प्रकरणाच्या असलेल्या साम्यावरून सुचले आहे.

जुना दासबोधाची रचना समर्थ इ. स. १६४४ मध्ये कृष्णातटाकी चाफळास येऊन राहिल्यावर पहिल्या पाच-सहा वर्षात झाली असावी. असे स. ख. आळतेकर यांचे अनुमान आहे. (समर्थ चरित्र, पृ. १५५) पण जुन्या दासबोधातील काय उल्लेख पाहिले तरी हनुमान टिकत नाही. आपल्या गुरूला उद्देशून समर्थांनी जुन्या दासबोधात 'मज आपणाऐसे केले। उदार नाम दिधले रामदास ऐसें। असे उद्गार काढले आहेत. (९.१) 'तेथें पिसाट रामदास।

उभा असे दीन रूपे ।' 'तुजकारणें सर्व संग । व्यक्त केला ।' असे म्हटल्यावर (२.१- २) त्यापुढे

"तुजवीण मज माया । काही नाही रे रामराया ।

आम्हा अनाथा कासया । उपेक्षिसी ॥

तुज समुदाय दासांचा । आम्हांसी स्वामी आणिक कैंचा ।

तुजकारणें जिवलगाचा । संग सोडीला ॥" (२. ४- ५)

असे जे उद्गार समर्थांनी जुन्या दासबोधात काढले ते घरातील प्रेमळ माणसाचा सहवास नुकताच सोडून आल्याच्या काळात निघणे अधिक संभवनीय वाटते. समर्थ चाफळास येऊन राहिल्यावर म्हणजे घर सोडून टाकळी येथील तपश्चर्येची बारा व त्यानंतरची तीर्थयात्रेचे बारा असे २४ वर्षे उलटल्यावर असे उद्गार निघणे शक्य वाटत नाही. त्यामुळे जुन्या दासबोधाची रचना तीर्थयात्रेच्या पूर्वी समर्थ नाशिकजवळ टाकळीला असताना झाली असावी असे मानणे अधिक योग्य वाटते. असे डॉ. पेंडसे यांचे मत आहे.

### जुन्या दासबोधातील विषय:

जुन्या दासबोधातील पहिले दोन समास मंगलाचरण व रघुनाथध्यान यांचे आहेत आणि त्यानंतर वक्ता श्रोता, सद्गुरु व सच्छिष्य यांची लक्षणे तीन समासात सांगितल्यावर वैराग्य, सगुणध्यान व निरभिमान शांती यांचे विवेचन येते. त्यानंतर विविध शिकवण हा ढोबळ विषय येतो त्या पुढे प्रारब्ध प्रयत्नवाद हा वेगळा विषय येतो. त्यापुढे प्रारब्धप्रेत्नवाद हा विषय येतो व मग रघुनाथ चरित्र येते. 'सत्संगमहिमा' हा एकोणिसाव्या समासातील विषयही त्याच्या पुढच्या समासाहून वेगळा वाटतो. समर्थांच्या बहुतेक सर्व रचनेमध्ये सर्वत्रच निरनिराळे स्फुट विषय कसेतरी एकत्र आणलेले आढळतात. असा हा एकवीससमासी हा ग्रंथ शिथिल बांधणीचा आहे असे म्हणावे लागते.

### जुना दासबोध : तत्त्वज्ञान विशेष आणि शैली

जुन्या दासबोधाची रचना तीर्थयात्रेच्या पूर्वीच्या काळातील असेल तर ती समर्थांनी आपल्या वयाच्या तेवीस-चोवीस वर्षाच्या आत केली आहे, असा निष्कर्ष निघतो. त्यांच्या तत्त्वज्ञान विचारातील विशेष त्यांच्या या आरंभीच्या प्रकरणातही काही प्रमाणात आढळतात. नवविधाभक्तिमधील आत्मनिवेदनभक्तीचा विशेष अर्थ व त्या व्यक्तीला समर्थांनी दिलेले विशेष स्थान या एकवीससमासीतही आहे, कारण त्या भक्तीच्या विवेचनाला एक स्वतंत्र समास दिलेला आहे. श्रवण, मनन व निदिध्यास, त्याचप्रमाणे भक्ती, ज्ञान व वैराग्य या साधनांचा उल्लेखही येथे आला आहे. अद्वैतावर व निर्गुण ब्रह्मवर त्यांचा अखेर असणारा भर येथे शेवटच्या समासामध्ये अनिर्वाच्य ब्रह्माच्या वर्णनात दिसतो आणि सगुणाच्या उपासनेला ते काही एका मर्यादेत देत असलेली मान्यता सगुणध्यान व रघुनाथचरित्र या समासात दिसते. 'प्रारब्ध – प्रयत्न' या नावाचा एक समासही येथे आहे पण त्यामध्ये परमार्थाच्या दृष्टीने विवेचन आहे. 'यत्न तो देव जाणावा।' किंवा 'केल्याने होत आहे रे । आधी केलेंचि पाहिजे ॥' हा पुढे येणारा संदेश येथे नाही. प्रपंच आणि परमार्थ याचा विवेक हा

समर्थांच्या उत्तरकाळातील शिकवणीचा एक विशेष. या प्रकरणात प्रपंचाच्या मिथ्यातत्वावर, प्रपंच हा परमार्थाच्या आड येतो या विचारावर आणि त्याचा त्याग करण्यावर भर दिलेला आहे. 'जरी हा प्रपंच शाश्वत जाणतो। तरी आम्ही यासीच धरितो' (११.५९) असे प्रारब्ध - प्रयत्न या समासात म्हटले आहे

"का गृहाशी आग लागली। देखोनि कां बोंब केली।

लोकांची मांदी मेळविली। आगी विझवायाकारणें॥

तैसी परमार्थी बोंब मारावी। काही काढाकाढी करावी।

हळू हळू सोडवावी। मिठी प्रपंचाची॥" (११.५४ -५५)

शिष्याबद्दल वाटणारा कळवळा हा समर्थांच्या उत्तरकालीन वाङ्मयात आढळणारा एक महत्त्वाचा विशेष. गुरूच्या भूमिकेतून शिष्याला हळुवारपणे समजावीत समजावीत केलेला भक्तीचा, ज्ञानाचा व वैराग्याचा उपदेश या प्रकरणात आढळतो. एकंदरीत ही पूर्व वयातील रचना असे मानले तरी समर्थांच्या विचारांचे, व्यक्तिमत्त्वाचे व शैलीचे मूळ कंद आपणास येथे आढळून येतात.

**रामायण:**

समर्थ रामदासांनी रचलेली रामायणाची 'सुंदर' आणि 'युद्ध' अशी दोन कांडे आहेत. पहिल्याचे शंभर श्लोक असून दुसऱ्याचे १३६२ श्लोक आहेत. खरे पाहता या श्रीरामाच्या भक्ताचे समग्र रामायण पाहिजे होते पण त्याने त्यातली मोजकी दोनच कांडे लिहिली कारण त्यातच रामचरित्राचे सार त्याला दिसले.

"अजिंक्य रजनीचर माजले। देव कारागृही घातले।

म्हणोनि वैकुंठींहून पातले। देव सोडवावया॥

जिहीं त्रैलोक्य जिंकिले। त्यास मर्कटा हाती मारविलें॥

भुवनत्रय आनंदविले। दाशरथीनें॥"

हे रामदासांनी एके प्रसंगी सांगितलेले रामायणाचे सारे सार आहे. 'सीताहरण' हे खरे सार नव्हे. रामदास म्हणतो, 'निमित्यमात्र ते सीता । विबुधपक्ष पुरता ।' आणि म्हणूनच कथा देवइंद्रादि ब्रह्मादिकांची । समस्तामधें श्रेष्ठ या राघवाची' इतर लेखनाप्रमाणेच रामायणाची रचना सरळ आहे. पुष्कळ ठिकाणी तर ती इतकी सोपी आहे की, वाटेल त्यांनी अर्थाबरोबर सहज धावत जावे. याचे शब्द अगदी प्रचारातले, साधारणपणे कधीही काव्यात न आढळणारे असेच असतात. 'खचते' आणि' रचते 'कार्य, म्हैसमंगळू वगैरेसारखे शब्द अगदी त्यांच्या खास टाकसाळीतली नाणी आहेत.

### २आ.१.५.३.३ लघुरामायण:

रामदासी स्फुट प्रकरणात एक लहानसे रामचरित्रात्मक प्रकरण आहे. त्यासच कोणी कोणी लघुरामायण म्हणतात. त्याचे प्रामाणिका वृत्तातले अवघे एकशे पंचवीस श्लोक आहेत. हे

अगदी पहिलेच नसले तरी प्रारंभीच्या रचनांपैकी तरी एक असाव. यात दोन गणेशांच्या आणि एक सरस्वतीच्या नमनाचे असे पहिले तीन श्लोक झाल्यावर चौथा श्लोक

"समस्तही मनी धरा । कथा करीनसे करा ।

लहानसा कवी नवा । रघोत्तमासि वीनवा ।।"

असा आहे. यातदेखील कथाभाग रावणाने लंकेत देव कोंडिले तेव्हापासून पुढलाच आहे. देवाच्या या बंदिखान्याचे वर्णन करताना हा लहानसा कवी म्हणतो.

"उदासली वसुंधरा । बहू भीति निशाचरा।

अनीति फारसी वसे । कदापि न्याय तो नसे ।।"

यात कवीच्या प्रौढपणातल्या रचनेचे ओळख स्पष्ट पटते.

**मनाचे श्लोक :**

समर्थांनी मानवी मनाला सामर्थ्याचं प्रमुख स्त्रोत मानले आहे. मन हेच सर्व प्रकारच्या गोष्टीला कारणीभूत असते. मानवी कृती - प्रवृत्तीचे मुख्य प्रेरणास्थान मन हेच असते, त्यामुळे दुर्बल मनापेक्षा सशक्त मनच व्यक्तीचे तसे समाजाचे दैव घडविते. त्यामुळे रामदासांनी मनाचे श्लोक हे काव्य रचले आहे. दासबोधातील विचार, तत्त्वज्ञान सामान्य लोकांसाठी सोप्या भाषेत मनाच्या श्लोकातून व्यक्त केले आहे.

समर्थांच्या लेखनात त्यांच्या उपदेशकाच्या भूमिकेचा प्रत्यय जागोजागी येतो. करूणाष्टके व इतर काही स्फुट रचना सोडली, तर इतर ठिकाणी या उपदेशकाच्या भूमिकेतून समर्थ आपले सारे लेखन करीत आहेत. मनाचे श्लोक लिहिताना देखील स्वतःच्या मनाला आणि जनमानसाला शिकविण्याची, समजावून सांगण्याची भूमिका आहे. 'मना त्वांचि रे पूर्वसंचीत केले । केले । तयासारिखे भोगणे प्राप्त झाले ।।' किंवा 'जगी सर्व सुखी असा कोण आहे । विचारी मना तूंचि शोधूनी पाहे ।।' अशा चरणातून ती भूमिका स्पष्ट दिसते. श्रीरामांचा भक्त किंवा सेवक, गुरूचा जिज्ञासू शिष्य अशी भूमिका समर्थांनी आपल्या लेखनात प्रारंभी काही थोडा काळच घेतलेली आहे. त्यानंतर अखेरपर्यंत ते एक समाजशिक्षक म्हणून वावरले. उपदेश करणे, हिताहित समजावून सांगणे, विचार समजावून देणे, आचरणाची दिशा दाखवणे हेच काम त्यांनी आयुष्यभर केले आणि याच भूमिकेतून आपले सारे लेखन केले. शिष्याला सांभाळून घेणे, धीर देणे, आश्वासन देणे, त्याचा आत्मविश्वास जागा करणे व ती वाढवणे, धोक्याच्या जागा बाबत सूचना देणे, हे सारे भाग यामध्ये येतात. त्यांच्या तात्त्विक विवेचनपर लेखनातही बहुतेक स्थळी हीच भूमिका आहे. ते आपले लेखन केवळ तटस्थपणाने एखादा सिद्धांत मांडून दाखवा तसे करीत नाही, तो शिष्याला समजावून द्यावा म्हणून करतात. स्वतःच्या विचाराबद्दल एक ठाम आत्मविश्वास गुरूला असावा लागतो. तो समर्थांच्या ठाई पुरेपूर आहे व तो त्यांच्या वाणीत सर्वत्र भरून राहिलेला आहे. या दृष्टीने ते एक 'समर्थ' उपदेशक आहेत. हे श्लोक भुजंग वृत्तातले साधे, सोपे व ठसठशीत असल्यामुळे म्हणणारांना व ऐकणारांना दोघांनाही सुखकर वाटतात.

### २आ.१.५.४ स्फूट प्रकरणे:

### २आ.१.५.४.१ अस्मानी सुलतानी:

अस्मानी सुलतानी या प्रकरणांमध्ये समर्थ म्हणतात 'आता नाना तंटे बखेडे येथे माजलेली असून पृथ्वी गळाटली आहे. ब्राह्मण बुद्धीपासून चेवले आणि आचारभ्रष्ट झाले. पूर्वीचे असंख्य देवस्थाने गेले आता म्लेच्छ नृपतीच्या राज्यामध्ये ठाया ठाई उर्स भरू लागले.

तीर्थक्षेत्रे मोडिली । ब्राह्मणस्थाने भ्रष्ट झाली ।

सकळ पृथ्वी आंदोळली । धर्म गेला ॥

ब्राह्मण बुद्धीपासून चेवल्या । आचारापासून भ्रष्टले ॥

गुरुत्व सोडले जाले । शिष्य शिष्यांचे ॥

राज्य ने ते म्लेच्छ क्षेत्री। गुरुत्व नेले कृपात्री

अशा आपण आरत्री ना परत्री । काहीच नाही

महाराष्ट्र धर्म थोडाच उरला असे विदारक चित्रण या प्रकरणात आले आहे.

### २आ.१.५.४.२ परचक्र निरूपण:

परचक्र निरूपण या प्रकरणात समर्थ रामदासांनी परचक्रामुळे निर्माण झालेल्या सामाजिक स्थितीचे चित्र रेखाटले आहे. येणे करित बहुज्याअंला । संकट झाले ॥ माणसा खावया अन्न नाही । अंथरूण पांघरूण तेही नाही घर करावया सामग्री नाही । काय करिती ॥

सारे लोक अखंड चिंतेच्या प्रवाही पडले आहेत. कोणीही सुखी नाही. काळ इतका कठीण आला की, समाजात विषण्णता, निराशा पसरली आहे असे वर्णन पर चक्र निरूपणात रामदास करतात.

### २आ.१.५.४.३ राम वरदायिनी

हे प्रतापगडाच्या भवानीस अनुलक्षून म्हटलेले स्तोत्र आहे. इ. स. १६७८ मध्ये रामदास प्रतापगडाच्या भवानीस दर्शनाला गेले असता आपल्या कुलस्वामिनीला तुळजाभवानीला ते रामवरदायिनी असे म्हणतात.

'तुझा तू वाढवी राजा । शीघ्र की आम्हासी देखता ॥'

हे मूळ सामर्थ्य दाखवी अशी प्रार्थना तुळजाभवानीस करतात. यात शिव - स्वराज्याविषयीची आस्थाही प्रकट केली आहे.

### २आ.१.५.४.४ आत्माराम:

आत्माराम हे प्रकरण पाच समासाचे व १८३ ओव्यांचे आहे. हे प्रकरण एका दृष्टीने महत्त्वाचे आहे, कारण इहलोक सोडून जाते वेळी आपल्या शिष्यांना उद्देशून समर्थांनी जे शेवटचे

उद्गार काढले त्यामध्ये दासबोधाबरोबर आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध । या प्रकरणाचा उल्लेख आलेला आहे. शिष्याने जिज्ञासू वृत्तीने प्रश्न विचारावा व गुरुने त्याचे उत्तर द्यावे अशी नेहमीचीच प्रथा आहे, पण आत्माराम या ग्रंथाच्या प्रारंभी समर्थ म्हणतात - हे शिष्या, सावधान होऊन मी सांगतो ते गुह्यज्ञान ऐक. तू आशंका घेतलेली नाहीस पण तुझी भ्रांती अद्याप फिटलेली नसल्यामुळे मलाच तुझी चिंता लागलेली आहे. (१. १८- १९) शिष्याचे कल्याण व्हावे याविषयी आपल्या मनातील ही काळजी व्यक्त केल्यावर,

"दासबोधींचे समासीं । निर्मूळ केले मीपणासी।

त्याने निरुपणी वृत्तीशी । पालट दिसेना ।।

म्हणोनी न पुसता सांगणे । घडले शिष्या तुजकारणे ।

आता तरी सोय धरणे । श्रवणमननी" (१.२०-२१)

असा दासबोधाचा उल्लेख समर्थांनी केला आहे.

शिष्याबद्दलचा गुरूला वाटणारा कळवळा -

१) 'अरे तूं कोण कोणाचा । कोठून आलासि कैंचा ।'

२) 'अरे तुवां जन्मांतर घेतले । काय मानितोसि आपुले ।'

३) 'येथे तुझे कोणी नाही । भुलला आहेस काई ।'

४) 'ईश्वरापासोनि झालासी । परंतु त्यास चुकलासी।'

५) 'तुझे अढळपण गेले । तुज मायेने वेड लाविले।'

या उद्गारामधून स्पष्ट प्रकट झालेला आहे. (१.१५, २६, २७, २९, ३१) आपला शिष्य प्रपंचाच्या पाशातून सुटावा व परमार्थाच्या मार्गाला लागावा, या गुरूच्या प्रेरणेमधून हे छोटे प्रकरण लिहिले गेले आहे.

या ग्रंथाच्या दुसऱ्या प्रकरणांमध्ये 'नाशवंत असेल ते टाकावे' असे म्हटले आहे. नाशवंत काय ? हे सांगताना मायेचे विवरण केले आहे. जे जे दिसते, भासते, ते ते सारे मायात्मक होय हे म्हणताना सारी सृष्टी, तिच्या मुळाशी असलेली प्रकृती व पुरुष ही मूळ तत्त्वे, एवढेच नव्हे तर 'जीव, शिव आणि ईश्वर । हाही मायेचा विस्तार ।। असे वर्णन समर्थांनी केले आहे. (२.१७) शिष्य म्हणतो की, ही माया स्वरूपाच्या सत्तेने चालते, स्वतःच्या सत्तेने चालत नाही. पण त्यावर गुरू म्हणतो,

"ते झालेचि नाही सर्वथा । तयावरी निर्गुणाची सत्ता ।

ऐसे हे ज्ञातेपणें बोलता । तुज लाज नाही ।।" (२.२५)

गुरूचा हा गहजब ऐकून शिष्य साहजिकच गोंधळतो आणि 'सकळ माया-ममता । आणि झालीच नाहीही सांगता । तरी म्या काय करावे आता ।' असे तो म्हणतो. (२.२६) मूळ

निर्गुण ब्रह्म हे साऱ्या बोलांपलीकडचे आहे, जे जे म्हणून सांगावे ते ते साकार आहे, म्हणून त्या निराकाराचे वर्णन करता येत नाही,

"ऐसे जरी न बोलावे । तरी म्या काय करावे ।

न बोलता कळावे । तुज कैसे ॥

बोलणे तितुके व्यर्थ जाते । बोलतां अनुभवा येते।

अनुभव सांडिता तें । आपण होईजे ॥" (३.१६-१७)

असे अनुभवाच्याही अतीत असणारे ते परब्रम्ह आहे, असे वर्णन समर्थांनी केले आहे.

हे सारे वर्णन आणि विवेचन 'अंतर्भाव' या प्रकरणातील सरणीशी जुळणारा आहे. अशा त्या निराकार निर्गुण परब्रह्माचा साक्षात्कार होण्यासाठी श्रवण, मनन व निदिध्यास, आणि त्याबरोबर भक्ती, ज्ञान व वैराग्य या साधनांचा अवलंब करण्यास सांगितले आहे. आत्मनिवेदन भक्तीचा उल्लेखही आला असून ती भक्ती आणि अद्वैतज्ञान, तसेच विज्ञानही सारखीच होत. असे म्हटलेले आहे. (४.३१-३२) असा उपदेश ऐकल्यावर, शिष्याने जे कृतार्थतेचे उद्गार काढले आणि त्याला अद्वैताचा अनुभव जो आला तो पाचव्या समासात सांगितला आहे. अखेर गुरू व शिष्य दोघे एकरूप होऊन जातात. 'ऐसा कृपाळू स्वामीराव । आदिपुरुष देवाधिदेव ।' या शब्दांनीच या प्रकरणातही गुरूचा उल्लेख आलेला आढळतो. (५.२५)

### २आ.१.५.४.५ आनंदवनभुवन:

रामदासांचे महाराष्ट्राला 'आनंदवनभुवन' असे आवडते नाव आहे आणि विचार करता ते अगदी सार्थ आहे. महाराष्ट्रात पसरलेला दुःखाचा वणवा विझून गेल्यावर आपले हे आवडते आनंदवनभुवन कसे दिसावे, कसे दिसेल, याच्या विचारात मग्न होते व त्यावेळी मनाच्या त्या अवस्थेत त्यांच्या ज्ञानचक्षूंना जे डोळ्यापुढे दिसले त्याचे वर्णन त्यांनी या प्रकरणात केले आहे. कोणी कोणी याला रामदासांचे 'भविष्यपुराण' असेही म्हणतात. यातून काही ओळी समर्थांच्या या काल्पनिक चित्राची कल्पना होण्यासाठी पुरेशी आहेत -

स्वप्नी जे देखिले रात्री । ते ते येथे तैसेंचि होतसे ।

हिंडता फिरता गेलो । आनंदवनभुवना ॥

हे साक्ष देखिली दृष्टी । किती कल्लोळ उठिले ।

विघ्नघ्ना प्रार्थिलें गेलो । आनंदवनभुवना ॥

स्वधर्मा आड जी विघ्ने। ते ते सर्वत्र उठिलीं ।

लाटिली कुटिली देवे । दापिली कापिली बहू ॥

सुरेश उठिला आंगे । सूरसेना परोपरी ।

मोहीम मांडिली मोठी । आनंदवनभुवनी ॥

कल्पांत मांडिला मोठा। म्लेच्छ बुडवावया ।

कैपक्ष घेतला देवी । आनंदवनभुवनी ॥

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्थान बळावले ।

अभक्तांचा क्षय झाला । आनंदवनभुवनी ॥

येथून वाढला धर्मू । रमा धर्मसमागमे ।

संतोष मांडला मोठा । आनंदवनभुवनी ॥

बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला ।

मोडली मांडली क्षेत्र । आनंदवनभुवनी ॥

बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ॥

ताडिले पाडिले देवे । आनंदवनभुवनी ॥

उदंड जाहले पाणी । स्नान- संध्या करावया ।

जप-तप अनुष्ठाने । आनंदवनभुवनी ॥

लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला ।

चढता वाढता प्रेमा । आनंदवनभुवनी ॥

यावरून श्री समर्थ रामदासस्वामी दिवसा काय करीत, रात्री कसे असत, जागतेपणी काय बोलत. त्यांना सर्वकाळ चिंता कशाची असे, त्यांचे मन कोठे धावे, भ्रमणात त्यांना काय दिसे, काय पाहून त्यांचा ऊर फाटे, कोणती कल्पना त्यांच्या मनाला सुख देई... याचे चित्र कोणालाही त्यांच्या मगदूराप्रमाणे काढता येईल. असे महाराष्ट्र सारस्वतकार वि. ल. भावे यांनी म्हटले आहे.

**गंगाधर:**

रामदास स्वामींना गंगाधर या नावाचे एक वडीलबंधू होते. त्यांनाच 'श्रेष्ठ' असे म्हणत. रामदासांप्रमाणे हे त्यांचे बंधू आजन्म ब्रह्मचारी नव्हते. ते गृहस्थाश्रमी होते. त्यांनी चांगला प्रपंचही थाटला होता. हे समर्थांच्या पूर्वीच चार वर्षे शके १५९९ मध्ये फाल्गुन वद्य चतुर्दशीस मृत्यू पावले. त्यांची मराठी भाषेत भक्तीरहस्य व सुगमोपाय हे मुख्यग्रंथ काही थोडीशी स्फुटरचना उपलब्ध आहे.

‘भक्तीरहस्य’ हा ग्रंथ नावाप्रमाणेच भक्तीचा महिमा कथन करण्याच्या हेतूने लिहिला आहे. यात नामस्मरणाचे महत्त्व सांगताना अनेक गोष्टी व कथा आल्या आहेत. याची ७७ प्रकरणे आहेत. हे भक्तीरहस्य श्रेष्ठांनी शके दशके उणीसोळा शते । कीलकनाम संवत्सराते।

म्हणजे इ. स. १६६८ मध्ये कीलकसंवत्सरी लिहून पूर्ण केला. व त्यानंतर सुगमोपाय हा ग्रंथ लिहिला आहे. हा ग्रंथ भक्तिरहस्याची पर्वणीच आहे.

**२आ.१. ५.४.६ दास पंचायतन:**

१) श्रीसमर्थ रामदासस्वामी व त्यांचे समकालीन आणि अनुयायी २) श्रीजयराम स्वामी वडगावकर ३) रंगनाथस्वामी निगडीकर ४) आनंदमूर्ती ब्रह्मनाळकर आणि ५) केशवस्वामी भागानगरकर या पाच जणांचा त्यावेळच्या लोकांनी दासपंचायतन असे नाव दिले आहे. हे सर्व फार श्रेष्ठ असे साधुपुरुष असून चांगले विद्वान ग्रंथकार होते.

## २आ.१.६ समारोप

तुकारामांच्या अशा विविध स्तरांमधील रचना मराठी भाषेतले सुभाषितवजा चलनी नाणीच झालेली आहेत. त्यामुळेच महाभारतातल्या सुक्तींबरोबरच तुकारामरचित अभंगचरणांचाही उपयोग शैलीच्या सजावटीसाठी कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर हे करीत असत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनीही तुकारामांच्या अभंगातील वचने उपयोगात आणली आहेत. त्यांच्या मूकनायक या वर्तमानपत्रांमध्ये सुरुवातीलाच काय करूं आता धरूनिया भीड ।निशंक हे तोंड वाजविले ॥ नव्हे जगीं कोणी मुकियाचा जाण। सार्थक लाजोनी नव्हे हिता॥ (४२२९ , पृ.६९०) न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या प्रार्थनासमाजीय मनाला तुकारामांच्या अभंगातून शांती व स्फूर्ती मिळ, हे सर्वज्ञात सत्य आहे. असा हा आपला बहुजनांविषयी कळवळा असलेला कवी वारकरीपंथाच्या संतकृपेने फळाला आलेल्या इमारतीचा कळस ठरला.

समाजाविषयीच्या अपार तळमळीतून समर्थांनी विपुल वाङ्मयनिर्मिती केली आहे. रोखठोक विचार, साधी सरळ भाषा आणि स्पष्ट निर्भीड मांडणी ही त्यांच्या लेखनाची वैशिष्ट्ये आहेत. दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, करुणाष्टके, अस्मानी सुलतानी, आनंदवनभुवन, भीमरूपी स्तोत्र, सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची ही गणपतीची आरती, लवथवती विक्राळा ब्रह्मांडी माळा ही शंकराची आरती, सत्राणे उड्डाणे हुंकार वदनी श्री हनुमानाची आरती अशा ६१ आरत्या त्यांनी लिहिल्या आहेत. समर्थांनी राष्ट्र उभारणीसाठी जसे बहुमोल मार्गदर्शन केले तसेच लोकशिक्षण, प्रपंच, परमार्थ, विवेक या गोष्टींवरही भर दिला.

## २आ.१.७ संदर्भग्रंथ


१ . पंडित परशुराम शास्त्री - श्री तुकाराम बावांच्या अभंगांची गाथा, शासकीय मुद्रणालय, पुणे पुनर्मुद्रण २०११

२. डॉ. पेंडसे, शं.वा; - राजगुरू समर्थ रामदास कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

३. संपा. मालशे, स गं; - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा भाग पहिला, मराठी साहित्य संस्कृती मंडळ. पुरस्कृत पुणे ३० पहिली आवृत्ती १५ सप्टेंबर १९८२

४. गोसावी, र. रा; - श्री समर्थ आणि समर्थ संप्रदाय व्हीनस प्रकाशन, पुणे

५. नसिराबादकर, ल. रा; - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

६. डॉ. पेंडसे, शं.वा; - राजगुरू समर्थ रामदास कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे

## २आ.१.८ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. संत तुकारामाच्या अभंगाचे आशय व स्वरूप स्पष्ट करा.

२. समर्थ रामदास यांच्या वाङ्मयाचा आशय व स्वरूप स्पष्ट करा.

३. संत तुकारामांच्या अभंगवाणीतील भाषिक सौंदर्य आणि वैशिष्ट्यें लिहा.

४. शिवकालीन संतसाहित्याचा थोडक्यात परिचय करून द्या.

५. समर्थ रामदासांचा जीवनपरिचय आणि ग्रंथरचनेचा परिचय थोडक्यात करून द्या.

**ब) टीपा लिहा.**

१. आनंदवनभुवन

२. संत तुकारामांचे प्रासंगिक अभंग

३. समर्थ रामदास

४. संत एकनाथांचे अभंग

५. समर्थ रामदासांची ग्रंथसंपदा

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संत तुकारामांचा जन्म कोणत्या घराण्यात झाला.

**उत्तर – मोरे कुळातील सधन व धर्मनिष्ठ आंबिले घराण्यात.**

२. तुकारामांच्या वडिलांचे नाव सांगा.

**उत्तर – बोल्होबा.**

३. पुढील अभंग पूर्ण करा.

“कन्या सासुराशी जाये। मागे परतोनि पाहे॥

तैसे झाले माझ्या जीवा। केव्हा भेटती …….॥”

**उत्तर – केशवा.**

४. समर्थ रामदासांचे पूर्ण नाव सांगा?

**उत्तर – नारायण सूर्याजी ठोसर.**

५. 'ग्रंथसाहेब' म्हणून घेताना कोणता ग्रंथ ओळखला जातो?

**उत्तर – दासबोध.**

*****

# घटक २आ.२

## २आ.२ शिवकाळातील पंडिती काव्य

**घटक रचना**


२आ.२.१ उद्दिष्टे

२आ.२.२ प्रस्तावना

२आ.२.३ पंडिती काव्याची स्वरूप - वैशिष्ट्ये

२आ२.४ पंडिती साहित्य प्रेरणा

२आ.२.५ पंडिती कवितेचे गुण आणि दोष

२आ.२.६ सामराज

२आ.२.६.१ सामराजाचे ग्रंथलेखन

२आ.२.६.२ मुद्गलाख्यान

२आ.२.६.३ रूक्मिणीहरण

२आ.२.७ रघुनाथ पंडित

२आ२.७.१ रघुनाथ पंडिताची ग्रंथसंपदा

२आ.२.७.२ रामदासवर्णन

२आ.२.७.३ गजेंद्रमोक्ष

२आ.२.७.४ दमयंतीस्वयंवर

२आ.२.८ कवी नागेशांची ग्रंथरचना

२आ२.८.१ सीतास्वयंवर

२आ.२.८.२ रुक्मिणीस्वयंवर

२आ.२.८.३ चंद्रावळीवर्णन

२आ.२.८.४ रसमंजरी

२आ.२.९ समारोप

२आ.२.१० संदर्भग्रंथ

## २आ.२.१ उद्दिष्टे

१. पंडिती काव्याच्या लेखनामागील प्रेरणांचा अभ्यास करता येईल.

२. शिवकाळातील पंडित कवींचा जीवनपरिचय अभ्यासता येईल.

३. शिवकाळातील पंडित कवींनी केलेल्या महत्त्वाच्या वाङ्मयीन रचनांचा अभ्यास करता येईल.

४. शिवकालीन पंडित कवितेची स्वरूप आणि वैशिष्ट्ये याचा परिचय होईल.

५. शिवकाळातील पंडिती कवितेचे गुण - दोष सांगता येतील.

६. शिवकाळातील काही निवडक पंडित कवी त्यात - रघुनाथ पंडित, सामराज, नागेश आणि विठ्ठल या पंडित कवींच्या साहित्याचा परिचय होईल.

## २आ.२.२ प्रस्तावना

संतकाव्य, पंडिती काव्य, शाहीरी वाङ्मय या काव्यपरंपरानी मराठी साहित्याचे दालन समृद्ध केले आहे. संत अभंगवाणीने तर सामान्य मराठी माणसाच्या मनावर अधिराज्य केले आहे. त्यामुळे बदलत्या काळातही संत साहित्याची लोकप्रियता कायम राहिली परंतु एकेकाळी पंडिती काव्याने मराठी रसिकात अफाट लोकप्रियता मिळविली होती. पंडित कवींनी मुख्यतः रामायण, महाभारत, भागवत, पुराणे, रघुवंश, कुमारसंभव, शाकुंतल यासारख्या सर्व प्रकारच्या मौलिक विषयांना आणि रसांना स्थान देणाऱ्या महाकाव्यातून आणि नाटकातून आपल्या आख्यानाचे विषय उचलले. वामन पंडिताच्या चाळीस हजार काव्यपंक्तीमधून त्यांच्या सखोल व्यासंगाचा आणि आत्मज्ञानाचा परिचय होतो. सरळ साधे आणि प्रासादिक निवेदन हे सामराजांच्या कवितेचे वैशिष्ट्ये आहे. रघुनाथ पंडितांचे नल - दमयंती स्वयंवर ही अविस्मरणीय रचना आहे. महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, कथाकाव्य, स्तोत्रे, चंपूकाव्य असे अनेक काव्य प्रकाराची त्यांनी नव्याने भर घातली. त्यामुळे मराठी साहित्याचे दालन समृद्ध होण्यास हातभार लागला आहे.

## २आ.२.३ पंडिती काव्याची स्वरूप - वैशिष्ट्ये

पंडित काव्याची प्रेरणा ही कवित्वाचा विद्वत्त्वजन्य आस्वाद घेणे हीच आहे. रसिकता आणि व्युत्पन्नता याचा प्रभाव पंडित कवींवर होता. पंडित कवी हे व्यवसायाने पुराणिक होते. त्यातील काहींना राजाश्रय लाभला होता. स्वस्थ, समृद्ध आणि संपन्न जीवन हे कवी जगत होते. त्यामुळे जीवनातील दुःख, दारिद्र्य, विवंचना, लोकोद्धार असे त्यांचे काव्यविषय कधी बनले नाहीत. रसिक जनांच्या मनाला भावणारे, त्यांचे रंजन करणारे, त्यांच्या भाववृत्तीला आवाहन करणाऱ्या विषयाची, घटना - प्रसंगाची रचना करण्यात पंडित करण्याचा हातखंडा होता. संस्कृत गणवृत्तात लिहिलेल्या आख्यानपर रचनेस त्यांनी प्राधान्य दिले. डौलदार भाषा, तंत्रबद्धता, अलंकारिकता, विविध वृत्तांचा स्वैर वापर हे पंडिती काव्याची वैशिष्ट्ये

त्यांच्या रचनेत दिसून येते. अनेक पंडित कवींना राजाश्रय लाभल्यामुळे त्यांना पोट भरण्याची चिंता नव्हती. भरल्यापोटी साहजिकच मनुष्य प्रयोगशीलतेकडे वळतो. त्यामुळेच महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, कथाकाव्य, स्तोत्र, चंपूकाव्य अशा अनेक प्रकारात पंडित कवींनी लेखन केले. संस्कृतचा डौल मराठीत प्राप्त करून देण्याचे श्रेय सर्वस्वी पंडित कवींचे आहे. त्यांना पंडित्यप्रदर्शनाचा सोस होता. त्यांनी आपल्या काव्यात 'शृंगार मुख्य नवही रस मूर्तिमंत' ही भूमिका घेऊन जाणीवपूर्वक नवरसांची निर्मिती केली आहे. घडवून याची त्याची प्रेरणा आहे मुळाक्षणावर व प्रसंगावर म्हणजेच आरसे सामग्रीवर कलापूर्ण संस्कार केल्यानंतर निर्माण झालेले विद्ग्ध काव्य म्हणजे पंडित एक काव्य होय.

पंडित काव्य हे 'अभिजात संस्कृत काव्याचे पुनरुज्जीवन आहे' असे म्हटले जाते. पंडिती काव्याची प्रेरणा हे कवित्वाचा विद्वज्जन्य आस्वाद घेणे हीच आहे. रसिकता आणि व्युत्पन्नता यांचा पंडित कवींवर प्रभाव होता. पंडित कवी हे व्यवसायने पुराणिक होते. त्यातील काही कवींना राजाश्रय लाभलेला होता. शांत, निकोप निरामय आणि संपन्न जीवन हे कवी जगत होते. त्यामुळे सामान्यांच्या जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्र्य, विवंचना त्यांच्या नशिबी नव्हते. त्यांना संताप्रमाणे लोकोद्धारही करायचा नव्हता. म्हणून पंडिती काव्याचे ते विषय कधीच बनले नाहीत. पंडित कवींनी मुख्यतः रामायण, महाभारत, श्रीमद् भागवत, पुराणे, रघुवंश, कुमारसंभव, शाकुंतल यासारख्या सर्व प्रकारच्या लौकिक विषयांना आणि रसांना स्थान देणाऱ्या महाकाव्यातून आणि नाटकातून आपल्या आख्यानकाव्यासाठी विषय घेतले. रसिक जणांच्या मनाला भावणारे, त्यांचे रंजन करणारे, त्यांच्या भाववृत्तीलाच चेतविणारे विषय, घटना- प्रसंगाची रचना करण्यात पंडिती कवींचा हातखंड होता. संस्कृत गणवृत्तात लिहिलेल्या आख्यानपर रचनेस त्यांनी प्राधान्य दिले. डौलदार भाषा, तंत्रबद्धता, विविध वृत्तांचा स्वैर वापर हे वैशिष्ट्ये पंडिती काव्य जागोजागी दिसून येतात. बहुतांश पंडित कवींना राजाश्रय लाभला असल्यामुळे त्यांना पोट भरण्याची चिंता नव्हती. साहजिकच भरल्यापोटी मनुष्य प्रयोगशीलतेकडे वळतो. त्यामुळेच महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, कथाकाव्य, स्तोत्रे, चंपूकाव्य असे अनेक प्रयोग पंडिती काव्यामध्ये दिसून येतात. संस्कृतमधील अलंकाराचे वैभव, वृत्तरचना, मराठीत प्राप्त करून देण्याचे श्रेय सर्वस्वी पंडित कवींची आहे. पंडिती कवींचा पांडित्यप्रदर्शनाचा सोस त्यांच्या काव्यात मुख्यत्वे दिसून येतो. संत काव्यप्रमाणे निवृत्तीपर आणि भक्ती, शांतरसाचा आविष्कार करणारे पंडिती काव्य नाही तर नवरसांचा आविष्कार घडविण्याची त्यांची प्रेरणा आहे. मुळ आख्यान काव्यातील घटना- प्रसंगावर म्हणजेच आर्षसामग्रीवर कलापूर्ण संस्कार केल्यानंतर निर्माण झालेली विद्ग्धकाव्य म्हणजे पंडिती काव्य होय. संतांनी भक्ती, करूण, अद्भुत, वत्सला आणि शांतरसाला प्राधान्य दिले तर पंडितांनी ' शृंगार मुख्य नवही रस मूर्तिमंत काव्यात या परसता दिसती प्रशस्त ॥' असे मानले. पंडित एक कवितेमध्ये जाणीवपूर्वक वृत्तबद्धयोजना, अलंकारिकता, दीर्घ सामासिकता तंत्रबद्धता यांनीयुक्त कलात्मक आणि वस्तुनिष्ठ स्वरूपाची रचना हे पंडित कवितेचे वैशिष्ट्ये होते. त्यांच्यासमोर साक्षर, अभिजात, व्युत्पन्न, बुद्धिमान, विद्वान, श्रीमंत आणि सरंजामदार वर्ग श्रोता होता.

## २ आ.२.४ पंडिती साहित्य प्रेरणा

पंडितांनी आपल्या काव्यातून केलेले आवाहन हे भावनेपेक्षा बुद्धीला अधिक होते. त्यामुळे पंडितांनी अलंकारिकतेचा हव्यास काव्यात धरला. त्यानी विविध प्रकारच्या रचनापद्धती काव्यात आणल्या. तंत्रबद्धतेला अतिरेकी महत्त्व दिले. चमत्कृतीपूर्णतेत पंडिती कविता रमली. संस्कृत प्रचूरता अधिक असल्याने सर्वसामान्यांना ही कविता समजली नाही. त्यामुळे पंडिती काव्य कलात्मक झाले तसेच ते क्लिष्टही झाले.

पंडिती कवी कोणत्याही एका विचारसरणीशी, तत्त्वज्ञानाशी अथवा संप्रदायाची बांधील नव्हते. त्यामुळे पंडितांनी केवळ कला आणि कलाविष्काराला महत्त्व दिले. तत्कालीन असलेले विद्वान, पंडित, बुद्धीवंत यांना समोर ठेवून काव्यलेखन केले. पंडिती काव्याचा श्रोतृवर्ग ही असाच व्युत्पन्न, संस्कृतचा मर्मज्ञ होता. बहुजन समाजाशी पंडितांना काहीच देणे घेणे नव्हते. त्यामुळे त्यांच्याकडून सर्वसामान्यांना समजेल, रूचेल आणि या सर्वसामान्यांच्या आकलनाच्या कक्षेत येईल अशी रचना पंडिताकडून झाली नाही.

पंडिती साहित्य संस्कृत वाङ्मयाच्या धर्तीवर लिहिलेले आणि संस्कृत वाङ्मयाच्या छायेतील वाङ्मय आहे. या पंडित कवींसमोर संस्कृतीचा जाणकार वाचकवर्ग होता. त्यांच्यासमोर संस्कृतमधील प्रसिद्ध असलेल्या रामायण, महाभारत, श्रीमद्भागवत, भगवद्गीता, नलदमयंती स्वयंवर, दुष्यंत-शकुंतला, श्रीकृष्ण रुक्मिणी स्वयंव, अर्जुन - सुभद्रा कथा यांचा आदर्श होता व त्यांचाच आधार काव्यनिर्मितीसाठी त्यांनी घेतला व त्यांचीच नावे आपल्या ग्रंथाना दिलेली आढळतात.

पंडित कवींना सामाजिक, राजकीय आश्रय लाभलेला होता. पंडित कवींपैकी अनेकांचा व्यवसाय हा पुराणिकाचा होता. त्यामुळे त्यांना रचनेसाठी हवे असलेले सामाजिक, मानसिक स्वास्थ विपुल प्रमाणात लाभले होते. काव्यशास्त्रामध्ये पारंगत असा हा पुराणिकांचा वर्ग होता. या पंडितांनी काव्यशास्त्राचा अभ्यास केलेला असल्याने आपल्या काव्यात विविध प्रयोग करणे पंडितांना सहज शक्य झाले. त्यांनी आपल्या काव्यात विविध प्रयोग केले.

पंडित कवींनी संस्कृतातील विविध रसपूर्ण विषयावर आपल्या प्रतिभेने कलात्मक संस्कार केले. त्यामुळे मराठीत एक नाविन्यपूर्ण पंडिती काव्याचा प्रवाह सुरू झाला. त्यातून त्यांनी जाणीवपूर्वक नवरसांचा आविष्कार केला आहे. संत साहित्यात भक्ती आणि शांत या रसांचा आविष्कार झालेला दिसून येतो. परंतु पंडित कवींनी शृंगार, वीर, करूण, हास्य इत्यादी 'शृंगार मुख्य नवरस मूर्तिमंत' याप्रमाणे नऊ रसांचा जाणीवपूर्वक आविष्कार आपल्या काव्यातून केला आहे. त्याचबरोबर पंडिती काव्याच्या प्रवाहात विविधता आणि व्यापकता आहे. त्यांनी महाकाव्य, खंडकाव्य, चंपूकाव्य, लघुकाव्य, कथाकाव्य आरत्या, पदे, स्तोत्रे, चरित्रे इ. नव्या रचनाप्रकारांची मराठी साहित्यात भर घातली. त्यामुळे मराठी साहित्याचे दालन समृद्ध होण्यास हातभार लागला आहे.

## २आ.२.५ पंडिती कवितेचे गुण आणि दोष

**गुण:**

(१) पंडिती कवी कोणत्याही तत्त्वज्ञानाशी, विचारसरणीची अथवा संप्रदायाची बांधील नव्हते. त्यामुळे त्यांनी कला आणि कलाविष्कारालाच प्राधान्य दिले.

(२) पंडिती कवींनी संस्कृतीच्या धर्तीवर रचना केल्यामुळे त्यांनी मराठी भाषेला संस्कृतचा डौल आणि दिमाख मिळवून दिला. मराठी भाषा संस्कृतपेक्षा रेषभर ही कमी नाही हे सिद्ध केले.

(३) प्रयोगशीलता हा पंडित कवितेचा एक गुण आहे. त्यांनी विविध रचनाप्रकारांचा आधार घेतला आणि विविध नव्या साहित्यप्रकारांची निर्मिती केली. त्यात - महाकाव्य, खंडकाव्य, लघुकाव्य, कथाकाव्य, श्लोक, स्तोत्र, चंपूकाव्य असे अनेक प्रयोग त्यांनी केले.

(४) व्यापकता आणि विस्तृतता हा पंडिती काव्याचा एक गुण आहे. अनेक पंडित कवींना सामाजिक आणि राजकीय आश्रय लाभलेला होता. पंडित कवींमधील अनेकांचा पुराणिकाचा व्यवसाय होता. त्यामुळे लेखनासाठी हवे असलेले सामाजिक - मानसिक स्वास्थ्य त्यांना लाभलेले लाभले. ते काव्यशास्त्रात पारंगत होते. त्यामुळे त्यांच्या काव्यात विविध प्रयोग करणे त्यांना सहज शक्य झाले. त्यामुळे या काव्यात विविधता व व्यापकता आली.

(५) विविध रसांचा जाणीवपूर्वक वापर हा पंडित एक काव्याचा आणखी एक गुण आहे. पंडितापूर्वीच्या काव्यामध्ये भक्तीरस, शांतरस, अद्भुतरस आणि वत्सलरस मोठ्या प्रमाणात होता परंतु पंडित कवींनी 'शृंगार मुख्य नवरस मूर्तिमंत' ही भूमिका घेऊन शृंगाररस, वीररस, करूणरस हास्यरस इत्यादी नवरसांची जाणीवपूर्वक निर्मिती केली.

**दोष:**

(१) पंडिती कवींनी आपल्या काव्यातून भावनेपेक्षा बुद्धीला अधिक आवाहन करणारी रचना केली.

(२) पंडिती कवींनी आलंकारिकता, तंत्रबद्धता, चमत्कृतीपूर्णता, संस्कृतप्रचुरता, पांडित्यप्रदर्शन, दीर्घ सामासिक शब्द यांना अतिरेकी महत्त्व दिले. त्यामुळे सर्वसामान्य निरक्षर लोकांना ही कविता फारशी समजली नाही. परिणामी ती कृत्रिम, कलात्मक आणि क्लिष्ट झाली.

(३) पंडिती कवींनी तत्कालीन विद्वान, पंडित, व्यासंगी आणि संस्कृत मर्म डोळ्यासमोर ठेवून लेखन केल्यामुळे बहुजन वर्गाची त्यांनी फारशी तमा बाळगली नाही. त्यामुळे त्यांच्याकडून बहुजन समाजाला रुचेल, पटेल, समजेल आणि सर्वसामान्यांच्या आकलनाच्या कक्षेत येईल अशी रचना पंडिताकडून झाली नाही.

(४) पंडिती काव्यामध्ये स्वराज्यात - पेशवाईतील अनेक उलाढाली झाल्या पण त्याचे जाणीवपूर्वक वर्णन आले नाही.

## २आ.२.६ सामराज - (इ.स.१६०८ - १६८८)

**सामराजांचा जीवनपरिचय:**

सामराजांच्या वंशाचे मूळपुरुष 'श्री मुद्गलाचार्य गोसावी' हे असून या वंशातील तेरावा पुरुष लक्ष्मण यास दोन बायकांपासून दोन मुलगे होते. वडील पत्नीचा मल्हारगड व धाकटीचा श्यामभट होय. मल्हाररावांपासून साताराच्या पंडितरावांची शाखा सुरू झाली व श्यामभटापासून कोल्हापूरच्या राजोपाध्यांच्या शाखेला आरंभ झाला कोल्हापूरच्या शाखेत प्रथम पन्हाळकर असे नाव होते व ते या श्यामभटापासूनच पडले. हा श्यामभट म्हणजे मुद्गलाख्यानाचा व रुक्मिणीहरणाचा कर्ता श्यामराज. सामराजांचे घराणे ऋग्वेदी, आश्वलायन सुत्री, शाकल्य गोत्राचे आहे. तुळजापूरची देवी व जेजुरीचा 'मल्लारी' ही या घराण्याचे कुलदैवत आहेत. आर्वीचा मुद्गलेश्वर हाही त्यांचे कुलदैवत किंवा कुलस्वामी आहे.

या घराण्याचे मूळ पुरुष मुद्गलाचार्य गोसावी हे उदेपूरच्या भोसले घराण्याचे पुरोहित होते असे म्हणतात. शिवाजी महाराजांचे पणजे बाबाजी भोसले यांच्याबरोबर श्यामभटाचे आजे मल्हारभट हे होते. त्यांचे पुत्र लक्ष्मणभट हे मालोजीबरोबर फिरत असताना श्यामभट यांचेबरोबर होते. राज्याभिषेकापूर्वी शिवाजी महाराजांनी बाळंभट नावाच्या ब्राह्मणाची पूजा केल्याचा उल्लेख सभासदी बखरीत आला आहे. या बाळंभटास श्यामभटाचे वंशातील रामेश्वरभटाचे चिरंजीव प्रभाकरभट यांनी दत्तक घेतले होते. हे दत्तकपत्र शके १५९६ मधील आहे. या कागदावर साक्षीदारांच्या सह्यांत श्यामभटाची सही आहे. यावरून ते शिवाजी महाराजांचे दरबारी गेले असावे असे दिसते.

मुद्गलाख्यानात सामराजाने एक 'तीर्थयात्रा' प्रकरण घातले आहे. या तीर्थयात्रेचे इतके सुसंगत वर्णन कवीला स्वतः यात्रा किंवा प्रवास केल्याशिवाय करता येणार नाही. पुढे श्यामभट राजाराम महाराजांबरोबर पन्हाळ्यास गेले व त्यावरून त्यांना पन्हाळकर हे नाव पडले. शेवटी ते राजाराम महाराजांबरोबर सिंहगडास गेले व तेथे त्यांचा अंत झाला. भोसले वंशातील बाबाजी, मालोजी व शहाजी यांचे समकालीन त्यांच्या उपाध्यायांचे वंशातील मल्हारभट, लक्ष्मणभट व लक्ष्मणभटाचे चिरंजीव मल्हारभट हे अनुक्रमे होते. हे सरासरीने समवयस्क मानण्यास हरकत नाही. अशी माहिती गो. रा. राजोपाध्ये यांच्या मुद्गलाख्यानाच्या प्रस्तावनेत आली आहे.

गो. रा. राजोपाध्ये यांच्या मताहून प्र. धो. कानिटकर यांचे मत किंचित निराळे आहे. सामराजाच्या कालनिर्णयासाठी त्यांनी त्यांच्या काव्यातील अंतर्गत प्रमाणांचा आधार प्रामुख्याने घेतला असून त्यांच्या अभ्यासाचा निर्णय असा आहे की, सामराज, तुकाराम, रामदास, वामनपंडित, नागेश, जयराम पिंड्ये व शिवभारतकार परमानंद यांचा समकालीन ठरतो.

यासंबंधी सामराजाचे आणखी एक अभ्यासक प्रा. द. सी. पंगु यांचे मत असे आहे की, "सामराज वामनाचा समकालीन असून त्याने पंडिताची काव्यकृती पाहिली असावी.'' यास अनुसरून श्री. राजोपाध्ये यांनी गीताचंद्रिके वरून शके १६०५ हा जो त्याचा कालखंड ठरविला आहे तोच ग्राह्य ठरतो. अर्थात शके १६०५ हा सामराजांचा उतारवयाचा काळ होय. हे लक्षात घेतले पाहिजे. तस्मात शके १५५० - १६०० या काळात सामराजाने आपले 'रुक्मिणीहरण' रचिले असावे. ( पंगु द. सी. - सामराज प्रथमावृत्ती पृ. ५९) तात्पर्य, सामराज हा कवी 'सारस्वत' कार मानतात त्याप्रमाणे शाहूकालीन नसून शिवकालीन असावा असे दिसते. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी राजे आणि राजाराम या तिघांच्या कारकिर्दी पाहिल्या आहेत. त्याला दरबारातील रीतिरिवाजांचा, लोकव्यवहाराचा चांगला परिचय असल्याचे जाणवते.

### २आ.२.६.१ सामराजाचे ग्रंथलेखन:

सामराजाचे 'मुद्गलाख्यान' आणि 'रुक्मिणीहरण' हे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत. या दोन काव्याच्या कर्तृत्वासंबंधी प्र. धो. कानिटकर यांनी त्यांच्या स्वरूपावरून शंका घेतली. पण गो. रा. राजोपाध्ये यांनी दोन्ही काव्यातील भाषा पद्धतीच्या साम्यावरून व दोन्ही ठिकाणी येणार्या कवीच्या 'सामराज' या नावावरून हे काव्य एकाच कवीचे आहेत, असा निर्णय दिला असून तो आता सर्वमान्य झाला आहे.

### २आ.२.६.२ मुद्गलाख्यान:

मुद्गलाख्यान हे सामराजाचे पहिलेच काव्य आहे. यात २६१ श्लोक आले आहेत. अंगिरस गोत्रातील वेदपारंगत विख्यात मुनी मुद्‌गल यांची कथा यात आली आहे. मुदगल हे सामराजाचे कुलदैवत. कुलदेवतेच्या लेखनाने आपल्या काव्यरचनेस प्रारंभ करावा असा त्यांचा हेतू होता. मुद्‌गल मुनींच्या तपःसामर्थ्यामुळे व दानशीलतेमुळे इंद्रादी देवांना भीती उत्पन्न होते. ते यमराजाला त्यांची सत्त्वपरीक्षा घेण्यास पाठवतात. दुष्काळात अन्नान्नदशा झालेल्या अवस्थेत दिवस कंठणाऱ्या मुद्‌गल कुटुंबात यमराज अतिथी म्हणून प्रवेश करतात आणि त्यांची परीक्षा घेतात. त्या परीक्षेत मुद्‌गलमुनी व त्यांचे कुटुंबीय यशस्वी होते. अशी या आख्यानाची कथा आहे.

आपल्या कुलदैवताचाच हा गुणानुवाद असल्याने सामराजाने हे काव्य मोठ्या भक्तिभावाने लिहिले आहे. भाषासौष्ठव वा कल्पनावैभव याबाबतीत 'रुक्मिणीहरण' एवढे हे काव्य सरस नसले तरी सामराजांच्या मनातील भक्तीभावामुळे 'मुद्गलाख्याना' ची रचना अधिक हृदयंगम वाटते.

सामराजांनी या ग्रंथात वर्णाश्रमधर्माचा पुरस्कार केला आहे. तसेच मोक्षासाठी गृहस्थाश्रमधर्म महत्त्वाचा असल्याचे सामराजाने सांगितले आहे. मुद्गलाख्यान या ग्रंथात मुद्गलाची दिनचर्या आली आहे. मुद्गलयात्रेस निघाल्यानंतर पशूपक्ष्यांची झालेली विकल अवस्था मोठ्या बहारीने वर्णन केली आहे.

### २आ.२.६.३ रूक्मिणीहरण:

'रूक्मिणीहरण' या ग्रंथाची कथा श्रीमद्‌भागवताच्या दशमस्कंधावर आधारलेली आहे. या स्वयंवरकाव्याची रचना आठ सर्गात महाकाव्यासारखी असून श्लोकसंख्या ११४० आहे. अध्याय संख्या ५२- ५३ आहे. रूक्मिणीहरण हे काव्य सामराजाने संस्कृत विदग्ध महाकाव्याच्या आदर्शानुरूप लिहिले आहे. महाकाव्याच्या व्याख्येनुसार याचे आठ सर्ग असून सर्व सर्ग मुख्यतः उपजाती वृत्तात लिहिले आहेत. काव्याचा प्रारंभ मंगलाचरणाने करून ठिकठिकाणी प्रसंगोपात्त नगरवर्ण, ऋतूवर्णन, नायक नायिकांचे वर्णन, नायिकाविरह, राजसभा वर्णन इत्यादी वर्णने केली आहेत. अशाप्रकारे काव्याचे बाह्यांगही महाकाव्य अनुरूप सजविणारा सामराज हा मध्ययुगीन काळात झाला.

## २आ.२.७ रघुनाथ पंडित

रघुनाथ पंडित हे समर्थ रामदासांचे समकालीन मानले जातात. त्यांच्याविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही. हा रघुनाथ पंडित कोण विषयी पाच मते आढळतात. त्यापैकी

१) ज. रा. आजगांवकर व शणै गो. यं. बाब यांच्या मते, दमयंती स्वयंवराच्या कारवार प्रतीत शेवटी 'कथा ऐसी चंदावरकर रघुनाथचि करी' असे उद्गार आढळतात तसेच त्यांच्या काव्यात काही कोकणीतील शब्द आढळतात. या आधारे हा कवी कारवारकडील चंदावरचा सारस्वत ब्राह्मण असावा.

२) विष्णुशास्त्री चिपळूणकर, अ. सी. साठे, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. भ. श्री. पंडित यांच्या मते,

रघुनाथ पंडित तंजावरचा असला तरी तो शिवकालीन कवी नसून उत्तर पेशवाईतील कवी आहे अर्थात मोरोपंतांचा समकालीन आहे.

३) स. ल. कात्रे यांच्या मते, हा कवी मूळचा चौल जिल्हा कुलाबा (आताचे रायगड) येथील मनोहर कुळात जन्मलेला असून पुढे तो कारणपरत्वे कर्नाटक प्रांतात जाऊन तेथे स्थायिक झाला. या रघुनाथ पंडित आणि वैद्यविलास, कवीकौस्तुभ, छंदोरचनावली, चिकित्सामंजिरी व नाडीज्ञानविधी ही वैद्यक व साहित्य विषयक प्रकरणे संस्कृत भाषेत रचलेली असून दमयंती स्वयंवराचा कर्ताही तोच आहे. (सह्याद्री मे व जुलै १९५१) या संस्कृत ग्रंथाचा परिचय डॉ. गोडे व श्री कात्रे यांनी करुन दिला असून (पूना ओरिएंटॅलिस्ट १ - ७, ८ - ११) त्या वरून या पंडित कवीच्या पित्याचे नाव भिकंभट व पितामहाचे नाव कृष्णपंडित होते असे दिसते. चौलचा उल्लेख तो 'चंपावतीपुर' असा करतो. याशिवाय त्याने जगन्नाथ पंडिताच्या 'गंगालहरी' वरही एक मराठी टीका लिहिल्याचे कात्रे सांगतात. (विसंभंवा १९६९पृ. ९२) या 'मनोहर' पक्षास श्री. य. ग. फफे यांचा पाठिंबा असून त्यांच्या मते, कोणत्याही रघुनाथांपेक्षा रघुनाथपंडित मनोहर हाच दमयंती स्वयंवराख्यानाचा कर्ता मानण्यास सबळ प्रमाणे (पुरावे) आहेत. त्याच्या शतांशहि पुरावे इतर कोणत्याही रघुनाथास नाहीत. (सह्याद्री मार्च १९३८)

४) श्री. अ. का. प्रियोळकर यांनी आपल्या दमयंतीस्वयंवरामध्ये रघुनाथ पंडित हे शिवाजी हे महाराजांच्या अष्टप्रधानांपैकी न्यायशास्त्री पंडितराव पदारूढ रघुनाथ पंडित हे असून मूळच्या तंजावरच्या या देशस्थ ब्राह्मणास शहाजीराजांनी शिवाजी महाराजांकडे पाठवले होते.

५) प्रा. द. सी. पंगू यांच्या मते, नलोपाख्यानकार रघुनाथ पंडित म्हणजे शिवाजी महाराजांच्या पदरचे 'राज्यव्यवहारकोश' कार रघुनाथ नारायण हणमंते हे होत. श्री प्रियोळकर व प्रा. द. सी. पंगु यांची परस्पर विरोधी आहेत. दोघांच्याही विचारसरणीत काही कच्च्या जागा आहेतच. इतके मात्र खरे, की हा कवी तंजावरचा होता व तो राजकारणपटुही होता. रघुनाथ पंडित हे वामन पंडिताचे समकालीन होते. रघुनाथ पंडित रामदासांना गुरु मानतात. तेव्हा ते त्यांच्यापेक्षा वयाने लहान असावेत परंतु त्यांनी काव्यग्रंथ नक्की केव्हा लिहिले? ते सप्रमाण दाखवता येत नाही. त्यामुळे पारंपरिक मताला धरून ते आनंदतनयाच्या थोडसे नंतरचे असावेत. असे सांगतात की, आनंदतनयाच्या मुलास रघुनाथपंडितांची मुलगी दिली होती. म्हणजे ते दोघे व्याही व्याही होते. परंतु लेखनकाळदृष्ट्या इ. स. १६८० च्या आसपासचा त्यांच्या काव्यकृतीचा विचार करणे बरे. (कारण रघुनाथपंडिताचा कालखंड ठरविताना खूपच मतभिन्नता आहे. निबंधमालाकार चिपळूणकरांनी रघुनाथ पंडितास पेशवाईतील कवी म्हटले असून (विज्ञावि.२. ६४. ४) या मताला डॉ. वि. भि. कोलते व प्रा. भ. श्री. पंडित यांचा पाठिंबा दिसतो. नलोपाख्यानाची रचना डॉ. कोलते यांच्यामते, इ. स. १७७४ – १८२१ च्या दरम्यान केव्हातरी झाली. (फुलोर पृ.३१) प्रा. भ. श्री. पंडित इ. स. १७३५ - १७९८ रघुनाथ पंडितांचा काळ मानतात व त्यास मोरोपंतांचा समकालीन ठरवतात. (संतसमागम, क्रमांक- ८) वि. का. राजवाडे त्याचा कालखंड शके १५८२ – १६४३ असा देऊन त्यास रामदासकालीन ठरवतात. (ग्रंथमाला, निवडकनिबंध पृ. ७ )

**२आ.२.७.१ रघुनाथ पंडिताची ग्रंथसंपदा:**

* रामदासवर्णन

* गजेंद्रमोक्ष

* दमयंतीस्वयंवर

**२आ.२.७.२ रामदासवर्णन:**

हे त्यांचे पहिलेच काव्य असून या आपणास लोक आले आहे. हे ठराविक पद्धतीचे गुरुस्तोत्र आहे. रघुनाथ पंडित मोठे समर्थभक्त होते व समर्थांच्या आज्ञेवरून त्यांनीच शके १६०३ मध्ये तंजावरहून रामलक्ष्मणाचा मूर्ती सज्जनगडावर पाठवल्या होत्या. रामदासवर्णनाचे श्लोक अवघ्या अकरा असून त्यात रामदासांच्या 'डोंगरी गिरींदरी' फिरण्याचा, त्यांच्या कपाळावरील आवळाचा व ते नेहमी 'लेखणीसहित कागद दौती' बरोबर ठेवीत असा उल्लेख आहे.

### २आ.२.७.३ गजेंद्रमोक्ष:

गजेंद्रमोक्ष हे अनेकवृत्तात्मक काव्य आहे. हे श्रीमद्भागवतवरील एक प्रकरण आहे. याची रचना विविध वृत्तात्मक आहे. यातील हे तीन पदे चांगली आहेत. 'प्राणविसाव्या रामा येशील कधी' हे पद एक भक्तिरसपूर्ण धावा आहे. 'घोर हे उपेक्षा माझी' हे पद तर आर्त मनाचे कळवळून निघालेले उद्गार आहेत. ही पदे अर्थातच गजेंद्राच्या करूण विणवण्याची आहेत. त्या मानाने 'श्रीहरिधणि वरि देखिला, मनिं रेखिला' हे पद उत्तम नजरेस भरणारे व आंदोलित गतीचे आहे. रघुनाथ पंडित यांच्या गजेंद्रमोक्षात अनेक वर्षे गजराजाबरोबर क्रीडा करणारे 'सखे माये भाचे चुलत - पुतणे आणि चुलते' असले दूरचे आणि जवळचे सर्व आप्तेष्टमित्र विषम समय येतांच क्षणात निघून गेलेले पाहून त्या गजेंद्राने काढलेले उद्गार आले आहेत.

रामदासवर्णन आणि गजेंद्रमोक्ष हे स्फूट पदे वेगळी उपलब्ध नसून 'दमयंती स्वयंवर' या आख्यानकाव्यातच मधून मधून गुंफलेली आहे.

### २आ.२.७.४ दमयंतीस्वयंवर:

रघुनाथ पंडित यांची कीर्ती त्यांच्या 'दमयंतीस्वयंवर' या काव्यामुळे सर्वत्र झालेली आहे. हे काव्य लिहित असताना त्यांच्यासमोर श्रीहर्ष कवीचे नैषेधचरित्र हे काव्य होते त्याला समोर ठेवूनच रघुनाथ पंडितांनी दमयंतीस्वयंवर हे काव्य लिहिले आहे. दमयंतीस्वयंवरामध्ये परंपरागत संहितेप्रमाणे ओव्या, घनाक्षऱ्या - पदे यासह २५३ पद्यबंध आहेत. संशोधित आवृत्ती मध्ये २५४ पद्यबंध आहेत पण वेगवेगळ्या पद्यबंधाच्या संख्येत फरक आहे. उदा. पारंपारिक पाठात शार्दूलविक्रीडित १४, दिंड्या किंवा दंड्या ७२, वसंततिलका ७६, पदे ६, ओव्या - घनाक्षऱ्या ३१ आहेत. तर संशुध्द प्रतीत शार्दूलविक्रीडित १२, दिंड्या किंवा दिंडीत ६६, वसंततिलका ७८, पदे १५ ओव्या - घनाक्षऱ्या २८ आहेत. मुख्यत्वे पदे नव्या संशोधित आवृत्ती जास्त आहेत, हे विशेष होय. नव्याने उपलब्ध झालेले हस्तलिखित प्रतीत दंडी, ओवी, पदे, गीति, सवाई, चूर्णिका इतक्याचा नामनिर्देश असून बाकी संस्कृत वृत्ताचा केवळ श्लोक म्हणून उल्लेख आहे. संस्कृत धाटणीच्या वृत्तांत वामन पंडिताचे सौष्ठव यात नाही पण समग्र वातावरणामुळे दमयंती स्वयंवर फार लोकप्रिय झाले आहे. यातल्या पदांपैकी तीन पदाच्या मात्रिक मोडणीवरून नव्या जातीसंज्ञा रूढ झाल्या आहेत. ती पदे अशी : नीज न ये नळराजया... शशिचारू मुखीच तया पुसे 'यातल्या अंत्य ओळीतल्या शब्दावरून जाति 'शशिचारूमुखी 'ही सज्ञा आली' हंस धराया लागली हे भागली स्तविली रघुपति पंडितें कृति मंडिते 'यातल्या कृतिमंडिते वरून जातिनाम' 'कृतिमंडिते' हे नव्याने प्रचारात आले. नळ नवरा मी नोवरी काय होईल ऐसे... करिती कलरव बंभरी उदरंभरी यातील बंभरी जातिमान बनले आहे. या सर्व पदातील रचना डौलदार व खटकेदार आहे. आणि आताच्या काळात ही काहीशी संस्कृतनिष्ठ वाटली तरी एकंदरीत प्रासादिक आहे. या पदास शिवाय 'हर हर सापडलों सापडलों, सरसाकृती पद शिरसाचे' आणि विशेषतः तया वनीं खेळे राज (भूप) सुता, ही पदे सुरस आहेत आणि कीर्तनात गायला अगदी योग्य आहेत. त्यातही लयबद्ध खटके आहेतच. त्यातल्या 'कथा बोलूं हे मधुरसुधा धारा' यासारख्या दिंड्याही सुधा रसासारख्याच मधुर असल्यामुळे लोकांच्या तोंडी सहज खेळतात.

आधीच नल - दमयंतीचे आख्यान हे फार सरस आहे आणि ते आज हजारो वर्षे महाराष्ट्राच्या मनाला आनंद आणि विसावा देत आहे. पांडव आपल्या वनवासाचा दुःखमय काळ कंठीत असताना बृहदश्व ऋषीच्या भेटीस गेले. त्यावेळी धर्मराजाने आपल्या दुःखाची कहाणी त्यांच्याजवळ गाऊन' माझ्या इतका कष्टी प्राणी तुमच्या पाहण्यात कधी आला आहे काय?', 'असले काबाडकष्ट तुमच्या ऐकण्यात तरी कोणी कधी काढले आहेत काय?' असा त्यास प्रश्न केला. याप्रमाणे त्या सत्वशील राज्याचे मन दुःखसागरात बुडू लागलेले पाहून त्याला आधार व्हावा म्हणून ही नळ राजाची कथा बृहदश्व ऋषींनी त्यास सांगितली. या करुणरसप्रधान कथानकात पहिला नल दमयंतीच्या विवाहाचा तेवढा गोड भाग घेऊन त्यावर हे काव्य पंडितांनी रचले आहे. हे कथानक महाभारतकाळीही अगदी जुने वाटले जाण्याइतके ते प्राचीन आहे. त्यात विष्णू, शंकर, गणपती वगैरे देवांचाही उल्लेख नसून इंद्र, वरुण, अग्नी वगैरे देवाचा उल्लेख आहे व ते स्वयंवराला आले आहे. इतक्या प्राचीन कथानकातल्या कल्पना महाराष्ट्रीयांच्या अगदी आवडत्या असाव्यात हे साहजिक आहे. आणि हा कथाभाग सांगताना रघुनाथ पंडितांनी स्वभाववर्णन फार मार्मिकपणे केली आहे त्यामुळे या काव्यात विशेषच गोडी आली आहे.

या स्वयंवरात 'उपवनजलक्रीडा' करण्यासाठी जमलेले शाळूसोबती त्यातला एक हंस नळराजाने पकडताच सर्व 'वेगळाले पळाले' हे पाहून त्या पकडलेल्या हंसाचे 'कठीण समय येता कोण कामास येतो!' हे उद्गार किती नित्यातल्या परिचयाचे आहेत ! या जगाच्या रहाटींत याचा कठीण अनुभव कोणाला येत नाही! पैशाचा झरा चालू आहे तोपर्यंत जिवापेक्षाही जास्त म्हणविणारे इष्टमित्र, पैशाचा हात जरा आखडतांच किंवा तो आखडेल असे वाटताच कसे दूर होतात व दुश्मन बनतात, याचा प्रत्यय कोणाला नाही ! तसेच, जमलेले सखे सोयरे दूर उडाल्यावर हाती सापडलेला हंस आपल्या सोडवणुकीसाठी नल राजाच्या अनेक विनवण्या करतो, हाही प्रसंग चांगला साधला आहे.

प्रथम तो पक्षी राजाला आपल्या बरोबरीच्याशी सामना करून थोरपण मिळव. मला पाखराला धरण्यात काय भूषण ! असे म्हणून त्याला चढवू पाहतो. ते नीट जमेना तेव्हा आपली म्हातारी आई आणि लहान लहान 'साता दिसांची पिले' याची दीन दशा सांगून त्यांची करुणा भाकतो. त्यातही स्त्रीला पुढेमागे मुलाचा आधार होईल व विसर पडेल पण म्हातारीला माझ्यावाचून काहीच आधार नाही आणि तिचे काळीज पोळून जाऊन ती मरेलही, असे सांगतो. पण या अशा दैन्याच्या कहाणीने राजा थोडाच वळणार ! गरीब जरी प्राण्यांच्या दुःखाचे त्याला काय? राजाच्या मनाला दयेचा पाझर मुळीच येत नाही. असे पाहून पक्षी म्हणतो, 'राजा तुझ्या सदयतेची व मोठेपणाची कीर्ती ऐकून व त्यावर विश्वसून मी येथे सहज क्रीडा करायला आलो आणि या अशा

मजही वध कराया घातकी पातला जो।

वरूनि पति असा ही भूमि कैसी न लाजो !

हे मर्मभेदक शब्द बोलतो. या उघड तिरस्काराचा पण आतून भरलेले ओतप्रोत प्रेम असतो तिचा बरोबर परिणाम होऊन राजहंसाचा कार्यभाग सहज साधतो, ही चित्र स्वाभाविक आणि खुबीदार आहे.

तो सुंदर राजहंस पाहून त्याला धरून इच्छिणारी दमयंतीबरोबर 'सखीचा मेळ' असता त्यास युक्तीने दूर ठेवते. अल्लड स्वभावाने त्यांच्यावर रागावते, हे ही वर्णन अगदी स्वाभाविक आहे. दमयंतीचे रूप, तिचे पदर सावरून सुटसुटीत होणे, तिला नेण्याकरिता त्या पाखरांच्या युक्त्या, हे प्रसंग लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांना आवडतील असेच आहेत.

इंद्राचा दूत म्हणून परोपरीची शोभा पाहत तो... ... ।

राजा जाय अंतः पुरी । तेथे देखिली सुंदरी । कामसोमपौर्णिमा ॥

सुमनशेजेच्या पलंगी । सखि बैसलीसे तन्वंगी ॥

सख्या खेळताति संगी । बहू अप्सरा त्या जैशा ॥

आणि मग प्रकट तिज पुढारां जाहला राजराजमौळी ।

पदर वरि न घेतां हार जैसा झळाळी ।

निजहृदयनिवासी काय बाहीर आला ।

निरखुनि दमयंती तेंवि मानी तयाला ॥

तेव्हा गजबजोनि समस्त तिच्या सख्ख्या । गजगमा उठल्या तिच्यासारख्या ॥

पदर सांवरितां नृपबाळिका । झळकती हृदयीं मणिमाळिका ॥

हे सर्व वर्णन गोड आहे. थोरांच्या मुलींला शोभेल असा साधा स्वभाव, बालपणाला योग्य असे वर्तन आणि कोणालाही कौतुक वाटेल असले शब्द, याच्या योगानें पंडितांची ही दमयंती फारच शोभते. स्त्रीजातीच्या नाजूकपणाला गैरवाजवी असे उच्छृंखल वर्तन पंडितांच्या दमयंतीला ठाऊकदेखील नाही. अगदी स्वयंवराच्या वेळीदेखील सभेत आलेले राजराजेश्वर शारदेने दमयंतीला दाखविले आणि 'मना येईल तयाला । माळ गळां घाली तू' असे सांगितले

"तेव्हा दमयंती सुंदरी । इंद्रादिकां नमस्कारी ।

तया बोले उत्तरीं अमृता परी मधुर ॥

माझा भीम जैसा पिता । जैसे तुम्ही जी तत्वतां

करा कन्यादान आतां । नळनाथाचे करीं ॥" (२४८)

या उत्तरात केवढा विनय भरला आहे ! आणि हे शब्द कसे कोमल व मधूर लागतात! वर दिलेली पद्येंही रघुनाथ पंडितांच्या काव्यातली अगदी साधी पद्ये आहेत. पण त्यांची घडण किती मनोहर आहे ! विशेष असे काही नाही. पण यात काव्यसर्वस्व आहे, याची साक्ष प्रत्येकाचे मन देईल.

**समारोप:**

रघुनाथ पंडितांनी रुक्मिणीस्वयंवराशिवाय रामदासवर्णन, गजेंद्रमोक्ष अशी प्रकरणे लिहिली आहेत. आनंदतनयापेक्षाही त्यांचा व्याही जो रघुनाथपंडित तो फार श्रेष्ठ दर्जाचा कवी आहे. त्याची रचना व त्याचे कल्पनाचातुर्य फारच उत्तम आहे. अगदी आरंभापासून ते अखेरपर्यंत रघुनाथ पंडित यांनी आपले 'नलदमयंतीस्वयंवराख्यान' संस्कृत काव्यशास्त्राच्या नियमास धरून थेट पंचमहाकाव्याच्या थाटावर रचले आहे. त्याची रचना ठाकठिकीचे असून त्यातला मुग्ध शृंगार फार बहारीचा उतरला आहे. प्रसिद्ध ग्रीक कवयित्री साफोफ् (Sappho)हिच्या एका चुटक्यावर तिची कीर्ती तशी अजरामर झाली तशी एका नलदमयंती आख्यानावर रघुनाथ पंडिताचे कीर्ती आजपर्यंत अबाधित राहिली आहे व पुढेही कैक काळापर्यंत ती तशीच राहील हे उघड दिसत आहे.

लोकी सौरभकाव्यनाटककलालंकारचुडामणी

सर्वां नैषधविद्धदौषध असे विख्यात वाग्धोरणी।

हे त्याचीच टिका टिकोनि छोटी घटिका ऐकेल जो आदरें।

बोले त्या रघुनाथ पंडित कवी भेटे हरी सादरे॥

कित्येकांच्या मताने तर हे काव्य सर्व मराठी काव्यग्रंथात पहिल्या प्रतीचे उतरले आहे व सर्व मराठी कवितेत हा कवी अग्रगण्य गणण्याजोगा श्रेष्ठ आहे. आता हा अभिप्राय सर्वांनाच बरोबर पटेल असे नाही, पण इतके खरे की रघुनाथ पंडिताच्या रचनेची पायरी पुष्कळ वरच्या दर्जाची आहे. कवी स्वतःला 'सौरभ काव्य नाटक कलालंकार चुडामणी' असे संबोधित असला तरी रघुनाथ पंडितासंबंधाने खालील श्लोक तंजावर प्रांतात प्रसिद्ध आहे.

“म्हातारा बहु जाहलो, कवन ही त्रातां नसे भेटला।

भाताची तजवीज तेच उदरीं भाता गमे पेटला।

हातामाजि नसेच एक कवडी हा ताप आता हरी।

दातारा मज वांचवी सदय हो माता पिता तूं हरी॥”

यावरून लक्ष्मी आणि सरस्वतीचे अखंड हाडवैर असते म्हणतात, ते खरे दिसते. मराठी भाषेतले एक अप्रतिम काव्य निर्माण करणारा हा रघुनाथपंडित आपल्या म्हातारपणी अन्नाला महाग व्हावा. एका कवडीची ही माया त्याच्याजवळ नसावे, हे पाहून फार वाईट वाटते व मनी खंत मनात होते.

## २आ.२.८ कवी नागेशांची ग्रंथरचना

नागेश हा अहमदनगर जवळील भिंगार येथील राहणारा होता. त्याचे उपनाव ‘मुळे’ असे होते. त्याने आपल्या चंद्रावळीवर्णनात आपल्या मातापित्यांची नावे अनुक्रमे जानकी आणि मोरजोशी अशी दिली आहेत आणि आपल्या बंधूची नावे मल्हारी व त्र्यंबक अशी दिली आहेत. या भिंगारकर जोशांच्या कुळात नागेशाशिवाय इतरांनाही काव्यरचनेचा नाद होता.

पण नागेशाला तो विशेष होता. साधी घरगुती भाषा आणि कानाला बरे वाटतील अशी गोड यमके हे नागेश जोशी आपल्या काव्यात सहज योजितात.

"जरि शिरी गणराज विराजतो। तरीच होय महाकविराज तो।

मतिस जे जरि हेच सरस्वती। रसवती तरि होय सरस्वती ॥"

अशी याची रचना व यमके साधी आणि मधुर आहेत.

नागेश हा कवी वास्तविक पाहता सामराजांचा समकालीन आहे. किंबहुना आपल्या काव्य रचनात त्याने सामराजांचा कित्तासमोर ठेवलेला दिसतो. सामराजांचे रुक्मिणीहरण शके १५७५ च्या सुमारास पूर्ण झाले. तेव्हा ते समोर ठेवून ग्रंथरचना करू पाहणाऱ्या नागेश यांची काव्य शके १५७६ च्या नंतर व शके १६०४ च्या आत निर्माण झाले असावी. 'सीतास्वयंवर' हे त्याचे अखेरचे काव्य आहे आणि तो स्वतः सामराजांहून दहा- पाच वर्षांनी लहान होता. या दोन गोष्टी ध्यानात घेता त्याचा काळ त्याचा काळ शके १५४५ ते शके १६१० च्या दरम्यानचा ठरतो.

या कवीचे मूळचे नाव नागभट्ट जोशी असे असून तो नागेश, नागेंद्र, नागजोशी व नागकवी इतक्या पाच नावानी ओळखला जातो. नागेश यांचे वडील मोरजोशी हे स्वतः थोडेफार कवित्त्व करीत व तोच गुण पुढे त्यांच्या चिरंजीवात उतरला. नागेश उर्फ नागभट हा यशवंतराव कोकाटे यांच्याकडे आश्रयाला होता. त्याने संस्कृत महाकाव्ये, नाटके, अलंकारशास्त्रे, छंदशास्त्रे इत्यादीचा अभ्यास केला होता.

### २आ.२.८.१ सीतास्वयंवर:

हे नागेश कवीचे प्रसिद्ध काव्य आहे. या काव्याची निर्मिती होताना नागेश कवी समोर रघुवंश, हनुमन्नाटक हे काव्य होते. श्रीराम व सीता यांची स्वभावचित्रे परिणामकारक रेखाटली आहेत. सोळाव्या शतकातील दाग - दागिण्यांचे वर्णन यात आले आहे. अहिल्योद्धाराच्या प्रसंगात श्रीराम पदस्पर्शाने शिळेतून सुंदरी अवतीर्ण झालेले पाहताच भटभिक्षुकांना आनंद होतो. ते एक एक शिळा घेऊन येतात व सुंदर स्त्रीची मागणी करतात. त्यातून नागेश तत्त्कालीन सोंगाढोंगावर प्रकाश टाकतो. शृंगाराचे वर्णन करताना त्याचा तोल सुटलेला आहे. नागेशाने स्वयंवराच्या वेळी त्या 'महाख्यात कुलावंतसी' राजांना पत्रिका लिहिली त्यात चव्हाण, मोरे, राणे, शिसोदे वगैरेंची नावे आहेत पण भोसल्यांचे नाव नाही. जनकाच्या राजधानीचे वर्णन करताना तो भिंगार गावाशेजारच्या अहमदनगर राजधानीशी इतके जुळते की ते अहमदनगरचेच असावे असे कोणालाही वाटेल. उदा –

बहु बरी नगरी अति साजिरी। तिज सरी न करी अमरीपुरी।

प्राकार सोपे तिजला विशेषें। संवेष्टिली भासत जेंवि शेषे ॥

शोभे तया फार चऱ्यासि फेरा। नाहीं तियेलागी कदापि घेरा।

शोभती बहु चहूंकडे हुडे। पर्वतांसि तुटले जसे कडे ॥

खंदका बहु अगाधता असे। प्राप्तसिंधूवरबद्धसा वसे।

नरकें कर्णे नफेऱ्या `बहु वाजताती। नादें दिशा सर्वही गाजताती॥

शोभते बहु ते दरवाजे। नौबती बहुत सुंदर वाजे। इ. इ.

### २आ.२.८.२ रुक्मिणीस्वयंवर:

पंडित कवी नागेशने रूक्मिणीस्वयंवर काव्यावर संस्कृत काव्यातील वेचक प्रसंगाचा अनुवाद काव्यात योग्य स्थळी योजला आहे. या काव्यात भक्तीची पार्श्वभूमी असली तरी सामराजाने ह्या काव्यात श्रृंगार आणि वीर रसांचा अधिक परिपोष केलेला आहे. यात श्रृंगार, विरहावस्था, निसर्गवर्णने, युद्धप्रसंग आणि शेवटी लग्नसमारंभ अशी रचना यात आहे. तर कवी विठ्ठल या पंडित कवीकृत रूक्मिणी स्वयंवरात कुटात्मक रचना दृष्टीस पडते.

### २आ.२.८.३ चंद्रावळीवर्णन:

कवी नागेश यांनी अग्नीपुराणातील कथाप्रसंगातून चंद्रावळीवर्णनाची रचना केली आहे. चंद्रावळ नावाच्या गोपीशी श्रीकृष्णाने तिच्या बहिणीचे रूप घेऊन एकांतात भेट घेतली त्याचे हे वर्णन आहे. नागेश कवीला तू रसिक असल्याने मोठा वाव मिळाला आहे. चंद्रावळ व तिच्या सोबतच्या गोरस विकावयास जाणार्या गोपीचे वर्णन या ग्रंथात आलेले आहे.

### २आ.२.८.४ रसमंजरी:

रुक्मिणीस्वयंवर व रसमंजरी आणि शारदाविनोद अशी याची आणखी तीन काव्ये आहेत. एकेकाळी त्याचे पुष्कळसे श्लोक लोकांच्या व हरिदासांच्या तोंडी असतात.

## २आ.२.९ समारोप

पंडिती कविता आपल्या भोवतच्या समाजाची गरज म्हणून जन्माला आली. या कवितेने पौराणिक कथा, पौराणिक व्यक्तीची रसभरीत चरित्रे चित्रित करून उत्तम रूचिसंवाद साधला. पंडिती साहित्यातील रचना या समाजातील उच्चभ्रू वर्गालाच रूचेल अशी अभिजात वळणाची होती. ती संस्कृतप्रचूर होती त्यामुळे विशिष्ट सामान्य माणूस या कवितेत सामावला नाही.

## २आ.२.१० संदर्भग्रंथ

१. भावे, वि. ल.; - महाराष्ट्र सारस्वत, खंड पहिला पॉप्युलर प्रकाशन, मुंबई सहावी आवृत्ती १९८३

२. नसिराबादकर, ल. रा.; - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३. संपा. मालशे, स गं; - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा भाग पहिला, मराठी साहित्य संस्कृती मंडळ. पुरस्कृत पुणे ३० पहिली आवृत्ती १५ सप्टेंबर १९८२

४. पगडी सेतू माधवराव - मोगल आणि मराठे, पार्श्व पब्लिकेशन कोल्हापूर पहिली आवृत्ती १९६३

५. डॉ. पठाण, यु. म.; - मराठी साहित्य आणखी काही मानदंड मध्ययुगीन मराठीचा साधनग्रंथ, भूमी प्रकाशन, लातूर

## २आ.२.११ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. पंडिती काव्याची स्वरूप – वैशिष्ट्ये थोडक्यात स्पष्ट करा.

२. रघुनाथ पंडितांची ग्रंथसंपदेचा परिचय करून द्या.

३. पंडिती साहित्याच्या प्रेरणा लिहा.

४. पंडिती कवितेचे गुण आणि दोष सविस्तर लिहा.

५. शिवकालीन पंडिती कवींनी केलेल्या वाङ्मय निर्मितीचा आढावा घ्या.

**ब) टीपा लिहा.**

१. दमयंती स्वयंवर

२. रघुनाथ पंडितांची ग्रंथसंपदा

३. कवी नागेश - ग्रंथरचना

४. सामराजाचे ग्रंथलेखन

५. पंडिती साहित्याची वैशिष्ट्ये

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अहमदनगरजवळील भिंगार येथे राहणारा कवी कोण?

**उत्तर – कवी नागेश.**

२. रघुनाथ पंडिताने रूक्मिणी स्वयंवराशिवाय कोणती प्रकरणे लिहिली?

**उत्तर – गजेंद्रमोक्ष व रामदासवर्णन.**

३. ‘मुद्लाख्यान’ व ‘रूक्मिणीहरण’ हे दोन ग्रंथ कोणत्या पंडित कवीचे आहेत?

**उत्तर – सामराज.**

४. श्रीमद्भागवताच्या दशमस्कंधावर कोणती कथा आधारलेली आहे?

**उत्तर – रूक्मिणीहरण.**

५. सामराजांनी कोणत्या ग्रंथात वर्णाश्रमधर्मांचा पुरस्कार केला आहे?

**उत्तर –मुद्लाख्यान.**

*****

# घटक २आ.३

## २आ.३ शिवकाळातील शाहीरी वाङ्मय, बखर वाङ्मय

**घटक रचना**


२आ.३.१ उद्दिष्टे

२आ.३.२ प्रस्तावना

२आ.३.३ पोवाड्याची वैशिष्ट्ये

२आ.३.४ लावणीची वैशिष्ट्ये

२आ.३.५ शिवकाळातील प्रमुख शाहीर

२आ.३.५.१ आगीनदान उर्फ अज्ञानदास

२आ.३.५.२ तुळसीदास

२आ.३.६ शिवकालीन बखर गद्य

२आ.३.७ बखर म्हणजे काय?

२आ.३.८ बखर लेखनाचा हेतू

२आ.३.९ बखरीचे वर्गीकरण

२आ.३.१० शिवकालीन बखरी

२आ.३.१०.१ सभासदाची बखर

२आ.३.१०.२ शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र-

२आ.३.१०.३ श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र –

२आ.३.१०.४ भोसलेवंश चरित्र

२आ.३.११ समारोप

२आ.३.१२ संदर्भ ग्रंथ

२आ.३.१३ प्रश्नावली


### २आ.३.१ उद्दिष्टे

१. मध्ययुगीन मराठी साहित्यातील शाहिरी काव्याचा परिचय करून घेता येईल.

२. शिवकाळातील पोवाड्यातील वीररसाचा आस्वाद घेता येईल.

३. शिवकाळातील पोवाड्यातील पराक्रमी पुरुष आणि ऐतिहासिक प्रसंगाचे दर्शन घडेल.

४. शिवकाळातील राजकीय, सामाजिक सांस्कृतिक आणि ऐतिहासिक परिस्थितीचा परिचय होईल.

५. शिवकाळातील मराठी भाषेची स्वरूप व वैशिष्ट्यांचा आढावा घेता येईल.

६. बखर गद्याची संकल्पना आणि वर्गीकरणाचा आढावा घेता येईल.

७. मध्ययुगीन मराठी साहित्याच्या दृष्टीने बखर गद्याच्या स्वरूप आणि वैशिष्ट्ये याचा परिचय करुन देता येईल.

८. शिवकाळातील प्रमुख बखरींचा परिचय करून देता येईल.

## २आ.३.२ प्रस्तावना

शाहिरी वाङ्मय म्हटले की, पोवाडे आणि लावण्या हे दोन रचना प्रकार ताबडतोब आपल्या नजरेसमोर येतात. शाहीर = कवी, शाहिरी = कविता होय. यातील शाहीर आणि शाहिरी हे शब्द यवनी आहेत म्हणून हे रचनाप्रकार मुसलमानी असावेत असा तर्क केला जात असतो परंतु तो तर्क बरोबर नाही. शाहिरी कवनांचे रचनाकार स्वतःला 'कवी' म्हणवून घेतात. पोवाडा व लावणी त्याचे मूळ यवनी, परकीय किंवा संस्कृतजन्य नसून अस्सल 'मऱ्हाटी' आहे. प्राकृत काव्यप्रकार आणि लोकगीतप्रकार यांच्या परंपरेतूनच शाहिरी रचना विकसित झालेली दिसते. शायरी वाङ्मयाच्या बाबतीत आणखी एक समजूत आहे ती अशी की, शाहिरी वाङ्मयाची सुरुवात शिवकाळात झाली व नाट्य, संगीत या अंगाने तिचा विकास पेशवाईत झाला. तेही खरे नाही कारण या वाङ्मयाची उत्पत्ती चौदाव्या शतकापर्यंत मागे नेता येते.

‘लावणी’ आपले मूळ लोकगीताच्या परंपरेतून घेऊन आलेली आहे. लोकगीतात कवीची नाममुद्रा नसते. लोकगीतात काहीसे भडक चित्रण असते व स्थूल अनुभव व्यक्त झालेला असतो. लोकगीत सताल म्हणता येते. चूर्णिकाप्रधान ही रचना असते. लावणी - पोवाडा ही तालात आणि ठेक्यात म्हणता येणारी रचना असते. परंतु शाहिरीचा रचनाकार कवनात आपली नाममुद्रा गोवतो.

पोवाडे आणि लावण्या ही तर राष्ट्राच्या ऐश्वर्य वसंतातच बहरास येतात असे म्हणण्यास हरकत नाही. वास्तविक पाहता कवनांचे हे दोन प्रकार म्हणजे निरनिराळ्या किंबहुना एकमेकास विरोधी व भिन्न अशा दोन रसांचा परिपोष आहेत. योग्य पराक्रम आणि तोंडात बोट घालण्यासारखी वीरांनी केलेली शौर्याची कृती ही जसे पोवाड्याचे योग्य विषय होत तसेच तरुणांचे शृंगार हे लावण्यांना योग्य असे विषय होत. वीररसाशिवाय पोवाड्याची बहार नाही आणि शृंगाराशिवाय लावणीची मजा नाही. असे या शाहिरी काव्याबाबत म्हटले जाते.

पवाडे किंवा लावण्या हे प्रकार राष्ट्राच्या दयनीय अवस्थेत किंवा पडत्या काळात आढळत नाही. हेमंत सरून राष्ट्राच्या भाग्याला वसंतऋतू आला म्हणजे, राष्ट्राच्या चढत्या काळातच कवनांचे फुलारे फुलू लागतात व त्यावरील शाहिरांचे गुंजारव चोहोकडे ऐकू येतात. वसंतात जसे आमक्या झाडाला पालवी फुटते आणि फुले येतात आणि तमक्याला तो बहार येत नाही असे होत नाही. तसेच राष्ट्राला एकदा ज्वानीचा व संपन्नतेचा फुंद चढला की, आमक्या जातीचे शाहीर कविता करतात आणि या जातीचे करीत नाहीत असे होत नाही. सर्वांनाच एक तऱ्हेचा मद चढतो व सर्व जाती आनंदभराने डोलू लागतात. त्यांच्या जिव्हा कवने म्हणू लागतात. या शाहिरीत संपूर्ण मानवी समाज या संपन्नतेच्या सागराच्या या उधानातील लाटावर मोजेने विहार करताना दृष्टीस पडतात आणि हे असे सर्व जातीचे, सर्व पंथांचे, दर्जाचे लोक सुखसागरात लीलेने पोहताना दृष्टीस पडले, म्हणजे मनाला आनंदाचा पूर येऊन, प्रेमाच्या लाटा उडू लागतात. व ज्या काळी हे महाराष्ट्र, हे आनंदवनभुवन असेच सुख अनुभवीत होते,त्या काळाबद्दल कौतुक वाटते व ज्यांनी हे असे दिवस आपल्या वाडवडिलांना दाखवले त्यांचेबद्दल धन्यता वाटते. सर्व जातीच्या व सर्व पंथाच्या लोकांनी आनंदात मग्न असावे. वीररसाने न्हाऊन जावे आणि त्यांचे चेहऱ्यावर मदाची धुंदी चढावी हीच राष्ट्राच्या संपन्नतेची व जिवंतपणाची खरी खुण आहे, आणि शाहीर व त्यांची कवने ही त्याची एक निशाणी आहे. ‘शाहीर’ हा शब्द उर्दू भाषेतील ‘शायर’ या शब्दापासून आला आहे. ‘शायर’ म्हणजे कवी आणि ‘शायरी’ म्हणजे ‘विशिष्ट प्रकारे लावण्या व पोवाडे’ यांसारखे काव्य लिहिणारा व गाणारा असा याचा अर्थ आहे.

थोडक्यात लावणी आणि पोवाडा ही मुळात कविता आहे. ती जनसमुदायाची, जनसमुदायाने, जनसमुदायाच्या मनोरंजनासाठी केलेली रचना असून तिचे स्वरूप ताल ठेक्यात म्हणता येणाऱ्या मात्रावर्तनी रचनेची आहे. तिच्यात मागवून समाविष्ट झालेले नृत्य हे, ती रचना म्हटली जात असताना आशयानुसार होणारी म्हणणाराच्या शरीराची हालचाल म्हणून प्रादुर्भूत झाली. पोवाडा केवळ श्राव्यकाव्य राहिला नाही तर त्यात दृश्यकाव्य आणि नाट्याचे अंग यात असते. पोवाडा गद्यपद्य असतो म्हणून इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांनी पोवाड्याला चंपूकाव्य म्हटले आहे.

## २आ.३.३ पोवाड्याची वैशिष्ट्ये

पोवाडा या शब्दाची उत्पत्ती प्र + वद् = स्तुती, प्रशस्ती करणे म्हणजे ठासून स्तुती करणे अशी आहे. पोवाडा म्हणजे वीरांच्या पराक्रमाचे व विद्वानांच्या बुद्धिमत्तेचे काव्यमय वर्णन होय. पोवाडा हा पराक्रमाचे गाणे असल्यामुळे मुसलमानी राजवटीत हा काव्यप्रकार मागे पडला असावा परंतु शिवछत्रपतींनी स्वराज्याची स्थापना करताच हा वाङ्मयप्रकार बहरास आला. मराठा वीरांच्या वाढत्या पराक्रमाबरोबरच पोवाड्याची निर्मितीही वाढू लागली. शिवकाळात शाहीर भरपूर असावेत परंतु या सर्वांचे पोवाडे उपलब्ध नाहीत. आज उपलब्ध असलेला सर्वात जुना पोवाडा म्हणजे आगीनदासांचा 'अफजलखानाच्या वधाचा पोवाडा' हा होय. तो जिजाबाई यांच्या सांगण्यावरून लिहिला आहे. दुसरा पोवाडा तानाजीचा तो तुळशीदासाने लिहिला आहे.

- पोवाडा हा शाहिरी वाङ्मयातील एक महत्त्वाचा प्रकार आहे. पोवाड्यात वीररसाची निष्पत्ती होते पोवाड्यात राजकीय जीवनाचे चित्रण उमटले आहे, म्हणून तिला 'राष्ट्रीय कविता' म्हटले जाते.
- पोवाडा हे एक दीर्घ कथाकाव्य आहे. त्याचप्रमाणे कीर्तीकाव्यही आहे.
- पोवाडा शाहिरांकडून म्हटला जातो त्याची चाल धावती, खटकेबाज असते. पोवाड्यामध्ये नाट्यपूर्णता असते.
- पोवाडा स्वयंस्फूर्तीने लिहलेला नसून कोणाच्यातरी आज्ञेवरून अथवा सांगण्यावरून व आर्थिक लाभासाठी तो लिहिला आहे.
- शाहीर पोवाड्यातील वर्ण्यविषयाशी तादात्म्य पावलेले असतात, एकरूप झालेले असतात. त्यामुळे त्यात विविध वीर रसाबरोबर विविध रसांची निष्पत्ती होते.
- पोवाड्यात तत्कालीन लोकांच्या भाव - भावना, ईच्छा, आशा - आकांक्षाचे चित्रण आलेले असते.
- शाहिरांना स्वजन, स्वभाषा, स्वदेश, स्वसंस्कृती यांचा अफाट अभिमान असल्यामुळे अवास्तव स्तुती, अतिशयोक्ती आलेली असते दुजांबाबत तुसडेपणा आणि निंदेचा भाव येतो त्यामुळे पोवाड्यातील वर्णने सत्य असतीलच असे नाही.
- पोवाड्यांची रचना गोंधळासारखी असते त्यामुळे प्रारंभी गणेश, शारदा किंवा इतर देवदेवतांच्या नमनाचा भाग येतो.
- पोवाड्यात काल्पनिक कथा, दंतकथा, दैवतकथा, विनोद, उपहास इत्यादींचा उपयोग केला जातो त्यामुळे त्यात ऐतिहासिक सत्य आणि मूल्य फार कमी असते.
- पोवाडा दृश्य व श्राव्य असतो. पोवाड्याचे साभिनय सादरीकरण केलेले असते.
- पोवाड्यात मुख्य शाहीर आणि त्याचे साथीदार असतात. त्याला मोठ्या संगीतसामुग्रीची गरज नसते नुसत्या डफ आणि तुणतुण्यावर भागविले जाते.
- पोवाड्यात परिणामकारकता साधण्यासाठी मधून मधून गद्याचा वापर केला जातो. म्हणजेच पोवाड्यांची रचना गद्य - पद्य मिश्रित असते.

## २आ.३.४ लावणीची वैशिष्ट्ये

- लावणी हा शाहिरी काव्याचा दुसरा प्रकार आहे.
- लावणीत शृंगार हा मुख्य रस असतो.
- लावणी हे स्फुटकाव्य असते.
- लावणीचा मुख्य उद्देश लोकरंजन असतो तरी अनेक लावणीतून आध्यात्मिक वर्णन आढळते.

- लावणीतील विषय धार्मिक व पौराणिक असला तरी बव्हंशी लावण्यातुन उत्कट कधी कधी उत्तान शृंगार असतो.
- लावणीची रचना गेय, तालबद्ध, ठसकेबाज असते. त्यासाठी यमक, अनुप्रास, अलंकार यांचा वापर केलेला असतो.
- लावणीत आठ किंवा सहा मात्रांचे आवर्तन असते.
- लावणीचे रचना अटकर बांध्याची असते.
- लावणीत विवाह, पती-पत्नी संबंध, प्रणयचेष्टा, मर्द गड्याचा, पत्नीस निरोप, पती-पत्नीस निरोप, पती-पत्नी विरह, विरहातील मदनपीडा, पूर्ण मिलन, व्याभिचारी प्रेम, जारिणीचे प्रेम, चोरटे प्रेम इत्यादी विषयांवर असतात.
- लावणीतील शृंगार उत्तान, भडक, बीभत्स व अश्लील असतात.
- लावणी म्हणताना ताल सूर सांभाळावा लागतो. लावणीला ढोलकी व तुणतुण्याची गरज असते. काही लावण्या रागदारीत बसवलेल्या असतात.
- शाहिरांनी केवळ शृंगार या विषयावरच लावण्या लिहिल्या नाहीत तर गणगौळणीनंतर उपदेश, वैराग्य, देव स्तुतिपर, कथनपर, अनेक भाषापर, संत-महात्म्यपर, व्यक्तीवर्णनपर, विनोदी, मुजऱ्याच्या, भेदिक लावण्या अशा विविध विषयावर विविध प्रकारच्या लावण्या शाहिरांनी लिहिले आहेत.

## २आ.३.५ शिवकाळातील प्रमुख शाहीर

शिवकाळातील काही प्रमुख शाहीरांचा आपण विचार करू.

### २आ.३.५.१ आगीनदान उर्फ अज्ञानदास:

हल्ली प्रसिद्ध असलेल्या सर्व पोवाड्यांपैकी सर्वात जुना पोवाडा म्हटला म्हणजे आगीनदासाच होय. आगीनदास किंवा अज्ञानदास हा पुण्याचा राहणारा होता. त्याच्या गुरूचे नाव नारायण असावे. त्याच्या पोवाड्याचा विषय शिवाजी महाराजांनी अलौकिक चातुर्याने, आपणास पिंजऱ्यात धरून न्यावयात आलेल्या अफजलखानास कसा गर्क केला तो होय. हा पोवाडे रचण्याचा अगदी प्रथम प्रकारचा नमुना आहे. नावाला मात्र हा पद्य आहे परंतु याची सर्व रचना एकतारी तुणतुण्यावर सहज सुराने म्हणता येईल अशी गद्याचीच आहे. शिवाय घडलेल्या अद्भुत प्रसंगानुसार लवकरच हा रचलेला दिसतो. कारण शेवटच्या चौकात शाहीर म्हणतो की, या अलौकिक प्रसंगाच्या आनंदोत्सवातच 'जिजाबाईने शाहीर बोलाविले' आणि त्याच वेळी 'आपल्या मते अज्ञानदासाने एका तडाक्याने हा' कडाका गायला 'व' बिरमल राज्याचा गाइला म्हणून "शिवाजी सरज्याने। इनाम घोडा बक्षीस दिला। शेरभर सोन्याचा। तोडा हातात घातला" असे म्हणतो. हा पवाडा जिजाबाईंनी, शिवाजीने आणि त्याच्या सदरेच्या सरदारांनी प्रत्यक्ष ऐकलेला दिसतो. त्यातील वर्णनही अगदी त्याच वेळचे दोन डोळ्याच्या साक्षीने मिळविलेले आहे. या पोवाड्यावरून असे दिसते की, आपणावर अफजलखान येतो ही बातमी कळल्यावर शिवाजीने सामदामाचे प्रकार करुन

पाहिले व सदरेत सर्वांना बोलावून सर्वानुमते अफजलखानाच्या प्रत्यक्ष भेटीचा विचार ठरविला. पण खानाची भेट हा एक निर्वाणीचा प्रसंग आहे हे शिवाजी महाराज समजून होते. आणि म्हणूनच या आणीबाणीच्या प्रसंगाच्या तयारीबरोबरच त्यांनी पुढची सर्व निरवानिरव करून 'राजे स्वामींनी ब्राह्मण बोलावून द्रव्य दिधले' आणि सांगितले की, 'तुम्ही काशीस व गंगेस जाऊन उत्तरकार्य करणे. धर्म हस्तकें गोदाने देखील दिधली, दाढी लांब होती ती बाल छाटून लहान केली. जिजाऊ रडू लागली. तीस समीप येऊ न दिले की न जाणो मोह पडेल.' अशी सर्व पूर्वतयारी करून गडाखाली 'सदरेची मांडणी' केली होती, तेथे भेटीस जाण्यास निघते वेळी लोकांनी सांगितले की, शिवबा सील करा अंगाला ! तेव्हा राजाने अंगात जरीचे कुर्ती घातली, वर चिलखत चढविले आणि त्यावरून राजा बारीक झगा ल्याला 'रेशमी विजार पायात घातली, डोईस मंदिल बांधला. डाव्या हातीं बिचवा ल्याला । वाघनख सरजाच्या पंजाला ॥ वरून बारीक झगा ल्याला कंबरबस्ता वेढा केला । पोलाद घातली गळा ॥ फिरंग पट्टा जिऊ म्हाल्याप दिला । शिवाजी सरजा बंद सोडुनि चालला ॥२४॥ निघताना त्याने सर्वांचे मुजरे घेतले, व माझा रामराम दादांनु । गडच्या गडकऱ्या बोलीला॥ जतन भाईनु करा । आमच्या संभाजी राजाला ॥ सराईत उमाजी । राज्य होईल तुम्हांला। गड रवितो गडकऱ्याला । राज्य निरवितो नेताजीला । निरवानिरव दादांनु । विनंती केली सकळीकाला ॥ येथून सलाम सांगा । माझा शहाजी महाराजाला । खबर गेली जिजाऊला। शिवबा जातो भेटायला । पालखींत बैसुन । माता आली भेटायला ॥२५॥

राजकारणावर दृष्टी ठेवून शिवाजीने आईस प्रथम भेटीस न येण्याविषयी सांगितले. पण म्हणतात ना ! माया ही अधोवाहिनी आहे. आईच्यानें कसे राहवेल ? पुत्रवात्सल्य फार कठीण आहे. जिजाऊ पुत्रप्रेमाने पालखीत बसून भेटीस धावून आली. पुढे शाहीर म्हणतो, शिवबा बोले जिजाऊ सवे । बये वचन माझे ऐकावें ॥ 'माझी असोसी खानाला । बये जातो भेटायला ।' जिजाऊ बोले महाराजाला । 'शिवबा न जावें भेटायला ॥ खान राखिना तुम्हांला ।' राजा बोले जिजाऊला । एवढी उंबर झाली । भेट दिली नाही कोणाला ॥ एवढी गोष्ट माते आज द्यावी मला ॥ 'आई ! अबदुलखान आला । त्याने धाक लाविला देवाला ॥' शिवाजीचे हे आर्जवाचे पण निर्धाराचे शब्द ऐकून - जिजाऊ बोले महाराजांना । 'शिवबा ! बुद्धिने काम करावे । उसनें संभाजीचे घ्यावे ॥ २६ ॥ जिजाऊ घेती अलाबला । 'शिवबा चढती दौलत येऊ दे तुला ॥ घे यशाचा विडा' । शिवबा स्मरणे महादेवाला । गळा घातली मिठी । मातेच्या चरणासी लागला ॥ध्यानीं आठवुनी भगवंताला । शिवाजीराजा सदरेला गेला ॥ २७॥ याचा पुढचा प्रकार सर्वांना ठाऊकच आहे. डोळ्यांचे पाते लवते न लवते तो ही झटपट शिवाजीनें सहज आटपून घेतली व खान 'पुरा केला'

### २आ.३.५.२ तुळसीदास:

यापुढील दुसरा प्रसिद्ध पोवाडा तुळशीदास नावाच्या शाहिराने रचलेला आहे. तुळशीदास हा आगीनदास याचा कोणी संबंधी असावा. असे चरित्रकार शाळीग्राम म्हणतात. हा शिवाजी महाराजांचे वेळी पुण्यात मंडईचे बाजारात राहत असे. त्याचा पवाडा आगीनदासाच्या पोवाड्यापेक्षा फार मोठा आहे. त्याचे ५५ चौक आहेत. आगीनदासाची तडप तुळशीदासात नाही पण तुळशीदासात अज्ञानदासापेक्षा काव्य जास्त आहे. तुळशीदासाने आपल्या कथानकाचा प्रसंग, प्रारंभ, वर्णने व झटापटी आणि शेवट, या सर्व गोष्टी जागच्या जागी ठीकठीक ठेवून दिल्या आहेत.

एके सोमवारी सकाळी जिजाबाईने शिवबास बोलावून घेतले व दोघे मायलेकरे गमतीने सोंगट्या खेळण्यास बसली. खेळात जिजाबाईची सरशी होऊन डाव शिवाजीवर लागला. म्हणून शिवाजीने आईस काही मागून घेण्यास सांगितले. हे ऐकून त्या वीरमातेने पुण्याचे तोंडाला । जेजुरीच्या बारीला। आहे सिंहगड किल्ला । तो घेऊन द्यावा मला । आऊक्ष मागेन तुझ्या राज्याला ।। हे मागणे मागितले. द्युतात दिलेला हा 'पण' पुरा करण्याकरता शिवाजीने तानाजी मालुसरे यांना ही कामगिरी सांगितली. धन्याची चाकरी बजावताना तानाजीने जीवाची शर्थ केली शेवटी गड हाती आला, पण हातचा सिंहगडावरच राहिला. हा वृतांत तुलसीदासांनी या कवनांत गाईला आहे. या कामगिरीचा लखोटा तानाजी सुभेदारांच्या हाती पडला त्यावेळी त्याने आपल्या एकुलत्या एक 'रायबा' नावाच्या मुलाचे लगीन योजिले होते.

स्वयंवर बाळाचे मांडिले । काढल्या पंचमीच्या हळदी । काढलें षष्ठीचे लगिन । लगीन बाळाचे मांडिले ।आली सिंहगडाची कामगिरी । लगीन रायबाचे राहिले । त्याने उमराव बोलविले । त्याची उमराव व सरदार सर्व आले... शेलारमामा तो ही आला व सूर्याचा बंधू तो ही आला. तेव्हा सिंहगडाची कामगिरी आल्याची वार्ता त्याने सर्वास सांगितली. ती ऐकून सर्वजण दचकले. शेलारमामा बोलाया लागला । ऐंशी वर्षांचा म्हातारा । 'माझ्या तानाजी सुभेदारा । जे गेले सिंहगडाला। त्याचे पाठिरे पाहिले । नाही पुढारे पाहिले ।' पण अशाने तानाजीसारखा शूर गडी थोडाच कचणार ! त्याने एकदम कामगिरीची तयारी चालवली. 'मग रायबा तो बेटा । बाबाच्या जवळ आला' तेव्हा त्याचीही तानाजीने समजूत घातली. सर्व तयारी झाली. शिपाई मावळे जमले. त्यांना हत्यारे वाटली. खर्ची दिली आणि सैन्य घेऊन तानाजी रायगडास राजाचे भेटीस निघाला. बारा भोयांची पालखी सवारिली । तोरण पालखीला पालखीला बांधिले । पाय दिला पालखीमध्ये। हात पालखीला दिला । रायबा तो बेटा । बाबांच्या आडवा येणार झाला । तेव्हा तानाजीने भिऊ नको माझे बेटा । तुझें येतो मी लग्नाला ।। आधी लगीन सिंहगडाचें । मग करीन रायबाचें ।। असे सांगून तानाजी सुभेदार जिजाबाईचे भेटीस गेला. जिजाबाईंनी त्याला ओवाळिले व 'तानाजी सुभेदार । चढत्या दौलतीचे राज्य येऊ दे तुला' म्हणून आशीर्वाद दिला. जिजाबाईंची भेट झाल्यावर सुभेदार शिवाजीराजांच्या मुजऱ्याला गेला व मुजरे करुन म्हणाला, आम्ही येतो सिंहगडाला । आमचा रायबा संभाळा । जर आलो सिंहगडावरून लगीन करीन रायबाचें । जर गेलो तिकडे मेलो । लगीन करा रायबाचे । मज बापाची सरदारी । द्यावी रायबा बेठ्याला । डोणजगाव द्यावा पानसुपारीला । मालुसरेचा दंड द्यावा इनाम खायाला ।।

असे सांगून निरोप घेतले व पुन्हा एकदा जिजाबाईकडे जाऊन तिच्या पायावर डोके ठेवून रायबाला सांभाळण्याविषयी पुन्हा पुन्हा सांगून तानाजी सिंहगडाकडे वळला. गडाच्या माचीस जाऊन गडाचा भेद काढिला, 'पेटारा उघडला । काढिली यशवंत घोरपड' आणि तिच्या कमरेला साखळी बांधून ती किल्ल्याला लावली. घोरपड नेहमीप्रमाणे वर जाऊन धरावी ती वर न जाता मधूनच परतली. ते पाहून सुभेदार मनात जरा कचरला व रागावून म्हणाला -

'सत्तावीस किल्ले मीं घेतले । घोरपड कधीं नाही मागें फिरली । मी आहे मराठ्यांचा पोर, नाही भिणार मरणाला । एक हात टाकीन । अठरा खांडोळी पाडीन । शिळ्या भाकरी संगे खाईन ।।' अखेर घोरपड पुन्हा लाविली, व मग 'पट्टे घेतले तोंडामधीं । सोल धरली हातामधी' आणि तानाजी सुभेदार शेलके माणूस घेऊन किल्ल्यावर चढले. किल्ल्यावर चकमक

होऊन मोगलांचा किल्लेदार उदेभान पठाण मारला गेला व किल्ला सर झाला. परंतु या लढाईत तानाजी सुभेदार कामास आला. किल्ला घेऊन सैन्य शिवाजीकडे आले तेव्हा त्याला आनंद झाला परंतु तानाजीबद्दल शिवाजीला व जिजाबाईंना फार वाईट वाटले. पुढे सुभेदाराचा मुर्दा पालखी घातला व शिवाजी स्वतः जातीने त्याबरोबर जाऊन तो सुभेदाराच्या गांवी मुलाकडे नेला. पालखी पाहताच रायबा धावतच आला पण बाप मेल्याची खबर ऐकल्यावर त्याने फार आकांत मांडला. तेव्हा त्यांचे सांत्वन करून शिवाजी राजाने । मुलगा पोटासंगे धरिला । 'भिऊ नको माझे बेटा । शिवाजी महाराज तो गेला । तान्हाजी सुभेदार आहे तुला । असे सांगितले व 'बारा दिवसांचे । सूतक धरले। शिवाजी महाराजांनी सुभेदाराचे!' पुढे राजाने रायबाचे लग्न केले व 'दिवठ्याबुधलीची जहागीर । दिली रायबा बेठ्याला । बापाची सरदारी । दिली रायबा बेठ्याला । डोणजगाव ते दिलं पानसुपारीला । मालुसऱ्यांचा दंड दिला इनाम खायाला ।' असे निराळे सांगणे नकोच. पण हेही शाहिराने पोवाड्यात सांगितले आहे, आणि आम्ही तुम्हाला सांगतो, शाहीर शेवटी म्हणतो, 'हा शूर मर्दाचा पवाडा, शूर मर्दाने ऐकावा!' याच्या योगाने 'गात्याला उद्राण व ऐकत्याला पुण्य प्राप्त होईल. छत्रपती शिवाजी महाराजांच्या आमदानीत महाराष्ट्राला वैभवसंपन्नता आणि स्फूर्ती आली तेव्हा त्या काळाचे आणखी अनेक पोवाडे असले पाहिजेत. पण फार थोडे पोवाडे उपल्ब्ध आहेत.

शिवाजी महाराजांनी वैजापूर काबीज केले त्या वेळचा एक पोवाडा दिसतो. शिवकालानंतर या प्रकारच्या रचनेत एक मोठा खंड पडला. शिवाजी महाराजांच्या पश्चात महाराष्ट्र कोणत्या पेचांत सापडले गेले व त्यांच्यावर कोणती संकटे कोसळली हे सर्वश्रुत आहे. हा अतिशय धामधूमीचा काळ होता. त्यानंतर बरीच वर्षे दुःखाची लोटली. पुढे शून्यातून नवीन सृष्टी निर्माण करण्यांत शाहूंचे आणि त्यांच्या पेशवा बाळाजी विश्वनाथ यांचे दिवस गेले. पण तो ही काळ सुख - संपन्नतेचा नव्हता. बाजीरावानंतर नानासाहेबांच्या वेळी मात्र सगळीकडे समृद्धीचे दिवस आले. तेव्हा या काळी पुन्हा चोहीकडे डफ वाजू लागले. नानासाहेबांच्या कारकिर्दीतल्या अनेक प्रसंगांपैकी पानिपतच्या घनघोर युद्ध प्रसंगावर फार पोवाडे रचले गेले. तो प्रसंगही तसाच होता. या प्रसंगावर सात-आठ पोवाडे हल्ली उपलब्ध आहेत. त्यापैकी 'जंगबहार' हा उर्दू पोवाडा फार जुना आहे. त्याची रचना कादर नावाच्या शाहिराने, जाधवराव मालेगावकर यांनी प्रत्यक्ष पानिपत येथे पाहिलेली हकीकत स्वमुखाने सांगितली त्या आधारे केली आहे.

इतिहास संशोधनाची एक नवीन शाखा म्हणून हे वाङ्मय आता सर्वांना मान्य झाले आहे. कै. राजवाडे यांनी आपल्या साधनांच्या चौथ्या खंडात पोवाड्याचे ऐतिहासिक निरीक्षण करून बखरीपेक्षा पोवाडे अधिक ग्राह्य आहेत असे म्हटले आहे. त्याबरोबरच पोवाड्यातील नाट्यगुणही त्यांनी पोवाडा हे केवळ श्राव्यकाव्य नव्हे, ते दृश्यकाव्यही आहे. पोवाडा हे एक प्रकारचे नाटक आहे, असे महिकावतीची बखर प्रस्तावना, पृ.३८ वर उत्कृष्टपणे दाखविले आहेत. त्यानंतर महामहोपाध्याय पोतदार यांनी 'ऐतिहासिक पोवाडे' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की, "ज्याप्रमाणे इतिहासात काव्य असू शकेल त्याप्रमाणे काव्यातही इतिहास असू शकतो. बखर पुरावा हा अनेक दोषांनी युक्त असतो. त्यात विसंगती व्युत्क्रम व कल्पना यांचे मिश्रण पुष्कळ वेळा दिसते... पोवाडा म्हणजे केवळ 'पद्यमय बखर' असे पुष्कळांना वाटते. परंतु बखरीपेक्षा तो अधिक विश्वासनीय आहे. तो समकालीन असल्यास उत्तमच. आजवर उपलब्ध असलेल्या पोवाडा सगनभाऊचा पानिपतचा पोवाडा विषमकालचा आहे.

तानाजीचा पंचावन्न चौकी पोवाडा शाहीर तुळशीदास हा पोवाड्याचे शेवटी आपणास पंतोजी काकाने पुण्याहून बोलावून घेतले, आपण पोवाडा रचला व त्याबद्दल एक हजार रुपयाचा तोडा आपल्या हातात घातला असे स्वतः म्हणतो. यावरून तुळशीदास हा तानाजीचा समकालीन असावा असा सर्वत्र समज आहे. परंतु हा शाहीर शिवकालीन असून पेशवेकालीन आहे असा निवाडा पोतदार यांनी त्याच्या पोवाड्याचे अंतरंग तपासून दिला आहे. (भा.इ.सं.मं.त्रैमासिक, १९-१). त्यामुळे दोन पोवाडे सोडून बाकीचे बहुतेक सर्व समकालीन आहेत असे म्हणता येईल. या समकालीन शाहिरी वाङ्मयात इतिहासाचे सुवर्णकण सापडतात.

## २आ.३.६ शिवकालीन बखर गद्य

मध्ययुगीन मराठी साहित्यात मोठ्या प्रमाणात काव्यमय आविष्कार आढळतो. ओवी, अभंग, गवळणी, श्लोक, पदे, स्तोत्र, इत्यादी काव्यप्रकारांचा त्यात समावेश होतो. गद्यलेखन करण्याचा अल्पसा प्रयत्न महानुभाव पंथाचे चरित्रग्रंथ, ख्रिस्ती - मुस्लीम धर्माचे लेखक, नाथांचे अर्जदास्त हे भारूड, जैन धर्मियांचे चंपूकाव्य या निमित्ताने झाल्याचे आढळते. इस्लामी राजवटी मराठीला उत्तेजन मिळाले नाही. या काळात फारसी भाषा राजभाषा असल्यामुळे त्या भाषेतून ग्रंथनिर्मिती झाली. सतराव्या शतकाच्या मध्यापासून (१६४६) स्वराज्याची स्थापना झाली. रयतेचे लोककल्याणकारी राज्य सुरू झाले. मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा प्राप्त झाला. शिवकाळात सुरू झालेला गद्याचा अवतार म्हणजे 'बखर वाङ्मय' होय. शिवकाळ आणि पुढे पेशवे काळातील हा गद्याचा अवतार जितका तेजस्वी तितकाच कलात्मकही होता. कौटुंबिक आणि राष्ट्रीय भावनेने भारलेला होता. ऐतिहासिक घडामोडी, राज्यकर्त्यांचे कर्तृत्व, शूरवीरांचे गुणगान, लढायांचे वर्णन, थोर पुरुषांची चरित्रे याविषयीचे लेखन करण्याचे हेतूने बखर हा साहित्य प्रकार उद्याला आला. बखर लेखनाची परंपरा ही मूलतः ऐतिहासिक स्वरूपाची आहे. इतिहासापेक्षा वाङ्मयदृष्ट्या बखरी महत्त्वाच्या ठरल्या आहेत. बखर वाङ्मयात विषयाची विविधता आढळते. त्यामुळे इतिहास म्हणून या बखर वाङ्मयाला महत्त्व आहे तसेच साहित्यिक मूल्यही आहे.

## २आ.३.७ बखर म्हणजे काय?

- 'बखर' या शब्दाचा अर्थ हाकिकत, बातमी इतिहास कथानक, चरित्र असा आहे. 'खबर' या या अरबी शब्दाचा अर्थ माहिती, वार्ता, समाचार आहे. खबर या शब्दाचा वर्णविपर्यास होऊन बखर हा शब्द मराठीत रूढ झाला असावा असे अभ्यासकांचे मत आहे.

- मुसलमानी राजवटीत तवारीखा (दैनंदिनी) लिहिण्याची पद्धत होती. या तवारीखामधून दैनंदिन नोंदी लिहिल्या जात. काही अभ्यासकांच्या मते, तवारीखातील पद्धतीचा अवलंब करून आपले वंश - चरित्र सांगण्यासाठी बखरीचा उदय झाला.

- 'बखरी' म्हणजे वंशचरित्र असे श्री. वा.सी. बेंद्रे म्हणतात.

- 'बख' म्हणजे बकणे, बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली असावी असे असे मत इतिहासाचार्य वि.का. राजवाडे यांचे आहे. राजवाडे यांना खबर पासून बखर हा शब्द तयार झाला हे उत्पत्ती अमान्य आहे. बखर हा शब्द भष्, भख् , बख्या, बख् या धातूपासून निघाला आहे. पूर्वीचे भाट मोठमोठ्या वीर पुरुषांच्या 'बखरी' तोंडाने बोलत असत. त्यावरून 'बखर' हा शब्द प्रथमत: तोंडी इतिहासाला लावू लागले आणि नंतर लेखी इतिहासालाही तर शब्द लावण्यात आला.

- "बखर म्हणजे मराठी साहित्यात तेजस्वी पराक्रमाचे नंदादीप होत". असे र. वि. हेरवाडकर यांनी म्हटले आहे.

- मोल्सवर्थ शब्दकोशात, ' Any history, narration or chronicle in Prakrit pores'.

- मेजर कँडी यांनी A written narrative or history in Prakrit prose.

- आज बखर या शब्दाचा रूढ अर्थ 'राजकीय स्वरूपाचे लेखन'असा आहे वृत्तांत असे बखरींचे वर्णन डॉ. ल.रा. नसिराबादकर करतात.

अशाप्रकारे बखर या शब्दाची उत्पत्ती 'खबर' शब्द फार्सी आणि बख् (संस्कृत) या दोन्ही शब्दापासून सांगता येते. या दोन्ही शब्दाचे मूळ एकच असणे शक्यता आहे. आज बखर या शब्दाचा रूढ अर्थ 'राजकीय स्वरूपाचे लेखन' असा आहे. 'ऐतिह्य वृत्तांत' असे बखरीचे वर्णन डॉ. ल. रा. नसिराबादकर करतात.

बखर हे प्रदीर्घ स्वरूपाचे लेखन आहे. त्यामध्ये स्थळ, काळ, व्यक्ती, प्रसंग, कारण इत्यादी बाबतीत विपर्यास झालेला दिसून येतो. बखर लेखक पगारी नोकर होते. आपल्या धन्याच्या आज्ञेनुसार बहुतेक बखरी लिहिलेल्या आहेत. त्यामुळे धन्याचा गौरव, पराक्रम वर्णनात अतिशयोक्ती आढळते. तसेच बखरकार हा प्रत्येक गोष्टीचा साक्षीदार नसतो. त्यामुळे बखरीत स्थळ, काळ, व्यक्तीविषयक उल्लेख अनेक वेळा चुकीचे ठरतात. त्यामुळे बखर म्हणजे इतिहास न राहता वाङ्मय गुणांनी सजविलेले वृत्तकथन होते. त्यामुळे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांना 'एक अस्सल चिटोरे बखरीच्या सर्व बहुमताला हाणून पाडण्यास बस्स आहे'. असे वाटते. असे असले तरी बखरकार जाणीवपूर्वक सत्य लपविण्याचा प्रयत्न करताना दिसत नाहीत.

बखर म्हणजे इतिहास नव्हे तशी ती ऐतिहासिक कादंबरी ही नव्हे. ऐतिहासिक कादंबरीतील अनेक घटनांचा ऐतिहासिक सत्याला आधार असतो. या सत्याभोवती कल्पनांची गुंफण असते. त्यातील काही घटना, संवाद, वर्णने काल्पनिक असली तरी घटनेशी जुळणारी असतात. प्रमुख पात्रे इतिहासातीलच असतात परंतु काही पात्रे, घटना, संवाद काल्पनिक असतात. त्यामध्ये सत्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न कादंबरीकार करीत असतो. त्याची भूमिका कलावंताची, नवनिर्मितीची असते. या उलट बखरीत घटना, प्रसंग, संवाद, काल्पनिक नसतात. तेथे नवनिर्मितीचा प्रश्न नसतो. परंतु काही वेळा प्रसंगानुरूप असणारी जिवंत व रसरशीत भाषा, अलंकृती, कल्पनारम्यता, सुभाषिते, म्हणी यांची जोड, पौराणिक संदर्भ पाहिले की बखरकार हा कलावंत आहे असे वाटते. म्हणून डॉ. ग्रामोपाध्ये म्हणतात, 'बखरकार जाणीवपूर्वक कलानिर्मिती करणारा कलावंत नव्हे परंतु बखरीच्या एकंदर

घाटावरून, त्यावर चढलेल्या कल्पनेच्या व भावनात्मकतेच्या रंगावरून बखरकार हा Unconscious Artist असे अनुमान केले तर वावगे होणार नाही'. थोडक्यात बखर म्हणजे धड इतिहास नाही व ऐतिहासिक कादंबरी ही नाही. सर्व बखरींचे लेखन गद्यातूनच झालेले आहे. याला अपवाद फक्त माहिकावतीची बखर आहे ती एकमेव बखर गद्यपद्यमिश्रित आहे.

## २आ.३.८ बखर लेखनाचा हेतू

खऱ्या अर्थाने मोठ्या प्रमाणात बखर लेखनाचा प्रारंभ शिवकाळात झाला. मुसलमानांच्या तवारिखा पाहून मराठ्यांनाही आपल्या राजाची हकीकत देणाऱ्या देण्याच्या उद्देशाने बखरी लिहायला सुरुवात केली. इतिहास लिहिणे, माहिती देणे, सांगणे किंवा चरित्र लेखन करणे या उद्देशाने प्रामुख्याने बखरीचे निर्मिती झाली आहे. घडलेल्या गोष्टी कथन करणे, वीर पुरुषाचे चरित्र सांगणे हा त्यांचा उद्देश अगदी स्पष्ट होता.

बखर हा वाङ्मय प्रकार खास मराठमोळा वाङ्मयप्रकार आहे. तो कोणाच्याही अनुकरणातून जन्माला आलेला नाही. बखरी तत्कालीन समाजातील इतिहास, व्यक्ती, घटना, यांच्यातील कार्यकारण संबंध, त्यांचे व्यवहार, त्यांच्यातील परस्पर संबंधाचे चित्रण, बखरकाराने आपापल्या प्रतिभेप्रमाणे प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्या चित्रणातून विराट, विस्तृत अशा समाजजीवनाचे दर्शन बखरकार घडविताना दिसतात. इतिहासकालीन व्यक्तींची रामायण, महाभारतातील व्यक्तींशी तुलना करतात. बखरीतील जीवन पूर्णपणे मानवी आहे. प्रत्यक्ष मानवी जीवनाचेच वर्णन त्यात असल्यामुळे मानवी जीवनातील हर्ष - खेद, राग - लोभ, विचार - विकार, सुख- दुःख, स्वप्न - वास्तव असे कितीतरी भावभावनांचे चित्रण त्यात आले आहे. हे चित्रण वास्तव असल्याने, त्याला सत्याचा आधार असल्याने बखर वाङ्मयातील व्यक्तीचित्रणे, समाजचित्रणे वाचकांना आकर्षित करतात. असे आकर्षित करण्याचे सामर्थ्य मराठी बखर वाङ्मयात असल्यानेच बखरींना वाङ्मयकृती म्हणण्याचा मोह होतो.

बखर हा वाङ्मयमप्रकार स्वतंत्र असला तरी बखर लेखनाचा हेतू स्वतंत्र नाही. बखरी स्वयंस्पूर्तीने लेखकाने लिहिल्या गेल्या नाहीत. कोणाची तरी आज्ञा झाली, कोणीतरी सांगितले म्हणून बखर लेखन झालेले आहे. बखरीच्या प्रारंभी बखरकारांनी आपण जे लेखन करीत आहोत ते कोणाच्या आज्ञेने करीत आहोत याविषयी भाष्य केलेले आढळते. उदा. महिकावतीची बखर. मालाड देसला नायकोराव यांच्या सांगण्यावरून लिहिली आहे.

## २आ.३.९ बखरीचे वर्गीकरण

बखर गद्याचे लेखन स्वरूपाच्या दृष्टीने पुढील पाच प्रकार करता येतात.

**१) समकालीन बखरी:**

या प्रकारामध्ये बखरकाराने समक्ष पाहिलेल्या किंवा ऐकलेल्या राजकीय घटनांवर आधारित असतात. बखरकार आपल्या समकालीन राजकीय, सामाजिक घटनांचा इतिहास अशा बखरीतून सांगत असतो. उदा. भाऊसाहेबांची बखर. सभासदाची शिवछत्रपतींची बखर.

### २) स्मृतीवर म्हणजे आठवणीवर आधारित उत्तरकालीन बखरी:

काही बखरकार स्मृतीवर हवाला ठेवून दंतकथा, आख्यायिका, हकीकती यांच्या आधारे बखरलेखन करीत. त्यांना उत्तरकालीन बखरी म्हणतात. बखरकाराला उपलब्ध पुराव्यांची छाननी करण्यास वाव मिळतो परंतु कालविपर्यास, स्थळविपर्यास, व्यक्तीविपर्यास होण्याची शक्यता असते. उदा. कृ. वि. सोहनी यांची 'पेशव्यांची बखर' दाभाड्यांची हकीकत.

### ३) ऐतिहासिक कागदपत्रावर आधारित उत्तरकालीन साधार बखरी:

या बखरी उत्तरकालीनच असतात परंतु तत्कालीन कागदपत्रे, दप्तरातील नोंदीचा आधार असतो. त्यामुळे विश्वासनीय असतात. उदा. म. वि. चिटणीसकृत सप्तप्रकरणात्मक चरित्र.

### ४) बखर हे नाव नसलेल्या परंतु बखर सदृश्य ऐतिहासिक स्वरूपाचे लेखन:

वाका, कैफियत, हकीकत, चरित्र, आत्मचरित्र इत्यादी स्वरूपाचे लेखन. यामध्ये प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेली हकीकत असते. उदा. आंग्र्याची हकिकत, पटवर्धनी वाका, होळकरांची थैली,

### ५) बखर हे नाव असलेल्या परंतु ऐतिहासिक किंवा राजकीय विषय नसलेल्या बखरी:

या बखरीची निर्मिती श्रद्धेतून झालेली असते. हे लेखनाचे स्वरूप पौराणिक, सांप्रदायिक असते. उदाहरणार्थ समर्थांची बखर, कृष्णजन्मकथा बखर, बकासुराची बखर.

कालखंडानुसार बखरींचे वर्गीकरण:

अ) शिवपूर्वकालीन बखरी

ब) शिवकालीन बखरी

क) पेशवेकालीन बखरी त्यापैकी आपणास शिवकालीन बखरीचा अभ्यास करायचा आहे.

## २आ.३.१० शिवकालीन बखरी

शिवकाळामध्ये छत्रपती शिवाजी महाराज हे थोर विभूती होते. त्यामुळे त्यांचे चरित्र आणि कार्यकर्तृत्व यावर जास्तीत जास्त बखरी लिहिल्या जाणे स्वाभाविक होते. शिवकाळामध्ये स्वराज्याची स्थापना, शिवाजी महाराजांचा पराक्रम, आग्र्याहून सुटका, छत्रपती शिवाजी महाराज - अफझलखान भेट, शिवराज्याभिषेक या घटना अभूतपूर्व आणि दैदिप्यमान होत्या. या कालखंडामध्ये सभासदाची बखर, चित्रगुप्त विरचित शिवाजी महाराजांची बखर, श्रीछत्रपतींची ९१ कलमी बखर, शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र, भोसले वंश चरित्र, शिवदिग्विजय, श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र इत्यादी बखरी लिहिल्या आहेत.

### २आ.३.१०.१ सभासदाची बखर (१६९७):

कृष्णाजी अनंत सभासद यांनी विरचित शिवछत्रपतींचे चरित्र म्हणजे सभासदांची बखर ही ऐतिहासिक प्रामाण्याच्या दृष्टीने प्रमाण मानली जाते. सभासद बखर ही मराठीतील पहिली

चरित्रात्मक बखर होय. शिवचरित्र हा बखरीचा विषय आहे. सभासद हा शिवाजी महाराजांच्या काळापासून दरबारी सभासद होता. शिवचरित्राचे व कार्याचे मर्म जाणणारा पहिला माहितगार व्यक्ती होता. म्हणून राजाराम महाराजांनी सभासदास "तुमहीन पुरातन, राज्यातील माहीती (गर) लोक आहां, तरी इस्तकबिलपासून (म्हणजे सुरुवातीपासून) चरित्र लिहून देणे." अशी आज्ञा केली. त्यामुळे श्रीमंत राजाराम महाराज यांचे आज्ञेनुसार इ. स. १६९७ च्या सुमारास लिहिली आहे. या बखरीत शिवचरित्रातील ७१ प्रसंगाचे वर्णन आले आहे. शिवचरित्राचे विश्वासनीय साधन म्हणून या बखरीला महत्त्व आहे.

"साहेबी मेहरबानी करून सेवकास . . . आज्ञा केली" अशी या बखरीची सुरुवात आहे. सभासदाने शिवाजी महाराजांच्या घराण्याची सविस्तर माहिती दिली आहे. बाबाजी (इ.स.१५३०), मालोजी (इ.स.१५५२), शहाजी (इ.स.१५९४) शिवाजी (इ.स.१६२७) अशी वंशावळ सभासदांच्या बखरीत आहे. शहाजीराजे कर्नाटकातील बंगळूर येथे असल्याने त्यांनी त्यांची प्रथम पत्नी जिजाबाई व शिवरायांना पुण्याची जहागिरी सांभाळण्यास पाठविले. जहागिरीतील किल्ले जे आदिलशहाकडे होते ते ताब्यात घेतले. सैन्य वाढविले व बारा मावळावर अंमल सुरू केला. शिवरायांनी मावळ प्रदेशातील तोरणा जिंकून स्वतःची राजधानी स्थापन केली. राजगड बांधला. पाठोपाठ जावळी काबीज करून प्रतापगड बांधला. शिवथरखोरे आणि श्रृंगारपूरचे राज्य जिंकले. सभासदांच्या बखरीत हे सारे प्रसंग सविस्तर येतात. शिवाजी महाराज - अफजलखानाची भेट (१६७४) आणि शिवराज्याभिषेक सोहळा या दोन घटनाचा तंतोतंत कालखंड या बखरीत दिला असून बाकीच्या घटनांचे वर्णन याउपरी, यावरी, तोवरी, इतकीयात, मग या शब्दांनी दर्शविला आहे.

अफजलखानाचा वध हे प्रसंग अत्यंत विस्तृतपणे चितारले आहेत. "खान ही उभा राहून पुढे समोरं येऊन राजियासी भेटला. राजियाने भेटी देतं खानाने राजियाची मुंडी कवटाळून खांकेखाली धरली. आणि हातीची जामदाड होती. तिचे मेण टाकून कुशीत राजियाने चालविली. तों अंगांत जरीची कुडती होती त्यावरील खरखरली. अंगास लागली नाही. हें देखोन राजियांनी डावे हाताचें वाघनख होतें ते हात पोटात चालविला. खानाने अंगात झगाच घातला होता. वाघनखाचा मारा करतात खानाची चरबी बाहेर आली. दुसरा हात उजवे हाताचे बिचवियाचा मारा चालविला. ऐसे दोन वार करून मुंडी आसडुन चौधरियाखाली उडी घालोण निघोण गेले."

शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधानंतर तळ कोकणातील सर्व किल्ले ताब्यात घेतले. जवळपास ५०- ६० किल्ले व घाटावरील प्रदेशही जिंकून घेतला. आदिलशाही पाठोपाठ मुघलांच्या ताब्यातील परांडा, हवेली, कल्याण, कलबुर्गे, आवशे, उदगीर, गंगातीर, औरंगाबाद या प्रदेशात आक्रमण करून ते विजयी झाले. किल्ले काबीज केल्यानंतर प्रशासन व्यवस्था सुरू केली. समान दर्जाचे तीन अधिकारी नेमले. हवालदार, सबनीस, कारखानीस यांच्या सहीने कारभार होईल अशी व्यवस्था केली. किल्ल्यांसाठी नियमावली बनविली. युद्धातील पराक्रमाइतकेच महत्त्व प्रशासनातील कार्याला दिले. शाहिस्तेखानाची स्वारी, मिर्झाराजे तह, आग्रा भेट व सुटका या प्रसंगाचे वर्णन सभासदांने केलेले आहे. यानंतरच्या भागात संभाजीराजे स्वराज्यात परत आले ती घटना, राज्याभिषेक सोहळा, दिग्विजय मोहीम अशा घटनांचे वर्णन येते.

शिवाजी महाराजांच्या संपूर्ण आयुष्याचा पट या बखरीत उलगडत जातो. शौर्य, धैर्य, चातुर्य या गुणांचे या गुणांचे यथोचित वर्णन या बखरीत सभासदांनी केले आहे. जाणता राजा, थोर प्रशासक, आदर्श पिता या पैलूचे दर्शन घडते.

### २आ.३.१०.१ शिवाजी महाराज छत्रपती जनेश्वर यांचे चरित्र:

इ. स.१७६१ मध्ये रघुनाथ यादव चित्रे उर्फ चित्रगुप्त यांनी ही बखर लिहिली आहे. हा बखरकार बाळाजी आवजी चिटणीस यांच्याच घराण्यातील होता. ही बखर स्वतंत्र नसून सभासद बखरीचा तो अनुवाद आहे. सभासद बखर शिवराज्याभिषेक या दोन प्रसंगाचे वर्णन सभासदांपेक्षा चित्रगुप्ताने अधिक डोलदार व विस्तृत केले आहे. अफजलखान व शिवाजी यांचा संवाद हिंदुस्तानी पद्यात केला आहे. बखरीतील मजकुरात अधून मधून त्याने आपल्या कविता घातल्या आहेत. नाट्यपूर्ण अस्खलित व जोमदार वाणीमुळे बखर आकर्षक झाली आहे.

### २आ.३.१०.१ श्री शिवछत्रपतींचे सप्त प्रकरणात्मक चरित्र:

मल्हार रामराव चिटणीस यांनी शाहू प्रतापसिंहाच्या पदरी होते. त्याच्याच आज्ञेनुसार इ.स. १८११ मध्ये ही बखर लिहिली आहे. या बखरीत सात प्रकरणे आहेत म्हणून 'सप्तप्रकरणात्मक चरित्र' म्हणून ओळखली जाते. या बखरीत शिवाजी महाराजांचे लोभस व्यक्तिमत्व, आदर्श, तेजस्वी आणि पराक्रमी राजा, एक महापुरुष म्हणून वर्णन केले आहे. बखरकाराने यात सुभाषितांचा वापर केला आहे. डौलदार व चटकदार भाषा, रसभरीत वर्णनांनी युक्त अशी ही बखर आहे. मानवी स्वभावाचे विविध नमुने त्यांनी सादर केले आहेत. तत्कालीन लोकस्थितीचेही दर्शन या बखरीत आहे.

शिवकाळानंतर जवळपास शंभर वर्षानंतर लिहिलेली ही बखर असल्याने ती उत्तरकालीन असल्यामुळे बखर फारशी विश्वासनीय मानली जात नाही. ही बखर आख्यायिका, दंतकथा, ऐकीव माहिती, दप्तरातील नोंदी याद्वारे या आधारे मल्हाररावांनी ही बखर लिहिली आहे.

### २आ.३.१०.१ भोसलेवंश चरित्र:

हे चरित्र म्हणजे भोसले घराण्याचा इतिहास होय. तंजावरच्या बृहदीश्वराच्या देवळातील शिलालेख स्वरूपात ही बखर आहे. सरफोजी राजांचे आज्ञेवरून बाबुराव चिटणीस यांनी हा वृत्तांत दिला आहे. शिवाजी महाराजांच्या १४ पिढ्यांची परंपरा यात दिली आहे. ऐतिहासिकदृष्ट्या ही बखर विश्वानीय मानणे जड जाते. कारण शिवाजी महाराजांचा संबंध श्रीनारायण, सूर्यनारायण, मनू यांच्या पिढ्यापर्यंत जोडला आहे.

## २आ.३.१० समारोप

शिवकाळात सुरू झालेला गद्याचा अवतार म्हणजे 'बखर वाङ्मय' होय. शिवकाळ आणि पुढे पेशवे काळातील हा गद्याचा अवतार जितका तेजस्वी तितकाच कलात्मकही होता. कौटुंबिक आणि राष्ट्रीय भावनेने भारलेला होता. ऐतिहासिक घडामोडी, राज्यकर्त्यांचे कर्तृत्व, शूरवीरांचे गुणगान, लढायांचे वर्णन, थोर पुरुषांची चरित्रे याविषयीचे लेखन करण्याचे हेतूने बखर हा साहित्य प्रकार उद्याला आला. बखर लेखनाची परंपरा ही मूलतः ऐतिहासिक

स्वरूपाची आहे. इतिहासापेक्षा वाङ्मयदृष्ट्या बखरी महत्त्वाच्या ठरले आहेत. बखर वाङ्मयात विषयाची विविधता आढळते. त्यामुळे इतिहास म्हणून या बखर वाङ्मयाला महत्त्व आहे तसेच साहित्यिक मूल्यही आहे.

बखर हा वाङ्मयप्रकार मराठेशाहीबरोबरच उगम पावला. पेशवाईत बखर वाङ्मयाचा विस्तार झाला आणि पेशवाई अस्तांना गेली तेव्हा त्या वाङ्मयप्रकाराला उतरती कळा लागली. यावरून बखर वाङ्मयाचा आणि तत्कालीन समाजजीवनाचा जवळचा संबंध असल्याचे स्पष्ट होते. साहित्य हे काळाचे अपत्य असते असे म्हणतात. याचे उत्तम उदाहरण म्हणून बखर वाङ्मयाकडे पाहता येईल.

इतिहासातील घडामोडी सांगणे, ऐतिहासिक वीर पुरुषांची चरित्रे सांगण्यासाठी बखर वाङ्मयाची निर्मिती झाली. त्यामुळे इतिहास, सत्य, वास्तव यांना महत्त्व मिळाले. स्वामीनिष्ठा हा घटक बखर वाङ्मयाच्या लेखनाच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरला. स्वामीनिष्ठेमुळे अभिनिवेशाने बखरकार आपल्या स्वामीचा पक्ष घेताना दिसतो. स्वामींची, मालकाची बाजू अभिनिवेशाने मांडताना अनेक बखरकार दिसतात. त्यामुळे अभिनिवेशाने कथाविषय मांडताना पुराणिकाची कथनपद्धती बखरकारांनी स्वीकारलेली दिसते. दंतकथा, आख्यायिका, मिथके यांचा वापर करून ऐतिहासिक सत्याला पुराणकथेच्या माध्यमातून बखरकारांनी सादर केले.

बखरकार हा कलावंत आहे. त्यामुळे त्याने तत्कालीन वास्तवाला वाङ्मयाचे रूप दिले. विचारसौंदर्य, भावसौंदर्य, रसोत्कटता, अलंकारिकता, वक्तृत्वपूर्णता यासारखे कितीतरी वाङ्मयीन गुण बखरीत आढळतात. बखरीत लोकसमज, दंतकथा, आख्यायिका, ऐकिव माहिती, रूढी सांगीवांगीच्या गोष्टी यांचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला आहे. तत्कालीन समाजजीवनाचे, समाजातील विविध घडामोडीचे दर्शन बखरीतून घडते. समाजदर्शन, व्यक्तींचे जीवनचित्रण करण्यात बखरकार कमी पडले नाहीत. हे वास्तव आहे. त्यांनी पराक्रमाचे, वीररसाचे, यश - अपयशाचे, रसपूर्ण वर्णन केले.

## २आ.३.११ संदर्भ ग्रंथ

१. संपा. मालशे, स गं; - मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड दुसरा भाग पहिला, मराठी साहित्य संस्कृती मंडळ. पुरस्कृत पुणे ३० पहिली आवृत्ती १५ सप्टेंबर १९८२

२. पगडी सेतू माधवराव - मोगल आणि मराठे, पार्श्व पब्लिकेशन कोल्हापूर पहिली आवृत्ती १९६३

३. भावे वि. ल.; - महाराष्ट्र सारस्वत, खंड पहिला पॉप्युलर प्रकाशन, मुंबई सहावी आवृत्ती १९८३

४. डॉ. पठाण, यु. म.; - मराठी साहित्य आणखी काही मानदंड मध्ययुगीन मराठीचा साधनग्रंथ, भूमी प्रकाशन, लातूर

५. ग्रामोपाध्ये गं. ब.; - मराठी बखर गद्य व्हीनस बुक स्टॉल, पुणे प्रथम आवृत्ती १९५२ प्रस्तावना

६. संपा. कुलकर्णी, भिमराव; - सभासद बखर अनमोल प्रकाशन, पुणे प्रथम आवृत्ती १९७७

७. नसिराबादकर, ल. रा.; - प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर

## २आ.३.१२ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. शिवकाळातील सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक परिस्थितीचा आढावा घ्या.

२. बखर गद्याची स्वरूप व वैशिष्ट्ये लिहा.

३. शिवकाळातील प्रमुख बखरींचा आढावा घ्या.

४. बखर म्हणजे काय? बखर लेखनाचा हेतू स्पष्ट करा.

५. शिवकाळातील प्रमुख शाहिरांचा आढावा घ्या.

**ब) टीपा लिहा.**

१. बखरीचे वर्गीकरण

२. सभासदाची बखर

३. पोवाड्याची वैशिष्ट्ये

४. लावणीची वैशिष्ट्ये

५. शिवकालीन बखरी

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. बखर म्हणजे काय?

२. मराठीतील पहिली चरित्रात्मक बखर कोणती?

३. 'अफजलखानाची भेट' ही घटना कोणत्या बखरीत आलेली आहे?

४. महीकावतीची बखर कोणाच्या सांगण्यावरून लिहीलेली आहे?

५. शिवाजी महाराजांच्या संपूर्ण आयुष्याचा पट कोणत्या बखरीत आहे?

*****

# घटक २इ१

## २इ१ वारकरी संप्रदाय परिचय (कालखंड १६००-१८१८)

**घटक रचना**

२इ१.१ उद्दिष्टे

२इ१.२ प्रस्तावना

२इ१.३ वारकरी संप्रदाय

२इ१.४ संत एकनाथांची साहित्य संपदा

२इ१.४.१ चतु: श्लोकी भागवत

२इ१.४.२ एकादशस्कंधटीका (एकनाथी भागवत)

२इ१.४.३ भावार्थरामायण

२इ१.४.४ संत एकनाथांची भारूड रचना

२इ१.५ संत तुकाराम

२इ१.६ संत तुकाराम यांचा जीवनपरिचय

२इ१.७ संत तुकारामांच्या अभंगाचे विषय

२इ१.८ संत तुकारामांच्या लेखनशैलीतील सौदर्य आणि वैशिष्ट्य

२इ१.९ तुकाराम शिष्या संत बहिणाबाई यांचे लेखन कर्तृत्व

२ इ १.९.१ बहिणाबाईंची अभंगरचना

२इ१.९.२ बहिणाबाईंचे निर्याणपर अभंग

२इ१.१० समारोप

२इ१.११ संदर्भग्रंथ

२इ१.१२ पूरक वाचन

२इ१.१३ प्रश्नावली

## २इ.१ उद्दिष्टे

- वारकरी आणि समर्थ संप्रदायाची ओळख करून देणे.
- १६००-१८१८ या कालखंडातील मराठीच्या भाषा आणि साहित्याच्या निर्मितीमागील तत्वज्ञान समजावून घेणे.
- १६००-१८१८ या कालखंडातील सांप्रदायिक विचारांचा शोध घेणे.
- संत एकनाथांची साहित्य साहित्याचा परिचय होईल.
- संत तुकारामांच्या साहित्याचा परिचय करून देणे.
- संत तुकारामांचे वारकरी संप्रदायातील योगदान स्पष्ट करणे.
- संत तुकारामांच्या अभंगवाणीय स्वरूप आणि वैशिष्ट्ये यांचा अभ्यास करणे.
- समर्थ रामदासांच्या ग्रंथरचनेचा परिचय करून देणे.
- समर्थ रामदासांच्या ग्रंथरचनेची वैशिष्टये व स्वरूप समजावून घेणे.

## २इ१.२ प्रस्तावना

तेराव्या शतकात महाराष्ट्रात महानुभाव आणि वारकरी असे दोन महत्त्वाचे संप्रदाय दिसून येतात. महाराष्ट्रात त्याकाळी यादवांची सत्ता होती महाराष्ट्रात वैभव संपन्नता होते पण, त्याचबरोबर रूढी परंपरा व्रतवैकल्य पूजा पाठ यांना अवास्तव महत्त्व प्राप्त होऊ लागले होते खऱ्या धर्माचे स्वरूप सर्वसामान्य लोकांना कळत नसल्यामुळे समाज अंधारमय जीवन जगत होता. संत चक्रधर स्वामींनी महानुभाव पंथाची स्थापना केली, तर संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत मध्ये बंदिस्त असलेले तत्त्वज्ञान सर्वसामान्यांपुढे आणण्याचा प्रयत्न केला. हरिहर ऐक्य साधण्याचा प्रयत्न केला. पंढरीचा विठ्ठलासारखे दैवत पुढे आणले आणि तत्कालीन विस्कळीत समाजाला भागवत धर्माच्या पताकेखाली आणले. वारकरी संप्रदायात पंढरीचा विठ्ठल हा केंद्रबिंदू असून तेराव्या शतकापासून महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचा उगम झाला.

तेराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत भक्ती मार्गावरून चालणारे अनेक संत निर्माण झाले शूद्र अतिशूद्र यांना मिळणारी उपेक्षित वागणूक समाजातील विषमता जातीभेद या सगळ्यातून बाहेर काढण्याचा प्रयत्न या संतांनी केला. परमेश्वराची भक्ती करणे त्याचे साहित्य निर्माण करणे या सगळ्या गोष्टी केवळ पंडितांची उच्चवर्णीय यांची मक्तेदारी नव्हे हे या संतांनी आपल्या आचरणातून आणि आपल्या साहित्यातून दाखवून दिले म्हणूनच या संप्रदायात सर्व जातीपंथाचे लोक समाविष्ट झालेले दिसतात.

## २इ१.३ वारकरी संप्रदाय

वारकरी संप्रदायात भक्ती करून सगळ्यांना एका समान पातळीवर येता येते याचा अनुभव मिळाला. या संतांनी आपल्या दैवताची संवाद साधला देवाला आपली सुख-दुःख सांगितले. विठ्ठल नामाचे महात्म्य वर्णन केले आणि त्यातून मिळणारा आनंद त्यांनी शब्दबद्ध करून ठेवला ते साहित्य म्हणजेच संत साहित्य होय. ज्ञानदेवांचे तत्त्वज्ञान त्यातील भक्ती सर्वसामान्य पर्यंत पोहोचवण्याचे कार्य संत नामदेवांनी केले. त्यांचे साहित्य थेट पंजाब पर्यंत जाऊन पोहोचले. भक्ती आणि तत्त्वज्ञान या दोघांचा सुरेख सूर मिसळाला गेलेला या साहित्यातून दिसतो.

वारकरी संप्रदायाच्या सुरुवातीच्या काळात जे अतिशय उच्च प्रतीचे साहित्य निर्माण झाले त्याच्या प्रेरणा त्यांच्या व्यक्तिगत जीवनात दिसत नाही तर अतिशय व्यापक पडेल त्या तत्त्कालीन समाज जीवनात आढळतात.

वारकरी संप्रदायाच्या साहित्यात लोकांच्या भाषेचा वापर आढळतो हे त्या साहित्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य सांगता येईल. अशा या पार्श्वभूमीवर १६०० ते १८१८ या कालखंडातील स्थूलमानाने येणाऱ्या महत्त्वाच्या संत कवींचा आणि त्यांच्या साहित्य संपदेचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

**संत एकनाथ:**

संत एकनाथ हे सोळाव्या शतकातील एक महत्त्वाचे संत होऊन गेले. त्या काळात मुसलमानांचे आक्रमण महाराष्ट्रावरती झाले असल्यामुळे महाराष्ट्रात बहामनी राजवट स्थापन झाली होती आणि त्यातूनच सर्वत्र गोंधळाची परिस्थिती संपूर्ण महाराष्ट्रात निर्माण झाली होती. सर्वत्र अधर्माचे राज्य पसरले होते. दुष्ट प्रवृत्तीचे लोक समाजात होते. अज्ञानात वाढ होत होती. भक्ती मार्ग लोप पावत होता. धर्मशास्त्रातील कल्पना अतिशय चुकीच्या पद्धतीने समाजात रूढ होत होत्या. बुवाबाजीचे चमत्कार, महंत या सर्वच गोष्टींना प्रचंड मोठ्या प्रमाणात समाजात पाठिंबा मिळत होता. सर्वसामान्य लोकांची फसवणूक होत होती. सर्वत्र मुस्लिम राज्यकर्ते अतिशय अंधाधुंदपणे राज्य करत होते. समाज धर्मग्रस्त होत होता आणि या सगळ्याचाच परिणाम समाजावर देखील होत होता. अशा या अस्थिर राजकीय परिस्थितीचा तत्कालीन समाजावर अतिशय विपरीत परिणाम झाला होता. राज्यकर्त्यांच्या सततच्या आक्रमणामुळे समाजात भीतीचे वातावरण पसरले होते. साहजिकच त्या काळाची महाराष्ट्राची वाङ्मयीन परिस्थिती ही अतिशय विस्कळीत बनली होती. तत्त्कालीन शुद्रांना मोक्षप्राप्तीपासून उच्चवर्णीयांनी दूर ठेवले होते. त्यामुळे महाराष्ट्राचे प्रचंड मोठे वाङ्मय नुकसान झालेले दिसते. याच पार्श्वभूमीवर संत एकनाथ आणि त्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते.

'जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।' असे संत बहिणाबाईंनी एकनाथ बद्दल उद्गार काढले आहे त्यावरूनच मध्ययुगीन मराठी साहित्यातील संत एकनाथ महाराज यांचे महत्त्व लक्षात येते. एकनाथांनी अनेक आख्यान रचना , लोकसाहित्य, भारुडे, गवळण यांची रचना केली आणि त्यावरून ते सर्वार्थाने इतर संत कवींपेक्षा वेगळे होते हे लक्षात येते.

शके १६७२ मध्ये केशव स्वामींनी ३१ अध्यायाचे एकनाथ स्वामींचे चरित्र लिहिले. हे पहिले चरित्र मानले जाते. त्यानंतर महिपती बुवा ताराबादकर यांनी आपल्या' भक्तीविजय' या ग्रंथात दोन अध्यायात आणि भक्त लीलामृत या ग्रंथात १२ अध्यायात त्यांचे चरित्र लिहिलेले दिसून येते. त्यानंतर श्रीकृष्ण दास जगन्नाथ नंदन या कवीने चरित्र लिहिलेले असून त्यात अकरा अध्याय आणि अकराशे तीस ओव्या आहेत. त्याचा लेखन काल शके १६२० सांगितला जातो. या सर्व चरित्र ग्रंथातून संत एकनाथांचे जीवन कार्य आपल्या लक्षात येते.

संत एकनाथांचा जन्म संत भानुदासांच्या कुळात शके १४५५ मध्ये म्हणजेच १६ व्या शतकाच्या पूर्वार्धात झाला, म्हणजेच इसवी सन १५३३ मध्ये झाला. ते संत भानुदास यांचे पणतू होते. मुंज झाल्यानंतर ते देवगिरी किल्ल्यावरील जनार्दन स्वामींच्या भेटीला गेले आणि तिथेच त्यांनी संत ज्ञानेश्वरांचा ज्ञानेश्वरी आणि अमृतानुभव या ग्रंथाचे अध्ययन केले. जनार्दन स्वामी यांनी ज्ञानेश्वरीतील शिकवण आणि विठ्ठलाचे उपासना यावर अधिक भर द्यावा असा गुरुपदेश केला. देवगिरी येथील त्रिविक्रमशास्त्री यांची मुलगी गिरीजा हिच्याशी त्यांचा विवाह झाला आणि त्यानंतर त्यांना हरी पंडित नावाचा मुलगा गोदा व गंगा नावाच्या मुली झाल्या. त्यांच्या दैनंदिन जीवनात भजन, कीर्तन, पूजा अर्चना प्रातः वंदन, संध्यावंदन, हरी किर्तन, हरिपाठ इत्यादी गोष्टींचा समावेश होता. एकनाथांनी जनजागृतीसाठी मराठी भाषेचा वापर केला. कीर्तनाच्या भारुडाच्या माध्यमातून त्यांनी जनमानसात जागृती करण्याचा प्रयत्न केला. इसवी सन १५९९ मध्ये पैठण येथे त्यांचे देहावसान झाले.

## २इ१.४ संत एकनाथांची साहित्य संपदा

संत एकनाथांचे साहित्य चार प्रकारात विभागता येते. सर्वप्रथम त्यांनी 'ज्ञानेश्वरी' या ग्रंथाचे शुद्ध स्वरूपाचे संशोधित अशी प्रत तयार केली. यासाठी संत ज्ञानेश्वरांनीच त्यांना प्रेरणा दिली असे सांगतात.

"श्री ज्ञानदेव येऊन स्वप्नात सांगितले मात मज लागी ।"

असे ते त्यासंदर्भात सांगतात. त्यांनी विविध स्वरूपाचे आख्यान काव्ये आणि इतर काव्य लिहिली. कारण सर्वसामान्य लोकांना चरित्र कथांची आवड निर्माण व्हावी त्यात 'चतु:श्लोकी भागवत', 'एकादश स्कंदावरील टीका म्हणजेच 'एकनाथी भागवत', 'भावार्थरामायण', 'रुक्मिणी स्वयंवर', 'हस्तामलकटीका' 'शुकाष्टकटीका' 'आत्मबोध' 'चिरंजीव पद' 'आनंद लहरी' 'अनुभवानंद' 'मुद्रा विलास 'लघुगीता' असे लहान- मोठे ग्रंथ, त्याचबरोबर संत चरित्र गवळणी आरत्या अर्जदस्त प्रकरण इत्यादी साहित्याचा समावेश होतो. तिसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे त्यांनी ४००० पर्यंत अभंग रचना केली. आणि चौथी गोष्ट म्हणजे अतिशय प्रभावी जनमानसांपर्यंत जनसामान्यांपर्यंत पोहोचणारी भारुड आणि गवळणींची रचनाही केली. असे विपुल स्वरूपाचे लेखन एकनाथांनी केलेले आहे.

*** एकनाथांचे आख्यान काव्य:**

आख्यान काव्य म्हणजे कथाकाव्य. यामध्ये 'महाकाव्य', 'खंडकाव्य', 'रामायण' 'महाभारत' आणि 'भागवतग्रंथा'तील अनेक कथा या अख्यानकाव्याच्या रूपाने मराठी मध्ये लिहिल्या

गेलेल्या आपणास दिसतात. या कालखंडात मराठी साहित्यात खूप मोठ्या प्रमाणात आख्यान काव्य लिहिली गेली असून त्यात रुक्मिणी स्वयंवराची कथा ही खूप कवींनी आपल्या आख्यान आणि काव्याचा विषय म्हणून घेतलेली दिसते. आख्यान काव्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजाला भक्ती आणि ज्ञान देण्याचे प्रयोजन या अख्यानकवींचे होते असे दिसते. एकनाथांनी देखील 'चतु:श्लोकी भागवत', 'एकादशस्कंध टीका', आणि 'भावार्थरामायण' असे तीन महत्त्वाचे ग्रंथ लिहिलेले दिसतात.

### २इ१.४.१ चतु: श्लोकी भागवत:

आपले गुरु जनार्दन स्वामी यांच्या आज्ञेवरून एकनाथ आणि वयाच्या २२व्या वर्षी चतु:श्लोकी भागवत या ग्रंथाची रचना केली. त्यांनी तत्कालीन लोकजीवनाचे सूक्ष्म निरीक्षण करून त्यावर या ग्रंथातून टीका केली आहे. या ग्रंथामध्ये भागवताच्या दुसऱ्या स्कंधातील नव्या अध्यायाच्या ४५ श्लोकांवर टीका असून या ग्रंथाची ओवी संख्या १०३६ इतकी आहे. ग्रंथातील ओवी साडेचार चरणी आहे. या ग्रंथामध्ये संत एकनाथांनी गुरु महिमा वर्णन केला असून जीवनामध्ये गुरुचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे हे विशद केले आहे. त्याचप्रमाणे या ग्रंथात एकनाथांनी ब्रह्मदेव -नारद -शुक -परीक्षित अशी उपदेशाची परंपरा नोंदवली आहे. गुरूच्या महात्म्या बरोबरच ज्ञान -विज्ञान, अन्वये व्यतिरेकाचा देखील समावेश आहे. आत्मज्ञान हेच अंतिम सत्य असून माया ही मिथ्य आहे, खोटी आहे. असे त्यांनी या ग्रंथातून सांगितले आहे यासाठी त्यांनी विविध दृष्टांताचा वापर केला त्यासाठी त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण अशी वर्णन शैली वापरली आहे. शब्दज्ञान कसे व्यर्थ आहे हे सांगताना ते म्हणतात,

"सत्य कापूसाची वस्त्रे होती। परी कापूसनेस तो नागवे दिसती।

तेवी शब्दविज्ञानस्थिती। त्या शाब्दिक अंती अपरोक्ष कैचे।

चाटू नाना मधुर रस वाढे परी चाटू खाता न लभे गोडी।

तेवी शब्दे स्वानंद जोडी। चावी चोखडी शाब्दी नाही॥"(५७३-७४)

नाथांच्या या चतु:श्लोकी भागवतावर 'ज्ञानेश्वरी अमृतानुभव' आणि 'चांगदेव पासष्टी' या तीन ग्रंथांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

### २इ१.४.२ एकादशस्कंध टीका (एकनाथी भागवत):

संत एकनाथ महाराजांच्या लेखन कार्यातील सर्वात महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'एकादशस्कंध टीका' होय. या ग्रंथातून एकनाथ महाराजांचे स्वतःचे तत्वज्ञान आणि विचार प्रकट झालेले बघावयास मिळतात. 'एकादशस्कंध टीका' या ग्रंथामध्ये भगवान श्रीकृष्ण आणि उद्धव यांच्यातील संवाद दिसून येतो. अद्वैत आणि भक्ती यांचे महात्म्य एकनाथांनी यात वर्णन केले आहे. एकादशस्कंद यात एकूण ३१ अध्याय असून १३६७ श्लोक आहेत. या ग्रंथात साडेचार चरणी ओवी वापरली असून या ग्रंथात एकूण वीस हजार ओव्या आहेत. तत्त्कालीन समाजाने या ग्रंथाला सहजासहजी मान्यता दिलेली दिसत नव्हती. संस्कृत मधील ब्रह्मविद्या ही प्राकृतमध्ये आणण्यास त्याकाळच्या विद्वानांचा विरोध होता. तेव्हा प्राकृत काय

चोरापासून झाली असा प्रश्न एकनाथ यांनी करून आपल्या ग्रंथ प्राकृतमधून लिहिला. आपण पुन्हा पुन्हा माय मराठीचा गजर करीत आहोत असे ते या ग्रंथात सांगताना दिसतात मराठी भाषेविषयीचा अभिमान या ग्रंथात प्रकट झालेला दिसतो.

"ग्रंथु मराठी देखोन । उपेक्षा न करिता करावा रत्न । पारखोनि चिद्रत्न साधावया ॥"

असे त्यांनी म्हटले आहे. या ग्रंथात भागवतातील श्लोकांचा आधार घेऊन या लोकांचा अर्थ स्पष्ट केला आहे. ग्रंथाच्या शेवटी आपण कोणकोणते विषय घेतले आहे हे ते रूपकाच्या आधारे सांगतात प्रत्येकाच्या शेवटी पुढील अध्यायातील विषय सांगितला आहे.

'एकादशस्कंध टीका' या ग्रंथात गुरुभक्तीचे महत्त्व भक्तांचे प्रकार गुरूंची लक्षणे, कर्म, कर्माचे प्रकार, प्रारब्ध बोध, ब्रह्म, माया, ईश्वर ज्ञान, ज्ञानाचे प्रकार, विज्ञान, यामनियम चार आश्रम, वैराग्याचे महत्व, मोक्षाचे स्वरूप, वैकुंठाचे विषय वर्णन, असे विविध विषय दिसून येतात. त्यात अद्वैत बघते भक्ती, सद्गुरूंचे महत्त्व, सत्संगाचा महिमा, वैराग्याची आवश्यकता या विषयांना महत्त्व मिळाले आहे. किंबहुना हे विषय महत्त्वाचे आहे म्हणूनच नाथांच्या या ग्रंथात त्यांना महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. या ग्रंथात अद्वैत भक्ती आणि श्रीकृष्णलीला यांचे अतिशय विस्ताराने वर्णन असल्यामुळे हा ग्रंथ खूप मोठा झाला आहे. त्यामुळे एक प्रकारचा एक सुंदर परिणाम त्यातून वाचकांवर होत नाही. म्हणजेच पल्हाळीकपणाची एक त्रुटी राहिली असे अनेकांचे म्हणणे आहे.

**'एकादशस्कंध टीका' यातून दिसणारे तत्कालीन कालखंडातील मराठी भाषेचे स्वरूप:**

या ग्रंथातील एकनाथांची लेखन शैली बघता एकनाथांचे कुठेही कमी पडले नाही. अतिशय सुलभपणे ते भाषेचा वापर करतात त्यात कथनात्मकता, संवादत्मकता देखील येते. उदाहरणार्थ कपिलदेवहुती संवाद इ.

अध्यात्मिक विचार स्पष्ट करताना या ग्रंथात एकनाथांनी अनेक दृष्टांताचा वापर केला आहे. बऱ्याचदा पुनरावृत्ती होताना दिसते, पण ग्रंथाच्या लेखनासाठी विविध दृष्टांत वारंवार वापरणे आवश्यक ठरते. विविध रूपकांचा वापर देखील या ग्रंथात केलेला दिसतो. यात अनेक ठिकाणी अतिशय सूक्ष्म आणि व्यापक अर्थ असलेले रूपक योजले आहेत. 'महामेरू', 'क्षीरसागर' अशी रूपके तर ज्योतिषी, धन्वंतरी ही व्यावहारिक रूपके त्यांनी वापरलेली दिसतात. अतिशय सुरस आणि सरळ साधी सोपी रसाळ अशी लोकप्रिय भाषा, शैली त्यांनी या ग्रंथात वापरलेली दिसते. तत्त्कालीन भाषेचे प्रतिबिंब या ग्रंथात पडलेले दिसते त्यामुळे हा ग्रंथ अतिशय लोकप्रिय झालेला आहे असे म्हणता येईल.

### २इ१.४.३ भावार्थरामायण:

संत एकनाथांच्या लेखन कारकिर्दीतील शेवटची रचना म्हणजे भावार्थरामायण याचा उल्लेख करता येईल सुमारे ४० हजार ओव्या असून त्यात सप्त म्हणजे सात कांड लिहिले आहे. पहिली पाच कांडे आणि सहाव्या कांडातील ४४ अध्याय लिहिल्यानंतर १५९९ मध्ये नाथांचे निधन झाले. त्यानंतर उर्वरित ग्रंथ नाथांचे शिष्य गावबा यांनी पूर्ण केले.

या ग्रंथाविषयी सुप्रसिद्ध समीक्षक वि.ल भावे म्हणतात, "भावार्थरामायण हे कोणत्याही एका संस्कृत ग्रंथाचे भाषांतर नसून अनेक ठिकाणच्या गोड गोष्टी घेऊन रचलेले स्वतंत्र असे रामचरित्र आहे. यात एकोपंताने त्या काळच्या सर्व लोकांना कित्यादाखल व नित्य मनन करण्यास योग्य असा एक रामचंद्र आपल्या कल्पनेच्या डोळ्यांपुढे उभा करून त्याचे चित्र आपल्या लेखणीने काढले आहे." (भावे:१९८२, २०६) वाल्मिकी रामायणामध्ये नसणाऱ्या अनेक गोष्टी भावार्थरामायणांमध्ये आलेल्या दिसतात. याचं कारण म्हणजे जनमानसात रूढ असलेल्या राम सीता यांच्या विषयीच्या प्रतिमांचा विचार त्यांनी भावार्थ रामायणाच्या घडणीमध्ये केलेल्या दिसतात. म्हणजेच टीका ग्रंथ असून देखील तत्कालीन समाज मानसातील विविध विचारांचा पूर्णपणे विचार संत एकनाथांनी श्री भावार्थरामाच्या निर्मितीच्या वेळी केलेला दिसतो. भावार्थ रामायणात तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब पडलेले दिसते. अतिशय सुरम्य आणि गोड शैलीत हे रामायण लिहिलेले दिसते.

भावार्थ रामायण लिहिण्यामागील हेतू देखील महत्वाचा आहे. सर्वत्र अंधःकारमय परिस्थिती असताना, महाराष्ट्रावर परकीयांची आक्रमणे होत असताना, स्वधर्म नागवला जात असताना, स्वधर्माचे उत्थान करण्यासाठी समाजापुढे एक आदर्श निर्माण करणे आवश्यक होते, असे नाथांच्या दूरदृष्टीला जाणवले असावे. तद् अनुषंगानेच एक आदर्श, मर्यादा पुरुषोत्तम आणि त्याचा पराक्रम, त्याचे स्वधर्म रक्षण या सगळ्या गोष्टी पुनश्चः एकदा समाजापुढे आणणे नाथांना अत्यावश्यक वाटले असावे आणि म्हणूनच त्यांनी मर्यादापुरुषोतम श्रीरामाचे चरित्र तत्त्कालिन समाजापुढे आणले असावे. धर्माला आलेल्या ग्लानीतून बाहेर काढण्यासाठी भावार्थ रामायणाची रचना नाथानी केली असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही.

तात्पर्य, एकनाथांच्या 'भावार्थ रामायणामुळे' समाजासमोर एक योग्य, आदर्श निर्माण झाला.

**संत एकनाथांची भारूड रचना:**

संत एकनाथांनी निर्माण केलेला एक अत्यंत महत्वाचा काव्यप्रकार म्हणजे 'भारूड' होय. मराठीत पूर्वपार असलेला हा काव्यप्रकार असला तरी संत एकनाथांनी 'तो समाजात रुजवला. याचे कारण तत्त्कालिन समाज परिस्थिती. 'जनसामान्यांचे विचार परिवर्तन करण्याबरोबरच त्यांच्या मनात अध्यात्मिक विचार रुजवणे हे महत्वाचे कार्य भारुडाच्या सहाय्याने संत एकनाथांनी केले. भारूड या शब्दाची व्युत्पत्ती ल. रा. पांगारकरांनी 'बहुरूढ ते भारूड' अशी सांगितली. डॉ. ना. गो. नांदापूरकरांनी 'गारुड' व' भारूड' यात साम्य सांगून 'भार + हाडू ' = भाराडू (जनसमुदायांसमोर म्हणावयाचे गीत) आणि भा+ आरुढ म्हणजे प्रतिभाधिष्ठित गीत, भारूड या दोन मुख असलेल्या पक्ष्याप्रमाणे भारुडाचे व्यावहारिक आणि पारमार्थिक असे दोन अर्थ असतात म्हणून 'भारूड' असे अनेक अर्थ त्यांनी सुचविले.

भारुडांचे स्वरूप मनोरंजनाचे असले तरी एकनाथांची भारुडे केवळ मनोरंजवादी नव्हती. एकनाथांना समाजपरिवर्तनाचे कार्य करायचे होते. समाजाला एक दिशा द्यायची होती. ग्लानी आलेल्या समाजात चैतन्य आणायचे होते. ब्रम्हचैतन्य जाणून घेण्यासाठी भक्तीमार्गाकडे नेणे आवश्यक होते. यासाठी मनुष्यस्वभावात असलेले षड्रीपू नाहिसे करणे अतिशय कठीण काम होते. अशा परिस्थितीत भारूडांच्या' मदतीने नाथांनी समाजात

भक्तीमार्ग रुजवण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी लोकांच्या दैनंदिन जीवनातील विषय निवडले आणि त्यांच्याच भाषेचाही वापर केला. नाथांच्या भारुडात तत्त्कालीन गावगाडा, समाज व्यवस्था, समाजातील विविध स्तरातील लोकं या सगळ्यांचा मोठ्या कल्पकतेने वापर झालेला दिसतो. त्यांच्या भारुडात टिटवी, विंचू, एडका, साप यासारखी प्राणीसृष्टी देखील आढळते. या सगळ्यांचा रूपकासारखा वापर केला आहे.

'विंचू चावला', 'दादला नको ग बाई', 'सगुण गुण माया', भू'त जबर मोठे ग बाई', 'दार उघड बया दार उघड', 'अनादि निर्गुण मधील जोगवा', या सगळ्या रूपकात्मक भारूडांमुळे जनसामान्यापर्यंत आपले म्हणणे पोहोचवणे नाथांना सोपे गेले. त्यांनी आपल्या सर्वच भारूडातून जनसामान्यांना आध्यात्माचा बोध दिला. 'त्यांचा 'जागल्या' हा प्रपंचात झोपलेल्यांना सावध करतो.

एकनाथांच्या भारुडातून वाच्यार्थाबरोबर लक्षार्थ महत्वाचा ठरतो. 'पाखरू' या भारूडातून ब्रम्हतत्त्व दिसून येते. त्यांच्या भारुडातून एकीकडे व्यावहारिक अर्थ तर सुंदर आहेच पण त्यातून निघणारा आध्यात्मिक अर्थ त्याहून सुंदर आहे. एकूणच तत्त्कालिन समाजाला दिशादर्शक ठरणारे त्यांचे भारूड आहेत असे दिसते.

**गवळणी:**

भारूडांप्रमाणेच एकनाथांच्या गवळणी देखील प्रसिद्ध आहेत. 'कशी जाऊ मी वृंदावना' 'वारियाने कुंडल हाले' यासारख्या गौळणींनी जनमानसावर गारुड केलेले दिसते. 'नाथाच्या घरची उलटीच खूण' यांसारखी गूढ कूटरचनाही एकनाथांनी लिहिली. सुबोधता, रसाळता आणि भावगर्भता हे या गवळणींचे वैशिष्ट्य म्हणता येईल. प्रभू श्रीराम आणि श्रीकृष्ण यांच्या जीवनातील प्रसंगांना या गवळणींमध्ये चित्रित केले आहे. 'कसा मला टाकून गेला राम' 'देवाचा देवबाई ठकडा' यांसारख्या गवळणींमधून आर्तता दिसून येते. मधुराभक्ती दिसून येते.

संत एकनाथांच्या लेखनाचा समग्र आढावा घेतल्यास त्यांनी आख्यानकाव्य, भारूड, गवळणी यासारखे वाङ्मयप्रकार लिलया हाताळलेले दिसतात. त्यामागील त्यांची भूमिका समाजात राष्ट्राभिमान, धर्माभिमान, पूर्वसूरींच्या दैदिप्यमान इतिहासाला पुन्हा ज्ञात करून देणे ही होती. त्यांनी दत्ताच्या उपासनेबरोबरच विठ्ठलाच्या उपासनेला देखील विशेष प्राधान्य दिले. भक्तीमार्ग, षड्रीपूंवर विजय मिळवणे, स्वधर्मपालन, जातीभेद न पाळणे या सगळ्या गोष्टी त्यांच्या लेखनाबरोबरच त्यांच्या आचरणातून देखील दिसतात.

## २इ१.५ संत तुकाराम

'ज्ञानदेवे रचिला पाया, तुका झालासे कळस' असे संत बहिणाबाईंनी लिहिलेल्या अभंगातून संत तुकारामांच्या कार्यकर्तृत्वाचा परिचय आपणांस सहज होतो. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून भक्तिमार्ग संपूर्ण समाजाला शिकवण्याचा प्रयत्न या संतांनी केलेला दिसतो. समाजाला वारकरी संप्रदायाचा आचारधर्म आणि तत्त्वज्ञान शिकवण्यासाठी विपूल वाङ्मयाची निर्मिती केली त्यामध्ये महत्वाचे संत शिरोमणी संत तुकाराम यांचा उल्लेख महत्वाचा ठरतो.

वारकरी संप्रदायातील संतांविषयी संत तुकारामांच्या शिष्या बहिणाबाई म्हणतात,

"संतकृपा झाली । इमारत फळा आली ॥

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया ॥

नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ॥

जनार्दन एकनाथ । खांब दिधला भागवत ॥

तुका झालासे कळस । भजन करा सावकाश॥"

या अभंगातून वारकरी संप्रदायातील संत तुकोबांचे महत्त्व अधोरेखित होते. त्यांच्या अभंगातून समाजाविषयीची तळमळ आणि कळवळा प्रकट होतो. म्हणूनच आजही त्यांचे अभंग जनमानसाला भुरळ घालताना दिसतात.

## २इ१.६ संत तुकाराम यांचा जीवनपरिचय

'तुकाराम बोल्होबा आंबिले यांचा जन्म देहू येथे इ. स. १५९८ मध्ये देहू येथे झाला. त्यांच्या घरात पूर्वापार विठ्ठल भक्ती होतीच. पण एकामागोमाग आलेल्या कौटुंबिक संकटाच्या साखळीमुळे ते संसारातून विरक्त झाले. त्यांच्या भावना या कवितांमधून व्यक्त होऊ लागल्या. या सांसारिक जीवनानुभवामुळे त्यांचे मन ईश्वराकडे वळू लागले. गावाबाहेरील भंडारा डोंगरावर जाऊन ते इश्वरचिंतनात आपला वेळ व्यतित करत. 'येणे सुखे रुचे एकांताचा वास । नाही गुणदोष अंगा येत ॥ असे त्यांच्या अभंगातून व्यक्त झालेले दिसते. निसर्गातील सहवासात त्यांना समाजातील गुणदोष प्रकर्षाने जाणवू लागले. त्या जाणीवेतूनच त्यांनी समाजात अस्तित्वात असलेल्या दुष्ट रुढी परंपरा, बुवाबाजी, ढोंगीपणा यांवर उघडउघड हल्लाबोल केला.

संत तुकारामांनी सुमारे चार हजार अभंग लिहिले . 'तुकाराम गाथा' यामध्ये ते एकत्रित केले आहेत. 'तुकाराम महाराजांची महती आज केवळ वारकरी संप्रदायापुरती, महाराष्ट्रापुरती मर्यादित न रहाता आधुनिक काळात ही त्यांची लोकप्रियता दिसून येते. तुकाराम डॉट कॉम ( www. tukaram.com) या संकेतस्थळाला सुमारे एकशे चाळीस देशातील वाचकांनी भेट दिलेली दिसते. यावरूनच आधुनिक काळातही तुकारामाचे अभंग दिशादर्शक, प्रेरणादायी आहेत असे दिसते. तुकारामांचे द्रष्टेपण या अभंगातून दिसून येते.

## २इ१.७ संत तुकारामांच्या अभंगाचे विषय

संत तुकारामांनी विविध विषयांवर अभंग लिहिले. आपल्याच आजूबाजूला असलेल्या असंख्य विषयांना त्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे आपल्या अभंगातून दृग्गोचर केले. समाज जीवनातील वास्तवता, ढोंगीपणा, अनिष्ट रूढी-परंपरा, धर्माला आलेली ग्लानी, असहिष्णुता या सगळ्या विषयांवर आधारित त्यांचे अभंग आपणांस दिसतात. अभंगांच्या माध्यमातून त्यांनी समाज प्रबोधन केले. समाजात जागृती आणण्याचा प्रयत्न केला. सर्वसामान्यांनी जीवनात विवेकाने कसे वागावे हे त्यांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य आहे असे म्हणता येईल. त्यांच्या अभंगात उत्स्फूर्तता दिसून येते आणि बहुतांशी अभंगातून आत्माविष्कार केलेला

दिसतो. त्यांच्या अभंगातून विविध विषय मांडलेले दिसतात. त्यांच्या आत्मनिवेदन पर अभंगातून त्यांचे जीवन समजण्यास मदत होते. तुकाराम आपल्या देहूगावाविषयी 'धन्य देहू गाव पुण्यभूमी ठाव । तेथे नांदे देव पांडूरंग ॥' असे म्हणतात. त्यांच्या बऱ्याच अभंगातून त्यांच्या घराण्याविषयी, व्यवसायाविषयी माहिती कळते. ते म्हणतात,

"शुद्धबीजा पोटी । फळे रसाळ गोमटी ॥"

सततच्या दुष्काळामुळे त्याकाळी अतिशय बिकट परिस्थिती झाली होती. त्या दुष्काळग्रस्त, दुःखी प्रपंचाचे, समाजाचे प्रतिबिंब त्यांच्या अभंगातून दिसून येते आणि ' ऐसी कळवळ्याची जाती" असे म्हणावे लागते. या अभंगांबद्दल ज्येष्ठ साहित्यिक वि. भि. कोलते म्हणतात, "तुकाराम आणि तुकारामांचे अभंग आत्मपर आहेत. मराठी साहित्यातील उत्कृष्ट भावगीते आहेत." मनाची व्याकुळ अवस्था, पांडुरंगाला भेटण्याची तळमळ अतिशय उत्कटपणे त्यांच्या अभंगातून जाणवते. समाजातील सर्वसामान्यांना समजतील अशा अनेक उपमा, दृष्टांत त्यांनी वापरून त्यांनी आपले अभंग लिहिले आहे. त्यामुळे ते अतिशय उत्कट आणि रसाळ झाले आहेत. आणि जनसामान्यांपर्यंत पोहोचले आहेत.

**उदा.** १) कन्या सासुरासी जाये २) भेटीलागी जीवा लागलीसी आस सदैव विठ्ठल भक्तीत लीन असणाऱ्या तुकाराम महाराजांची विठ्ठलाच्या दर्शनाचा लाभ झाल्यावर "आनंदाचे डोही आनंद तरंग " अशी अवस्था झालेली दिसते.

त्यांच्या विठ्ठलभक्तीपर अभंगातून विठ्ठल या दैवताबद्दल असलेले प्रेम, त्याच्याबरोबर असलेले नाते, विठ्ठल आपला जीव - भाव, सखा- सोबती, माता- पिता अशा सगळ्या रुपात दिसून येते. विठ्ठलाचे सर्वांगसुंदर असे वर्णन त्यांनी "सुंदर ते ध्यान उभे विटेवरी" या अभंगातून केलेले दिसते. "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती" असे ते विठ्ठलाशी हितगुज करतात तर "हेचि दान देगा देवा" असे ते विठ्ठलाला विनवतात. पंढरीचे महात्म्य, चंद्रभागेचे ममत्व, माहेराइतके पंढरीला दिलेले महत्व, वाळवंटात दिसणारा समान स्तरावरील समाज (खेळ मांडियेला वाळवंटी ठायी) असे त्यांच्या अभंगाचे विषय झालेले दिसतात.

संत तुकारामांनी आपल्या अभंगातून समाजप्रबोधन मोठ्या कौशल्याने केले आहे. समाजप्रबोधन करताना त्यांची लेखणी काहीशी कठोर ही होताना दिसते. समाजातील पाखंडीपणा, भेदाभेद, भोंदूपणा, बुवाबाजीत झालेली वाढ आणि त्यामुळे त्यात अडकलेला तत्कालिन समाज, अनिष्ठ रुढी परंपरा, अंधश्रद्धा या सगळ्या अनिष्ठ प्रथांवर आपल्या अभंगांतून त्यांनी कोरडे ओढले. "बुडते हे जन देखवेना डोळा ।" असे म्हणून ते समाज प्रबोधनासाठी पुढे सरसावताना दिसतात. प्रपंच आणि परमार्थ यांची सांगड घालताना दिसतात. ते म्हणतात,

"जोडोनिया धन उत्तम व्यवहारे । उदास विचार वेच करी"

"जे का रंजले गांजले ।त्यासि म्हणे जो आपुले"

अशांनाच साधू म्हणावे आणि परमेशर तेथेचि मानावा असे ते म्हणतात. सज्जनांचे गुणगौरव गाताना ते म्हणतात,

"चंदनाचे हात पाय ही चंदन ।

परिसा नाही हीन कोणी अंग ॥

तुका म्हणे तैसा सज्जनापासून ।

पाहतां अवगुणं मिळेचि ना ॥"

चंदनासारखा हा सज्जन समाजात आपल्या 'गुणांनी एक आदर्श व्यवस्था निर्माण करत असतो त्याची 'नित्य वंदावी पाऊले' असे ते म्हणतात.

समाजातील सज्जनांविषयी त्यांच्या मनात अंतरीचा कळवळा दिसून येतो पण जे वाईट प्रवृत्तीचे आहेत त्यांना त्यांच्या भाषेतच ते आपल्या अभंगातून उत्तर देतात.

"मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास। कठीण वज्रास भेदूं ऐसे।

भले तरी देऊ कासेची लंगोटी। नाठाळाचे माथी हाणू काठी ॥

समाजातील अंध श्रध्देवर त्यांनी कडाडून हल्ला केला. नवस-सायास, गंडे-दोरे, होम-हवन यासारख्या निर्थक गोष्टींवर कडाडून हल्ले चढविले. ते म्हणत-

"नवस सायासे होती पोरे, मग का करणे लागे पती?

"पाया झाला नारू । तेथे न बांधा कापुरू ॥

"देवावरी विंचू आला । देवपूजा नावडे त्याला ॥

"तेथे पैजारेचे काम । अधमासि तो अधम ॥"

असे सांगून समाजातील अधम, दुष्ट- दुर्जनांशी कसे वागावे याचा उपदेश केला आहे.

महत्प्रयासाने मनुष्य 'जन्म आपणास लाभला असल्यामुळे त्याचे सोने करावे. हा जन्म आपणास मिळाला त्याबद्दल आपल्या अभंगातून ते कृतज्ञता व्यक्त करतात,

"बरवें झालें आलों जन्मासी । जोड जोडिली मनुष्य देहाऐसी ॥

आपल्या या नरदेहाचा योग्य तो उपयोग करून जिवनभर त्याप्रमाणे वागत जावे. इष्ट अनिष्ट यातून इष्ट तेच निवडावे. आणि शेवटी उपकारापुरते उरावे असे त्यांच्या अभंगातून दिसते.

## २इ१.८ संत तुकारामांच्या लेखनशैलीतील सौदर्य आणि वैशिष्टय

संत तुकारामांच्या अभंगातून स्वानुभवाचा प्रत्यय येतो. अत्यंत बिकट अशा परिस्थितीतून तत्कालीन समाज जात होता. त्याचप्रमाणे व्यक्तिगत जीवनात देखील अनेक तीव्र चढ - उतारांना त्यांना सामोरे जावे लागले होते, पण त्यांनी आपली वृत्ती समतोल ठेवून आपले सर्व चित्त परमेश्वरापाशी लीन केले. हे त्यांच्या अभंगाचे वैशिष्टय म्हणता येईल.

अल्प अक्षरत्व हे त्यांच्या लेखनशैली चे आणखी एक वैशिष्टय म्हणता येईल. त्यांचे अनेक अभंग आजही सुविचारांप्रमाणे वापरले जातात.

**उदा.**

१) ‘जे का रंजले गांजले’

२) ‘सुख पाहता जवापाडे.. दुःख पर्वताएवढे’

३) ‘लहानपण देगा देवा’

४) ‘वृक्षवल्ली आम्हा सोयरे’

५) ‘जेथे जातो तेथे तू माझा सांगाती’

६) ‘मन करा रे प्रसन्न सर्व सिध्दीचे कारण’

७) ‘निश्चयाचे बळ’’

८) असाध्य ते साध्य करिता सायास’ इ.

त्यांच्या अभंगातून दृष्टांत, अनुप्रास, उपमा  या गोष्टी प्रत्येक ठिकाणी आढळतात. समर्पक दृष्टांत  हे त्यांच्या शैलीचे मुख्य वैशिष्टये सांगता येईल. ‘अणूरेणूया थोकडा, तुका आकाशाएवढा” अशा परस्परविरोधी दृष्टांताचा सुंदर नमुना आहे असे म्हणता येईल.

तुकारामांच्या अभंगातून परकायाप्रवेश हे वैशिष्टय महत्वपूर्ण आहे असे म्हणता येईल .

“कन्या सासुरासी जाये । मागे परतोनी पाहे ।

तैसे जाले माझे जीवा । केव्हा भेटसी केशवा”

यातून कन्येच्या मनातील हळवे व्याकूळपण अगदी चपखलपणे दृष्टांत रूपात साकारले आले. तर,

“दिवाळीचा मुळा, लेकी आसावली ॥

“तैसे माझे मन । वाट पाहे ॥”

अशा शब्दांतून स्त्रीमनाशी सहवेदना साधलेली दिसते. त्यामुळेच त्यांचे अभंग जनमानसाच्या अगदी ‘जवळचे झालेले दिसतात.

आत्मानुभव प्रकट करणारे, भक्तीरसात बुडलेले असे त्यांचे अभंग तत्कालीन समाजाचे उद्बबोधन करताना दिसतात. तर तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब देखील या अभंगातून पडलेले दिसते.

सारांश, ज्ञानेश्वरांनी महाराष्ट्राला भागवत धर्माचे व्यापक तत्त्वज्ञान दिले, नामदेवांनी भक्तीचा ध्वज खांदयावर टाकून हा बहुमोल ठेवा उत्तर भारतापर्यंत प्रसृत केला. एकनाथांनी तत्त्व आणि व्यवहार यांचा मेळ घडवून सामाजिक नीतिमत्तेची प्रतिष्ठापना केली; तर ‘तुकारामांनी

भागवतधर्माची शिकवण खेड्यापाड्यांत, अगदी खालच्या थरांपर्यंत पोचवून भागवत धर्म-मंदिरावर कळस चढविला, हे संत बहिणाबाईंचे बोल अत्यंत समर्पक आहेत. (द. वा. पटवर्धन मराठी वाङ्मयात इतिहास, खंड दुसरा: भाग दुसरा पृ. १५१)

संत तुकारामांनंतर त्यांच्या पश्चात काही संत होऊन गेले त्यांचा थोडक्यात उल्लेख करणे आवश्यक आहे. हे संत म्हणजे रामेश्वरभट वाघोलीकर, बहिणाबाई सिऊरकर, निळोबा पिंपळनेरकर व कचेश्वरभट ब्रम्हे. कान्होबा हे तुकारामांच बंधू आणि मुलगी भागूबाई आणि शिष्य निळोबा हे देखील संतपरिवारात महत्वाचे ठरतात.

तुकोबांच्या विचार परिवारात त्यांना समकालीन असणाऱ्या संतांचा एक गट तर तुकारामांच्या नंतरच्या काळातील संतांचा दुसरा गट असे दोन गट कल्पावे लागतात. पहिल्या गटात रामेश्वरभट वाघोलीकर, कान्होबा, भागूबाई व संत बहिणाबाई यांचा समावेश होती तर दुसऱ्या गटात निळोबा पिंपळनेरकर व केशरभट ब्रम्हे या दोघांचा समावेश होतो.

**तुकारामांच्या समकालीन संतांमध्ये देखील तीन गट पडतात.**

१. 'तुकारामांशी सुरवातीला विरोधाने वागून नंतर त्यांना शरण गेलेले रामेश्वरभट वाघोलीकर

२. तुकारामांचे बंधू आणि मुलगी कान्होबा आणि भागूबाई

३. 'तुकारामांच्या विचारसरणीला अनुसरणारी आणि त्यांचे शिष्यत्व अनन्यभावाने स्वीकारणाऱ्या संत बहिणाबाई सिऊरकर

## २इ१.९ तुकाराम शिष्या संत बहिणाबाई यांचे लेखन कर्तृत्व

संत तुकारामांच्या समकालीन संत सहवासांपैकी संत बहिणाबाई या महत्वाच्या ठरतात कारण त्यांनी जाणीवपूर्वक 'तुकारामांना अनुसरले होते. योगसाधना, ज्ञाननिष्ठा, वैराग्यशीलता, चौकस बुद्धी, वारकरी संप्रदायाला सामोरी जाण्याची वृत्ती आणि काव्यनिर्मिती हे गुण त्यांच्यात महत्वपूर्ण होते असे दिसते. म्हणजेच 'तुकारामांच्या समकालीन प्रभावळीत बहिणाबाई अधिक प्रभावी वाटतात. तुकारामांच्या प्रत्यक्ष दर्शनापूर्वीच बहिणाबाईंना 'तुकारामांनी स्वप्नदृष्टांत दिला होता त्या आधारे त्यांनी 'तुकारामांना आपले सद्गुरू मानले होते.

संतकृपा झाली। इमारत फळा आली ||

ज्ञानदेवें रचिला पाया। उभारिलें देवालया ॥

नामा तयाचा किंकर। तेणें रचिले तें आवार ॥

जनार्दन एकनाथ। खांब दिला भागवत ॥

तुका झालासे कळस | भजन करा सावकाश ॥

बहिणी म्हणे फडकती ध्वजा। निरूपणा केलें बोजा ॥ [संत बहिणाबाईचा गाथा, चित्रशाळाप्रत, (चित्रगा) पृ. २२९]

या अभंगात 'त्यांनी वारकरी संप्रदायातील प्रमुख संतकवींचे संप्रदायातील कार्य आणि अचूक स्थान वर्णन करून प्रमुख संतकवींच्या अभंगवाणीचे मूल्यमापन केलेले दिसते. त्याचप्रमाणे 'तुकाराम' हा वारकरी संप्रदाय मंदिराचा कळस असून आपण त्यावर फडकणारी ध्वजा आहोत असे त्यांनी मोठ्या अभिमानाने म्हटले आहे.

प्रत्यक्षात तुकारामांचा अनुग्रह जरी मिळाला नसला तरी अप्रत्यक्षपणे 'तुकाराम महाराजांशी त्यांचा आत्मऐक्यभाव साधला गेला होता असे दिसते.

### २इ१.९.१ बहिणाबाईंची अभंगरचना:

मराठीत आत्मचरित्रलेखन करणारी पहिली कवयित्री संत बहिणाबाई होय. बहिनाबाईंनी आपल्या 'आदिनाथे उपदेश पार्वतीस केला' या अभंगातून आपली गुरुपरंपरा नमूद करून संत तुकारामांच्या चैतन्य संप्रदायाचे नाते संत ज्ञानेश्वरांच्या नाथ संप्रदायाशी जोडून संत तुकारामास आपले गुरु मानले आहे. यातून बहिणाबाईंची समन्वयबुद्धी दिसून येते.

'श्री संत बहिणाबाई यांची अभंगाची गाथा' या ग्रंथांत बहिणाबाईच्या नावावर एकूण ७४० अभंग दिले आहेत. त्यांचे स्थूलमानाने पुढीलप्रमाणे विषयवार वर्गीकरण करता येते. बहिणाबाईची कविता क्वचित श्लोकरूप असली, तरी प्राधान्याने अभंगरूपच आहे.

१) आदि परंपरा १ (२) आत्मनिवेदनपर ७८ (३) निर्याणपर २६ (४) मनःपर ३४ (५) भक्तिपर १० (६) सद्गुरुस्तवन २५ (७) अनुतापपर २८ (८) संतवर्णनपर २१ (९) बोधपर ५५ (१०) निवृत्तिपर १९ (११) तुलसीमाहात्म्यपर ११ (१२) ज्ञानपर ७० (१३) नाममाहात्म्यपर ११ (१४) ब्रह्मकर्मपर ५० (१५) श्रीपंढरीनाथपर १३ (१६) पंढरीमाहात्म्यपर १ (१७) पतित्रताधर्मपर ७ (१८) करुणापर ३३ (१९) टोणप्याचे अभंग १६ (२०) स्फुट ४० (२१) पदे-गौळणी- भारुडे ५० (२२) आरत्या २० (२३) श्लोक ४८ (२४) करुणापर (देवाशी भांडण ) ४१ इ.

बहिणाबाईंनी वारकरी संप्रदायाचे सर्व काव्यविषय आपल्या अभंगरचनेत हाताळलेले दिसतात, त्यातून तिच्या कवितेचे सांप्रदायिक रूप स्पष्ट होते. त्यांच्या अभंगरचनेवर संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत नामदेव, संत जनाबाई यांच्या अभंगरचनेचा फार मोठा प्रभाव पडलेला दिसतो, त्यामुळे त्याच्याशी मिळते जुळते असे अनेक अभंग त्यांनी लिहिलेले दिसतात.

उदा:

निशींचिया भरी दिवस ना राती। प्रकाश ना ज्योती कैसे माये ॥

हें सुख जाणती जाणते स्वभावें। पूर्ण कृपा देवें केली ज्यांसी ॥

बिंबीं बिंब कैसें सामावोनि ठेलें। स्वरूप कोंदलें दशदिशा ॥

बहिणी म्हणे तेथे बोलावें तें काय। मज मीच पाहें हारपलें ॥ (चिबगा. ३०४

या अभंगावर संत ज्ञानेश्वरांच्या अभंगाचा प्रभाव दिसतो.

असेच साम्य नामदेवांशीही आढळेल :

तूं माझी माउली तुझे मी बालक। करितें कौतुक नामीं तुझिया ॥

तूं माझी गाउली मी तुझें वासरूं । करितें हुंकारू तुझे नाम ॥

तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस । करीं रात्रंदिवस ध्यान तुझें ॥ (चिबगा. ५२५)

तसेच जनाबाईच्या अभंगाचा केलेला अनुवाद असा आहे :

विठू माझा लेंकुरवाळा । संगें लेंकुरांचा पाळा ॥

तुका घेतो कडियेवरी । नामा करांगुळी घरी ॥

एकनाथ खांद्यावरी । कबिरातें हातीं घरी ॥

गोरा कुंभार मांडीवरी । चोखा जिवा बरोबरी ॥ (चिबगा. ५४६)

तुकारामांच्या अभंगाचा देखील त्यांनी अनुवाद केला आहे.

आपले आपण देखिले मरण । तो जाला शकुन स्वानंदासी ॥ हा अभंग संत तुकारामांच्या ' आपले मरण पाहिले म्यां डोळा' या अभंगाचा अनुवाद आहे.

संत तुकारामांच्या विराण्यांचाही बहिणाबाईंनी अनुवाद केला आहे.

'ऐसी कोण आहे उदार जीवाची', 'सांडियेली लाज लौकिक व्यवहार', 'निंदक भेटतां दुणावे हरीख 'या सारख्या इतर अनेक अभंगात संत तुकारामांचेच अनुभव आणि अनुभवांची अभिव्यक्ती बहिणाबाईंनी केलेली दिसते. 'त्यांच्या अभंगातून तुकारामांच्या प्रतिमांचाच वापर केलेला दिसतो तर काही ठिकाणी त्यांनी तुकारामांच्या अभंगातील मूळ आशयसूत्र देखील कायम ठेवले आहे.

उदा:-

'निंबा कडुपण देत असे कोण' किंवा 'लाटिकेच अवतण जेविलिया साच' या सारख्या कित्येक अभंगांत 'तुकाराम महाराजांच्या अभंगात आलेल्या प्रतिमा, त्यातील आशयसूत्र, त्यामागील लयतत्व, बोलीभाषेचा उपयोग या सगळ्यांचा प्रभाव दिसतो.

असे असले तरी संत तुकाराम आणि संत बहिणाबाई ही दोन वेगळी व्यक्तिमत्वे आहेत. दोघांच्या आयुष्यात विरक्ती हा समान धागा दिसून येतो असे असले तरी दोघांचे वैराग्य वेगवेगळ्या प्रकारचे होते. बहिणाबाई परंपरावादी असून बऱ्याचदा 'तडजोड' स्विकारताना देखील दिसतात.

### २इ१.९.२ बहिणाबाईंचे निर्याणपर अभंग:

बहिणाबाईंच्या निर्याणपर अभंगांना सुहासिनी इर्लेकर यांनी अपूर्व प्रकरण आहे असे म्हटले आहे. (म.वा.इ. खंड दुसरा पृ. १९७) मृत्यूला सामोरे जाणाऱ्या बहिणाबाईंच्या बारा पूर्वजन्मासंबंधीच्या या स्मृती आहेत. बहिणाबाईंच्या या निर्याणपर अभंगातून एक अपूर्व असा अध्यात्माचा अनुभव संक्षेपाने प्रकटला त्यातून प्रकट होणारी बहिणाबाईंची प्रतिमा एका विलक्षण, विचक्षण योगिनीची, ज्ञानवतीची आहे असे दिसते.

वज्रसूचिकोपनिषदाच्या सहाय्याने खरा ब्राम्हण कोण हे स्पष्ट करून बहिणाबाईनी तुकारामांसारख्या संतांचे अनुसरण केले. या एका गोष्टीमुळे देखील बहिणाबाई भागवत धर्मांच्या ध्वजा ठरतात.

## २इ१.१० समारोप

अशा प्रकारे वारकरी संप्रदायातील महत्वाचे संत, जगद्गुरू संत तुकाराम आणि आणि त्यांचा शिष्यपरिवार यांचा परिचय करून देता येतो.

## २इ१.११ संदर्भग्रंथ

१. करंदीकर, वि. रा., २०१० 'टीका आणि विवेचनपर वाङ्मय' मराठी वाङ्मयाचा इतिहास: खंड दुसरा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे.

२. भावे, वि. ल. ( पुरवणी, शं. गो. तुळपुळे), १९८२: महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई., सहावी आवृत्ती

३. देशपांडे, अ. ना.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ४ व्हिनस प्रकाशन, पुणे

४. आंतरजाल:-

https://www.esakal.com/culture-and-religion/sant-tukaram-maharaj-jayanti-2024-famous-abhang-aam99

५. आंतरजाल:-

https://pocketbiography.com/tukaram-maharaj-information-in-marathi/

## २इ१.१२ पूरक वाचन

१. फाटक, न. र.: श्री एकनाथ वाङ्मय दर्शन आणि कार्य, मौज प्रकाशन गृह, मुंबई.

२. देशपांडे, अ. ना. : प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खड तिसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे.

## २इ१.१३ प्रश्नावली

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. संत एकनाथांच्या वाङ्मयीन कार्याचा परिचय करून दया.

२. संत एकनाथांच्या लेखनामागील प्रेरणा सोदाहरण स्पष्ट करा.

३. 'एकनाथ हे ख-या अर्थाने महाराष्ट्राचे लोकनाथ होते.' या विधानाची सविस्तर चर्चा करा.

४. संत तुकारामांच्या वाङ्मयीन कार्याचा सविस्तर आढावा घ्या.

५. 'संत तुकारामांचे परस्पर विरोधी व्यक्तिमत्व त्यांच्या अभंगातून कसे व्यक्त होते ते सोदाहरण स्पष्ट करा.

**ब. टीपा लिहा.**

१. संत एकनाथकृत 'रुक्मिणी स्वयंवर'

२. संत एकनाथांच्या भारूडातून झालेले समाजप्रबोधन

३. संत तुकारामांच्या अभंगातून होणारा आत्माविष्कार

४. संत तुकारामांचे समाज प्रबोधनपर अभंग

५. संत बहिणाबाई यांचे लेखन कर्तृत्व

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. संत भानुदास यांचे पणतू कोण होते?

**उत्तर – संत एकनाथ**

२. संत बहिणाबाई यांची 'अभंगाची गाथा' या ग्रंथांत बहिणाबाईच्या नावावर एकूण किती अभंग दिले आहेत

**उत्तर- ७४०**

३. "मन करा रे प्रसन्न सर्व सिध्दीचे कारण" ही रचना कोणी केली आहे?

**उत्तर- संत तुकाराम**

४. मराठीत आत्मचरित्रलेखन करणारी पहिली संत कवयित्री कोण आहे?

**उत्तर- बहिणाबाई**

५. संत एकनाथ महाराजांच्या लेखन कार्यातील सर्वात महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे ------------होय.

**उत्तर- 'एकादशस्कंध टीका'**

*****

# घटक २इ२

## २इ२ समर्थ संप्रदाय परिचय (कालखंड १६००-१८१८)

**घटक रचना**

२इ२.१ समर्थ संप्रदाय

२इ२.२ संत रामदासांचे संक्षिप्त चरित्र

२इ२.३ समर्थ संप्रदायाची स्थापना, तत्त्वज्ञान आणि आचारसंहिता

२इ२.४ रामदासांची साहित्य संपदा

२इ२.४.१ करुणाष्टके

२इ२.४.२ रामायणे

२इ२.४.३ मनाचे श्लोक

२इ२.४.४ दासबोध

२इ२.४.५ रामदासांचे इतर वाङ्मय

२इ२.५ रामदासांचा शिष्यपरिवार

२इ२.५.१ रंगनाथ स्वामी निगडीकर

२इ२.५.२ जयराम स्वामी वडगावकर

२इ२.५.३ केशव स्वामी भागानगरकर

२इ२.५.४ आनंद मूर्ती ब्रह्मनाळकर

२ इ२.५.५ श्री श्रेष्ठ किंवा श्रीरामीरामदास

२ इ२.५.६ समर्थ शिष्य दिनकर

२ इ२.५.७ कल्याण स्वामी

२ इ२.५.८ समर्थ शिष्या वेणाबाई

२ इ२.६ समारोप

२इ२.७ संदर्भग्रंथ

२इ२.८ पूरक वाचन

२इ२.९ प्रश्नावली

## २इ२.१ समर्थ संप्रदाय

संत परंपरेतील आणखी एक संत म्हणजे संत रामदास होत. त्यांनी स्वतःचा असा 'समर्थ संप्रदाय' निर्माण केला आणि तत्त्कालिन महाराष्ट्रात एक चैतन्य आणण्याचा प्रयत्न केला. स्वतः संसारात न रहाता 'जनसामान्यांना 'प्रपंच करावा नेटका' असे ते त्यांच्या अलौकिक अधिकारामुळे म्हणू शकतात. प्रपंच कसा करावा हे त्यांनी आपल्या वाङ्मयातून जनसामान्यांपर्यंत पोहोचवले. तत्त्कालिन समाजाला आलेली ग्लानी त्यांनी आपल्या आचार - विचारांनी करण्याचा प्रयत्न केला. आणि समाज प्रबोधन करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे असे दिसते. सतराव्या शतकात महाराष्ट्र अस्मानी (दुष्काळ/ आपत्ती) आणि सुलतानी (राजकीय संकटे) या दोन्ही गोष्टींनी गांजला होता. समाजात एक प्रकारची उदासीनता, आळस, शैशिल्य, कमीपणाची वृत्ती, अज्ञानीपणा निर्माण होऊन समाज आपली उज्वल पूर्वपरंपरा विसरून निष्क्रिय बनला होता. अशा समाजात चैतन्य निर्माण करण्याचे कार्य संत रामदासांच्या समर्थ संप्रदायाने केले असे दिसते. किंबहुना यासाठीच संत रामदासांनी 'समर्थ संप्रदायाची' स्थापना केली असे अधोरेखित होते.

## २इ२.२ संत रामदासांचे संक्षिप्त चरित्र

नारायण सूर्याजीपंत ठोसर हे समर्थ रामदास यांचे मूळ नाव. त्यांचा जन्म जालना येथील 'जांब' या गावी इ. स. १६०८ मध्ये झाला. वयाच्या सातव्या वर्षी त्यांच्यावरील पितृछत्र हरपले. लहानपणापासूनच 'ते अतिशय कुशाग्र बुद्धीचे होते. वयाच्या नवव्या वर्षी त्यांना श्रीरामदर्शन आणि रामाचा अनुग्रह झाला. प्रपंचात अडकणे नको असा विचार करून लग्नमंडपातून वयाच्या तेराव्या वर्षी ते पळून गेले. पुढे नाशिक येथील पंचवटी येथे रामदर्शन घेऊन टाकळी येथे गेले. तेथे त्यांनी बारा वर्ष दीर्घ तपश्चर्या करून राम जपात घालवले. त्यानंतर बारा वर्षे भारत भ्रमण केले. श्रीराम आणि श्री हनुमान ही त्यांची आराध्य दैवतं होती. प्रभू श्रीरामासारखा आदर्श समाज निर्माण व्हावा यासाठी त्यांनी श्रीरामाची उपासना करून त्याचा प्रचार आणि प्रसार केला तर, हनुमान शक्ती आणि युक्तीची तसेच कुशाग्र बुध्दीची देवता आहे. म्हणून त्यांनी महाराष्ट्रात ११ मारुतीची देवळे स्थापन केली. 'तत्त्कालिन समाज त्यांना गतीमान करण्याचा हा एक प्रयत्न होता. "साह्य आम्हांसी हनुमंत। आराध्य दैवत श्रीरघुनाथ असे समर्थ रामदास सांगतात. "मराठा तितुका मेळवावा । महाराष्ट्र धर्म वाढवावा" हा उपदेश त्यांनी केला. न्यूनगंडात बुडालेल्या तत्त्कालिन समाजाला एक चैतन्य प्राप्त करून देण्याचे कार्य त्यांनी केले. शैथिल्य आलेल्या समाजाला, बोथट झालेल्या मनाला लढण्याची उर्मी दिली. लोकसंघटन करून आपली उज्ज्वल परंपरा त्यांच्यासमोर उभी केली. इ.स. १६४९ मध्ये समर्थांनी सज्जनगडावर देह ठेवला.

## २इ२.३ समर्थ संप्रदायाची स्थापना, तत्वज्ञान आणि आचारसंहिता

१७ व्या शतकातील शिवकालापूर्वीचा समाज हा अस्मानी सुलतानी संकटात होरपळून निघत होता. सतत होणाऱ्या विविध प्रकारच्या परचक्रांनी समाजव्यवस्था ढासळून गेली होती. सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अधःपतन चालू होते. अशा दिशाहीन समाजाला

दिशा दाखवण्यासाठी लोकांपुढे एक आदर्श व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न समर्थ रामदासानी केला. टाकळी येथे उद्धव नावाच्या शिष्याला आपल्या शिष्य संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. पुढील बारा वर्षे समर्थ रामदासांनी संपूर्ण भारतात पदभ्रमण केले. त्यातून भारतातील हिंदूंची दारुण अवस्था त्यांनी बघितली आणि 'निशिदिनि जनचिंता लागलीसे उदारा। सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे?" असा विचार करून आत्मउध्दाराबरोबर लोकोध्दार देखील करावयास सुरवात केली. रामाची उपासना एकट्याने करायची गोष्ट नसून 'ती एक सामूहिक स्वरूपात करावयास हवी आणि 'ती गावोगाव होण्यासाठी या कल्पनेने भारलेले शिष्य सर्व भारतभर पसरले पाहिजे असा प्रचार करून शके १५६६ मध्ये त्यांनी आपल्या समर्थ संप्रदायाची स्थापना केली. या संप्रदायाचे प्रभू श्रीरामचंद्र हे आराध्य दैवत होते. आणि रामाचा सेवक म्हणजेच 'रामदास' हे नामाभिधान त्यांनी घेतले. त्याचबरोबर समाजात बलोपासना रुजावी यासाठी हनुमानभक्ती समाजात रुजविली. वैदिक धर्माचे पुनरोद्धारण करण्यासाठी जो संप्रदास रामदास स्वामींनी सुरु केला त्यास 'रामदासी संप्रदाय, समर्थ संप्रदाय किंवा दास संप्रदाय असे म्हणतात.

"जाणावा रामदासांचा। हाचि संप्रदाय ॥

व्रत ज्याचे ब्रम्हचारी। वस्त्रे ज्याची हुरमुजी बरी ॥

समर्थ संप्रदायाची चाफळ आणि सज्जनगड ही दोन महत्त्वाची स्थाने बनली. दासबोध हा ग्रंथ आणि मनाचे श्लोक हे नित्यपठणाचे झाले.

"आधी ते करावे कर्म।

कर्म मार्गे उपासना।

उपासकां सापडे ज्ञान।

ज्ञाने मोक्षीच पावणे ॥"

यातून समर्थ संप्रदायाचा आचारधर्म कसा होता याचे ज्ञान होते. हरिकथा निरूपण, राजकारण, सावधनता आणि साक्षेप ही या संप्रदायाची शिकवणूक दिसते.

*** समर्थ संप्रदायाचे तत्वज्ञान:**

इ.स. १६४५ मध्ये समर्थ रामदासांनी सातारा येथील मसूर या गावी रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला त्याबरोबरच हनुमानाच्या मंदिराची स्थापना करण्यासही सुरूवात केली. तत्कालिन समाज परकीयांच्या भीतीने ग्रासून गेला होता. समर्थांच्या या कार्यामुळे दुबळ्या समाजात स्फूर्तीदायक धर्मभावना निर्माण करून आत्मविश्वास पूर्वक निर्भयपणे देवदेवतांची पूजा अर्चा सुरू करण्याचे कार्य सुरु झाले. समर्थ रामदासांनी 'त्यांच्या शिष्यमंडळींना शिस्तप्रिय आचाराचे आणि सामूहिक रामभक्तीचे धडे शिकवून त्यांची ठिकठिकाणी नेमणूक केली. त्यामुळे प्रपंच आणि परमार्थ यांच्या समन्वयाचे तत्त्वज्ञान सर्व भारतभर पसरले. समर्थ रामदासांनी आपल्या शिष्यांबाबत प्रयत्नपूर्वक कठिण पात्रता ठेवली होती आणि आचार विचारांच्या बाबतीतही त्यांचे नियम अतिशय कडक होते.

त्यांच्या शिष्यगणात छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे सहकारी यांचा देखील समावेश होता.

समर्थ रामदासांनी आपल्या शिष्यांच्या बरोबरीनेच मुमुक्षू स्त्रियांनाही समर्थ संप्रदायात प्रवेश दिला. एवढेच नव्हे तर त्यांना धार्मिक क्षेत्रात प्रतिष्ठेचे स्थानही मिळवून दिले. यातून त्यांची उदार दृष्टी दिसून येते.

त्यांच्या साहित्यातून त्यांच्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान दिसून येते. बहुतांस राजी राखावे, लोकांना शहाणे करून सोडावे, समाजात अलिप्तपणे, निःस्पृहपणे वागावे, हे त्यांचे बहुश्रूत तत्त्वज्ञान आहे. प्रयत्नवादाचा त्यांनी उद्घोष केला असून आळणीपणाचा धिक्कार केला आहे. स्त्री दाक्षिण्य दाखवणे हा समर्थ संप्रदायाचा आचार धर्म होता असे दिसते.

## २इ२.४ समर्थ रामदासांची साहित्य संपदा

समर्थाच्या साहित्याचा समग्रपणे विचार करता त्यांच्या वयाप्रमाणे त्यांच्या साहित्यात परिपक्वता येत गेली असे दिसते. सुरवातीच्या त्यांच्या साहित्यातून कारुण्य, श्रीराम दर्शनाची तळमळ दिसून येते.

### २इ२.४.१ करुणाष्टके:

समर्थ रामदासांनी आपल्या सुरवातीच्या म्हणजे साधक काळात या " करुणाष्टकांचे" लेखन केलेले दिसते. अतिशय करुणरसाने भरलेली अशी ही रचना असून मनाचा कोलाहल करुणाष्टकात मांडला आहे. रामाची अगदी व्याकुळ पणे आराधना करून देखील रामाचे दर्शन होत नाही त्यामुळे त्यांच्या मनाची जी अवस्था निर्माण झाली ती त्यांनी या करुणाष्टकातून मांडलेली दिसते. रामदर्शनाची तळमळ धडपड या काव्यातून अगदी सुस्पष्टपणे दिसून येते.

"अनुदिन अनुतापे तापलो रामराया।

परमदिन दयाळा निरसी मोहमाया।

अचपळ मन माझे नावरे आवरिता।

तुजविण क्षण होतो धाव रे धाव आता॥" यातुन हे दिसून येते.

"भजन रहित रामा सर्वही जन्म गेला।

स्वजन जनधनाचा व्यर्थ ज्ञान गर्व केला॥"

आपल्या मनाच्या विविध भावावस्था त्यांनी यातून व्यक्त केल्या आहेत. एकीकडे गर्वाने पस्तावलेली, प्रभू श्रीरामांचे दर्शन होत नाही म्हणून संतप्त झालेली, तर दुसरीकडे टोकाची व्याकुळता, आर्तता अशा अवस्थांचे वर्णन त्यांच्या करुणाष्टकातून घडते. भक्तीरसाने ओथंबलेली अशी ही रचना असून याचा रचनाकाळ साधारणपणे इ.स. १६२५ ते इ.स. १६३० च्या दरम्यानचा असावा असे म्हटले जाते.

## २इ२.४.२ रामायणे :

प्रभू रामचंद्र हे संत रामदासाचे आराध्य दैवत असल्यामुळे रामदासांनी दोन रामायणे त्यांच्यावर लिहिली. अर्थात केवळ रामचरित्र सांगणे हा त्यांचा हेतू नव्हता हे त्या रामायणांना वाचल्यावर कळते. तत्कालिन समाजाला जी एक ग्लानी आली होती . एक मैंद्य चढले होते. त्या परिस्थितीला बदलून टाकण्यासाठी, समाजात जागृती निर्माण करण्यासाठी, समाजात एक चैतन्य निर्माण करण्यासाठी या रामायणनिर्मिती मागे हेतू होता असे दिसते. अन्यायाविरुद्ध लढणाऱ्या प्रभू रामचंद्राचा आदर्श समाजात निर्माण व्हावा, समाजाला आलेली शिथिलता दूर व्हावी, समाज सुसंघटित व्हावा, आपल्या पूर्व परंपरांचा अभिमान जो लोप पावला होता तो पुन्हा त्यांच्यात निर्माण व्हावा हा या रामायण निर्मिती मागील हेतू होता. त्याचप्रमाणे अन्यायाचा निःपात करणारा आधुनिक राम निर्माण होईल अशी अपेक्षा त्यांनी या रामायणातून व्यक्त केली होती.

श्री रामदास स्वामींनी लिहिलेल्या रामायणात ‘किष्किंधाकांड’, ‘सुंदरकांड’ व ‘युद्धकांड’ अशी तीन कांडे दिसून येतात. या दोन रामायणांपैकी एक ‘लघुरामायण’ असून ते ‘प्रमाणिका’ छंदात लिहिले आहे. त्यात १२५ श्लोक असून युद्धकांड आहे. मूळ रामायणाची कथा पण रामदासांचे कौशल्य यात आहे की ते तत्कालिन समाजाला साजेसे, प्रेरणा देणारे, कृतीप्रवण करणारे अशा पद्धतीने लिहिले आहे. ग्लानी आलेल्या समाजाला प्रेरणा देण्याचे कार्य रामदासांच्या या रामायणाने केले आहे. रावणाच्या कैदेत बंदी असलेल्या देवदेवतांना प्रभू रामचंद्रांनी सोडवले. ‘बंदीचे सोडले देव । आनंदी घातले सदा ।’ असे वर्णन त्यात आले आहे.

सुंदर आणि युद्ध कांड अशी दोन कांडे मिळून ‘दीर्घ रामायण’ असून याची रचना भुजंगप्रयात वृत्तात केली आहे. दुसरे रामायण १४६२ श्लोकांचे असून वीररसपूर्ण आहे. अतिशय जिवंत असे चित्रण केले आहे. ‘तत्कालिन परिस्थितीत लोकांचा आत्मसन्मान वाढीस लागावा, स्वधर्माचे रक्षण व्हावे, परकीय आक्रमणांचा विरोध केला जावा अशा प्रकारचे आदर्श समाजात साहित्याच्या माध्यमांतून निर्माण व्हावे यासाठी या रामायणाची रचना झाली असे म्हणता येईल.

## २इ२.४.३मनाचे श्लोक:

मनाचे सामर्थ्य किती असते हे समर्थ रामदासांनी आपल्या मनाचे श्लोक या काव्याची रचना केली. दासबोधातील विचार, तत्त्वज्ञान सामान लोकांना समजेल अशा सोप्या भाषेत केलेले आहे. या श्लोकाची रचना भुजंगप्रयात या वृत्तात असून त्याची संख्या २०५ इतकी आहे.

मना वासना दृष्ट कामा नये रे ।

मना सर्वथा पाप बुद्धी नको रे ।

मना धर्मता नीती सोडू  नको हो ।

मला अंतरी सार विचार राहो ॥

असा नीतीचा, पुण्याचा, विवेक, सदाचाराचा, धर्मअधर्मता याचा उपदेश करतात.

नको रे मना क्रोध हा खेदकारी।

नको रे मना काम नाना विकारी॥

नको रे मना लोभ हा अंगिकारू।

नको रे मना मत्सरु दंभ भारु॥

देहे त्यागितां कीर्ति मागें उरावी।

मना सज्जना हेचि क्रीया धरावी॥

मना चंदनाचे परी त्वां झिजावे।

परी अंतरीं सज्जना नीववावे॥

अशा अनेक सुविचार सदृश्य वचनांतून समर्थ रामदासांनी मनाला म्हणजेच मानवी मनाला बोध केला आहे. समाजाला एक सन्मार्ग दाखवण्यासाठी, समाजाने कृतिप्रवण होऊन अन्यायाविरुद्ध लढावे यासाठी मनाच्या श्लोकाची रचना झालेली दिसते.

**२इ२.४.४ दासबोध:**

रामदासांनी मांडलेले सर्व तत्त्वज्ञान, विचार, नीति-अनिती, धर्माचरण या सगळ्या गोष्टी रामदासांच्या "दासबोध" या ग्रंथात प्रकर्षाने दिसून येतात.

श्री समर्थ रामदासांचे प्रगल्भ आणि परिपक्व व्यक्तिमत्व या ग्रंथातून दृष्टोत्पत्तीस पडते. त्याची ओवी संख्या ७७५१ इतकी असून इ.स. १६८१ मध्ये हा ग्रंथ पूर्ण झाला. वेगवेगळ्या वेळी प्रसंगी लिहिलेले समास एकत्र करून दशकांमध्ये विभागणी करून त्यांची एक सुंदर बांधणी नंतर केली असावी. याच्या पूर्वाधात ३८६६ तर उत्तरार्धात ३८८५ ओवी संख्या असून पूर्वाधात आठ दशक तर उत्तराधात बारा दशक आढळतात.

दासबोधाच्या पहिल्या सात दशकांत 'अध्यात्म विवेचन 'असून आठव्या दशकाचे नाव ज्ञानदशक आहे. त्यात भक्तीमार्ग सांगितलेला आहे पण रामदासांना ही भक्ती डोळस भक्ती अभिप्रेत आहे. हा ग्रंथ भक्तीज्ञान, वैराग्याचा आहे. यात भागवतधर्मात अपेक्षित अशा नवविध भक्तीचा उपदेश केला आहे. दासबोध लिहिण्यामागील प्रयोजन ते खालील अभंगातून स्पष्ट करतात.

"पहिले ते हरिकथा निरूपण। दुसरे ते राजकारण।

तिसरे ते सावधपण। सर्व विषयी॥

तर दासबोध ग्रंथाची फलश्रृती सांगतांना ते म्हणतात,

"आता श्रवण केलियाचे फळे। क्रिया पालटे तात्काळ।

तुटे संशयाचे मूळ। येकसरा॥

आळशी तेचि साक्षपी होती। पापी तोचि प्रस्तावती।

निंदक तोचि वंदू लागती। भक्तिमार्गासी ॥

या ग्रंथातून जीवनविषयक तत्वज्ञान, सदगुरुचे महत्त्व, विवेकीपणा आणि त्यातून येणारे वैराग्य, आदर्श पुरुषांची लक्षणे त्याच बरोबर मूर्खाची लक्षणे देखील रामदास स्वामींनी सांगितली आहेत. संसाराचा त्याग न करता प्रपंच न सोडता देह कारणी जोडावा आणि चंदना सारखे झिजून आपल्या किर्तीचा परिमळ जगात पसरावावा.

"राजधर्म आणि क्षात्रधर्म" या प्रकरणात राजकारणविषयक जागृत सावधानता बाळगायला सांगतात.

"जितुके काही आपणास ठावे।

तितुके इतरांसी शिकवावे।

शहाणे करून सोडावे सकळजन ॥

समाज जागृती कारण सर्वसामान्य जनांसाठी दासबोध हा एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे असून त्यात धर्म, अर्थ, राजकारण, समाजकारण, साहित्य, विज्ञान, कला, शास्त्र, व्यवस्थापन, नीतिमूल्ये अशा सर्व क्षेत्रांतील समस्यांचे समाधान मिळते.

**२इ२.४.५ रामदासांचे इतर वाङ्मय:**

वरील साहित्य संपदेशिवाय रामदासांची काही साहित्य रचना महत्वपूर्ण आहे त्याचा परिचय पुढीलप्रमाणे आहे. 'तीर्थयात्रा करीत असताना रामदासांना जी समाजाची ग्लानी आलेली स्थिती दिसली त्या समाजाला कृतिप्रवण करण्यासाठी रामदासांनी जी काही रचना केली ती पुढीलप्रमाणे आहे.

**'अस्मानी सुलतानी':**

या स्फूट  प्रकरणात समर्थ रामदास म्हणतात 'आता नाना तंटे बखेडे ' म्लेंच्छ राजांच्या राज्यामुळे ठिकठिकाणी उरूस भर लागले आहेत. थोडक्यात स्वधर्म लयाला गेला असून परधर्माचे आक्रमण झाले आहे.

**परचक्र निरूपण:**

या स्फूट प्रकरणाच्या शीर्षकावरूनच परकीय आक्रमणामुळे समाजाची झालेली स्थिती विदीत होते. सकल जन चिंताग्रस्त असून कोणीही सुखी नाही, भयमुक्त नाही. समाज विविध अनैतिक कृत्यांनी रसातळाला जात आहे एक निराशा, उदासिनता समाजात पसरली आहे असे या प्रकरणात वर्णन केले आहे.

*** आनंदवनभुवन:**

इ.स.१६४४ मध्ये "लिहिलेल्या या स्फूट प्रकरणात भविष्यकालीन उज्ज्वल भवितव्याची कल्पना केली आहे. "देहत्यागासी येणे हा। आनंदवनभुवनी ॥" असे म्हटले आहे.

महाराष्ट्रावरील सर्व संकटे नाहिशी होऊन पाप्यांचा, अभक्तांचा नाश झाला. सर्वत्र आनंदी आनंद झाला असे वर्णन केले आहे.

**रामवरदायिनी:**

हे भवानी देवीस उल्लेखून लिहिलेले काव्य आहे. ते आपल्या कुलस्वामीनी तुळजाभवानीला रामवरदायिनी म्हणतात. शिवराज्य स्थापन व्हावे असे यात मागणे मागितले आहे.

**भीमरूपी स्तोत्रे:**

यात मारुतीची एकूण तेरा स्तोत्रे लिहिली आहेत.  याशिवाय, 'जनस्वभाव गोसावी', ' जुनाट पुरुष',' निर्गुण ध्यान', 'मानसपूजा' इ. अध्यात्मिक प्रकरणे देखील लिहिली आहेत. तसेच शिवरायांना पत्रातून

"निश्चयाचा महामेरू। बहुत जनांचे आधारु

अखंड स्थितीचा निर्धारू। श्रीमंत योगी ॥

यशवंत, कीर्तीवंत, सामर्थ्यवंत, वरदवंत, पुण्यवंत, नीतीवंत, जाणता राजा असे शिवरायांचे अतिशय योग्य असे गुणधर्म या पत्रात केले आहे.  याशिवाय असंख्य धाट्या, सवाया, पदे, भूपाळ्या, वारी गीते, मारुतीची आरती, शंकराची आरती, गणपतीची आरती या आरत्या देखील श्री समर्थ रामदासांनीच लिहिल्या आहेत.

**श्री समर्थ रामदासांच्या लेखनाची वैशिष्टये:**

रामदासांच्या लेखनाचा हेतू अध्यात्म निरूपण असून त्याचबरोबर देशातील परिस्थितीचे चित्रण करून समाजात जागृती करणे हा प्रमुख हेतू होता. अफाट ज्ञानाचा सागर असलेले रामदास दासबोधात अतिशय व्यासंगीपणे प्रकट झालेले दिसतात. त्याची लेखन शैली त्यांच्या स्वभावानुसारच ओजस्वी तेजस्वी असून तशाच स्फूर्तीदायक शब्दांचा वापर ते करताना दिसतात. योग्य ती शब्दकळा, विशेषणे, समर्पक  प्रसंगचित्रणे, प्रभावी व्यक्तिचित्रणे, कल्पना विलासाचा स्वच्छेद वापर, विविध अलंकारांचा उन्मुक्त वापर, अशा वाङ्मयीन गुणांनी युक्त रामदासांचे साहित्य दिसते. त्यांच्या साहित्यावर पुनरुक्ती, अशुद्धता, पाल्हाळ इ दोषांचा आरोप करण्यात आला असला तरी तत्कालिन ग्लानी आलेल्या समाजात नवचैतन्य आणण्याचा प्रयत्न त्यांच्या साहित्याने केला आणि आज देखील त्यांचे साहित्य दीपस्तंभाप्रमाणे प्रापंचिक माणसाला दिशा दाखवण्याचे काम करते.

## २इ२.५ रामदासांचा शिष्यपरिवार

रामदासांच्या काळातील रंगनाथ स्वामी निगडीकर, केशव स्वामी भागानगरकर, जयराम स्वामी वडगावकर आणि आनंद मूर्ती ब्रम्हनाळकर हे चार कवी आणि स्वतः समर्थ रामदास या सर्वांना मिळून 'दास पंचायतन' असे म्हटले जाते. याशिवाय समर्थ रामदासांचे बंधू रामीरामदास म्हणजेच श्रीश्रेष्ठ, समर्थांचे शिष्य दिनकर स्वामी आणि कल्याण स्वामी,

समर्थांच्या शिष्य वेणाबाई आणि वेणाबाईंची शिष्या बयाबाई या प्रमुख कवी कवयित्रींचा समर्थांच्या शिष्य परिवारात म्हणजेच समर्थांच्या प्रभावळीत समावेश होतो.

*** समर्थांच्या शिष्यपरिवाराची ग्रंथसंपदा:**

### २इ२.५.१ रंगनाथ स्वामी निगडीकर:

यांनी गुरु गीता राम जन्म, गजेंद्र मोक्ष, निजानंद साधने, सुदाम चरित्र, शुकरंभासंवाद, पंचीकरण, मिथ्यामाया स्वरूप श्री एकाखडी ओव्या, बद्ध मोक्ष निवारण पदे, अष्टके भानुदास चरित्र, योग वासिष्ठ सार या ग्रंथावरील टीका, गरुड सत्यभामा, गर्वहरण, रामचरित्र, अशी बरीच रचना केली असावी; पण दोन-तीन वेळा लागलेल्या आगीमुळे मठातील कागदपत्रे जळून त्यात ती नष्ट झाली असे दिसते.

### २इ२.५.२ केशव स्वामी भागानगरकर:

यांनी ८४७ पदे, ४५ सवाया, २१८ श्लोक अशी काव्यरचना केली.

### २इ२.५.३ जयराम स्वामी वडगावकर:

यांनी श्रीमद्भागवत दशम स्कंद टीका पूर्वार्ध, रुक्मिणी स्वयंवर, सीता स्वयंवर शनिभक्त-संवाद, शांती पंचीकरण अपरोक्षानुभव हे ग्रंथ लिहिले.

### २इ२.५.४ आनंद मूर्ती ब्रह्मनाळकर:

यांनी रामचरित्र काही भूपाळ्या पदे अशी साहित्यरचना केली.

### २इ२.५.५ श्रीश्रेष्ठ किंवा श्रीरामीरामदास:

यांनी 'भक्ती रहस्य' 'सुगम उपाय' हे दोन ग्रंथ लिहिले. याशिवाय कुलकर्ण कथा, सरवदा, नामस्मरण, वासुदेव, जोगवा, सीता शोक, मायानिरास, सहजानंद, वैभवचा वीट इत्यादी फूट काव्य त्यांनी लिहिली आहेत.

### २ इ२.५.६ समर्थ शिष्य दिनकर:

यांनी 'स्वानुभवदिनकर' हा महत्त्वाचा ग्रंथ लिहिला. याशिवाय अभंग, सवाया, पदे व श्लोक इत्यादी प्रकारचे स्फूट रचनाही त्यांनी केली आहे.

### २ इ२.५.७ कल्याण स्वामी:

'श्री समर्थ शिष्य कल्याण' या ग्रंथात त्यांची बहुतेक कविता समाविष्ट झाली आहे. 'महावाक्य पंचकरण सोल्यु सुख इत्यादी फूट प्रकरणे, चौचरणी, ओव्या, स्फूट श्लोक, अष्टपदे, सवया, भुपाळ्या, आरत्या, पदे, अभंग अशा विविध प्रकारची रचना कल्याण स्वामींनी केली असून तिची एकूण संख्या १४४८ आहे.

**२ इ२.५.८ समर्थ शिष्या वेणाबाई:**

वेणाबाईंचा जन्म कोल्हापूर येथील देशपांडे घराण्यात इसवी सन १६२७ च्या सुमारास झाला. वयाच्या दहाव्या वर्षी विधवा झाल्यामुळे त्यांचे वृत्ती विरक्त बनली आणि भक्ती मार्गाकडे त्यांचा ओढा वाढला. वेणाबाईंची कार्य कुशलता पाहून उपहारगृहाची व्यवस्था ठेवण्याचे काम समर्थ रामदासांनी त्यांच्यावर सोपवले होते तसेच सभेत उभे राहून कीर्तन करण्याचे समर्थांचे परवानगी या एकाच शिष्यला मिळाली होती.

त्यांनी 'उपदेश रहस्य- कौल', 'पंचीकरण श्रीरामगुहसंवाद', 'सिंहासन व सीता स्वयंवर', आणि काही स्फूट पदे अशी ग्रंथरचना केली आहे.

*** उपदेशरहस्य कौल:**

रावणाचा वध करून जेव्हा १४ वर्षांनी सीतेसह राम परत अयोध्ये झाले आणि भरताच भेटले त्यावेळी प्रजा त्यांच्याकडे कौल मागावयास आले. कौल म्हणजे राजाकडून प्रजेस मिळणारे अभय पत्र प्रजन्य कोणता कौल मागितला हे या २४ लोकांच्या प्रकरणात सांगितले आहे धनधान्य काही बैलगाड्या, कन्या कलत्रे, समृद्धी, सौख्य, तारुण्य, निर्विघ्नता, द्रव्यपरायणता यांचा कौल प्रजेने मागितला प्रजा जन कधीही दाद मागण्यास आले असता त्यांना अडकाठी असू नये अशीही विनवणे राजानी केली होती.

*** श्रीरामगुह संवाद:**

प्रभू रामचंद्र वनवासाच्या वेळी भागीरथी किनारी आले असता गुहास गंगा पार नेण्याची विनंती रामचंद्र यांनी केली त्यावेळेस संवाद या प्रकरणात ग्रंथीत केला गेला आहे. सीता स्वयंवर वेणाबाईंच्या 'सीता स्वयंवर' या ग्रंथात स्त्री सुलभ स्वभाव आणि भक्ती प्रेम दिसून येते. तत्कालीन चालीरितीचे दर्शन या ग्रंथातून होत असल्यामुळे या स्वयंवराला ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्व आहे. वेणाबाईंच्या पदरचनेतून त्यांचे मनोगत अविष्कृत झालेले दिसते. साधक अवस्थेतील तळमळ आणि त्यानंतर प्राप्त झालेली निरामय अवस्था वेणाबाईंच्या या स्फूट पदरचनेतून दिसून येते.

*** वेणाबाई शिष्या बयाबाई रामदासी:**

यांनी 'पदे', 'श्लोक', 'ओव्या' व 'आर्या' असे विविध प्रकारची रचना केली आहे. मराठी पदांबरोबरच त्यांची उर्दू पदेही सुंदर आहेत.

*** गिरीधर:**

बयाबाई यांचे बंधू गिरीधर हे असून त्यांनी 'श्री समर्थ प्रताप', 'श्री ग्रंथ भावार्थ', याशिवाय 'श्री दासबोध ग्रंथ', 'राज भावार्थ', 'श्री आत्मानुभव', 'श्री गुरुमार्ग', 'श्री गुरुदेव', 'श्री गुरुरूप', 'शिष्यशासन', 'श्री गुरुदीक्षा', 'श्री स्वामी दर्शन' इत्यादी ग्रंथात गुरु- शिष्य संबंधाचे उपदेशात्मक विवेचन केले आहे. त्याचप्रमाणे अभंग, पदे वगैरे साहित्य संपदा देखील लिहिली.

## २इ२.६ समारोप

रामदास स्वामींच्या शिष्य गणात मोडणाऱ्या या कवींच्या ग्रंथसंपदेचे अवलोकन केल्यास हे स्पष्ट होते की याचे बाह्यरंग वेगळे असले तरी अंतरंग एकच अध्यात्मपर आहे त्यांच्या रचनेत पदे, भुपाळ्या, श्लोक, सवाया, आरत्या असेच फूट प्रकार आहेत त्याचप्रमाणे काही तत्त्वज्ञानपर ग्रंथ ही आहेत. प्रपंच परमार्थाची एकरूपता, माया- स्वरूप यावरच या ग्रंथांमध्ये मुख्य भर दिला गेला आहे.

## २इ२.७ संदर्भग्रंथ

१. करंदीकर, वि. रा., २०१० 'टीका आणि विवेचनपर वाङ्मय' मराठी वाङ्मयाचा इतिहास: खंड दुसरा, भाग पहिला, महाराष्ट्र साहित्य परिषद , पुणे

२. भावे, वि. ल. (पुरवणी, शं. गो. तुळपुळे), १९८२: महाराष्ट्र सारस्वत, पॉप्युलर प्रकाशन , मुंबई., सहावी आवृत्ती

३. फाटक, न. र.:श्री रामदास वाङ्मय आणि कार्य

४. देशपांडे, अ. ना.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खंड १ ते ४ व्हिनस प्रकाशन, पुणे

५. आंतरजाल:-

https://www.esakal.com/culture-and-religion/sant-tukaram-maharaj-jayanti-2024-famous-abhang-aam99

६. आंतरजाल:-

https://pocketbiography.com/tukaram-maharaj-information-in-marathi/

## २इ२.८ पूरक वाचन

१. देशपांडे, अ. ना.: प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, खड तिसरा, व्हीनस प्रकाशन, पुणे.

२. मनाचे श्लोक

## २ इ२. ९ प्रश्नावली

**अ. दीर्घोत्तरी प्रश्न**

१. समर्थ संप्रदायाचे संस्थापक श्री रामदास स्वामी यांच्या वाङ्मयीन कार्याचा सोदाहरण परिचय करून दया.

२. संत रामदासांच्या साहित्य लेखनामागील प्रेरणा सविस्तर स्पष्ट करा.

३. समर्थ संप्रदायाचे उद्दिष्टये, तत्त्वज्ञान आणि आचारसंहिता स्पष्ट करा.

४. समर्थांच्या शिष्य परिवाराच्या साहित्याचा आढावा घ्या.

५. समर्थ संप्रदायाचा थोडक्यात परिचय करू द्या.

**ब. टीपा लिहा**

१. संत रामदासांचे मनाचे श्लोक

२. संत रामदासांची स्फूट प्रकरणे

३. दासबोध

४. समर्थ शिष्या वेणाबाई

५. समर्थ संप्रदायाचे तत्वज्ञान

**क. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. 'मनाचे श्लोक' या काव्याची रचना कोणत्या संताने केली?

**उत्तर- समर्थ रामदास**

२. वेणाबाईचा जन्म देशपांडे घराण्यात कोणत्या गावी झाला?

**उत्तर- कोल्हापूर**

३. समर्थ रामदासांनी --------------- येथील मसूर या गावी रामजन्मोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा केला

**उत्तर- सातारा**

४. कोणी लिहिलेल्या रामायणात किष्किंधाकांड, सुंदरकांड व युद्धकांड अशी तीन कांडे दिसून येतात.

**उत्तर- श्री रामदास स्वामीं**

५. वेणाबाईंची शिष्या कोण आहेत?

**उत्तर- बयाबाई**

*****